# ई-अभिव्यक्ती (मराठी) – दिवाळी अंक – 2023

अंक - 2



e-abhivyakti

www.e-abhivyakti.com





# संपादकीय

बघता बघता यंदाची दिवाळी आलीसुद्धा. दिवाळी म्हणजे दिव्यांचा उत्सव... दिवाळी म्हणजे आनंदोत्सव... दिवाळी म्हणजे नात्यांचा उत्सव... आताच्या काळात एक फॅमिली गेट-टुगेदर... उत्साहाची आतषबाजी... दिवाळी म्हणजे सुगंधी तेलं-उटणी लावून केलेलं अभ्यंगस्नान. दिवाळी म्हणजे वेगवेगळ्या चवी, वेगवेगळे आकार, वेगवेगळे प्रकार असलेला फराळ.

—- आणि हो.. या सगळ्याच्या जोडीने मिळणारा वैविध्यपूर्ण साहित्याचा फराळही. दिवाळीला - विशेषतः मराठी दिवाळीला - पूर्णत्व देणारी.. इतकंच नव्हे तर दिवाळीचं अविभाज्य अंग झालेली अजून एक गोष्ट म्हणजे स्वतःचे वेगळेपण जपणारे देखणे आणि अभिरुचीपूर्ण अनेक दिवाळी अंक.... आणि त्यापैकीच एक आपला हा ई-अभिव्यक्तीचा विशेष म्हणावा असा" ऑनलाइन" दिवाळी अंक. हा अंक आपल्यासमोर प्रस्तुत करतांना मला अतिशय आनंद होतो आहे.

ई-अभिव्यक्तीने गेल्या वर्षी काढलेल्या दिवाळी अंकाला वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. आणि आता हा या वर्षीचा ई-अभिव्यक्तीचा हा दुसरा दिवाळी अंक. उत्तम कथा, विविध विषयांवरील लेख, निवडक कविता, दोन एकांकिका, याचबरोबर पुस्तक परिचय व चित्रकाव्यं यांनी हा दिवाळी अंक नटला आहे. जोडीला विनोद व सुविचार वगैरेंची पानपूरकेही आहेत. या वाङमयीन फराळाचा मनमुराद आस्वाद घेऊन वाचकांची मने नक्कीच तृप्त होतील, याची आम्हाला खात्री आहे.

ई-अभिव्यक्तीने आतापर्यंत खूपच मोठी मजल मारली आहे. आपल्या वाचकवर्गाने पाच लाखाचा आकडा केव्हाच पार केला आहे. एका संस्थेतर्फे हजारो मराठी ब्लॉग्जमधून, आपणहून, ९० उत्कृष्ट ब्लॉग्ज निवडले गेले, त्यांत ई-अभिव्यक्तीचा क्रमांक २८वा आहे, ही अभिमानाची गोष्ट आपणा सर्वांना ज्ञात झालेलीच आहे.

आणखी एक गोष्ट इथे सांगावीशी वाटते. ती अशी की, या मराठी दैनिकाला यंदा तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. असे जरी असले, तरी हा मूळ ऑनलाइन अंक सुरुवातीला इंग्लिश-हिन्दी-मराठी या तीनही भाषात एकत्रितपणे प्रकाशित होत असे, आणि त्यादृष्टीने यंदा आपल्या ई-अभिव्यक्तीला पाच वर्षे पूर्ण होत आहेत हे सांगतांना खूप आनंद आणि संतोष वाटत आहे.

आपल्या कित्येक कवी-लेखकांना साहित्यक्षेत्रात वेगवेगळे पुरस्कार देऊन गौरवले गेले आहे. आपल्या एका लेखकाच्या ब्लॉगचा उत्कृष्ट ब्लॉग्जच्या यादीत समावेश आहे. एका लेखिकेच्या कथेचा बंगाली अनुवाद बांगलादेशच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला आहे. अशा आपल्या सर्वांमुळेच आपल्या ई-अभिव्यक्तीचा दर्जा सतत चढता राहिलेला आहे. ई-अभिव्यक्ती उत्कृष्ट ब्लॉगच्या यादीत आणखी वरच्या स्थानावर जाईल, याचा त्यामुळेच आम्हाला विश्वास वाटतो.

अर्थातच या यशस्वी वाटचालीत दर्जेदार साहित्यनिर्मिती करणारे आपले सर्वच लेखक, कवी, विविध प्रकारची विविध क्षेत्रातली नवी माहिती संग्रहित करून सादर करणारे अनेक सभासद, या सर्वांचे अतिशय मोलाचे योगदान आहे हे निर्विवाद सत्य आहे. या सर्वांचे अतिशय मनःपूर्वक आभार. आणि या सर्व यशातला वाचकांचा वाटा तर अतिशय मोलाचा आहेच.

वाचकांशी या अंकाच्या माध्यमातून संवाद साधतांना आपल्या सर्वांसाठीच अत्यंत अभिमानास्पद असणाऱ्या आणखी एका गोष्टीचा इथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो, आणि ती गोष्ट म्हणजे आपल्या देशासाठी अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था इत्यादी अनेक क्षेत्रात प्रचंड प्रगती करून आपल्या भारतदेशाने जगातल्या प्रगत देशांच्या यादीत आता आपलं स्थान पक्कं केलं आहे. हे देदीप्यमान यश. यामुळे देशा-परदेशातील सर्व भारतीयांची मान नक्कीच अभिमानाने उंचावली आहे, यात शंकाच नाही.

देशाचा हा प्रगतीपथावरील जोमदार प्रवास सुरू असताना, एकीकडे दुर्दैवाने काही नैसर्गिक किंवा इतर आपत्तींमुळे कित्येक नागरिकांची प्राणहानी वा इतर स्वरूपाचं नुकसान झालं आहे. प्राणहानी भरून येणं शक्य नाही. पण मागे उरलेल्यांना या दुःखावर मात करून, तसंच इतरांचंही नुकसान भरून येऊन त्यांचं जीवन जास्तीत जास्त सुरळीत होवो, अशी या अंकाच्या माध्यमातून आपण ईश्वरचरणी प्रार्थना करणे हे आपल्या प्रत्येक भारतीयाचे महत्वपूर्ण कर्तव्य आहे, आणि आमच्या या मताशी आपण नक्कीच सहमत असाल, याची खात्री आहे.

आपणा सर्वांना माझ्याकडून व मराठी विभाग संपादक मंडळाकडून दीपावलीच्या मनःपूर्वक असंख्य शुभेच्छा!"सर्वेपि सुखिनः सन्तु"

या अंकासाठी आपला असाच सहयोग असावा......

एक एक दिवा लागता

अंधार जातो पळून ....

मनातल्या प्रकाशाने

सर्वांचे जीवन जावो उजळून.....

हेमन्त बावनकर

**प्रधान संपादक**

## अनुक्रमणिका


व्यक्ति विशेष - श्री 5
व्यक्ति विशेष - डॉ. भारती माटे 5
चित्रकाव्य - शुभ दिवाळी - श्री सुहास रघुनाथ पंडित 7
चित्रकाव्य : शुभ दीपावली - श्री आशिष बिवलकर 8
कविता - शुभ दिपावली - श्री रविंद्र सोनवणे 9
कथा - प्रसीद विश्वेश्वरी! - सुश्री शांभवी मंगेश जोशी 10
लेख – दिवाळी अंक आणि मी... - सुश्री तृप्ती कुलकर्णी 17
कविता - मी मागतो.. - डॉ. विजयकुमार माने 20
कथा -"देवाची करणी" (मराठी भावानुवाद) - श्री मेघःशाम सोनवणे 21
लेख - श्रीकृष्णाला अनावृत्त पत्र - सौ. मंजिरी येडुरकर 25
कविता - खूळ - श्री सोमनाथ साखरे 26
कथा - गा बेटी गा - सौ. उज्ज्वला केळकर 27
लेख - कचराकुंडी - श्री आनंद हरी 33
कविता - शब्दांची रुपे - सुश्री त्रिशला शहा 37
कथा - अंगठी- सुनीता गद्रे 38
लेख - भूमिका! - श्री प्रमोद वामन वर्तक 44
स्टीव्ह आणि मी - पुस्तक परिचय - सुश्री रेखा दयानंद हिरेमठ 47
कविता - आभार - श्री राजकुमार कवठेकर 49
कथा - इकडे आड तिकडे विहीर - प्रणिता खंडकर 50
लेख - केशवाय नमः - सुश्री अरुणा मुल्हेरकर 54
एकांकिका - तुझी सावली... - श्री अरविंद लिमये 56
कविता - डोंगरातल्या घरात माझ्या... - श्री आशिष मुळे 68
कथा - मन के"शोले" - श्री मंगेश मधुकर 69
चित्रकाव्य - तरीही... - सुश्री नीलांबरी शिर्के 73
लेख - भारताची पंचाहत्तर वर्षांतील वैज्ञानिक प्रगती - श्री राजीव गजानन पुजारी 74
कविता - मी कुठे लिहीतो आहे कविता? - श्री सुहास रघुनाथ पंडित 83
कथा - मृत्युंजयाचे उपासक - सुनील देशपांडे 84
लेख - पेस्तनजी घड्याळजीवाला.. - श्री नंदकुमार पंडित वडेर 87
पुस्तक परिचय - हिंदोळा - सुश्री विभावरी कुलकर्णी 90
कविता - जीवनातील इंद्रधनु - सुश्री दीप्ती कोदंड कुलकर्णी 92
कथा - काय रे... ओळखलंस का मला? - सुश्री मंजुषा सुनीत मुळे 93
लेख - नारायण नारायण - श्री अमोल केळकर 97
एकांकिका - पॅसिव्ह स्मोकर्स - डॉ. मिलिंद विनोद 99

कविता - व्योम व्यथांचे - श्री शरद कुलकर्णी ... 106
कथा - दु:ख - सुश्री गौरी गाडेकर ... 107
लेख :"दीड हजार नातवंडांचा 'श्रीमंत' आजोबा!" - श्री संभाजी गायके ... 112
पुस्तक परिचय - एका कोंबड्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य - सौ. वंदना हुळबत्ते ... 116
कविता - कंठातील गीत - डॉ. निशिकांत श्रोत्री ... 118
कथा -"घुसमट" - श्री व्यंकटेश देवनपल्ली ... 119
लेख –"सफर सौर कुटुंबासह." - सौ. पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई ... 123
पुस्तक परिचय - भिक्षेकऱ्यांचा डॉक्टर - सौ. सुनंदा शिवाजी कदम ... 126
कविता - पुतळ्यांचे मनोगत - सौ. विद्या पराडकर ... 128
कथा - स्थळ... - सौ. नेहा लिंबकर ... 129
रसग्रहण -"टाकीचे घाव"- सुश्री ज्योत्स्ना तानवडे ... 132
कविता - उमज - सुश्री शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी) ... 143
कथा - झिंग - सौ. राधिका भांडारकर ... 144
लेख - कवयित्री शांता शेळके स्मरण - सुश्री सुरेखा कुलकर्णी ... 147
चित्रकाव्य - मागे वळून बघतो तेव्हा - श्री प्रमोद जोशी ... 148
लेख - वस्त्रप्रावरण चिरस्वरुपी आनंद - सौ. दीपा नारायण पुजारी ... 149
कथा - घटस्फोटाची कागदपत्रे - सौ. सुनिता अनंत जोशी ... 152
पुस्तक परिचय - अडगुलं मडगुलं - सुश्री प्रेमा माधव कुलकर्णी ... 156
लेख - त्यांनी मला शिकवलं... - प्रा. डॉ. सतीश शिरसाठ ... 158
कथा - मिरॅकल - सौ अर्चना देशपांडे ... 159
लेख – चिंता आणि चैतन्य - श्री सतीश मोघे ... 163
कविता - ऐकू येई अंतर्नाद - सुश्री प्रभा सोनवणे ... 167
कथा - प्राजक्त - सुश्री संगीता कुलकर्णी ... 168
लेख - पर्णपाचू - सौ. अमृता देशपांडे ... 170
कथा - अपुरा त्रिकोण - श्री प्रदीप केळूसकर ... 173
लेख – करिअरिस्टीक मुला-मुलींसाठी लग्न अडथळा की आधार - डॉ. सोनिया कस्तूरे ... 180
कथा - स्पर्धा... - डॉ. ज्योती गोडबोले ... 182
चित्रकाव्य - समानता - सुश्री वर्षा बालगोपाल ... 187
लेख - भाग्यवान मी... - सौ. अंजली धडफळे ... 188
कथा - लिली लालू लेले - सौ अंजली दिलीप गोखले ... 191
लेख –"शूटींग - वेगळी ती दुनिया" - श्री सुनील काळे ... 193
चित्रकाव्य - मुखवटे - सुश्री नीलांबरी शिर्के ... 197
लेख - हॅप्पी हार्मोन्स ची काळजी घ्या आणि निरोगी आयुष्य जगा - सौ. मुक्ता महेश अभ्यंकर ... 198
लेख - शाळा सुटता, पुस्तक मिटता, दिवाळीची सुट्टी लागता... डॉक्टर मीना श्रीवास्तव ... 201
चित्रकाव्य - अनोखे अर्थविश्व - आशिष बिवलकर ... 204

## व्यक्ति विशेष - श्री संदीप राशिनकर



(चित्रकार आणि लेखक)

**जन्म :** ७ मे १९५८, इंदोर
**शैक्षणिक अर्हता :** बी.ई. ( सिव्हिल )
श्री. संदीप राशिनकर हे सुपरिचित आणि मान्यवर चित्रकार, लेखक आणि समीक्षक आहेत.
आत्तापर्यंत अनेक अखिल भारतीय कला प्रदर्शनांसाठी त्यांच्या चित्रांची आवर्जून निवड केली गेलेली आहे. तसेच, मुंबई, गोवा, इंदोर, निमच,या ठिकाणी आणि लंडनमध्येही त्यांच्या चित्रांची स्वतंत्र प्रदर्शने भरवली गेलेली आहेत.
राष्ट्रीय पातळीवर प्रकाशित केल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांमध्ये आणि साप्ताहिकांमध्ये आत्तापर्यंत त्यांची अक्षरशः हजारो चित्रे आणि रेखांकने प्रकाशित झालेली आहेत.
भारतीय ज्ञानपीठासह अनेक प्रतिष्ठित प्रकाशनांच्या शेकडो पुस्तकांची मुखपृष्ठे श्री. राशिनकर यांनी चित्रांकित केलेली आहेत. म्यूरल्सच्या क्षेत्रातही ते कार्यरत असून अनेक ठिकाणी अनेक प्रतिष्ठानांसाठी त्यांनी भव्य म्यूरल्स तयार केलेली आहेत. आणि त्यात अनेक अभिनव आणि यशस्वी प्रयोगही केलेले आहेत. ब्रास आणि स्टील यांचा वापर करून त्यांनी स्वतः अनेक कलाकृती साकारल्या आहेत, ज्या देश-विदेशातील अनेक कलाप्रेमींनी स्वतःकडे जतन करून ठेवल्या आहेत.
पत्नी सौ. श्रुती यांच्या सहयोगाने त्यांनी लिहिलेला "कुछ मेरी कुछ तुम्हारी" हा काव्यसंग्रह, आणि त्यांनी स्वतः लिहिलेले "कैनवासपर शब्द" हे पुस्तक– अशी त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झालेली असून दोन्हीही लोकप्रिय ठरलेली आहेत. तसेच पुरस्कारप्राप्तही ठरलेली आहेत. याखेरीज 'कला-संस्कृती' या विषयावरही त्यांनी बरेच लेखन केलेले असून, त्यांचे समीक्षात्मक लेखनही प्रकाशित झालेले आहे.
"जीवनगौरव" पुरस्काराबरोबरच देशभरातील अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी श्री. राशिनकर यांना सन्मानित केले गेलेले आहे.
**संपर्क:-**: ११-बी , मेन रोड , राजेंद्रनगर , इंदौर -४५२०१२ (म.प्र.)
**मो.** ९४२५३ १४४२२ / ८०८५३ ५९७७० email :rashinkar_sandip@yahoo.com
**Web Site.** http://www.sandiprashinkar.com

## व्यक्ति विशेष - डॉ. भारती माटे



(चित्रकार, लेखिका आणि कवयित्री)

**शैक्षणिक अर्हता :** M.Com, CAIIB, Ph.D.(from Irvine (USA) Sub: "Art History of Rangavali & Dry Frescos of Rangavali as Neo-Antiques".)
**Proprietor :** TAO ARTS, Pune **Creative Director** : TAO Communications, Pune
**संस्थापक** : भारती माटे फाईन आर्ट्स अँड रिसर्च सेंटर, पुणे. आर्ट वेलफेअर, पुणे.
भारती माटे यांच्या व्यक्तिमत्वाचे अद्वितीय म्हणावेत असे आणखी दोन पैलू आहेत... एक म्हणजे त्यांच्या समकालीन कलाकारांमध्ये त्याच एक अशा कलाकार आहेत, ज्यांना खरोखरच "आत्मशिक्षित" कलाकार म्हणता येईल.
दुसरी गोष्ट अशी की त्या "चित्रकार कवयित्री" आहेत. सर्जनशील असणारी त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता, कविता आणि चित्रकारिता अशा दोन्ही क्षेत्रात एकाचवेळी उत्तम प्रकारे कार्यरत असते. आणि या दोन्ही कार्यक्षेत्रात त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.
त्यांची ही वैशिष्ट्यपूर्ण आणि सुंदर रांगोळी चित्रे विक्रीसाठीही उपलब्ध आहेत.
**मो.** : +91 9890722120 Email : bharati.taoarts@gmail.com
**Web Site** : www.bharatimate.com Blog : https://bharatimate-painter.blogspot.com/

## चित्रकाव्य - शुभ दिवाळी - श्री सुहास रघुनाथ पंडित



लक्ष्मीची  पाऊले उमटली
घरोघरी दारोदारी
उल्हासाची लेवून वसने
सजली सृष्टी सारी

आकांक्षांचे दीप उजळती
तेज नवे लाभले
आता नको मनात किल्मिष
स्नेह दीप लागले

चिंता सा-या मिटून जाव्या
व्हावी सुख बरसात
उजळून गेली लक्ष ज्योतींनी
अवसेची ही रात



**श्री सुहास रघुनाथ पंडित** - सांगली (महाराष्ट्र) - मो - 9421225491

## चित्रकाव्य : शुभ दीपावली - श्री आशिष बिवलकर



श्री गणेश कृपेनें मिळू दे सुबुद्धी!
सरस्वती कृपेने होऊ दे ज्ञानात वृद्धी `

ज्ञानाचा दीप अखंड उजळू दे!
अज्ञानाचा तिमिर दूर जाऊ दे!

धन्वंतरी कृपेने सुदृढ राहू दे आरोग्य!
निरोगी दीर्घायुष्याचे लाभू दे सौभाग्य!




लक्ष्मी कृपेने मिळू दे धन!
आत्मकृपेने शुद्ध राहू दे मन!

हातून घडू दे सदैव शुभ कर्म!
शुद्ध अचरणाने रक्षू दे स्वधर्म!

कीर्ती वाढून मिळू दे समाजात मान!
हातून राखला जाऊ दे सर्वांचा सन्मान!

प्रगती साधण्यासाठी सार्थ होवो दे कष्ट!
विश्वगुरू होऊ दे आपण बलवान करू राष्ट्र!

व्यक्ती, कुटुंब, जात, धर्म यापेक्षा श्रेष्ठ देश!
राष्ट्र अभिमान बाळगावा बहरू दे उन्मेष!

दीपावलीच्या या शुभेच्छा देई हा आशिष!
ईश्वर कृपा परमात्म्याचे राहो शुभाष!

**शुभ दीपावली**

**श्री आशिष बिवलकर** - बदलापूर मो. ९५१८९ ४२१०५

## कविता - शुभ दिपावली - श्री रविंद्र सोनवणे



आली दिवाळी, दिवाळी
दीप चेतवा मनात
दुःख चिंतेचा पाचोळा
चला जाळू या तमात ||१||

आली दिवाळी, दिवाळी
तिला उधळू जनात
महालाच्या पायथ्याशी
जीर्ण झुकल्या कुटीत ||२||

आली दिवाळी, दिवाळी
तिला मिरवा बाजारी
क्षण थांबवू या तिला
कुठे उघड्या संसारी ||३||

अशी दिवाळी जाऊ द्या
थोडी अनाथालयात
तिला हसू द्या जराशी
भोळ्या उदास डोळ्यात ||४||

तिला विसावू द्या थोडे
याचकाच्या हथेलीत
त्याच्या आसवांचे मोती
हळू झेला ओंजळीत ||५||

तिची तेवणारी माळ
माळू कडेकपारीत
अर्ध नागड्या वस्तीत
आणि विझल्या चुलीत ||६||

अशी दिवाळी राजस
तिला गुंफून गाण्यात
स्वर घागरी ओतून
उभा भरू आसमंत ||७||

**श्री रविंद्र सोनवणे** - शहर - टिटवाळा, जिल्हा - ठाणे - मोबाईल नं. ८८९०४६२९९३

## कथा - प्रसीद विश्वेश्वरी! - सुश्री शांभवी मंगेश जोशी



पहाटेची वेळ होती. तसा काळोखच. पण पौर्णिमेच्या चांदण्यात परिसर उजळून निघाला होता. चंद्रबाला देवीचं मंदिरही चांदण्यात न्हाऊन निघालं होतं. 350 वर्षांपूर्वीचं हे प्राचीन मंदिर! पण अजूनही मंदिराच्या चिरा न् चिरा अभंग होत्या. काळ्या कातळात घडवलेलं मंदिर अपूर्व तेजानं चमकत होतं. मंदिराचं ते अनुपम सौंदर्य डोळ्यात साठवून घ्यावं असंच होतं.

मंदिराच्या समोरच्या तळ्याचं पाणी शांत, स्थिर होतं. त्या शांत पाण्यात पौर्णिमेचं चंद्रबिंब पडल्यामुळं वातावरण गूढरम्य झालं होतं. आजूबाजूच्या माडांच्या झावळ्यांच्या सावल्यांमुळं ती गूढरम्यता वाढत होती. दर पौर्णिमेला आणि त्यानंतरच्या प्रतिपदेला मंदिरात एक अभूतपूर्व दैवी चमत्कार घडून यायचा.

मंदिराच्या गाभाऱ्याला एक झरोका असा होता की, झरोक्यामधून दर पौर्णिमेला रात्री 12 वाजता चंद्राची किरणं थेट नेमकी देवीच्या नाकातल्या हिऱ्यावर पडायची. अपूर्व तेजानं गाभारा भरून जायचा. काही सेकंदच हा अदभुतरम्य प्रकाश गाभाऱ्यात भरुन रहायचा. त्या अपूर्व प्रकाशाचं तेज एवढं असायचं की. गाभाऱ्याच्या बाहेरही हा प्रकाश पसरायचा. त्या प्रकाशानं देवीचे मुखकमलही अलौकिक तेजस्वी दिसायचं. हा एक दैवी चमत्कारच होता. म्हणूनच या देवीला चंद्रबाला नाव पडलेलं असावं.

दर पौर्णिमेला हा अद्भुत चमत्कार पहाण्यासाठी शेकडो लोक मंदिरात गर्दी करत. हा प्रकाश आपल्या डोळ्यात साठवून ठेवावा, म्हणून पापणी न हालवता एकटक नजरेने बघत बसायचे. क्षणभरच आसमंत उजळून टाकणाऱ्या दिव्य प्रकाशाचा थोडासा तरी अंश आपल्यावर पडावा आणि आपलं आयुष्य उजळून जावं, अशा प्रगाढ श्रद्धेनं लोक मंदिरात गर्दी करत असत.

त्या दिव्य प्रकाशाच्या सोहळ्यानंतर मंदिरात प्रसाद वाटप व्हायचं. शेजारती होऊन देवीची शयनव्यवस्था व्हायची. प्रसाद ग्रहण करून लोक मंदिराच्या परिसरातच थांबायचे. कारण त्यानंतरच्या कृष्णप्रतिपदेच्या पहाटे पहिल्या प्रहरात कृपाशंकरजींचं दर्शन व्हायचं.

कृपाशंकरजी 'असाच एक देदीप्यमान दिव्य चमत्कार! ' त्यांचे आई, वडील, कुटुंब, त्यांचा जन्म याबद्दल कुणालाच काहीही माहीत नव्हतं. 50 वर्षांपूर्वी एका प्रतिपदेला पहाटे पुजाऱ्यानं मंदिराचा दरवाजा उघडला. तेंव्हा त्याला चंद्रबाला देवीच्या पायाशी एक तेजःपुंज बालक ध्यानस्थ बसलेला दिसला. पुजारी घाबरला, गोंधळला, विस्मयचकीत झाला. रात्री त्यानंच शेजारती करून गाभारा बंद केला होता. मंदिराच्या मुख्य दरवाजाला कुलुप घातले होते. मग हा बालक आत आला कसा? कोठून? या बालकाला पूर्वी कधी पाहिल्याचंही त्याला आठवत नव्हतं. तो कोणी सामान्य बालक वाटतच नव्हता. त्याच्या तेजानं पुजारी अक्षरशः दिपून गेला. त्याच्या तोंडून शब्दही फुटेना. त्याने नकळत हात जोडले आणि एखाद्या पुतळ्यासारखा स्तब्ध झाला. त्या बालकाला पाहाता- पाहाता त्याचे भान हरपून गेले.

किती वेळ तो असा उभा होता कोणास ठाऊक. सुमधुर आणि घनगंभीर आवाजातल्या काकडा आरतीने तो भानावर आला. त्या बालकानं आरती सुरू केली होती. तेंव्हापासून 50 वर्षे तो बालकच देवीची पूजा, आरती करू लागला. त्या बालकाच्या आवाजातली आरती, स्तोत्रं ऐकायची म्हणजे ब्रह्मानंद होता.

रोज पूजा करून हा बालक त्याची ध्यानधारणा, तपस्या करायचा. पूजा - आरती शिवाय एरव्ही कधीच तो कोणाला दिसायचा नाही. दररोज पहाटे पाच वाजता मंदिराच्या समोरच्या तळ्यात तो उडी मारायचा. स्नान करून ओलेत्यानं येऊन देवीची पूजा करायचा. तेंव्हाच फक्त तो लोकांना दिसायचा. त्याच वेळेस पुजाऱ्याला त्याच्या छातीवर ॐ स्पष्ट दिसला आणि त्यानंच त्याला 'कृपाशंकर' नाव ठेवले. तेंव्हापासून सारे लोक त्याला कृपाशंकर म्हणून ओळखू लागले. अर्थात नाव... आडनाव... उपाधी याच्याशी त्या बालकाला काहीच देणं-घेणं नव्हतं. हळूहळू वर्षे लोटली आणि सारे लोक त्या बालकाला कृपाशंकरस्वामी म्हणून ओळखू लागले.

व्रतस्थ नेमस्त आणि संयत असे कृपाशंकर! तेजस्वी तेवढेच गूढरम्य असे कृपाशंकर त्यांच्यासारखीच त्यांची वाणी ओजस्वी! देववाणी वाटावी अशी घनगंभीर!

देवीची आरती आणि स्तोत्रे याशिवाय कोणताच शब्द त्यांच्या मुखातून कधी कोणी ऐकला नाही. देवीच्या नैवेद्याशिवाय कोणताही घास त्यांनी खाल्लेला कोणी पाहिला नाही. देवीच्या मूर्तीशिवाय त्यांची नजर कधी इतस्ततः गेलेली कधी कोणाला दिसली नाही. त्यांच्या वाणीत, त्यांच्या नेत्रात, त्यांच्या मनांत, त्यांच्या हृदयात फक्त देवी आणि देवीचंच रूप होतं.

त्यांच्या भक्तीत ते एवढे मग्न असायचे की, त्यांच्या अवती-भवती काय चालले आहे, याचं जराही भान त्यांना नसायचं. त्यांच्या नित्यनेमात जराही चूक व्हायची नाही. त्यामुळे त्यांचं दर्शन हे देवीच्या किंवा दैवी दर्शनासारखंच साऱ्यांना वाटायचं. कृपाशंकरजींच्या हृदयात देवीसाठी ओतप्रोत भक्ती होती. त्यामुळे त्यांचं रुपही देदीप्यमान तेजानं झळाळणारं असंच होतं. कृपाशंकरजींचं दर्शन घेण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आसुसलेली असायची.

त्या पौर्णिमेलाही कृपाशंकरजींचं रूप सारे जण डोळ्यात साठवून घेत होते. नित्यनेमाप्रमाणे आजही पहाटे कृपाशंकरस्वामी ठरल्याप्रमाणे तळ्यावर स्नानासाठी गेले. स्नान करून परत मंदिराकडे निघाले, तेंव्हा त्यांच्या दर्शनासाठी लोकांनी अलोट गर्दी केली होती. जे लोक पुढे होते, त्यातला प्रत्येक जण त्यांच्या पायाखालची चरणधूळ मस्तकाला लावत होता. गर्दीत जमेल तसा साष्टांग नमस्कार घालत होता. स्वामींचं कुठेच लक्ष नव्हतं. नेहमीसारखे भक्तीत मग्न असे चालत ते मंदिरात पोहोचले.

मंदिरात पूजेची सर्व तयारी होती. परडीत मोठे मोठे सुगंधी हार, फुलं, एका पात्रात फळं, पंचामृत, तबकात भरजरी वस्त्र, सारं काही तयार होतं.

कृपाशंकरस्वामींनी पूजेला सुरवात केली. तत्पूर्वी त्यांनी पद्मासन घालून ध्यानाचे श्लोक म्हटले.

धृत्वा श्रीमातुर्लिंगम्.....

प्रसीद विश्वेश्वरि, पाहि विश्वम्

त्वमीश्वरी देवि चराचरस्य ॥

हा श्लोक संपवून ते काही वेळ ध्यानस्थ झाले. ते ध्यानस्थ असताना देवीच्या मुखावर प्रसन्न हास्य विलसत होतं. त्यानंतर उभं राहून ते देवीच्या मूर्तीवरील निर्माल्य काढू लागले. एकीकडे मुखाने 'नमो देव्यौ महादेव्यौ, शिवायै सततं नमः...... ' हे देवीसुक्त ते म्हणत होते.

नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमो नमः । या शब्दांना मंदिरातील सर्व स्वामीजींच्या लयीत त्यांच्या सुरात सूर मिळवायचे. त्या नादलहरींनी आसमंतात दैवी तत्त्व जागृत होत असावं. या दैवी वातावरणात सारे जण कानात आणि डोळ्यात प्राण आणून पूजा पहात होते. नव्हे, भक्तिरसाचं अमृत... प्राशन करीत होते. पूजा चालू असतांना स्वामीजींच्या मुखातून येणाऱ्या शब्दांशिवाय दुसरा कोणताच आवाज नव्हता. कुणाच्या बोलण्याचा तर नाहीच पण कोणाच्या पायांचा, श्वासांचाही आवाज नव्हता.

देवीची मूर्ती अत्यंत लावण्यरूप होती. प्रत्यक्ष विधात्यानंच ही मूर्ती घडवली असावी, एवढी ती अप्रतिम देखणी मूर्ती होती. देखणी असली तरी ती मूर्ती वाटत नव्हती. तर खरोखर एखादी देखणी स्त्री साक्षात उभी आहे, असं वाटायचं. ती आता नजर हलवेल, बोलू लागेल, असा भास होत राहायचा. भलेभले लोक मूर्तीकडे एकटक बघत तासन् तास बसून रहायचे. स्वामीजींच्या पूजेनं तर मूर्तीभोवती प्रसन्न तेजाची आभा पसरत होती. देवीचं रुप डोळ्यात साठवावं की, कृपाशंकरजींचं दर्शन घ्यावं अशी साऱ्यांची अवस्था झाली होती.

स्वामीजींनी देवीवरचं निर्माल्य काढलं, अलंकार उतरवले, जुनी वस्त्रं उतरवली देवीला पंचामृताने स्नान घातले आणि अचानक काय झालं कुणास ठाऊक! स्वामीजींच्या हातात जडपणा आला, हालचालींचा वेग कमी झाला, श्वासाची लय वाढली, ताठ उभे असलेले स्वामीजी, हळूहळू पुढे झुकत आहेत हे बघणाऱ्यांच्या लक्षात येत होतं; पण कोणाच्याही पूर्ण लक्षात येण्याच्या आत निमिषार्धात स्वामीजींचा तोल गेला. कोणी सावरण्याच्या आत ते मूर्तीवर कोसळले आणि लगेचच मूर्तीच्या चौथऱ्यावरून खाली फेकले गेले. प्रचंड आवाज झाला. क्षणभर तीव्र प्रखर प्रकाशानं गाभारा भरून गेला. देवीच्या मूर्तीला उभी चिर जाऊन ती दुभंगली. क्षणभर प्रकाशलेला गाभारा अंधारून गेला.

मंदिरात एकच हलकल्लोळ झाला. "काय झालं? काय झालं? ...... " कृपाशंकरजींच्या भक्तीचा हा साक्षात्कार असावा, असं काहींना वाटलं; पण स्वामीजी खाली पडलेले पाहून हाहाःकार उडाला. वैद्यांनी तातडीने स्वामीजींची नाडी पाहिली. त्यांचा श्वास चालू होता पण त्यांच्यातलं चैतन्यच संपल होतं. वैद्यांनी तत्परतेनं स्वामीजींना चाटण दिलं; पण स्वामीजींनी चाटणच काय; पण पाण्याचा थेंबही घेतला नाही. त्यांच्या नेत्रातून मात्र अखंड पाण्याच्या धारा वाहत होत्या आणि नजर देवीच्या मुखकमलावर स्थिरावलेली होती. दुभंगलेल्या मूर्तीतलंही चैतन्य हरवलं होतं. ऐन प्रतिपदेच्या दिवशी गाभारा नेहमी प्रकाशानं भरून गेलेला असायचा, तो आजच्या प्रतिपदेला अंधारून गेला होता.

साऱ्यांच्याच पायातलं बळ गेलं होतं. नेमकं काय झालं? स्वामींची देवीवर एवढी भक्ती, एवढी श्रद्धा... मग असं का? आणि... आणि त्याचवेळेस मूर्ती का दुभंगली असावी? सारं... सारंच अनाकलनीय! कुणाकडेच काही

उत्तर नव्हतं. स्वामीजींचा अंत झाला म्हणून मूर्ती दुभंगली... की मूर्ती दुभंगली म्हणून स्वामीजींना धक्का बसला?

क्षणापूर्वी चालू असलेला भक्तीचा उत्सव संपला आणि साऱ्या मंदिरात शोककळा पसरली.

स्वामीजींचं प्राणोत्क्रमण झालं. हजारोंच्या उपस्थितीत दुःखी अंतःकरणांनी, साश्रू नयनांनी स्वामीजींना अग्नी दिला गेला.

भक्तीचं एक पर्व संपलं. मंदिराकडे येणारा भक्तांचा ओघ कमी झाला. यथावकाश मंदिरात त्याच जागेवर नवीन मूर्तीची प्रतिष्ठापना केली गेली. स्वामीजींच्या आधी मंदिरात पूजा करणारे वेणू गुरुजीच यथाशक्ती पूजेची सेवा करू लागले. कृपाशंकर स्वामींच्या आधीपासून ते पूजा करायचे. कृपाशंकर प्रगटल्यापासून ते फक्त इतर व्यवस्था बघायचे. त्यात जो आनंद होता, तो किंचितही उरला नाही. पूजा केवळ शुष्क कर्मकांड बनली.

पूर्वीसारखीच याही मूर्तीच्या नाकांत हिऱ्याची चमकी होती पण स्वामीजी असतांना दर पौर्णिमेला 12 वा. दिसणारा प्रकाश कधीच दिसला नाही. दर पौर्णिमेला पूर्वी होणारा तेजाचा उत्सव आता बंद झाला.

काही वृद्धांच्या मनात अजूनही त्या उत्सवाची आस होती. त्यातले मोजके वृद्ध पौर्णिमेला तेजाची वाट पहात मंदिरात थांबायचे, यंत्रवत पूजा करून, प्रसाद वाटायचे पण त्यांच्या काळजातली हुरहुर त्यांना अधिकच अस्वस्थ करायची.

एवढे दिवस झाले तरी वृद्ध वेणू गुरुजी - 'त्या' प्रतिपदेचा प्रसंग विसरू शकत नव्हते. त्यांच्या डोळ्यासमोर 'तो' प्रसंग जसाच्या तसा दिसत रहायचा. स्वामीजींचं मूर्तीवर पडणं, तिथून खाली फेकलं जाणं, मूर्तीचं दुभंगणं, वीज चमकावी, तसा क्षणार्धात दिसलेला प्रकाश आणि नंतरचा अंधःकार जो अजूनही सरत नव्हता.

त्यानंतर स्वामींचा मृत्यू, त्यानंतर कधीच न दिसलेला तेजाचा उत्सव... काय असेल या साऱ्यामागचं गूढ? तो प्रकाश स्वामीजींमुळं दिसायचा की देवीमुळं? स्वामी गेले तेंव्हाच मूर्ती का दुभंगली? की मूर्ती दुभंगल्यामुळं स्वामीजी गेले? मूर्ती आणि स्वामीजी यांचं काही अद्‌वैत होतं का? म्हणूनच एकाच वेळेस हे घडलं? पण मग स्वामींचा मृत्यू का? ही शिक्षा की देवीची कृपा? छे... छे...! विचार करून करून वेणू गुरुजींचं डोकं फुटायची वेळ यायची; पण विचार थांबायचे नाहीत. यांत्रिकपणे नित्यनैमित्तिक करताना ती तेजाची आस त्यांना स्वस्थता लाभू देत नव्हती. आर्तपणे देवीच्या मुखाकडे बघत कित्येक पौर्णिमा त्यांनी जागून काढल्या.

आजच्या पौर्णिमेला कृपाशंकर स्वामीजींना जाऊन 11 वर्षे झाली. पौर्णिमेच्या रात्री पूजा करून वेणू गुरुजी मंदिरातच लवंडले होते. डोळ्याला डोळा नव्हता. त्या घटनेनंतर वेणूगुरुजी कधी शांत झोपले नाहीत. अन् जागे असले तरी त्यात जाग नव्हती.

पहाटे पहाटे मंदिराच्या बाहेरच्या तळ्यात उडी मारल्याचा आवाज आला. वेणूगुरुजी ताडकन उठून बसले... प्रतिपदेच्या पहाटे तळ्यात उडी कोण घेणार, कृपाशंकरजींशिवाय? त्या आठवणींनी वेणू गुरुजींच्या अंगावर सरसरून काटा आला... कंठात हुंदका दाटला. कसं शक्य आहे? याच हातांनी... मी स्वतः अग्नी दिला ना?

… मग हा आवाज की भास? भासच! काय वेड्यासारखी… कशाची, कुणाची वाट पहायची? … छे… छे! हे शक्य नाही. म्हणून त्यांनी स्वतःला हताशपणे अंथरुणात लोटून दिलं आणि आपल्या आसवांना वाट करून दिली. “आई चंद्रबाले, हे सगळं सोसायला मला कशाला मागे ठेवलंस? कशासाठी? मलाही घेऊन जा आई, स्वामीजींकडे. स्वामीजी नाही, प्रकाश नाही, म्हणून तू पण नाहीस…. मग माझं इथं काय काम? ” असं म्हणून ते प्रेतवत पडून राहिले. प्रतिपदेच्या पहाटेचं पण त्यांना भान राहिलं नाही..

थोड्या वेळानं त्यांना पावलांची चाहूल मंदिराकडे जाताना जाणवली. हा भासच असणार, म्हणून ते निपचित, निष्प्राण पडून राहिले; पण हळूहळू गाभाऱ्याच्या बाजूने त्यांना प्रकाश जाणवला. हे सारे आपल्या भासांचेच परिणाम म्हणून ते अधिकच उद्विग्नपणे पडून राहिले. न राहवून त्यांनी गाभाऱ्याच्या दिशेने पहिले… तर गाभाऱ्याच्या दारात एक छोटा बालक पाठमोरा उभा असलेला दिसला. त्याने बहुतेक पुढे हात जोडलेले असावेत. गाभारा मंद प्रकाशानं भरून गेलेला होता. काय पहातो आहे? वेणूगुरुजी त्यांच्या नकळत उठून बसले. डोळे विस्फारून बघत राहिले. गाभाऱ्याचा दरवाजा आपोआप उघडला गेला. बालकानं आत प्रवेश केला.

हळूहळू उठत उठत, वेणूगुरुजी त्या बालकाच्या मागोमाग येऊन उभे राहिले. बालक पद्मासनात बसला. घनगंभीर आवाजात ध्यान स्तोत्र म्हणू लागला… धृत्व श्रीर्मातुर्लिंगंम तदुपरिच… तेच स्तोत्र, तसंच पद्मासनात ध्यानस्थ बसणं… तसाच घनगंभीर आवाज…

हळूहळू वेणूगुरुजी समोरून त्याला बघू लागले, बघतच राहिले, बघतच राहिले. आश्चर्य! महद् आश्चर्य! चमत्कार… की साक्षात्कार! वेणू गुरुजी पापणी न हलवता बालकाचे रूप डोळ्यात साठवत राहिले. त्याचा आवाज कानांनी पित राहिले.

हा… हा तर छोटा कृपाशंकर! सहासष्ठ वर्षांपूर्वी असाच मंदिरात प्रगट झाला होता.

हर्षोल्हासानं आपल्याला वेड लागेल असं गुरुजींना वाटलं! हा भास की स्वप्न, की सत्य?

म्हणून ते त्या बालकाच्या चरणांना स्पर्श करण्यासाठी वाकले. तेवढ्यात तो बालक ध्यानातून जागा झाला आणि कृपाशंकर स्वामींसारखंच सुरू केलं

“या देवी सर्वभूतेषु… नमस्तस्यै नमो नमः! ” मंदिरातला घंटानाद आपोआप सुरू झाला. गावांतले गावकरी धावत मंदिरात जमा झाले. बालकानं देवीची पूजा केली आणि देवीच्या चरणांवर लोळण घेतली आणि धीरगंभीर आवाजात बोलू लागला.

“देवी चंद्रबाले, मला क्षमा कर… मला क्षमा कर! ” एकेक शब्द स्पष्ट, स्वच्छ ऐकू येत होता.

“क्षमा मागण्याचा मला अधिकार नाही; पण तेवढ्यासाठीच तर तू हा देह मला दिलास! एवढंच नाही तर माझ्या स्वप्नात येऊन मला साक्षात्कार दिलास, मला मुक्त करण्याचं अभिवचन दिलंस. म्हणून तर मी तुझ्या चरणांशी धावत आलो आहे.

माझा हा जन्म संपव! मला मुक्त कर. अकरा वर्षांपूर्वी तुझी पूजा करतांना माझा घोर अपराध झाला. माझ्या मनात क्षणैक कामभावना जागी झाली... क्षणैक - फक्त एकच क्षण आणि माझी सर्व तपस्या धुळीला मिळाली. क्षणार्धात तू मला धिक्कारलंस! स्वर्गातून पाताळात लोटलंस. आणि तूही दुभंगलीस. धिक्कार करण्यासारखाच घोर अपराध होता तो!

चंद्रबाल; मला क्षमा कर. या जन्मातून, जन्ममरणाच्या फेऱ्यातून मला मुक्त कर!

तुझ्या चरणांपाशी मला जागा दे! चंद्रबाले, चंद्रबाले! " असं म्हणून तो बालक स्फुंदून स्फुंदून रडायला लागला.

पुन्हा बोलू लागला... "सारा जन्म तुझी उपासना आणि भक्ती करण्यात मी वेचला आहे. नव्हे त्यासाठी माझा जन्म होता. घोर तपस्येने तुझ्याशी एकरूप व्हायचं, अद्‌वैत साधायचा राजमार्ग माझ्यासाठी खुला असताना, संगमरवरी सौंदर्याची मला भुरळ पडली! कसं घडलं हे? का घडलं? क्षणभरच... पण माझी नजर त्या संगमरवरी रूपलावण्यात अडकली. माझ्यातलं माणूस नावाचं श्वापद जागं झालं का? की ते संपलंच नव्हतं म्हणून हे घडलं? खरंतर ही भावना मी कधी अनुभवलीच नव्हतं. ना असे काही विचार मी कधी अनुभवले होते. हे विचार ही जाणीव मला माझी वाटतच नाही. समजत तर काहीच नाही, ही कामभावना होती, सौंदर्यातली आसक्ती होती, की भक्तीतली उत्कटता होती? नाही! याचं उत्तर नाही. तुलाही मागत नाही. हे क्षणैक विचारांचं निंद्य, घृणास्पद पाप घडलं हे नक्की.

फक्त तू आणि तूच मला क्षमा करून माझं पापक्षालन करू शकतेस. आई चंद्रबाले, तूच मला मृत्यूचं शासन दिलंस. एवढंच नाही, तर माझ्या पापासाठी तूही दुभंगलीस, स्वतःला शिक्षा करून घेतलीस. पापक्षालनासाठी तूच मला दुसरा जन्म दिलास. आज तुझा हा अज्ञान बालक तुझी करुणा भाकतो आहे. माझा अपराध पोटात घाल. पापक्षालन कर, तुझ्या चरणांशी मला विलीन होऊ दे. आई चंद्रबाले, आई चंद्रबाले, जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मला मुक्त कर. कायमचं मुक्त कर. " असं म्हणून तो बालक स्फुंदून स्फुंदून रडू लागला. मंदिरात जमलेले असंख्य लोक हे दृश्य पाहून थिजून गेले. मंदिराच्या चिऱ्यांमधून आवाजाचे प्रतिध्वनी येऊ लागले. प्रत्येक जण श्वास रोखून पहात होता. ह्या बालकाला देवी क्षमा करेल ना? काय होईल? निःशब्द! निस्तब्ध! शांत... शांत! हळूहळू त्याचा आवाजही शांत शांत होत गेला. तो बालकही शांत, स्थिर, स्तब्ध झाला. अगदी निपचित!

वेणुगुरुजींची अवस्थाही फार विचित्र झाली. कृपाशंकर स्वामी परत आले. त्या धक्क्यातून सावरेपर्यंत त्यांना राग, दुःख आणि उद्‌विग्नतेचा दुसरा धक्का पचवणं फार कठीण झालं. कृपाशंकर स्वामींकडून... त्यांच्यासारख्या साधुपुरुषाकडून हे पाप... हे अधःपतन कसं घडलं? याच्या तीव्र वेदना होत असतानाच, लहानग्या कृपाशंकरने ज्या प्रामाणिकपणाने, हृदयाच्या तळापासून आर्तपणे हे सगळं कबूल केलं, त्यामुळे वेणूगुरुजींचं हृदय अपार प्रेमाने भरून आलं. चेहऱ्यावर प्रेमळ हास्य होतं. पण डोळ्यांना अश्रूंच्या धारा! प्रचंड भावनावेगानं वेणूगुरुजींना हास्योन्मादाचा झटका आला. रडता रडता ते हसू लागले जोराजोरात. आणि अचानक त्यांचा आवाज बंद झाला. त्या शांततेला भेदत घनगंभीर तेवढेच मंजुळ शब्द उमटले! "तथास्तु!" कोण बोलले? कोणाचा आवाज? चंद्रबालेच्या चेहऱ्यावर तेज झळाळून उठलं. पायाशी नमस्काराच्या स्थितीत

वाकलेला बालक स्तब्ध निश्चल झाला. मूर्तीसारखा. मूर्तीच बनली त्याची. त्याच वेळेस वेणूगुरुजींची शिळा बनली. तो बालक आणि वेणूगुरुजी दोघांनाही मुक्ती मिळाली. सतराव्या शतकात घडलेली ही घटना. पण आजही तो बालक त्याच नमस्कार स्थितीत चंद्रबालेच्या पावलांवर वाकलेला आहे. त्याच्या मागे एक शिळा आहे. जागेवरून हलू न शकणारी.

असं म्हणतात, त्या शिळेतून थेंब थेंब पाणी येत असतं. कितीही पुसलं, तरी पुन्हा पुन्हा येतच रहातं. लोक म्हणतात, ते वेणुगुरुजींचे अश्रूच आहेत...

**सौ. शांभवी मंगेश जोशी -** सुमन फेज 4, धर्माधिकारी मळा, एस्सार पेट्रोल पंपामागे, सावेडी, अहमदनगर 414003 मो. 9673268040 shambhavijoshi76@gmail. com



## लेख – दिवाळी अंक आणि मी... - सुश्री तृप्ती कुलकर्णी



सहासात वर्षांपूर्वी दिवाळी सण म्हणजे माझ्यादृष्टीने फक्त फराळ करणे, खाणे, आकाश कंदील करणे, पणत्या रंगविणे आणि शुभेच्छा पत्रं डिझाईन करून भेट देणे, खरेदी करणे, फिरायला जाणे इतक्याच चौकटीपुरता मर्यादित होता. तेव्हा या चौकटीपेक्षा फार काही वेगळं करता येईल, अशी अपेक्षाही मी कधीच केली नव्हती. नाही म्हणायला लेखनाची, वाचनाची आवड होती म्हणून दिवाळी अंकांचं वाचन होत होतं, तेवढंच. पण २०१६ नंतर मात्र माझ्या या चौकटीचा विस्तार झाला. कसा? त्याचीच ही गोष्ट...

ही गोष्ट माझ्यासाठी महत्त्वाची का ते समजण्यासाठीची ही पार्श्वभूमी... जवळपास बारा वर्ष एका सर्जिकल पॉवर टूल्स बनवणाऱ्या पुण्यातल्याच कंपनीत मी ग्राफिक डिझायनर म्हणून काम करत होते. सगळं काम ऑपरेशन संदर्भातलं. फोटोज, फिल्म आणि ड्रॉइंग्ज यांच्याशी संबंध जास्त... भाषेशी, त्यातही मराठी भाषेशी संबंधच कमी. शिवाय पदवीचं शिक्षणही भाषाविरहित विषयाचं... फाईन आर्टमध्ये झालेलं. या पार्श्वभूमीवर एक सर्वसामान्य वाचक ते थेट दिवाळी अंकात लेखन हे अवचित पडलेल्या गोड स्वप्नासारखंच नाही का... अप्रूप वाटावं असं...

तर एप्रिल २०१६ मध्ये एक विलक्षण आश्चर्यकारक असा योग आला. तो म्हणजे पुण्यातल्या 'साहित्यसूची' या नामांकित मासिकाचे संपादक श्री. योगेश नांदुरकर यांच्याशी घडलेली भेट. या भेटीनंतर साहित्याच्या आवडीमुळे आणि मुख्यतः योगेश सरांच्या प्रोत्साहनाने मी 'साहित्यसूची' या मासिकात नियमितपणे लिहू लागले. साधारणपणे मे २०१६च्या अंकात मी पहिल्यांदा पुस्तक परिचय लिहिला. मग दर महिना एक-दोन पुस्तकांवर मी लिहू लागले. अर्थात त्यामागे सरांचं मार्गदर्शन होतंच. असं करता करता दिवाळी अंकाबाबत चर्चा सुरु झाली. मला उत्सुकता होती. पण दिवाळी अंकात पुस्तक परिचय प्रकाशित करायचे नाहीत, असं ठरलंय, हे जेव्हा मला समजलं, तेव्हा मात्र माझ्या मनात थोडी निराशा दाटून आली. आणि वाटलं सरांच्या मार्गदर्शनाने आताशी कुठे पुस्तक परिचय लिहू लागलोत आपण, तर दिवाळी अंकात काय लिहिणार? मग तो विचार मी मनातून काढून टाकला.

पण अचानक एक दिवशी सरांचा मेसेज आला की या अंकात तू सहभागी व्हावंस अशी इच्छा आहे. मला आश्चर्य वाटलं. मी कळवलं की, 'सर, एखाद्या विषयावर साहित्यिक अंगाने लिहिता येईल, असा काही माझा कुठल्या विषयाचा अभ्यास नाही किंवा वाचन नाही. ' यावर त्यांची प्रतिक्रिया आली, 'की तू लिहू शकशील असाच यंदाचा विषय आहे. स्वतंत्रपणे जरी तुला लिहिणं शक्य झालं नाही, तरी तू मुलाखत घेऊन त्याचं शब्दांकन तर करू शकतेस. तू ये तर, मग आपण बोलू. ' सरांच्या या आश्वासक बोलण्याने मला हुरूप आला.

मग प्रत्यक्ष भेटल्यावर तर त्यांनी मला आश्चर्याचा धक्काच दिला. ते म्हणाले, 'आपण यंदा व्यंगचित्र विशेषांक करणार आहोत. त्यात तू काही व्यंगचित्रकारांच्या मुलाखती घेऊन त्याचं शब्दांकन कर. ' मला पटकन काय

बोलावं तेच कळेना. डॉक्टरांच्या मुलाखती घेणं हे जरी कंपनीतल्या माझ्या कामाचं एक स्वरूप होतं तरी ते खूपच वेगळं होतं, त्याचा साचा ठरलेला असायचा. ते पूर्णतः प्रॉडक्टशी निगडित असायचं. इथं व्यंगचित्रकारांशी बोलणं, आणि नुसतं बोलणं नव्हे तर, त्याचं सुयोग्य शब्दांकन करणं, हे माझ्यासाठी जरा अवघड होतं. जरी चित्रकला हा माझा विषय होता तरीही... हो- नाही- हो करता करता 'मी प्रयत्न करते' असं म्हणाले.

तर थेट दुसऱ्या दिवशी सकाळी मला सरांचा मेसेज... 'आज पाच वाजता चारुहास पंडित येतील. त्यांची मुलाखत तुला घ्यायची आहे. ' मला एकदम दडपणच आलं. 'चिंटू व्यतिरिक्त त्यांची काहीच माहिती नाही, तर मी कशी मुलाखत घेऊ? ' असं विचारल्यावर ते म्हणाले, 'जरा लवकर ये, आपण बोलूयात. ' मी लंचटाईममध्ये नेटवरून चारुहासजींची माहिती घेतली आणि काही प्रश्न काढून सरांना दाखवले. त्यात आम्ही काही बदल करून मग ते प्रश्न विचारायचे ठरवलं. त्याप्रमाणे मुलाखत चांगली झाली. मग त्या रेकॉर्ड केलेल्या मुलाखातीचं शब्दांकन करून ते चारुहास पंडित आणि योगेश सर यांना दाखवून मी ते काम पूर्ण केलं. या नंतर ज्येष्ठ व्यंगचित्रकार विकास सबनीस यांच्याशीही त्यांच्या व्यंगचित्रांबाबत फोनवरून मुलाखत घेऊन त्याचंही शब्दांकन केलं. हे सगळं करताना मला वेगळाच अनुभव आणि आनंद मिळाला.

ज्या मान्यवरांची चित्रं पाहात आपण मोठे झालो, ज्यांना केवळ वर्तमानपत्रातच पाहण्यात समाधान मानलं, त्या कलाकारांना प्रत्यक्षात पाहणं, त्यांच्याशी थेट संवाद साधता येणं यापरता दुसरा आनंद कोणता? दिवाळीतल्या इतर कुठल्याही गिफ्टपेक्षा ही गोष्ट जास्त आनंददायी नाही का? अतिशय उत्तम आणि वेगळ्या, आवडीच्या विषयाच्या अंकात तेही अनेक मान्यवरांच्या लेखनात आपलाही छोटासा खारीचा वाटा असलेला लेख पाहून... त्यातल्या यादीतलं आपलं नाव वाचून... मला खूपच भारी वाटलं.

याशिवाय आणखीन एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यंगचित्र या प्रकाराबद्दल जवळपास सर्वंकष माहिती मिळाली. तेही थेट जाणकारांकडून. जी माहिती क्वचितच कुठल्या आर्टकोर्समध्ये किंवा त्यासंबंधीच्या पुस्तकात मिळत असेल. खरोखर याबाबत योगेश सरांना मानलं पाहिजे. आपल्या रोजच्या जीवनातल्या समस्या थेटपणाने मांडणं आणि तेही कुणा व्यक्तीला न दुखावता, हे सहज साध्य होतं, ते या व्यंगचित्रांमुळेच. अशा या व्यंगचित्रकारांची विचार करण्याची पद्धत... लोकांचा व्यंगचित्रांकडे बघण्याचा दृष्टिकोन व्यंगचित्राची बलस्थानं... ते काढताना घ्यावी लागणारी काळजी... दृष्टिकोन... सामाजिक व राजकीय दृष्टिकोन... असं सारं काही पाहायला, वाचायला मिळालं. चांगल्या कलाकारांशी कायमचे संबंध जोडले गेले. सर्जिकल टूल्समध्ये दडपलेला माझ्यातला आस्वादक कलाकार थोडा खुलून आला. त्या दिवाळीचा आनंद काही औरच होता. कारण मला माझी एक वेगळीच ओळख मिळाली होती. खरंच, हा आनंद मी शब्दांत सांगू शकत नाही. योगेश सरांचे मनापासून आभार मानायला शब्दही तोकडे आहेत.

इतकंच नव्हे तर सरांनी अतिशय आपुलकीनं मला दिवाळी अंकाच्या निर्मितीच्या प्रक्रियेतही सामावून घेतलं. आणि दिवाळी अंकाची निर्मिती किती नियोजनबद्ध आणि काटेकोरपणे आखणीने केली जाते ते पाहायला, नव्हे तर अनुभवायला मिळालं. ही प्रक्रिया कशी टप्प्याटप्प्याने होते... त्या निर्मितीत किती जणांचा सहभाग महत्त्वाचा असतो, हेही यामुळे अनुभवता आलं. दिवाळी अंकांचं बदलतं स्वरूप तर मला चकितच करणारं ठरलं. आणि एक वाचक म्हणूनसुद्धा दिवाळी अंकाकडे पाहण्याचा माझा दृष्टीकोनच बदलला.

मंडळी! स्वानुभवाने सांगते. दिवाळी अंक निर्मिती प्रक्रिया ही एखाद्या मंगल कार्यासारखी असते अनेक लहानसहान गोष्टी त्यात घडत असतात, ज्याची आपल्याला गंधवार्ताही नसते. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे विषय निवड! मग त्यानुसार अतिथी संपादक निवडणं, विषयानुसार लेखकांची निवड करणं, मग त्यांच्याकडून लेखन लिहून घेणं, त्यावर चर्चा करून संपादकीय संस्कार करणं, मग आर्टिस्टकडून लेखांची मांडणी व अंकांचं मुखपृष्ठ करवून घेणं... प्रकाशनाच्या साहाय्यासाठी जाहिराती मिळवणं, प्रकाशनासाठी उत्तम पाहुणे शोधणं, अंकाचे टीझर तयार करून त्याची जाहिरात करणं... प्रकाशानानंतर वितरणाची सोय करणं, आता तर ऑनलाइन विक्रीचीही भर पडली आहे. अशी एका ना अनेक व्यवधानं सांभाळावी लागतात. आणि अंकाचे संपादक-प्रकाशक ती आनंदाने सांभाळतात. तेव्हा कुठे आपल्या हातात विकतच्या आयत्या चविष्ट फराळासारखाच आयता दर्जेदार अंक विकत मिळतो.

यातून जाणवलेली आणखीन एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनेक वर्षांची परंपरा असलेला दिवाळी अंक आता दिवाळीतल्या इतर गोष्टींप्रमाणे कात टाकू लागलाय. आता तो वेगवेगळ्या विषयांना वाहिलेला आहे. केवळ पाककृती किंवा कथा, कविता, गृहसजावट, राशिभविष्य यांच्यापुरताच मर्यादित न राहता तो जगण्याच्या सगळ्या आयामांना सामावून घेत आहे. अर्थकारण, समाजकारण, पर्यावरण, शेतीविषयक, कायदेविषयक, आरोग्यविषयक, पर्यटनविषयक, गड-किल्ले विषयक, योगविषयक, आध्यात्मिक, धार्मिक, मानसिक असे सगळेच विषय सामावणारा झाला आहे. जगण्यातल्या अनेक समस्यांवर विचार विनिमय करायला लावणारा दिवाळी अंक 'रंजन' आणि 'बोधन' या दोन्हींचा उत्तम मिलाफ आहे. इतकंच नाही तर केवळ विषयवैविध्यच नव्हे, तर माध्यमातही वैविध्यता जपत आहे. छापील तर असतोच; पण आता त्याचवेळी डिजिटल स्वरूपात, दृक्श्राव्य माध्यमातदेखील काही अंक तयार होत आहेत. एका अंकाच्या निर्मितीप्रक्रियेत थोडासा सहभाग घेतला आणि खरंच, एक वेगळंच विश्व पाहायला मिळालं.

यानंतरही पुढे काही अंकांत काम करताना, लेखन करताना वेगवेगळे अनुभव आले, येतही आहेत; पण शेवटी अनपेक्षितरीत्या मिळालेल्या, आवडीच्या विषयाच्या अंकाची पहिल्यावहिल्या अनुभवाची बात काही औरच नाही का...

**सुश्री तृप्ती कुलकर्णी -** मो ९८८११५७३३३



## कविता - मी मागतो.. - डॉ. विजयकुमार माने



आसवांना जोडणारा कालवा मी मागतो
नाव होते भावनांची नाखवा मी मागतो




मैफिलीची सांगता मी भैरवीने आखतो
सांजवेळी जीवनाला मारवा मी मागतो

जीवघेणी वाटते ही रात्र सारी एकटी
एकट्याने जागणारा रातवा मी मागतो

वास्तवाचे ऊन जेव्हा अंगणाला भाजते
साठलेल्या आठवांना गारवा मी मागतो

नाचणारे मोर येथे भांडणारे काकही
शांततेने नांदणारा पारवा मी मागतो

युध्द माझे चाललेले कौरवांशी आतल्या
एक गीता आज तीही माधवा मी मागतो

धर्म कसला जात कसली मी कशाला पाहतो
माणसाचा दाखलाही बांधवा मी मागतो

**डॉ. विजयकुमार स. माने** - मिरज

## कथा -"देवाची करणी" (मराठी भावानुवाद) - श्री मेघःशाम सोनवणे



शेठ श्री. कमलकिशोर यांचा सोन्याचे आणि हिऱ्यांचे दागिने बनवून विकायचा व्यवसाय होता. त्यांच्या दुकानातून बनवलेल्या दागिन्यांची ख्याती दूरपर्यंत पसरली होती. इतर शहरातील लोकही कमलकिशोर यांच्या दुकानात दागिने खरेदी करण्यासाठी येत असत. बांगड्या असोत, नेकलेस असोत किंवा कानातल्या कुड्या, बोटाच्या अंगठ्या असोत, त्यात हिरे-सोन्याचे एवढे सुंदर इनॅमलचे काम केलेले असायचे की सगळे त्याकडे बघतच राहायचे.

एवढा मोठा व्यवसाय असूनही कमलकिशोर अतिशय शांत आणि साध्या सरळ स्वभावाचे होते. या श्रीमंतीचा त्यांच्या वागण्या बोलण्यावर फारसा प्रभाव पडलेला नव्हता.

एके दिवशी त्यांचा एक मित्र आपल्या पत्नीसह वृंदावन येथून यात्रा करून परतत असताना आपला मित्र कमलकिशोर यालाही देवाचा प्रसाद द्यावा असे त्या मित्राला वाटले म्हणून त्यांच्या दुकानात आला.

जेव्हा तो त्यांच्या दुकानात पोहोचला तेव्हा कमलकिशोरचा एक कारागीर सोने आणि हिऱ्यांनी जडलेला एक अतिशय सुंदर हार बनवून कमलकिशोर यांना देण्यासाठी आला होता.

त्यांचा मित्र त्यांच्या दुकानात पोहोचला तेव्हा कमलकिशोर हा हार बघत होते. कमलकिशोरच्या मित्राने वृंदावन येथून श्रीकृष्णाची एक अतिशय सुंदर अशी मूर्ती आणली होती. मूर्तीचे रूप अतिशय मोहक असे होते.

त्यांचा मित्र दुकानात बसला तेव्हा श्रीकृष्णाची मूर्ती त्याच्या मांडीवर होती. श्रीकृष्णाचे मनमोहक सौंदर्य पाहून कमलकिशोर खूप खूश झाले. त्यांनी हातात घेतलेला हार श्रीकृष्णाच्या गळ्यात घातला आणि मित्राला म्हणाला,"बघ हा हार श्रीकृष्णाच्या गळ्यात घातल्यावर त्याचे सौंदर्य किती वाढले आहे."

त्यांचा मित्र आणि कमलकिशोर एकमेकांशी गप्पागोष्टी करू लागले आणि बोलत बोलतच त्यांचा मित्र अनवधानाने हार घातलेल्या श्रीकृष्णासोबत निघून गेला. श्रीकृष्णाच्या गळ्यात हार अजूनही पडून असल्याचे दोघांच्याही लक्षात आले नाही.

कमलकिशोरचा मित्र त्याच्या पत्नीसह टॅक्सीत बसला आणि त्याच्या घराकडे निघाला. टॅक्सीतून उतरल्यावर चुकून श्रीकृष्ण त्या टॅक्सीतच राहिले.

टॅक्सी ड्रायव्हर बाबू हा एक गरीब माणूस होता. आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी दुसऱ्या शहरातून टॅक्सी चालवत असे. शेठच्या मित्राला सोडून तो टॅक्सी घेऊन खूप पुढे निघून आला होता. आज त्याला दुसऱ्या शहरात असलेल्या त्याच्या घरी लवकर परत जायचे होते.

बाबू टॅक्सी घेऊन घरी पोहोचला. त्याच्या टॅक्सीच्या मागच्या सीटवर त्याने नजर टाकली तेव्हा त्याचं लक्ष मागच्या सीटवर गळ्यात हार व सुंदर पोशाख घालून, हातात बासरी धरून अत्यंत शाही पद्धतीने बसलेल्या श्रीकृष्णाच्या मूर्तीकडे गेलं.

श्रीकृष्णाची ही अतिशय सुंदर मूर्ती पाहून बाबू खरेतर घाबरला, पण आता तो दुसऱ्या शहरातून त्याच्या खूप दूर असलेल्या शहरात आला होता आणि गाडीतून थोडे लांबच उतरलेल्या प्रवाशाचा घरचा पत्ता ही त्याला माहीत नव्हता, त्यामुळे काय करावं अशी त्याची द्विधा मनस्थिती झाली होती.

मग त्याने हात स्वच्छ धुवून मोठ्या भक्तिभावाने श्रीकृष्णाच्या मूर्तीला उचलून घरात नेले. घरात प्रवेश करताच त्याच्या पत्नीचे त्याने हातात धरलेल्या चित्तवेधक मनमोहक अशा श्रीकृष्णाकडे लक्ष गेले. त्याच्या पत्नीने ताबडतोब पतीच्या हातातून श्रीकृष्णाला भक्तीभावाने उचलून घेतले.

त्यांचे लग्न होऊन आठ वर्षे झाली होती, पण अद्याप त्यांना मूलबाळ झालेले नव्हते. तिने श्रीकृष्णाला हातात घेताच तिच्या मनात मातृत्वाची आपुलकीची भावना जागृत झाली आणि तिच्या प्रेमळ आणि दयाळू डोळयांतून आपसूकच पाणी वाहू लागले. मातृप्रेम आणि आपुलकीमुळे तिने श्रीकृष्णाला आपल्या कुशीत घेताच आपल्याच मुलाला आपल्या कुशीत घेतल्यासारखे तिला वाटले आणि तिच्या स्तनातून आपसूकच दूध पाझरू लागले.

बाबूची पत्नी मालती हिला स्वतःची अशी अवस्था पाहून खूपच आश्चर्य वाटले. तिने श्रीकृष्णाला छातीशी घट्ट धरले आणि डोळयांत पाणी आणत म्हणाली,"बाबू, आज तू माझ्यासाठी कोणते अनमोल रत्न घेऊन आला आहेस याची तुला कल्पना नाही."

आपल्या बायकोला अचानक हे काय झाले, ते बाबूला समजले नाही, पण त्याची बायको आनंदाने एकदम वेड्यासारखी झाली होती. तिने पटकन श्रीकृष्णाला आत नेले आणि ती त्याच्याशी बोलू लागली,"अरे बाळा... तू इतक्या लांबून आला आहेस, तुला भूक लागली असेल" आणि तिने घाईत मध आणि तूप घालून चपातीचा काला बनवला आणि दूध गरम करून ते श्रीकृष्णाला अर्पण केले.

दुसरीकडे, जेव्हा कमलकिशोर यांना त्यांच्या दुकानात हार दिसला नाही, तेव्हा त्यांना आठवले, की तो हार अजूनही श्रीकृष्णाच्या मूर्तीच्या गळ्यात असेल, म्हणून त्यांनी त्यांच्या मित्राला फोन केला. मित्र म्हणाला,"अरे मित्रा! तो माखनचोर आणि चित्तचोर आहे; हारासह तोच चोरीला गेला आहे. मी स्वतःच खूप काळजीत आहे."

एवढा मौल्यवान हार कुठे गेला असेल, म्हणून कमलकिशोर यांना आता थोडी काळजी वाटू लागली. त्यांचे लाखोंचे नुकसान झाले पण तरीही त्याच्या शांत स्वभावामुळे ते त्यांच्या मित्राला काहीच बोलले नाहीत. त्यांनी मनात विचार केला, की काही फरक पडत नाही, माझे नुकसान फक्त हाराचेच आहे. माझ्या भावना खऱ्या असतील, तर श्रीकृष्ण तो घालत राहील.

दुसरीकडे बाबू आणि त्याची पत्नी मालती रात्रंदिवस श्रीकृष्णाची सेवा करत असत आणि आता मालती आणि बाबू श्रीकृष्णाला आपल्या मुलाप्रमाणे मानू लागले होते.

श्रीकृष्णाच्या कृपेने मालतीला एक अतिशय सुंदर अशी मुलगी झाली. या सर्व गोष्टींचे श्रेय ते श्रीकृष्णाला द्यायचे, की 'हा आमचा मुलगा आहे. आणि आता आम्हाला एक मुलगीही आहे, आता आमचे कुटुंब पूर्ण झाले आहे. '

मालतीला श्रीकृष्ण इतका आवडत होता, की ती रात्री उठून त्याला काही त्रास तर होत नाही ना, हे बघायची.

एके दिवशी शेठ कमलकिशोर यांना व्यवसायानिमित्त जिथे बाबू राहत होता त्या शहरात यावे लागले. पण दुर्दैवाने जेव्हा ते त्या शहरात पोहोचले, तेव्हा अचानक इतका पाऊस सुरू झाला, की कमलकिशोर यांना जिथे पोहोचायचे होते, तिथे पोहोचणे अशक्य झाले.

तेवढ्यात बाबू आपली टॅक्सी घेऊन तिथे आला आणि चिंतातुर असलेल्या कमलकिशोर यांना त्याने विचारले,"बाबूजी, तुम्ही इथे का उभे आहात? पाऊस काही थांबत नाही आणि संपूर्ण शहर पाण्याने भरले आहे. तुम्ही तुमच्या ठिकाणावर पोहचू शकणार नाहीत. येथून जवळच माझं घर आहे. हवं असेल तर तुम्ही माझ्या घरी येऊ शकता."

सोबत सोन्याचे आणि हिऱ्यांचे भरपूर दागिने असलेले कमलकिशोर एका अनोळखी टॅक्सी ड्रायव्हरसोबत जायला थोडे घाबरत होते; पण त्यांच्याकडे दुसरा काही पर्याय शिल्लक नव्हता, म्हणून ते त्याच्यासोबत टॅक्सीने बाबूच्या घरी गेले.

घरी पोहोचताच बाबूने मालतीला हाक मारली आणि सांगितलं, की"आज आपल्या घरी पाहुणे आले आहेत. त्यांच्यासाठी जेवण बनव."

कमलकिशोर यांनी पाहिले, की बाबूचे घर अगदी लहान पण व्यवस्थितपणे सजवलेले आहे. घरात अत्तराचा सुगंधी वास दरवळत होता, ज्याने त्यांचे मन प्रसन्न झाले.

मालतीने जेव्हा त्यांना जेवण वाढले, तेव्हा कमलकिशोर यांना ते अगदी अमृतासारखे चवदार वाटले.

त्यांचे लक्ष वारंवार त्या दिशेला जात होते, जिथे श्रीकृष्ण बसले होते. तिथून त्यांना एक वेगळाच अलौकिक प्रकाश येताना दिसत होता.

जेवण झाल्यावर कमलकिशोर यांनी बाबूला विचारले,"तुमचा काही आक्षेप नसेल, तर तुम्ही सांगू शकाल का, त्या दिशेला काय ठेवले आहे, ते? माझे लक्ष सारखे त्याच्याकडे आकर्षित होत आहे."

बाबू आणि मालती एकमेकांकडे बघून हसले आणि म्हणाले की,"आमच्या घरातील सर्वात महत्वाचा सदस्य, श्रीकृष्ण तिथे उपस्थित आहे."

कमलकिशोर यांनी विचारले,"मला त्यांचे दर्शन घेता येईल का?"

तेव्हा मालती त्यांना त्या कोपऱ्यात घेऊन गेली, जिथे श्रीकृष्ण बसले होते.

श्रीकृष्णाची मूर्ती आणि तिच्या गळ्यातला हार पाहून कमलकिशोर आश्चर्यचकित झाले. हा तोच श्रीकृष्ण आणि हा तोच हार आहे, जो मी माझ्या मित्राजवळील श्रीकृष्णाला घातला होता.

कमलकिशोर यांनी अतिशय नम्रपणे विचारले,"हे श्रीकृष्ण तुम्हाला कुठून मिळाले?"

बाबू, ज्याच्या मनात कोणतेही पाप नव्हते, त्याने कमलकिशोर यांना संपूर्ण कहाणी सांगितली, की श्रीकृष्ण त्यांना कसा सुदैवाने भेटला आणि त्याच्या घरी येण्याने त्यांचे दुर्भाग्य सौभाग्यामध्ये कसे बदलले.

कमलकिशोर यांनी विचारले,"श्रीकृष्णाच्या गळ्यातील हाराची किंमत तुम्हाला माहिती आहे का?"

बाबू आणि मालतीने अतिशय नम्रपणे हात जोडून सांगितले,"जी वस्तू आमच्या श्रीकृष्णाच्या अंगावर आहे, त्याची किंमत आम्हाला जाणूनही घ्यायची नाही आणि आमच्या बाळापेक्षा आम्हाला कोणत्याही गोष्टीची किंवा वस्तूची किंमत नाही."

हे ऐकून कमलकिशोर गप्प झाले. त्यांच्या मनात विचार आला 'एवढं तरी समाधान आहे की श्रीकृष्णाने माझा हार घातला आहे. '

दुसऱ्या दिवशी ते निघण्याच्या तयारीत असताना बाबूने त्यांना टॅक्सीत बसवून त्यांच्या ठिकाणावर नेऊन पोहचवले.

कमलकिशोर टॅक्सीतून उतरून चालू लागले, तेव्हा बाबूने त्यांना हाक मारली आणि म्हटले,"शेठजी थांबा, तुमचे काही सामान माझ्या टॅक्सीत राहिले आहे."

कमलकिशोर म्हणाले,"मी तर सर्व सामान घेतले आहे. तिथे काहीही राहीलेले नाही."

बाबूने विचारले,"पण ही बॅग तर तुमचीच आहे ना?"

कमलकिशोरने ती बॅग उघडून बघितली. त्यात खूप पैसे असल्याचे त्यांना दिसले. त्या नेकलेसच्या किमतीएवढे हे पैसे आहेत, हे पाहून कमल किशोर एकदम स्तब्ध झाले. 'मी स्वतःच श्रीकृष्णाला हार घालायला लावला आणि त्याने तो घातला. जेव्हा मी त्याला पैशाबद्दल बोललो, तेव्हा त्याने माझे गर्वहरण करण्यासाठी मला हे पैसे दिले का? ' असे त्यांच्या मनात आले.

त्यांच्या मनात विचार आला, 'देवाची करणी हेच खरं॰' ते म्हणाले, 'छे: छे:! बाबूराव, ही बॅग माझी नव्हे. ही त्या श्रीकृष्णाचीच दिसतेय. ' आणि त्यांनी ती बाबूरावांना परत दिली.

**मूळ हिंदी लेखक - अनामिक**

**मराठी अनुवाद - श्री मेघःशाम सोनवणे -** नाशिक. 9325927222

## लेख - श्रीकृष्णाला अनावृत्त पत्र - सौ. मंजिरी येडुरकर



तुझ्याबद्दल जितकं वाचावं, ऐकावं, तितके जास्त प्रश्न डोक्यात पिंगा घालतायत. त्यांची उत्तरं हवी आहेत, म्हणून हा पत्रप्रपंच! मला हे कधीच कळलं नाही की तुला माणसं देव का मानतात? तुला तारणहार का मानतात?

तुझंच आयुष्य बघ. ज्या आई, वडिलांच्या पोटी जन्म घेतलास, त्यांचा 12 वर्षं छळ झाला. आधीच कां नाही जन्म घेतलास आणि कंसाला मारलंस? असं म्हणतात गतजन्मीच्या वनवासाचा सूड घेतलास तो! अरे, मग त्या रामाच्या अवतारात इतक्या आदर्शांची यादी कशाला तयार केलीस? तो देखावा होता तर! तुझ्या मनात तर सुडाचीच भावना होती, सामान्य माणसांसारखी!

जर तुला राधेबरोबर विवाह करायचा नव्हता तर का तिच्या भावनांशी खेळलास? तुला कळलं का, की तू एकाच वेळी दोन आयुष्यांशी खेळलास. राधा उध्वस्त झालीच, पण तिच्याबरोबर अनयसुद्धा! अर्थात आणखी किती गोप-गोपींची आयुष्ये उध्वस्त झाली कोणास ठाऊक!

गोकुळाला तुझ्या बासरीचं वेड लावलंस, यशोदेला लळा लावलास. पण गोकुळ सोडल्यावर या लोकांचं काय झालं ते पहायला, त्यांच्यासाठी कधीतरी बासरी वाजवायला, ते जिवंत तरी आहेत का हे पाहायलासुद्धा तुला यावं असं वाटलं नाही? इतका निर्दयी तू! तू काय आमचा उद्धार करणार?

महाभारत घडवून आणलंस. तुझ्या मनात असतं तर तू पहिल्यापासूनच सगळं टाळू शकला असतास. एवढा नरसंहार थांबवू शकला असतास. अरे, गर्भातल्या बाळांनासुद्धा सोडलं नाहीस. द्वारका उभी काय केलीस, मग बुडवून काय टाकलीस! इतका विक्षिप्तपणा देवाच्या अंगात? तुझ्याच यादव वंशाचा नाश उघड्या डोळ्यांनी पाहत बसलास. असं म्हणतात, की पृथ्वीच्या काळजीनं, तिचा भार कमी करण्यासाठीच तू जन्म घेतलास. पण तू देव ना रे! मारायला त्या लढाया, वेदना, शोक, सूड, क्रूरता, फसवा-फसवी! हे सारं नुसतं घडलं नाही, ते जनमानसात रुजलं, आणि त्याचे परिणाम आजही आम्ही भोगतो आहोत. या युद्धात फक्त पापी माणसं मेली, असं नाही रे झालं. त्यामुळं आज लोकांचा चांगुलपणावरचा विश्वासही उडाला आहे. तू मनात आणलं असतंस तर सगळ्यांना झोपेतही मारू शकला असतास. त्यांच्या पाप-पुण्याच्या हिशोबाने त्यांना पुढचा जन्म मिळाला असता, तो हिशोब करायचा अधिकार तुला कुणी दिला? अर्थात तुला तर तुझंही मरण भीष्मांसारखं शानदार करता आलं नाही. एखाद्या बेवारशासारखा मेलास. बरोबर आहे, तुझ्यावरही कुणीतरी असणार, तुला शिक्षा देणारं! इतकी पापं केलीस आयुष्यभर! तुला स्वर्गात जागा मिळाली 'असणारच नाही' ऐवजी 'नसणारच'. पुन्हा मनुष्य जन्म घेऊन पृथ्वीवरच यावं लागलं असेल, का चोऱ्याऐंशीत फिरत बसलास, कुणास ठाऊक? तू जर परत जन्म घेऊन पृथ्वीवर आला असशील तर तुझ्या पाउलखुणा आम्हाला कुठंच कशा दिसत नाहीत!"यदा यदा ही धर्मस्य"चं काय झालं? अधर्म तर वाढतोच आहे. का तू गरिबांना

ओरबाडून आपली तुंबडी भरणाऱ्या नेत्यांमध्ये आहेस? कां, कितीही पापं करून उजळ माथ्याने हिंडणाऱ्या गुंडांमध्ये आहेस? तू द्रौपदीची लाज राखणारा झालास पण इथे तर आया-बहिणींची लाज सांडून, सांडून रस्ते भरलेत, पाय ठेवायला जागा नाही. कां, तू तुझं कर्तव्यही विसरलास? सामान्य माणसांसारखं!

तुझं असेल, पण माझं मन इतक्या कुविचारांनी भरलेलं नाही रे! त्यामुळं कधी कधी वाटतं, तू हरिप्रसाद चौरसिया यांच्या बासरीतून आम्हाला भेटायचा प्रयत्न केलास का? तू नेताजी, सावरकर असा क्रांतिवीर होऊन या देशासाठी प्राणत्याग केलास का? संत बनून मानवजातीचा उद्धार केलास का? मनात सतत द्वंद्व सुरू असतं. वाटतं, तू आहेस. तू आहेस, म्हणूनच चांगुलपणा, विश्वास, त्याग सारं अजून शिल्लक आहे. तसं अधम वृत्ती मोडून काढणं तुला तेव्हाही जमलं नव्हतं अन् आत्ताही नाही. पण तू तुझ्या ब्रिदाला जाग. अरे, आजही कोट्यवधी माणसं तुला मानतात, तुला पूजतात. तू फक्त हाक दे, जगाच्या कल्याणासाठी सारे तुझ्या पाठीशी उभे राहू. लवकर ये, कारण अजूनही चांगल्या माणसांची संख्या दुष्ट, हावऱ्या माणसांपेक्षा जास्त आहे. अशा माणसांच्या दबावाखाली असणाऱ्यांची सुटका कर. कलियुग संपायची वाट बघू नकोस. इतके आम्ही पापी नाही. सत्ययुगाची सुरुवात करून टाक. ये लवकर!

**सुश्री मंजिरी येडूरकर -** 9421096611

## कविता - खूळ - श्री सोमनाथ साखरे



मी शून्यच केवळ आहे
तूच पुढील अंक अनेक
मी पामर दीन दिवाणा
तू कुबेराघरची लेक

मी राब राबतो तेव्हा
शून्यातून होतो एक
तू खुशालचेंडू बाई
कसे पुरवावे तव शौक

मी भागभागतो नुसता
उरणार अखेर शून्यात
तू नित्य गुणतची जाते
होतसे सहजी द्विगुणित

मज अशक्य केवळ वाटे
हे बेरीज गणित आता
शक्यताच वजावटीची
अवघडणे येता जाता

घातांक बहु भवताली
हे जमले घन वर्गांचे
कौलारू घरास झुंबर
शोभणार ना काचेचे

बीजगणित तुझे नि माझे
दुःख-वेदनेचे मूळ
का उगाच जडले मजला
प्रेमाचे अवास्तव खूळ..!

**सोमनाथ साखरे -** नाशिक मो. ९८९०७९०९३३

**कथा - गा बेटी गा - सौ. उज्ज्वला केळकर**



मधू बागेला पाणी देत होती. गुलबक्षीच्या ताटव्याजवळ आज मे फ्लॉवरचा दांडोरा उमडून आलेला होता. दांडोऱ्यावर हजारभर कळ्यांचं कणीस. काल तर तिथे काहीच नव्हतं. आज पापण्या मिटलेल्या गप्पगप्पशा कळ्या कणसात एकमेकांना बिलगून बसल्याहेत. उद्या बाहेरच्या परिघातल्या कळ्या डोळे उघडतील. लालसर गुलाबी केशरकाड्या दूर होतील. आतल्या वर्तुळातले गुलाबी केसर मुकुटासारखे पिवळे परागकोश माथ्यावर मिरवतील. परवाला त्याच्या आतल्या वर्तुळातल्या कळ्या उमलतील. तेरवाला त्याच्या आतल्या. चार-पाच दिवसात त्या दांडोऱ्यावर गुलाबी रंगाचा फुटबॉल झोकात झुलू लागेल.

आज बाळ पोटात ढुशा देतंय. नंतर लाथा झाडेल, वळेल, फिरेल आणि एक दिवस पोटातलं बाळ कुशीत येईल. गळामिठी घालील. पापे घेईल. ती विलक्षण उत्तेजित झाली.

झाडांना पाणी देऊन झालं. नंतर तिने पाईपमधून पाण्याचा फवारा अंगणावर उडवला. तापलेल्या मातीचा कण न् कण उमलत गेला. त्याच्या गंधाच्या लाटा उसळत उसळत तिच्यापर्यंत पोचल्या. आवेगाने, तिने त्या श्वासातून आपल्या शरीरात सामावून घेतल्या. त्या गंधाने तिची उत्तेजना अधिकच वाढली आणि तिच्या गळ्यातून स्वर पाझरू लागले. स्वर... ताना... स्वरांच्या आवर्तनात तीदेखील झाडाझाडातून फुलपाखरासारखी भिरभिरू लागली. आता त्या स्वरांना शब्द भेटत गेले.

केतकी गुलाब जूही चम्पक बन फूले

गात गातच ती आत आली. मागच्या व्हरांड्यात उभी राहून बागेकडे बघत ती गाऊ लागली. आलाप-तानांचे झुले हिंदोळू लागले.

साधना घरी आली. पण, मधूचं लक्षच नव्हतं. ती आपली गातच होती. स्वरांचा झरा अविरतपणे झुळझुळत होता. साधना चकितच झाली. कितीतरी दिवसांनी.... वर्षांनी.... तिची लाडकी लेक गात होती. मनमोकळी होऊन गात होती. पण, आज असं काय घडलं? कितीतरी वर्षांपूर्वी तिने गाणारे आपले ओठ मिटून घेतले होते. गोड गळ्यावर अत्याचार केला होता. शपथ घ्यावी तसं गाणं सोडून दिलं होतं.

मधुवंतीचा आवाज अति मधुर सुरेल. ताला-सुरांची पक्की जाण. शाळेत असताना शाळेतली, शाळेबाहेरची गाण्याबद्दलची कितीतरी बक्षिसे तिने मिळवली होती. तिला खूप मोठी गायिका बनवण्याचं स्वप्न तिच्या जन्मापासूनच निरंजन आणि साधना बघत होते. 'पहिली बेटी-सूरकी पेटी... ' तिच्या जन्मानंतर निरंजन म्हणाला होता. मधुवंती त्याची भारी लाडकी. निरंजन रियाजासाठी तिला घेऊन बसले की साऱ्या जगाचं भान विसरायचे. गातच राहायचे. धाकट्या अनूपला मात्र एका जागी मांडा ठोकून आलाप-ताना घोटायचा भारी

कंटाळा. दहा मिनिटं एका जागी बसणं त्याला कठीण जायचं. गोड बोलून, चुचकारून, रागावून सगळं करून झालं. पण, तो भारी चंचल. मन एकाग्र करून एका जागी स्थिर बसणे त्याला मुळीच जमत नसे. शेवटी, निरंजनने त्याचा नाद सोडला. आपल्या मुलीवर मधुवंतीवरच त्या दोघांनी आपल्या आशा केंद्रित केल्या. तिला ख्यातनाम गायिका बनवायचं. आपल्या घराण्याचा वारसा अधिक संपन्न करून तिच्या हाती सोपवायचा.

पण एक दिवस... निरंजनच घरातून निघून गेला.

जाता जाता मधूचं गाणंही घेऊन गेला.

कोणार्कच्या सूर्यमंदिरात संगीत महोत्सव होता. त्यासाठी निरंजन घरातून बाहेर पडला. मुलांच्या शाळा, साधनाची बँक... कुणालाच जाणं शक्य नव्हतं. मधूचं तर १० वीचं महत्त्वाचं वर्ष. निरंजनचं गाणं खूप चांगलं झालं असणार. दुस-या दिवशीच्या वृत्तपत्रातून त्याचा विस्तृत रिव्ह्यू आलेला. जाणकार संगीत समीक्षकांनी त्याचं खूप कौतुक केलेलं. मुरकती, मींड, लोच आणि मुख्य म्हणजे त्याच्या गाण्यातलं भावसौंदर्य, त्याची प्रयोगशीलता, नावीन्य, वाचताना साधना-मधूच्या अंगावर रोमांच उभे राहिले. मधू तर दिवसभर आपल्या मन:चक्षूंपुढे निरंजनचं गाणं आठवत राहिली. त्याचा दमदार पुरिया... रंग कर रसिया आओ अब... तिच्या डोळ्यांपुढे शाळा नव्हतीच जणू. तिच्या डोळ्यापुढे आपल्या वडिलांची गाणारी मूर्ती... त्यांनी कुठे कोणते आलाप घेतले, ताना घेतल्या, मींड घेतली... हेच सारं तिला दिसू लागलं.

दुस-या दिवशी साधना बँकेतून घरी आली तर निरंजनने पाठवलेलं पत्र मिळालं.

'छान! म्हणजे हा काही कोणार्कहून सरळ घरी येत नाही. कुठे कुठे हिंडून, मैफली गाजवून येणार स्वारी... त्याला कितीदा सांगितलं, अशी परस्पर आलेली आमंत्रणं स्विकारू नकोस... ' असं पुटपुटत साधनानं पत्र फोडलं.

'साधना गेले वर्षभर मी एका प्रचंड वादळात सापडलोय. संसार की संगीत... मला वाट दिसत नव्हती. भोवतीनं दाट धुकं आहे आणि मला श्वासही घेता येत नाही असं वाटत होतं.

मनाशी खूप झगडून मी संगीताच्या वाटेवर पावलं ठेवलीत. प्रज्ञा माझी साथसंगत करणार आहे.

माझ्यासाठी केव्हापासून तिने आपलं घर सोडून यायची तयारी दाखवलीय. माझाच निर्णय होत नव्हता.

वाटत होतं, मी तुझ्यावर खूप अन्याय करतोय. अजूनही वाटतंच. मी तुझा ऋणाईत आहेच. शेवटपर्यंत तसाच राहीन. तुझ्यामुळेच माझा कलंदराचा संसार मार्गी लागला. त्यासाठी तुला तुझं आवडतं संगीतही सोडावं लागलं, हे कसं विसरू? त्यासाठी तुला तुझी आवडती संगीताची करिअर सोडावी लागली, हे तरी कसं विसरू? पण, या कलंदराला साथ द्यायला, सावरायला, सांभाळायला तुझे हातच आता रिकामे नाहीत...

वाचता वाचता साधनाच्या मनापुढे तिचा भूतकाळ उभा राहिला. गाण्यानेच त्यांना जवळ आणलं होतं. दोघेही साधुरामांचे पट्ट शिष्य. या दोघांबद्दलही खूप आशा बाळगून होते ते! आपल्या घराण्याचा नावलौकिक दोघेही वाढवतील याबद्दल साधुरामांची पक्की खात्री. गाता गाता दोघेही एकमेकांत गुंतत गेले. पुढे लग्न करून

अगदी एकमेकांचे झाले. संगीताच्या क्षेत्रात दोघेही अजून धडपडत होते. अजून नाव व्हायचं होतं. दोघांनाही मैफलीसाठी स्वतंत्रपणे निमंत्रणे यायची. पुढे वर्षभरात मधू झाली आणि त्यांच्या लक्षात आलं, दोघांनाही विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर घेऊन हिंडणं शक्य नाही. कुठे तरी स्थिर झालं पाहिजे. वाढत्या संसाराला स्थैर्य येण्यासाठी निश्चितपणे आणि नियमितपणे अर्थप्राप्ती होणारा व्यवसाय पत्करणं जरूर होतं. मग साधनाने नोकरी करण्याचा निर्णय घेतला. निरंजनने मात्र गाणं आणि गाणचं करायचं. साधनाला बँकेत नोकरी मिळाली. घराला स्थैर्य आलं. मधूच्या पाठीवर तीन वर्षांनी अनूप झाला. वर्षे सरत गेली. नावलौकिकाच्या पायऱ्या चढत निरंजन नामांकित गायक झाला. घराणेशाहीत बंदिस्त झालेल्या शास्त्रीय संगीताला त्याने अभ्यास, प्रयोगशीलता याच्या साहाय्याने नवी झळाळी, नवा चेहरा देण्याचा प्रयत्न केला. लोकसंगीताला शास्त्रीय बैठक देण्याचा त्याने प्रयत्न केला. हे सारं खूप लोकप्रिय झालं. रसिकांमध्ये, जाणकारांमध्ये त्याने स्वत:चे असे वेगळे स्थान निर्माण केले.

अलीकडे अलीकडे साधनाला जाणवत होतं. स्वरांचा धागा पकडून निरंजन उंच उंच जातोय. त्याच्या दृष्टीच्या कवेत केवढा तरी विशाल विस्तार आहे. आपण मात्र जमिनीवरच उभे आहोत आणि तो सप्तसुरांचा धागा आपल्या हातून निसटत चाललाय. छे! केव्हाच निसटून गेलाय. आता आपलं गाणं हौशा नवशा गायिकेइतपतच! बँकेमधली नोकरी करता करता इतके रूक्ष होऊन गेलो का आपण? कधी झालं असं? निरंजनच्या रियाजाच्या वेळी त्याने एखादी सुंदर जागा घेतली, एखादी अवघड तान घेतली तर पूर्वीसारखी आपली झटकन् दाद जात नाही. कामाच्या घाईत आपल्या लक्षातच येत नाही. कान जणू बधीर झालेले… त्या गाण्यातल्या, स्वरातल्या लावण्यकळा आपल्या मनाला उमगायच्याच नाहीत. निरंजनमधला कलावंत मग नाराज व्हायचा. पत्रातून त्याने हीच वस्तुस्थिती मांडली होती. पण, व्यवहाराच्या साऱ्या जबाबदाऱ्या पेलता पेलता ती इतकी थकून जायची की त्याला अपेक्षित असलेलं ताजं, टवटवीत, तरल मन तिच्याकडे उरलेलंच नसायचं.

पुढे मधू गाणं शिकायला लागली. तिचा आवाज, तिची गाण्यातली जाण पाहून साधनाने आपल्या आशा-आकांक्षा तिच्यावर केंद्रित केल्या. आपली स्वप्नपूर्ती ती तिच्यात शोधणार होती. मधूला चांगली गायिका बनवायचं. दहावीची परीक्षा झाली की तिच्या गाण्यावर भर द्यायचा. कॉलेजचं शिक्षण दुय्यम, असं त्यांनी केव्हाच ठरवून टाकलं होतं. मधूलाही दहावीचं वर्ष कधी पार पडतंय असं झालं होतं… आणि आज अचानक निरंजन घर सोडून गेला होता प्रज्ञाबरोबर…

प्रज्ञा तिशीच्या आसपासची. गेली पाच-सहा वर्ष त्याच्याकडे येतेय. ती पी. एच. डी. करत होती. ‘लोकसंगीताचा शास्त्रीय संगीताशी असलेला अनुबंध’ या विषयावर भारतभर फिरून अनेक मोठमोठ्या गायकांबरोबर चर्चा केली होती. या संदर्भात निरंजनशी चर्चा करायला ती एकदा घरी आली आणि नंतर येतच राहिली. प्रबंध पूर्ण झाला. तिला पीएच. डी. मिळाली. पण निरंजनच्या गाण्याने प्रभावित होऊन ती त्याच्याकडे गाणं शिकायला येऊ लागली. आता तर बहुतेक मैफलींच्यावेळी त्याच्यामागे तंबोऱ्याच्या साथीला ती असते.

निरंजनने लिहिलं होतं,

‘प्रज्ञा माझी प्रेरणा आहे. चेतना आहे. माझी प्रतिभा आहे. स्वरदा आहे. माझे संगीतीय प्रयोग हे खरे तर आमचे संयुक्त प्रयोग आहेत. तिचा अभ्यास आणि चिंतनच मी माझ्या गाण्यातून लोकांपुढे मांडतो. नाही. ती नसली तर माझं गाणं संपून जाईल. ती असताना माझं गाणं रंगतं. फुलतं. मला नवीन नवीन काही तरी सुचत रहातं. तिच्याशिवाय, गायक म्हणून मला अस्तित्व उरणार नाही. मी चुकत असेन. तरी, अनिवार्य आहे हे सारं… ’

साधना सुन्न बधीरशी झाली. प्रज्ञा गेली पाच-सहा वर्षं घरी येतेय. गोड गळ्याची, सुरेल आवाजाची, काहीशी अबोल, शांत, प्रतिभावंत तरूणी साधनाला आवडायची. कळत नकळत आपलं तारूण्यरूप, साधना तिच्यात शोधायची. धाकट्या बहिणीसारखं तिचं कौतुक करायची. निरंजनबद्दल तिच्या मनात भक्ती होती. साधना जाणून होती ते! तिची भक्ती प्रीतीत कधी रूपांतरित झाली? बहिणीची सवत होण्यापर्यंतची वाटचाल कधी झाली? आपल्याला काहीच कसं कळलं नाही?

एक काळ असा होता, साधना निरंजनची प्रेरणा होती. त्याची प्रतिभा जागृत करणारी चेतना होती. त्यावेळी त्याचं नाव झालेलं नवतं. एक उदयोन्मुख कलाकार म्हणून त्याच्याकडे खूप अपेक्षेने पाहिलं जात होतं. तेव्हा त्याचा रियाझ साधना समोर असल्याशिवाय होत नसे. कोणत्याही मैफलीच्या वेळी साधनाच तंबोऱ्याची साथ करत असे. संसार वाढला तसतशी ही साथ सुटत गेली.

निरंजनला गाण्यासाठी पूर्णवेळ मिळावा म्हणून साधनाने नोकरी पत्करली. मुलं झाली. घराचा व्याप वाढला. कामात, मुलांत, त्यांच्या आणि निरंजनच्या वेळी सांभाळण्यात साधना इतकी गुंतत गेली की गाण्याचा पदर तिच्या हातून कधी सुटला, ते तिचे तिलाच कळले नाही. गाण्यामुळे त्यांची ओळख झाली होती. ते परस्परांच्या जवळ आले होते. एकरूप झाले होते. परस्परांपासून दूर न जाण्याच्या शपथेने बांधले होते.

‘कामाच्या रेट्यात प्रथम गाण्यापासून दुरावलो आणि आता निरंजनपासून…’ साधनाला वाटत राहिलं.

पुढे पुढे निरंजनच्या रियाझाच्यावेळी आपल्याला तिथे थांबायला वेळ होईना. सुरुवातीला आपण तिथे थांबत होतो. त्याच्या नेमक्या जागा. सुरेख मींड, दमदार तान यांना दाद देत होतो. मन किती उत्सुक आणि टवटवीत होतं तेव्हा… काही काही वेळा तर आपण त्याला सूचनाही देत होतो. पुढं मुलं झाली. त्यांचं रडणं. आई हवी, हा हट्ट. त्याच्या रियाझात व्यत्यय नको म्हणून मुलांनाच दूर नेणं, मुलं मोठी झाल्यावर त्यांचे गृहपाठ, त्यांचे कार्यक्रम, शिवाय नोकरी, घरकाम या साऱ्याचा आपल्यावर उतरलेला शीण… पहिल्यासारखं आता निरंजनच्या आगेमागे करता येत नव्हतं. त्याचा आणि आपला ही संसार सावरता सावरता त्याच्या गाण्यापासून आपण दुरावत चाललो. आपलं स्वत:चं गाणं तर त्याहीपूर्वी केव्हाच सरलं होतं.

सुरवातीला वाटायचं, आपण हळूहळू बधीर, बोथट होत चाललोय. नंतर नंतर हे वाटणंही बोथटून गेलं. रियाझाचं राहू द्या. प्रत्येक मैफलीला जाणंही अशक्य झालं. निरंजन नावलौकिक मिळवत गेला. पण, त्याची प्रेरणा, प्रतिभा म्हणून असलेलं आपलं स्थान हरवत गेलं आणि आता तर धक्काच… आपल्यापेक्षा १७-१८ वर्षांनी लहान असलेल्या आपल्या शिष्येबरोबर तो राहणार. खरंय. त्याच्या नावाला वलय आहे. त्याहीपेक्षा

जीव ओवाळून टाकावं असं त्याचं गाणं आहे. खरं आहे. प्रज्ञाही अति संवेदनाक्षम, तरल मनाची आहे. अभ्यासू आहे. त्याच्या सांगितीय प्रयोगात तिचा मोठा वाटा आहे. हे सारं पटतंय आपल्याला.

पण, त्यासाठी खरंच दोघांनी एकत्र रहाणं अपरिहार्य आहे का? शिष्या मुलीसारखी असते ना?

सरत्या संध्याकाळी शिकवणीहून मधू परत आली. कोप-यात चपला आणि सोफ्यावर दप्तर भिरकावत तिने विचारलं,

'आई, बाबा आले? सकाळीच येणार होते ना? ' साधनाच्या चेहऱ्याकडे बघता बघताच तिच्या लक्षात आलं. बाबा आले नाहीत.

'शी! नाहीच ना आले बाबा! कधी येणारेत?' मधू निरंजनची अतिशय लाडकी. 'माझं गाणं हीच पुढे नेणार..' असं सारखा म्हणायचा. आईपेक्षा बाबांशीच तिचं गूळपीठ जास्त जमायचं.

साधनाने पत्र पुढे केलं. मधू दहावीत आहे. लहान नाही आता! आणि लपवणार तरी काय? आणि किती दिवस? नाहीतरी बाहेरच्या लोकांकडून काहीतरी कळण्यापेक्षा आपणच आपल्या मुलांच्या मनाची तयारी केलेली बरी.

पत्र वाचता वाचता मधूचे दात ओठात रूतले.

'आम्ही इंदौरला रहायचं ठरवलंय. माझ्या प्रकृतीला मुख्य म्हणजे गळ्याला मुंबईपेक्षा इंदौरची हवा जास्त मानवेल. मी तिथे नाही. मधूच्या गाण्याकडे लक्ष दे. तू देशीलच. मी येईन तेव्हा तिला तालीम देईन. तू येऊ दिलंस तर... सुट्टीत मधू माझ्याकडे येईल. परीक्षा झाली की तिला गाणं शिकायला तुळजापूरकरांकडे जाऊ दे...'

पत्र वाचून मधू सैरभैर झाली.

'शी! आपले लाडके बाबा आपल्याला सोडून गेले... गाण्यासाठी... नकोच ते गाणं... '

हातातल्या पत्राचे तिने अगदी बारीक तुकडे करून टाकले. 'हं! पत्राचे तुकडे केल्याने का वस्तुस्थिती बदलणार आहे.' साधनाच्या मनात आलं. त्यानंतर मधूची मन:स्थिती खूपच बिघडली. एकीकडे तिला बाबांचा राग येत होता. तिरस्कार वाटत होता आणि त्याचवेळी तिला नको असताना बाबांच्या आठवणी भरभरून येत होत्या. त्यांचं हसणं... त्यांची थट्टा मस्करी... गाताना त्यांची लागणारी समाधी... त्यांनी लावलेला षडज्... त्यांच्या ताना... फिरक्या... आणि मग त्यांचं गाणंच फक्त तिच्या मनात गुंजत राहयचं. या साऱ्याचा तिच्या मनावर खूप ताण पडला. तिला डिप्रेशन आलं. तिच्या बिघडलेल्या मन:स्थितीतून तिला सावरायल साधनाला खूप प्रयास पडले. पण, हळूहळू ती नॉर्मलला आली. यानंतर मात्र तिने गाणं सोडलं ते कायमचं. कुणाच्याही समजावणी, धमकावणीला तिने भीक घातली नाही.

साधनाने किती वेळा सांगितलं.

'तू गाणाऱ्याचा राग गाण्यावर काढतीयस, बेटा... तसं करू नको. गाणं आनंददायी आहे. हट्टाने या आनंदास पारखी होऊ नको. '

पण मधूने जणू आपले ओठ शिवून टाकले. गाणं म्हणणं सोडाच. ऐकणंही तिने सोडून दिलं. घरात रेडिओ, टी. व्ही. वर गाणं लागलं तरी खटकन् ती बटण बंद करायची.

अशी ही मधू... आज चक्क गात होती. कितीतरी वर्षांनी... मधूलाही आईची चाहूल लागली. आईच्या विस्फारलेल्या डोळ्यांकडे बघता बघता तिच्या लक्षात आलं, आज अघटित घडलं. आपण गातोय. आपल्याला गावसं वाटतंय. सकाळपासूनच. गाण्याची इतकी अनावर इच्छा आतून उफाळून आली की ती दाबून ठेवताच आली नाही. इतकी अनावर... आपल्या पोटात वाढणाऱ्या गर्भाच्या पेशी थेट आजोबांच्या पेशीशी नातं सांगणार आहेत की काय? त्याच्या धमन्यातून रक्ताबरोबरच स्वरांचा प्रवाह वाहणार आहे की काय? आपण नाही, आपल्या गर्भातील प्रत्येक पेशी जणू गात आहे आणि तिचा स्वर आपण मुखरित करतोय. आता कुणाचा तिरस्कार करणार आपण? कुणाला टाळणार?

साधनाकडे लक्ष जाताच, मधू धावत तिच्याकडे गेली. तिच्या पायाशेजारी फरशीवर बसली आणि तिच्या मांडीत आपलं तोंड लपवलं. जणू तिनं काही गुन्हा केला होता आणि त्यासाठी ती लज्जित झाली होती.

साधनाने तिच्या डोक्यावरून ममतेने हात फिरवत म्हटलं,

'गा बेटी गा! अगं, तुझ्या पोटात अंकुरणारं बाळ जसं ईश्वराचं देणं, तसं तुझ्या गळ्यातून उमटणारं गाणंही ईश्वराचं देणं. उतू नको, मातू नको, ईश्वरचं देणं अव्हेरू नको. '

मधूने मान वर उचलली. किती तरी दिवस तिच्या मनाच्या तळात घोंघावणारं वादळ शमलं होतं. आपल्या पोटात अंकुरणाऱ्या त्या इवल्या गर्भानं काहीतरी नवीन जाणीव आपल्याला दिलीय, असं तिला वाटत राहयलं.

**सौ. उज्ज्वला केळकर -** मो. - 9403310170



## लेख - कचराकुंडी - श्री आनंद हरी



"आजी, जुनेर म्हणजे काय गं?"

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आठवीत शिकणाऱ्या इशूनं आजीला विचारले. महानगरीय जीवन जगणारी आणि इंग्रजी माध्यमात शिकणारी इशू सुट्टीला आजोळी आली की आजी तिला आवर्जून मराठी पुस्तकं वाचायला द्यायची. तसा इंगजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषय होता, घरीही मराठी बोलले जाते पण घराबाहेर पडले की त्यांची संवादाची भाषा ही हिंदी- इंग्रजीच असते. आश्चर्याची बाब म्हणजे समोरची व्यक्ती मराठी भाषिक आहे हे ठाऊक असले तरी इंग्रजीत, किमान हिंदीत संवाद साधला जातो.

"आजी, सांग ना गं? जुनेर म्हणजे?"

इशूने पुन्हा विचारले.

"जुनेर म्हणजे अगदी जुनं झालेले.. वापरून वापरून रंग गेलेले इतकं जुनं कापड, साडी वगैरे."

"अगं, इथं लिहिलंय 'ती जुनेर नेसली होती. 'मी म्हणते इतकं जुनं कशाला घालायच? नवीन आणायचं ना?"

"अगं, घरात जुने नेसले तर काय होतंय? लगेच नवीन आणायचं? आणि मग जुन्याचे काय करायचे?"

"सिम्पल आहे, टाकून द्यायचे ना डस्टबिन मध्ये..?"

"हो गं बाई.. पण जुने झाले म्हणून लगेच तुमच्या त्या डस्ट बिन मध्ये टाकायचं? तुला माहिती आहे का इशू आमच्या लहानपणी...."

गॅसवरती वर आलेले दूध उतू जाऊ नये म्हणून गॅस बंद करण्यासाठी आजी बोलत बोलत स्वयंपाक घरात गेली होती. इशू सुट्टीला आली की आजी जुन्या काळातले, तिच्या लहानपणचे काहीबाही सांगत राहायची ते इशूला आवडायचे. 'तुझ्या लहानपणी काय...? सांग ना गं..' म्हणत तीही आजीच्या पाठोपाठ आत गेली.

"अगं थांब, सांगते."

दुधावरच्या या साईचे आजीशी छान मेतकूट जमते. आई मुलांना घडवतेच पण आजीशी नातवंडांचे चांगले जमत असते. गोष्टीतून, जुन्या काळातील घटना सांगत, गप्पा मारत आजीही त्यांच्यावर चांगले संस्कार करत असते.

मी वृत्तपत्र वाचन असतानाच आजी -नातीचा संवाद माझ्या कानावर पडला होता. सहज मनात आले, काळ किती बदललाय. जुनेर, ठेवणीतले कपडे हे शब्दही इतके जुने झालेत की आताच्या पिढीला ते माहितीही

नाही. कोणतीही गोष्ट असो ' टाकून मातू नये ' हा त्याकाळचा परवलीचा शब्द. त्याचाच संस्कार पिढी दर पिढी होत राहायचा. सणवार-समारंभाला पेटीतले ठेवणीचे कपडे बाहेर निघायचे. घातले जायचे."ही माझ्या सासूबाईंची साडी/ लुगडे… त्यांनी मला दिली बरं का!" असे एखादी सून आनंदाने, अभिमानाने आणि काहीशा हळवेपणाने सांगत मिरवायची. नंतर ते तसेच परत व्यवस्थित पेटीत जायचे. ते पुढच्या सणा-समारंभालाच बाहेर यायचे. ठेवणीतल्या कपड्यांचे नवेपण हे वर्षांवर अवलंबून नसायचे.

आम्ही शाळेत असताना एकाची नवीन पुस्तके घरातलेच नव्हे तर नात्यातले भाऊ-बहीण, शेजार-पाजारची मुले पुढे पाचसहा वर्षे वापरायचे. अगदीच कोणी मागे - पुढे शिकणारे नसेल तर ती अर्ध्या किमतीत विकली जायची, विकत घेतली जायची. कपड्यांचेही तसेच होते. आपल्या मोठ्या भावा-बहिणीने वापरलेले कपडे वापरताना आपण दुसऱ्या कुणाचे कपडे वापरतोय, असे काही मनातही यायचे नाही. ते मिळालेले जुने कपडे, जुन्या वस्तू नव्याइतकाच आनंद देत असत. फाटलेली, पाने निखळलेली पुस्तके आणि फाटलेले कपडे शिवून वापरले जात होते. कोणतीही वस्तू जोवर उपयोगी आहे तोवर तिचा कोणी ना कोणी उपयोग करत असे. वस्तू जुनी झाली म्हणून ती टाकून देणे हा विचारही मनाला कधी स्पर्श करायचा नाही. त्यामागे त्या वस्तूप्रति निर्माण झालेला आपलेपणा असायचाच; पण त्यापेक्षा जास्त कृतज्ञता असायची.

जुनी वस्तू विकण्यापेक्षा देण्याचा विचार जास्त असायचा. त्यामागे ती वस्तू आपल्याला उपयोगी नसली तरी दुसऱ्या कुणाला उपयोगी पडत असेल तर ती देणे ही भूमिका असायची.

वस्तू असोत, नाती असोत कुठल्याच बाबतीत डस्ट- बिन ही संकल्पनाच अस्तित्वात नव्हती. कोणतीही गोष्ट आत्ता उपयोगी पडत नसली तर ती कधी ना कधी स्वतःला किंवा दुसऱ्याला उपयोगी पडेल याची खात्री असल्यामुळे ती जपून ठेवली जायची. मोठ्या घरात अडगळीची खोली असायची किंवा पोटमाळा असायचा. तिथं असणाऱ्या वस्तूंना अडगळ म्हणलं जात असले तरी त्याची कधी अडगळ व्हायची नाही, वाटायची नाही. प्रत्येक गोष्ट जपून सांभाळून ठेवली जायची. कृषी संस्कृतीचे ते देणेही होते आणि लेणेही होते.

घरात चूल होती, दारात गोठा होता. जनावरांनी वैरण खाऊन झाल्यावर उरणारी धाटे/ताटे, झाडाची वाळलेली पाने, काटक्या सरपण म्हणून चुलीत जायची. घरात भाजी निवडून झाल्यावर उरलेली देठं गोठयात जनावरपुढे जायची. शेणकुटे/शेण्या चुलीत जायची तर चुलीतली राख, शेण वगैरे उर्वरित सर्व गोष्टी उकिरड्यात टाकल्या जायच्या. वर्षाभराने उकिरड्यात खत तयार झालेले असायचे. उकिरड्याचा गारा उपसून ते बैलगाडीतून नेऊन रानात टाकले जायचे. निसर्गाने निर्माण केलेली कोणतीच गोष्ट निरोपयोगी, कचरा, अडगळ अशी वाटायचीही नाही आणि तशी ती नसायचीही, नसतेही.

जे होते ते पुनर्वापर करता येण्यासारखे होते, निसर्गनिर्मित होते. तोवर मानवनिर्मित प्लॅस्टिकचा राक्षस जन्माला आला नसावा, कारण कुणाला प्लॅस्टिक माहितीही नव्हतं. दुकानातून गोडेतेल (ज्याला बहुतेकजण तेंव्हा येशेलतेल म्हणत ) हे तवलीतून, तांब्यातून, किटलीतून आणि खोबरेल तेल, रॉकेल (घासलेट ) हे काचेच्या बाटलीतून आणले जात होते… बाकीचे गहू, तांदूळ कापडी पिशवीतून, धडप्यातून (जुन्या धोतर, पातळ, लुगड्याचा मोठा तुकडा) बांधून आणले जायचे. साबुदाणा, साखर, डाळी वगैरे किराणा सामान कागदाच्या पुडीत बांधून आणले, दिले जायचे. कागद तसे दुर्मिळच. त्यामुळे ते रद्दी व्हायचे नाहीत.

दुकानातून पुड्या बांधून आलेले कागद पुन्हा कशाला तरी उपयोगी पडतील अशा विचाराने कुठल्यातरी फडताळात, कोनाड्यात, दिवळीत व्यवस्थित जपून ठेवलेले असत.

शाळेचा गृहपाठ पाटीवर लिहीत होतो. पहिली दुसरीला पाटीच. वही हा प्रकार तिसरीपासून पुढे होता. शाळेत जाताना दोरा बांधलेली काचेची दौत आणि टाक घेऊन जायचे. दोन पैशाला शाईची पुडी मिळायची. दौत भरून गडद निळी शाई व्हायची. बऱ्याचदा ती लिहून संपण्याआधीच सांड-लवंड होऊन संपून जायची. मग घरात आणि कधी कधी शाळेत गुरुजींचा मार ठरलेला. त्यावेळी राणी निब मिळायची. शाळेतले तक्ते गुरुजी बोरूने लिहायला लावायचे. तिसरीनंतर वही सुरू झाली. वार्षिक परीक्षा झाली की आम्ही सर्व वह्यांतील कोरे आणि पाठकोरे कागद काढून त्याच्या दोन वेगळ्या वह्या घरातच शिवून तयार करत होतो. पाठकोरी वही कच्च्या लिखाणाला वापरत होतो. काही जणांना घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे वह्या मिळायच्या नाहीत. गुरुजी सगळ्यांच्या कोऱ्या कागदाच्या वह्या पहायचे. कुणाकडे जास्त असतील तर त्यातील एखादी वही त्या विद्यार्थ्याला द्यायला लावायचे. नाहीतर स्वतः त्याला विकत आणून द्यायचे. त्यावेळी इस्लामपूरला अशा वह्या अगदी कमी किमतीत विकतही मिळत होत्या. काटकसरीचे आणि पुनर्वापराचे धडे प्रत्यक्ष कृतीतून शाळेतच मिळत होते.

काळ पुढे जात गेला तसे सारेच बदलत गेले. माणसाची वृत्ती आणि प्रवृत्ती बदलत गेली. ' अंथरूण पाहून पाय पसरावेत ' हा विचार नुसता कालबाह्यच झाला नाही, तर तो कर्तृत्वशून्यतेचा, अल्पसंतुष्टतेचा द्योतक मानला जाऊ लागला. जे गुण मानले जात होते, ते दोष मानले जाऊ लागले. माणसाचे आयुष्य घड्याळाच्या काट्याला बांधले गेले. आर्थिक, भौतिक संपन्नता आली; पण जीवनातील निवांतपणा हरवून गेला. साऱ्या गोष्टींपेक्षा पैसा महत्वाचा वाटू लागला. पैसा असेल तर सारी सुखे पायाशी लोळण घेतात, हा समज वाढला.. नाती-गोती दुय्यम स्थानावर गेली आणि माणसाच्या जीवनाला ताण-तणावांचे ग्रहण लागले.

प्रगतीच्या अतिरेकाने अधोगतीकडे तर वाटचाल सुरू झालेली नाही ना? हा प्रश्न सतावू लागला. अधिक पैशासाठी अधिक उत्पन्न, त्यासाठी रासायनिक खतं आणि नगदी पिके.. हा विचार रुजला. गोठे रिते झाले. ट्रॅक्टर, यंत्रे आली. माणूस स्वावलंबी नव्हे, तर स्वयंभू, स्वायत्त बनला. कुणाची गरज राहिली नाही. पैसा फेकायचा आणि खरेदी करायचे ही वृत्ती बळावली. साऱ्याचीच अडगळ होऊ लागली. जुने ते सोने वाटेनासे झाले. नवतेचा, नावीन्याचा स्वीकार करताना सगळे जुने टाकाऊ वाटू लागले.. अगदी जुने विचारही आणि विचारधाराही.

आमच्या लहानपणी आजकाल असणाऱ्या 'वापरा आणि टाकून द्या ' ( युज अँड थ्रो ) या कृतघ्न संस्कृतीचा, किंबहुना विकृतीचा उदयही झाला नव्हता. जे जे निसर्गाकडून घेतले जात होते, ते ते कृतज्ञ होऊन निसर्गाला परत दिले जात होते. आज वारंवार ऐकायला मिळणारा 'पर्यावरण संतुलन', 'पर्यावरण रक्षण, "प्रदूषण" हे शब्दही तेंव्हा ऐकीवात नव्हते. माणूस पर्यावरणाचा, निसर्गाचा एक घटक म्हणून जगत होता. निसर्गावर मात करण्याचा विचारही मनात येत नव्हता. फारसा स्वकेंद्रितपणा नव्हता. ' जगावे आणि जगू द्यावे ' ही जगण्याची भूमिका होती.

इशूच्या विचारांनी माझ्या मनात सुरु झालेले आठवणींचे, विचारांचे चक्र थांबले. मी काहीशा उत्सुकतेने स्वयंपाकघराच्या दाराकडे पाहिले.

आतून इशू आणि तिची आजी दोघीही बाहेर आल्या. दोघींचेही चेहरे प्रसन्न होते. आजीच्या चेहऱ्यावर हलकेसे स्मित झळकत होते, तर बोलता बोलता इशू विचारात गुंग झाली होती. मला पाहताच म्हणाली,

"आजोबा, काल तुम्ही म्हणत होता, ते पटले मला. आपण आपल्या या आजच्या जीवनशैलीमुळे आणि' वापरा आणि टाकून द्या' या वृत्तीमुळे खरोखरच आपल्या या पृथ्वीचे डस्टबिन... सॉरीss आजी, मघाशी काय म्हणालीस ग तू? हं! आठवले.. आपण या पृथ्वीची कचराकुंडी बनवत आहोत. फक्त कचराकुंडी!”

मी आणि इशूची आजी समाधानाने तिच्याकडे पहातच राहिलो.

**श्री आनंदहरी -** मो. ८२७५१७८०९९



## कविता - शब्दांची रुपे - सुश्री त्रिशला शहा



सुंदर गुळगुळीत पानावरती
एक कविता लिहावे म्हटले
शोधून छानसे पेनही आणले
अक्षर कोरुन लिहावे म्हटले

शब्दांना मग गोळा केले
एका ओळीत बसवावे म्हटले
उपमा, अलंकारांना सांगितले
थोडी मदत करण्यास सुचविले

यमक, रुपक जुळवावे म्हटले
पण माझे काही ऐकेचना ते
बाराखडीला मग बोलविले
काना, मात्रा, वेलांटीला आणले

शब्द शब्द मग जोडीत गेले
माझ्या मनाप्रमाणे बसविले
काना, मात्रांचे साज चढविले
अलंकारांनी किती नटविले

शब्दांचे मग रुप बदलले
लय, तालाचे भाव विखुरले
किती सुंदर दिसती ते सारे
यालाच मी कविता म्हटले.

**सुश्री त्रिशला शहा** - मिरज। मो. 9561562887

## कथा - अंगठी- सुनीता गद्रे



ही 'ती'ची कथा आहे. अगदी सामान्य, निरक्षर आणि चारचौघीसारखं रंगरूप असलेली ती! चाळीशीच्या घरातली पण पन्नाशी ओलांडल्यागत वाटणारी ती!

वयाच्या नवव्या वर्षीच परकर-पोलक्यातल्या तिला, एक हिरवी जरीची साडी गुंडाळून आणि हातात हिरवा चुडा भरून तिच्या आई-बापानं तिचं लग्न लावून टाकलं होतं. बाशिंग बांधलेला मुलगा, ज्याला नवरा म्हणतात.... आणि बॅगभर पातळं, कानातल्या कुडया, पायात जोडवी, गळ्यात गंठण आणि हातात हिरवा चुडा अशा सगळ्या अप्रूप असलेल्या गोष्टी मिळणं... या पलीकडं लग्न म्हणजे दुसरं काही वेगळं असतं, याची समज तिला होतीच कुठं? नाही म्हणायला आईचं माहेर जरा सुस्थितीत असल्यानं तिथल्या आजीनं, पहिल्याच नातीचं लग्न म्हणून एक अर्ध्या तोळ्याचं सोन्याचं वळं तिच्या बोटात घातलं होतं अंगठी म्हणून! ही अंगठी तिला फार आवडली होती.

सासू- नवरा आणि आता ती, एवढंच छोटं कुटुंब! बहीण-भावांच्या गोतावळ्यातून बाहेर पडलेल्या तिच्यासाठी हे सगळं नवीन होतं. तशी सासू स्वभावानं चांगली, प्रेमळ, समजून घेणारी, समजावून सांगणारी! तिचं मनही त्यामुळं सासरी रमलं. आई-बाबांच्या, भावंडांच्या आठवणीने मुळुमुळु रडणारी ती हळूहळू तिथं रुळू लागली. नव्या नवलाईचे दिवस होते. नवऱ्याबरोबर इकडं- तिकडं फिरणं, पिक्चर बघायला जाणं, जत्रेला जाणं, तिथून आणलेले चमकणारे दागिने घालणं सगळंच आनंद देणार होतं खरं, पण तिच्या बोटातल्या सोन्याच्या अंगठीची सर कशालाच नाही, असं तिला वाटायचं. काम करता करता मधूनच ती सारखी बोटातल्या अंगठीकडं कौतुकानं बघत असायची.

प्रेमळ सासूनं तिला लवकर उठून घरकाम आवरायला शिकवलं. छोट्या-छोट्या हातांनी ती धुणं धुवायला, भांडी लख्ख घासायला शिकू लागली. स्वयंपाक करायला शिकली आणि मग लोकांच्या घरात धुणं, भांडी, झाडू-फरशीचे काम करायला सासू पहिल्यासारखी मोकळी झाली. एकट्या मुलाच्या पगारावर काय भागणार?

चार एक वर्षात ती मोठी झाली.... आधी नवऱ्याच्या नुसत्या स्पर्शाने करंट लागल्यागत घाबरणारी ती आता पतीच्या सहवासात रमू लागली. संसारसुखाचा अनुभव घेणारी ती बघता बघता दोन लेकरांची आई झाली. सगळं कसं छान चाललं होतं. संसार असाच सुखाचा असतो, असं तिला वाटू लागलं होतं.

पण अचानक सासू वारली... तिच्यावर आभाळच कोसळलं. आता तर घरातलं करून सासूसारखं बाहेर ही कमवायला जाणं भाग होतं. नवऱ्यावर कुणाचाही धाक राहिला नव्हता. तो बेताल झाला होता.

"माझ्याकडं तुझं लक्षच नसतं", असं काहीतरी कारण काढून नवऱ्यानं दारूची बाटली पकडली होती.

आणि..... हळूहळू सगळ्या संसारसुखाचा अंतच झाला. घरात राबायचं, पोरांसाठी खस्ता खायच्या, नवरा घरात पुरेसा पैसा देत नाही, म्हणून बाहेर लोकांच्या घरात धुणं, भांडी, झाडू, फरशीचं काम करायचं, हेच आता तिच्या जीवनाचं इतिकर्तव्य झालं. सुखाचा संसार हा भुलावाच ठरला. अंगावर कामावरच्या मालकिणींनी दिलेल्या जुन्या साड्या, मुलांच्या अंगावर मुलांसाठी असेच मिळालेले जुने कपडे तिच्या दुर्दैवाची साक्ष द्यायला पुरेसे होते. आणि तिच्या बोटातली ती तिची आवडती सोन्याची अंगठी... केव्हा सावकाराकडे गहाण पडली आणि त्याचीच झाली ते तिच्या आता लक्षातही राहिलं नाही.

मुलं मोठी होत होती. शाळा शिकत होती. त्यांचे खर्च भागवता भागवता तिच्या नाकी नऊ येत होते. पण नवऱ्याला त्याची कधी दखलही घ्यावीशी वाटली नाही... आणि त्यात वेगळं काय आहे? आपल्या समाजात पुरुषांना कुठलं ना कुठलं व्यसन असतंच, किंबहुना असायलाच हवं.... हे त्याचे विचार होते आणि दारु हीच त्याचं सर्वस्व बनली होती.

काळ कोणासाठी थांबलाय? एक दिवस नवरा तिला सांगू लागला,

"लेकीसाठी एक मस्त सोयरीक आलीया बघ. लई चांगली लोकं हैत. त्यांना हुंडा-बिंडा नकोय. देणं-घेणं बी किरकोळ हाय. पोरगा सुतार काम करतोय. दादानंच सोयरीक आणलीय. आता लगीन उरकूनच टाकायचं."

"अजून जाऊद्यात ना थोडे दिस. सोळाचीच हाय आत्ता... शिकतीया."... ती अडखळत म्हणाली खरी, पण तिलाही ठाऊक होतं, आपल्या लोकांत मोठ्या वयाच्या, जास्त शिकलेल्या मुलीचं लग्न होणं अवघड असतं.

घरातली कुठलीही जबाबदारी न उचलणाऱ्या त्याला मुलीचे लग्न करावं हे तेवढं सुचलं होतं.

"पुढल्या सोमवारला आपल्या आणि त्यांच्या भावकीतली पुरुष माणसं, बाया समदी आपल्या घरी जमणार असं ठरलंय. ' यादी पे शादी 'बार उडवून टाकायचा." त्यानं निर्णयच देऊन टाकला.

पै- पावणं, जेवणखाण... व्याही, विहीण, नवरा मुलगा, यांचं कापड-चोपड आणि काहीबाही...... तिच्या मनात काहूर माजलं. पैशाचं काय? .. हा प्रश्न त्याला पडलाच नव्हता. कारण सगळं तिनंच करायचं हे ठरूनच गेलेलं होतं.

सोमवारी बैठक बसली. दोन्हीकडचे भावकीतले पाहुणे यादीला बसले. मुख्य मुख्य माणसांचं कापड -चोपड, मुलाच्या सफारी सूटचं कापड तिनं आणूनच ठेवलं होतं. कारण हुंड्याचा प्रश्न नसला तरी बाकीचे नुसते टॉवेल-टोपीवर खुश होणार नाहीत हे तिला माहीत होतं. पण बायका-बायकात फारच गलका चालू झाला. बोलणी फिसकटतात की काय असं वाटू लागलं. कारण विहीण म्हणत होती,

"गंठणात आम्ही सोन्याचं सहा मणी, दोन वाट्या घालतोया. तुमी बी सोन्याचं काय बी जावयाला घालावं"....

काय करावं तिला प्रश्न पडला. शेवटी घाबरलेल्या, अन् कुणा मोठ्यांचा सल्ला घेण्याचं लक्षात न आलेल्या तिनं सांगून टाकलं,

"बरं पण हे आत्ता नाय जमणार, पर मी शब्द देतो यंदाच्या दिवाळीला मी जावयाला अर्ध्या तोळ्याची सोन्याची अंगठी करून घालीन."

आणि ऐकताक्षणी बैठकीचा नूरच पालटला. हो नाही करता करता बोलणी पुरी झाली.

"बैठक लई बेस् झाली. तू पुढाकार घेतला नसतास तर काय बी खरं नव्हतं." नातेवाईक तिचं कौतुक करू लागले. लगेच संध्याकाळी मुलीचं लग्न झालं. सासरी पाठवणी पण झाली.

लग्नासाठी या वहिनी, त्या काकू, या आजी अन् त्या भाभी... अशा सगळ्या कामावरून घेतलेली उचल फेडताना तिची ओढाताण होऊ लागली. अर्ध्या तोळ्याची अंगठी रोज तिच्या डोळ्यासमोर नाचू लागली आणि दुसरीकडे विहीणीचा चेहरा! ... अंगठी आणि दिवाळी या गोष्टीचा तिने धसकाच घेतला. थोडे थोडे पैसे ती साठवत होती. पण तेवढे पुरणार नाहीत, हेही ती जाणून होती.... दसरा उलटून गेला आणि तिच्या नवऱ्याच्या पोटदुखीने उचल खाल्ली. दारू पिऊन पिऊन लिव्हरवर परिणाम होऊ लागला होता. हॉस्पिटल, औषधपाणी सगळ्याचा खर्च भागवता भागवता ती रडकुंडीला आली.

दिवाळीत ठरल्याप्रमाणं विहिणीनं अंगठीचा विषय काढला." मी देतो म्हणालोतो तर मी देणारच हाय, पर जरा घरातली अडचण बघा ना." ती गयावया करत राहिली आणि थोडक्यात आजचं मरण तिनं उद्यावर ढकललं.

.......

मुलानं दहावी पुरती न करताच शिक्षण सोडलं."अभ्यास करायला नाही मला आवडत," म्हणायला लागला. तिने कपाळाला हातच लावला.

"अरे जरा शिक की पुढंपत्तर. चांगला शिकलास तर चांगली नोकरी भेटंल. तुझ्या शिक्षणाला मी किती बी पैसा खर्च करायला तयार हाय." तिने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. पण त्याला हातात खेळता पैसा हवा होता. मोठ्या भाजी मंडईतल्या हमालीत ज्यादा पैसा भेटतो, असा त्याला शोध लागला होता. तो हमाली करू लागला. रोजचे रोज कमवू लागला, अन् आपल्या चैनी, हॉटेलबाजी, कपड्यांचा थाटमाट यात पैसे उडवू लागला.

मधेच एकदा तिनं विषय काढला. बाप लेक समोरच बसले होते," मागच्या वर्षाला नाय जमलं, यंदाच्या दिवाळीला तरी अंगठी देऊ या म्हणते मी."

"आई माझा पैसा मलाच पुरना, अंगठीसाठी मी कुठून देऊ?"

तिनं नवऱ्याकडं पाहिलं ..." तू कशाला आगाऊपणानं शब्द दिलास गं? आता तूच सगळं निस्तर".. नवरा खोचकपणे म्हणाला. बापलेक थट्टा करत हसू लागले आणि तिथून निघून गेले. आता अंगठीचा केलेला वादा तिला तिच्या एकटीच्या कमाईवरच पूर्ण करायचा होता. त्यामुळे विहिणीच्या टोमण्यांकडे दुर्लक्ष करत, कधी

तिच्या विनवण्या करत ती पैसे साठवत राहिली. एक गोष्ट बरी होती की अंगठीसाठी तिच्या मुलीला सासरी कोणी छळत नव्हतं.

भोळ्याभाबड्या, सरळ मनाच्या तिला वाटायचं, तिची सोन्याच्या अंगठीची हौस लहानपणीच मरून गेली. आता लेकीला अंगठी द्यायची हौस तरी पुरी होऊ दे.

बचत गटाची पद्धत सुरू झाली. हातात पैसे येऊ लागले. तिला आशा वाटू लागली की आता तरी अंगठीला मुहूर्त लागेल. कोणाच्या हाता- पाया न पडता आपला शब्द आपण खरा करू शकू.... पण बघता बघता खर्चाचे डोंगर आणि सोन्याचे दरही उंच उंच वाढत होते. मुलाचे लग्न, मुलीचं, सुनेचं बाळंतपण, सरकारी तगादा लागल्याने शौचालय बांधणं, पाण्याचा त्रास टाळण्यासाठी पाण्याचा नळ घेणं, एक ना दोन! आधीची उसनवारी तर फेडायचीच असायची. अर्धे पैसे त्यातच जायचे. हप्ते भरायची जबाबदारी फक्त तिची! शेजा-यापाजा-यांशी स्पर्धा करत मुलानं स्कूटर घेतली, त्यापाठोपाठ घरात टीव्ही आला. फ्रीज आला. मिक्सर, फिल्टर, उभ्याचा कट्टा, या तर किरकोळ गोष्टी! स्मार्टफोन वापरून मुलगा स्मार्टनेस दाखवू लागला."आम्ही काय कोणापेक्षा कमी आहे होय?" मुलगा म्हणायचा.

पण अंगठीच्या आठवणीनं ती हिरमुसून जायची. कामावरच्या एका वहिनीकडं ती आपलं हे दुःख सांगायची."सोडून दे तो अंगठीचा विषय. मुलीच्या बाळंतपणात, नंतरच्या तिच्या आजारपणात जवळजवळ पंधरा-वीस हजारांनी तू खाली आलीस. सरळ सांग आपल्या विहिणीला, अंगठीची किंमत त्यातच फिटली म्हणून."... वहिनी तिला व्यवहार शिकवायच्या. पण तिच्या पापभीरू, भाबड्या मनाला ते पटायचं नाही. ' नाही. एकदा शब्द दिला म्हणजे दिला. ' ती स्वतःलाच बजावायची... आणि नंतर अंगठी द्यायची जिद्दच जणू तिच्या मनात निर्माण झाली. काहीही करून तिला ती पुरीही करायची होती. बचत गटाचा हप्ता भरताना मुलानं, नवऱ्यानं तो दिला तर दिला, नाही तर नाही, असं चालायचं. त्यामुळे राबणं... खटणं, हप्ते भरणं, आणि संसाराचा गाडा पुढं रेटणं हेच तिच्या नशिबात होतं. देवाची पूजा आरती करताना ती देवाला साकडं घालत होती, उपास तापास करत होती, नशीब आजमवण्यासाठी लॉटरीची तिकीट घेत होती.... आणि म्हणूनच कष्ट आणि चिंतेमुळं चाळीशीतच पन्नाशी पार केल्यागत वाटत होती.

लॉटरीचं बक्षीस कधीच भेटलं नाही. असा चमत्कार क्वचितच, कधीतरीच घडतो. पण नियतीच्या मनातलं माणसाला कुठं कळतं? ...

असाच एक चमत्कार मात्र तिच्या आयुष्यात घडला. नेहमीप्रमाणे सारडा भाभीकडे ती काम करत होती. ' झाडू-फरशी झाली. भांडी घासून झाली. आता फक्त कपडे धुवायचे आणि घरी जायचं, दोन तरी वाजतीलच.... सुनेच्या हातची गरम गरम भाकरी खायची, टीव्हीवर ' जय अंबे माँ ' मालिका बघायची आणि तिथंच जरा आडवं व्हायचं, शीण घालवायचा अन् पाच वाजले की पुन्हा काम सुरू! ' तिचं विचार चक्र चालू होतं... इकडं ती साबणाच्या फेसात कपडे भिजवत होती. आणि एकदम खण्णकन् आवाज आला. चमकून तिनं बादलीत हात घातला..... आणि काय आश्चर्य! एक सोन्याची अंगठी तिच्या हाताला लागली.....

"शेठजींची अंगठी!” आश्चर्यानं ती उद्‌गारली. तिचे डोळे लकाकले. 'सोन्याची अंगठी' तिच्या हातात होती. डोळे विस्फारून ती पहातच राहिली.... तिच्या घशाला कोरड पडली... एकदम दरदरून घाम फुटला.... ब्लाऊजच्या गळ्यात हात घालून एक छोटीशी पर्स तिनं बाहेर काढली..., पुसून कोरडी करून अंगठी त्यात ठेवली.... इकडे तिकडे बघत बघत पर्स जागच्या जागी ठेवली... पुन्हा वाशिंग प्लेसच्या बाहेर डोकावून कानोसा घेतला... आपल्याला अंगठी पर्समध्ये ठेवताना कोणी पाहिलं तर नाही ना याची खात्री करून घेतली... पुन्हा पर्स बाहेर काढली.... तळहातावर पेलत अंगठीच्या वजनाचा अंदाज घेतला.

'बाई गंऽऽऽ किती जाडजुड अंगठी! तोळ्यापरीस जादाच असेल. दीड नाहीतरी... सव्वा तोळं कुठं नाय गेलं. ' ती स्वप्नात रंगली. ‘ आई लक्ष्मी माते! ही समदी तुझीच क्रिपा म्हणायची अन् काय? माझं समदंच प्रॉब्लेम तू सोडवलंस जणू! सोनाराकडं सोन्याचं कट्- बिट् वजावट केलं तरी एक तोळा पक्का... अर्ध्या तोळ्यात अंगठी... अन् उरलं अर्धा तोळं... तीस हजारला तर काय मरण नाही. पाच-दहा हजार उधार-उसनवार फेडण्यात गेलं.... उरलेल्यामधी त्या वैनी म्हणतात तसं बँकेत फिक्सला? '.... पण स्वप्नातून बाहेर आली तशी ती दचकली. तिचं मन हेलकावे खाऊ लागलं. ती थोडी संभ्रमात पडली. ' ही चोरी आहे. आपल्याजवळ नसलं, आपल्याला हवं असलं, तर मागून घ्यावं; पण चोरी करू नये. ' लहानपणीचे पडलेले संस्कार तिला अडवून मागं खेचू लागले. पण...

'ह्यँ ऽऽ! ही शिकवण उगाच खाण्या- पिण्याच्या, इतर काही -बाही किरकोळ गोष्टीसाठी असतीया. यवढा महागडा जिन्नस मागितला तर कोण दिल होय? .... आणि ही चोरी कुठाय? .... थोडीशी लबाडी हाय.... आपल्याला घावलेलं आपण फकस्त लपवलंय... तसं शेटजीचं भाबीचं फार काय नाय बिघडायचं. दोन-चार दिवस अंगठी हुडकतील... समद्यांना इचारतील... मग गप बसतील. शेटजींच्या बोटात नवी अंगठी येईल... अन् काय! ' मनातल्या सात्विक भावभावनांना दडपण्याच्या व्यवहारी बुद्‌धीचा प्रयत्न चालूच होता.

'समजा तू दिलीस परत अंगठी... फार फार तर काय होईल? ... भाभीला खूप आनंद होईल... खूश होऊन तुला शंभर दोनशे रुपये बक्षीस देईल.... एखादी नवी साडी देईल... सगळ्यांपाशी तुझ्या गुणाचं, प्रामाणिकपणाचं कौतुक करील. पण तुझं दुःख, तुझी आर्थिक विवंचना, ओढाताण, डोक्यावर असलेलं जावयाचं देणं याचं काय? ' व्यवहार युक्तिवाद सुचवत होता. तर्क लढवत होता. पण मनाच्या सात्विक विचारांनी पुन्हा जोर पकडला. तिचं सुसंस्कारी मन तिला म्हणू लागलं, ' प्रामाणिकपणा हेच तर तुझं खरं धन हाय... हे एवढेसे पैसे काय तुला जलमभर पुरणार हैत होय? .... कुठं फेडशील हे पाप? '...

एकदम डोक्यात लख्कन् प्रकाश पडल्यागत तिला वाटलं. दुर्बुद्‌धीचं मळभ छाटल्यागत झालं. पुन्हा नकळत पर्समध्ये ठेवलेली अंगठी काढून ती पुटपुटली,” नाय नको! ही अंगठी माझी परीक्षा घेणारं विषच हाय जणू! असल्या पापाच्या पैशानं आमचं वाईट्ट- वंगाळच व्हील. लेकरांचा संसार... घरातलं बालगोपाळ... समद्यांना दृष्ट लागंल... कुणी बी सुखी होणार नाय...”. या विचारासारशी भीतीने तिच्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला. उलटं पैशाचं दुसरं कोणतं तरी मोठं संकट समोर उभं राहील. मग नकोच हे पापाचं बीज. ' तिच्या मनानं तिला कौल दिला. आणि मानेला निश्चयपूर्वक जोरदार हिसडा मारून, क्षणाचाही विलंब न लावता तिनं अंगठीचा विचार उडवून लावला.

आणि..."भाभी कुठं हायसा तुमी?"... मोठ्यानं हाक मारत ती अंगठी परत द्यायला निघाली. मोहावर, वासनेवर, तिच्या प्रामाणिकपणाने विजय मिळवला होता. सात्विकतेचा एक वेगळाच आनंद तिच्या चेहऱ्यावर झळकत होता. वर्षानुवर्षं अंगठीनं तिल 'ठेंगा' दाखवला होता. आज मात्र ताठ मानेनं ती अंगठीला 'ठेंगा' दाखवणार होती...

... अगदी सामान्य, निरक्षर, आणि चार चौघीसारखं रंगरूप असलेली 'ती' आज मात्र माणूस म्हणून असामान्य झाली होती.

**सुश्री सुनीता गद्रे** - माधवनगर - मो. - ९६०४७२५८०५



## लेख - भूमिका! - श्री प्रमोद वामन वर्तक



मंडळी, लेखाचे शीर्षक वाचून, मी सिने-नाट्य क्षेत्रातल्या नट-नट्यांनी साकारलेल्या भूमिकांविषयी या लेखात काही लिहिणार आहे, अशा भूमिकेत हा लेख वाचतांना आपलं मन गेलं असेल, तर आपल्या मनाच्या त्या भूमिकेची निराशा होण्याची शक्यता आहे. अर्थात हा लेख आपण पूर्ण वाचलात, तर मी सुरुवातीला घेतलेल्या माझ्या या लेखाबद्दलच्या भूमिकेशी, मी शेवटपर्यंत संपूर्णपणे प्रामाणिक राहिलो आहे, याबद्दल आपली बालंबाल खात्री पटेल. आता लेख पुढे वाचायचाच, अशी एक ठाम भूमिका घेऊन आपण संपूर्ण लेख वाचाल, अशी आशा व्यक्त करतो आणि माझी भूमिका विषद करतो!

परवा सहज बऱ्याच दिवसांनी टीव्ही बघत होतो. कसला तरी विनोदी कार्यक्रम चालू होता. त्यातले विनोद अक्षरशः अंगावर काटा आणणारे होते. माझ्या पिढीच्या डोक्यात पु लं अजूनही इतके ठाण मांडून बसले आहेत, की आजकालच्या कुठल्याही विनोदाची पायरी(? ) लगेच डोक्यात जाते! आताही तसंच झालं आणि माझ्या मनाने त्याची भूमिका बदलली अन् मी लगेच माझ्या चोखंदळ प्रेक्षकाच्या भूमिकेत शिरून रिमोटचे बटन दाबले. त्या निर्जीव वाटणाऱ्या रिमोटनेसुद्धा त्याची भूमिका बदलून मला पुढच चॅनेल लगेच दाखवलं. त्या चॅनेलवर बघतो तर काय, बॉलिवूडच्या अनभिषिक्त सम्राटाची छबी पडद्यावर झळकली!

महाशय आपल्या नेहमीच्या धीर गंभीर आवाजात कोणाला तरी मुलाखत देत होते. आता चार चांगले शब्द कानावर पडतील, या आशेने त्याच चॅनेलवर स्थिरावण्याच्या भूमिकेत माझं मन शिरलं. मुलाखत अर्थातच हिंदीत चालू होती हे ओघाने आलचं, पण माझी व हिंदीची अती घनिष्ठ सलगी बघता त्यांचे संभाषण मला माझ्या हिंदीत सांगणे थोडं जड जाईल! शिवाय या सगळ्यात आपलं”बम्बय्या" हिंदी बिघडलं तर? उगाच रिस्क कशाला घ्या?

तर जसे सगळे मुलाखतकार नट-नट्यांना, त्यांची मुलाखत घेताना मुलाखतीच्या शेवटी जो घासून गुळगुळीत झालेला प्रश्न विचारतात, तोच प्रश्न, त्या मुलाखत घेणाऱ्या बाईने सम्राटाला विचारला.”सर, आत्ता पर्यंतच्या आपल्या सर्व भूमिकांमधे आपण साकारलेली आणि तुम्हांला स्वतःला सर्वात जास्त आवडलेली भूमिका कुठली?”

आता हा जो प्रश्न आहे, त्याला यच्चयावत गेला बाजार स्वतःला अभिनय येतो अशी चुकीची समजूत असणारे नट-नट्यासुद्धा, त्यांची कोणी कधीकाळी, कुठेतरी मुलाखत घेतली, तरी एकच एक उत्तर देतात! ते म्हणजे”अजून माझ्या कारकिर्दीत(? ) अशी भूमिका मला साकारायलाच मिळाली नाही! हे माझं खरं दुःख आहे!”

अरे, गेली २५-३० वर्ष सिने-नाट्यक्षेत्रात काम करून लोकं तुम्हांला तुमच्या कामामुळे बाहेर ओळखायला लागल्यावर, तुम्ही असं म्हणायची भूमिका का घेता? नाटकात-सिनेमात इतक्या वेगवेगळ्या भूमिका

करूनसुद्धा, ह्या सनातन प्रश्नाला एकच एक उत्तर देण्याची सक्ती तुमच्यावर कुठल्या"नाट्य परिषदेने" अथवा"सिने गिल्डने" नाही ना केल्ये? का एखादी अमुकतमुक भूमिका माझ्या कारकिर्दीतली मला सर्वात जास्त आवडलेली भूमिका आहे, असं आपण कबूल केलं, तर यापुढे आपल्याला काम मिळणं बंद होईल, अशी सार्थ भीती तर आपल्याला वाटत नाही ना? आणि तसं नसेल, तर आपण मिळेल त्या भूमिकेचं स्वतःच्या अभिनयाने सोनं करू शकतो अशी अजूनही खात्री असेल, तर बिनधास्त सांगा ना, की"मला ना"माझ्या ना, त्या नाटकातली माझी ती भूमिका सर्वात जास्त आवडली!""मला नां माझ्या त्या सिनेमातली ती भूमिका सर्वात जास्त आवडली!" पण असं डेरिंगबाज उत्तर द्यायच्या मनोभूमिकेत शिरून, त्या सनातन प्रश्नाला भिडावं असं भल्या भल्या नटांना अथवा नट्यांना अजून तरी जमलेलं नाही! असं बिनधास्त उत्तर कोणी दिलं असल्याचं आपण कुठे पाहिलं असेल अथवा ऐकलं असेल तर आपण मला नक्की कळवा ही विनंती! म्हणजे मी माझी या बाबतीतली मनोभूमिका बदलायला मोकळा! शिवाय जमलंच तर त्या नटाला अथवा नटीला अशी ठाम भूमिका घेतल्याबद्दल, एक बऱ्या पैकी बुके पाठवून त्याचं किंवा तिचं याबाबत अभिनंदन करीन म्हणतो!

नट-नट्यांची स्वतःच्या भूमिकेबद्दल ही तऱ्हा, तर सर्वपक्षीय राजकारणी नेत्यांची स्वतःच्या भूमिकेबद्दल तिसरीच तऱ्हा! कारण हल्लीच्या राजकारणात त्यांच त्यांनाच माहीत नसतं, की आपण सकाळी ज्या पक्षात आहोत त्या पक्षात दुपारपर्यंत असू का नसू? मग संध्याकाळची गोष्टच सोडा! आणि पहाटे पहाटे सारी जनता साखरझोपेत असतांना पक्ष बदलण्यात जी मजा आहे, ती सामान्य लोकांना कशी कळणार? त्यासाठी लगेच स्वतःच्या पक्षाची राजकारणातली भूमिका बदलून विरोधी पक्षाच्या राजकारणातल्या भूमिकेत शिरणं ही काय खायची गोष्ट आहे? त्यामुळे रात्री-अपरात्री किंवा पहाटेपहाटेसुद्धा आलेल्या परिस्थितीला धीराने सामोरे जाऊन, आपली भूमिका वेळोवेळी बदलण्याची ताकद त्यांच्याकडे असते! म्हणून कुठलाही नेता हा एक उपजत उत्तम अभिनेता असतोच असतो, अशी माझी कुठल्याही स्वतःला नेता म्हणवणाऱ्या माणसाबद्दल ठाम भूमिका आहे! माझ्या या ठाम भूमिकेशी आपण सहमत असाल असं गृहीत धरून, या सर्वपक्षीय नेत्यांच्या बाबतीतली माझी भूमिका इथेच थांबवतो मंडळी. कारण हल्ली कुठल्याही नेत्यांच्या कट्टर कार्यकर्त्यांच्या मनोभावना खूपच तरल झाल्या आहेत. त्यामुळे एखाद्या कार्यकर्त्याने माझं म्हणणं मनावर घेऊन त्याची माझ्याविषयीची भूमिका बदलली आणि माझ्या जीवाचं काही बरं-वाईट केलं, तर आपण सारे तमाम वाचक, एका स्वतःच्या भूमिकेशी ठाम असलेल्या माझ्यासारख्या स्वतःला साहित्यिक म्हणवून घेणाऱ्या"मानवाला" मुकाल! त्याशिवाय मराठी साहित्याची यापुढे अपरीमित हानी होईल ती वेगळीच! त्यामुळे मी, ही दुसरी रिस्क घेणंसुद्धा टाळतो आणि परत एकदा माझी पुढील भूमिका विषद करायच्या मागे लागतो!

पृथ्वीवरचा प्रत्येक सजीव त्याच्या जन्मापासूनच प्रत्येकवेळी त्याच्या समोर आलेल्या परिस्थितीला तोंड देताना वेगवेगळ्या भूमिका वेगवेगळ्या वेळी घेऊन जगत असतो आणि समोर आलेल्या त्यावेळच्या परिस्थितीला आपापल्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे भूमिका घेऊन त्यातून बाहेर पडायचा मार्ग शोधत असतो!

वरील वाक्य वाचून, मी एखाद्या तत्ववेत्याच्या भूमिकेत शिरतोय, अशी भूमिका आपल्या मनानं घेतली असेल तर माफ करा! कारण तसं काहीच नाहीये. उगाच आपला गैरसमज नको. मंडळी, त्याचं काय आहे ना, असं एखादं कळायला सोप्पं पण वाचायला भलंमोठं वाक्य लेखात असलं की माझ्यासारख्या लेखकाची

लेखाविषयीची भूमिका मांडायला थोडं बरं पडतं आणि लेखसुद्धा थोडा वजनदार होतो, अशा मनोभूमिकतून मी वरील वाक्य पेरलं आहे.

थोडक्यात, आलेल्या प्रत्येक संकटाला अथवा परिस्थितीला सामोरे जाताना, प्रत्येक माणसाची भूमिका वेगवेगळी असतेच असते, अशी माझी स्वतःची ठाम भूमिका आहे. म्हणजे असं बघा, आलेल्या परिस्थितीतून, संकटातून मार्ग काढायचा, का त्याला घाबरून पाठ दाखवून पळून जायचं, याबाबत प्रत्येकाची भूमिका वेगवेगळी असूच शकते, हे आपणसुद्धा मान्य कराल!

सारे जग ही एक रंगभूमी आहे आणि तो वर बसलेला सगळ्या दिग्दर्शकांच्या बापाचा बाप प्रत्येक प्राणीमात्राला जन्माला घालताना, त्याच्या संपूर्ण जीवनप्रवासात एक भूमिका देऊन पृथ्वीवर पाठवत असतो, अशी माझी तिसरी व या विषयापुरती शेवटची ठाम भूमिका आहे!

शेवटी, आपण आपल्यावर आलेल्या कुठल्याही प्रसंगाला स्वतःची यथोचित भूमिका घेऊन, दोन हात करायची सुबुद्धी तो वरचा दिग्दर्शक आपल्या सर्वांनाच देवो अशी विनंती करतो आणि माझी भूमिका आजच्यापुरती संपवतो!

**शुभं भवतु!**

**श्री प्रमोद वामन वर्तक -** दोस्ती इंपेरिया, A-702 ग्रेशिया, मानपाडा, ठाणे पश्चिम 400610 मो. 9892561086.



# स्टीव्ह आणि मी - पुस्तक परिचय - सुश्री रेखा दयानंद हिरेमठ






**पुस्तकाचे नाव -** स्टीव्ह आणि मी - (मगर मित्राबरोबरच्या सहजीवनाची विलक्षण कहाणी.)

**लेखिका -** टेरी इरविन.

**अनुवाद -** सोनिया सदाकाळ- काळोखे.

**प्रकाशक -** राजहंस प्रकाशन, पुणे.

जगविख्यात स्टीव्ह इरविन जो" क्रोकोडाइल हंटर" या नावाने प्रसिद्ध होता, त्याची पत्नी टेरी इरविन हिने लिहिलेलं आपल्या पतिबद्दलचे हे ३५८ पानी पुस्तक आहे. लेखिका सोनिया सदाकाळ काळोखे यांनी या कादंबरीचा अनुवाद केला आहे.

स्टीव्ह इरविन यांचा जन्म २२ फेब्रुवारी १९६२ रोजी - स्वतःच्या आईच्या वाढदिवसादिवशीच झाला. प्लंबरचे काम करणारे व सरपटणाऱ्या प्राण्यांबद्दल विशेष ममत्व असणारे बॉब व अडलेल्या प्राण्यांची प्रसूती करणारी लीन या जोडप्याचे अपत्य म्हणजे स्टीव्ह. या दोघांनीही स्टीव्हला लहानपणापासूनच अरण्यजीवनाची गोडी लावली व प्राण्यांचे संगोपन करावयाचे बाळकडू दिले. स्टीव्हला सहाव्या वाढदिवसाची भेट म्हणून चक्क एक खरखरीत अजगर मिळाला होता.

तर इकडे क्लारेन्स नामक प्राणीप्रेमी ट्रक ड्रायव्हर रस्त्यातील अपघातात बचावलेली बदकाची अर्धा डझन पिल्ले जॅकेटमधून घरी घेऊन येतात व त्यांचे प्रेमाने संगोपन करतात. अशा कनवाळू बापाची मुलगी टेरी ही बापाप्रमाणेच प्राणीमात्रांवर प्रेम करणारी. एके दिवशी सकाळी पेपरमध्ये" सिंहाचे छावे विक्रीसाठी" असे वाचून चक्क सिंहाचा छावाच विकत घेऊन त्याचे संगोपन करणारी टेरी. या दोघांचे सहजीवन या कादंबरीत वर्णन केलेले आहे.

टेलिव्हिजनमुळे स्टीव्हचे मगरींना हाताळणे हे आपण सर्व पाहू शकलो. मात्र या मांसभक्षी प्राण्याला हाताळणे व पुनर्वसनासाठी एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी हलवणे हे सर्व दिव्य इरविन कुटुंबीय कसे पार पाडत होते व स्वतःचा जीव धोक्यात घालून या भयावह अशा मगरीना सुरक्षित ठिकाणी नेणे हे दैनंदिन काम करत असताना त्यांना आलेल्या अनंत अडचणींवर या पुस्तकात प्रकाश टाकला आहे.

वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी स्टीव्हने वडिलांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्यांदाच मगर कशी पकडली होती, हे वाचताना अगदी थक्क व्हायला होतं. तीक्ष्ण टोकदार अवजारांनी घायाळ करून अथवा बंदुकीचा वापर करून

मगर पकडण्याच्या पारंपरिक पद्धतीला या पितापुत्रांनी छेद देऊन नवीन पद्धत कशी तयार केली, याचे खूप रोमांचकारी वर्णन वाचून या प्राणीमित्रांबद्दल आदरभाव निर्माण होतो. पाण्यात असलेल्या, तसेच पूर्णपणे न दिसणाऱ्या अशा मगरींना, खाण्याचे आमिष देऊन, प्रसंगी त्यांच्या डोळ्यावर उजेड सोडून मग प्रत्यक्ष त्या मगरीच्या पाठीवर उडी मारत या महाकाय प्राण्याचा जबडा दोरीने बांधून व डोळ्यावर पट्टी बांधून मगर पकडण्याची अवलिया पद्धत या पिता-पुत्र जोडीने कशी अवलंबिली, यातील थरार वाचून अगदी मेंदूला झिणझिण्या येतात.

स्टीव्ह आणि टेरी यांचे प्रथम ओळखीपासून ते त्यांच्या लग्नापर्यंतचे वर्णनदेखील खूप मनोहारी आहे. लग्नानंतर मधुचंद्र साजरा करण्याऐवजी गोळीबाराने जखमी झालेल्या पंधरा फूट लांब मगरीची सुटका करणारी जगावेगळी जोडी मनाला थक्क करून सोडते. विविध प्रकारच्या प्राण्यांचे या द्वयींनी संगोपन कसे केले, यातील अडचणी कशा सोडवल्या, हे वर्णन वाचून नक्कीच मनाला नवी उभारी येते.

आपले व आपल्या प्रियजनांचे आयुष्य पणाला लावून, अनेकविध प्राणीमात्रांना जीवनदान देऊन, त्यांचे पुनर्वसन करणाऱ्या या कुटुंबाला प्रसिद्धीमाध्यमे त्रास देतात व यातून बाहेर पडण्यासाठी कोर्टाचा आधार घेत हे कुटुंब कोणत्या दिव्यातून जाते याचे वर्णन वाचून, खरंच माणूस इतर प्राण्यांपेक्षा किती स्वार्थी, क्रूर, कपटी आहे याचा प्रत्यय येतो. पण या प्रकरणात इतर जनता या कुटुंबियांच्या पाठीशी कशी उभी राहते, हे वाचून पुन्हा एकदा मानवतेवरील विश्वासदेखील दृढ होतो.

इतके सारे सोसूनदेखील हे दोघं आपल्या दोन्ही मुलांनादेखील आपल्याच कामामध्ये सामावून घेतात. लहानपणापासूनच त्यांना प्राणी- प्रेमाचे बाळकडू देतात. सलाम अशा विभूतींना ....

अशा या किमयागाराचे वयाच्या ४४ व्या वर्षी एक डॉक्युमेंट्री बनवताना निधन व्हावे व तेही स्टिंग रे या माशाच्या काटेरी शेपटीच्या माऱ्यामुळे, ही घटना खरंच मनाला चटका लावून जाते. आयुष्यभर ज्यांनी प्राण्यांना जीवदान दिले त्याला काम करत असतानाच मरण यावे - ते देखील प्राण्यामुळेच! काय शोकांतिका आहे ना!

पतीच्या मृत्यू नंतरदेखील टेरी कशा प्रकारे असे अनेक प्रकल्प पूर्ण करते, याचे वर्णन खूपच प्रेरणादायी आहे. 'क्रोकोडाइल हंटर' ही उपाधी असणारा माणूसदेखील किती कनवाळू व संवेदनशील आहे, याचा प्रत्यय टेरीने अनेक प्रसंगातून खूप सुंदररीत्या वर्णिला आहे. तसेच स्टीव्हला त्याच्या प्राण्यांवरील प्रेमामुळे अनेक दैवी संकेत कसे वेळेआधीच मिळत होते, याचे देखील वर्णन वाचून मन अचंबित होते.

एकंदरीत खूप माहितीपूर्ण, रोमांचकारी व अद्भुत घटनाक्रम असलेले हे पुस्तक खूप काही शिकवून जाते. आणि मनाला एक दुर्दम्य आशावाद बहाल करते.

Hats off to such dedicated couple & their entire family....

**पुस्तक परिचय : सौ. रेखा दयानंद हिरेमठ** - मो. 9552298887

## कविता - आभार - श्री राजकुमार कवठेकर



जीवघेणे झेललेले नित्यनेमे वार मी
ना परी युध्दातुनी त्या घेतली माघार मी

काजवे आता स्वतःला सूर्य मानू लागले
मान्य केला सोबतीचा त्याहुनी अंधार मी

ना मिळे साध्या सुखाची एकही 'मात्रा' मला
भोगतो आहे 'जगायाचा' असा आजार मी

ठेविली जाणीव सत्याची सदा जागी तुम्ही
वेदना.. व्याधी.. व्यथांनो मानतो आभार मी

पांगळे आयुष्य माझे आंधळा मीही असा
जे हवे शोधू.. करू.. पाहू कसे साकार मी

मान्य केले जे मिळाले दुःख हक्कासारखे
कोणत्याही ना सुखांचा आज दावेदार मी

ऐकले होते शहाणे... सभ्य.. सारे लोक 'ते'
पाहिला तेथे- जिथे ते; रोज अत्याचार मी

थोर ते रे; विश्व ज्यांना हे कुटूंबासारखे
हाय! पोरे बायको हा मानला संसार मी

बोचणे दुर्लक्षिले मी, शेवटी काटेच ते
सोसली त्या गोड शब्दांची जिव्हारी धार मी

राखला नाही घरोबा.. ना सलोखा.. ना मने
राहिलो आजन्म येथे फाटका.. बेकार मी

शब्दही उच्चारला ना, लाजली तू केवढी
आपुल्या प्रेमा तुझा तो जाणला होकार मी

हे जिणे कंटाळलेल्या रोगग्रस्तासारखे
बैसलो मोजीत येथे श्वास.. वर्षे.. वार मी

**श्री राजकुमार कवठेकर** - मिरज

## कथा - इकडे आड तिकडे विहीर - प्रणिता खंडकर



'हॅलो संध्या!' सुझननं नेहमीप्रमाणे हसून म्हटलं. पण संध्यानं काहीच प्रतिसाद दिला नाही. संध्या आपली बॅग लॉकरमध्ये ठेवून, युनिफॉर्म घ्यायला आली होती. सुझनही नुकतीच तिथं आली होती. सिटी हॉस्पिटलमध्ये या दोघी नर्स होत्या. बऱ्याचदा त्यांची शिफ्टची वेळ एकच असायची. सहवासाने दोघींची छान मैत्रीही झाली होती. आजही दोघींना एकाच वॉर्डमध्ये रात्रपाळी होती.

'संध्या, काय झालं? आज मूड का खराब आहे? '

'सॉरी, सुझन! मी जरा तंद्रीतच होते. आज जरा उशीरच झालाय मला यायला. चल. कपडे बदलून येऊ पटकन!'

ड्यूटीची वेळ होत आली होती. दोघी युनिफॉर्म चढवून कामाला लागल्या. या वॉर्डमध्ये वीस कॉट्स होत्या आणि प्रामुख्याने शस्त्रक्रिया झालेले रुग्ण इथे होते. त्यामुळे या दोन नर्सना तिथे ड्यूटी होती. दिवस पाळीच्या आपल्या सहकाऱ्यांकडून दोघींनी रूग्णांची व्यवस्थित माहिती घेतली. त्यानंतर मग प्रत्येकाला त्यांच्या तक्त्याप्रमाणे औषध-गोळ्या, इंजेक्शन्स देऊन झाली. कोणाचं सलाईन काढणं, नवीन लावणं यात दोन तास सहज निघून गेले होते. अर्थात हे रोजचंच होतं म्हणा! त्यातही एखादा नवीन रुग्ण आला किंवा कोणाची अवस्था गंभीर असेल तर मग घड्याळाकडे लक्ष द्यायला फुरसतच मिळत नसे. पण आता बहुतेक सर्व रुग्ण झोपण्याच्या बेतात होते, म्हणून दोघी जेवायला बाजूच्या त्यांच्या छोट्या खोलीत आल्या, तेव्हा रात्रीचे साडेदहा वाजले होते.

संध्याच्या चेहऱ्यावर ताण जाणवत होता, पण जेवण होईपर्यंत सुझननं शांत राहायचं ठरवलं. जेवण झाल्यावर पुन्हा दोघी वॉर्डमध्ये एक चक्कर टाकून आल्या. आत्ता तरी तिथे सगळं आलबेल होतं. त्यामुळे परत बाजूच्या खोलीत येऊन त्या जरा विसावल्या.

'हं, बोला संध्याराणी, काय बिनसलंय आज? नवऱ्याशी भांडण झालं का लेकानं काही त्रास दिला? '

'नाही ग सुझन, एक वेगळाच प्रॉब्लेम झालाय?'

'म्हणजे? तू नीट सांगशील का? तरच कळेल ना मला!'

'अग, माझ्या त्या सासूला बाजूच्याच वॉर्डमध्ये ॲडमिट केलंय! काल मी सुधाशी बोलायला म्हणून तिकडे गेले होते. माझं तिथल्या पेशंटकडे लक्ष नव्हतं, पण तिनं मला ओळखलं. सुधाला सांगून मला जवळ बोलावलं. हात जोडून माझी माफी मागितली. तिला स्वतःच्या वागण्याचा पश्चात्ताप होतोय. तिला पॅन्क्रियाटिक

कॅन्सर आहे आणि अवस्था वाईट आहे तिची. मी स्वतःहून काही बोलले नाही, पण तिनं खोदून खोदून चौकशी केली आणि आता तिला तिच्या नातवाला भेटायचं आहे. तूच सांग काय आणि कसं करू?'

सुझनही विचारात पडली. काय बोलावं ते तिलाही कळेना. तिला संध्याचा भूतकाळ माहीत होता. संध्या डोळ्यातले अश्रू पुसत टेबलवर डोकं टेकून बसली. भूतकाळ तिच्या नजरेसमोर जणू जिवंत साकार होत होता.

तिचं माहेर गंगापूर, लहानसं खेडंच! संध्याचे वडील ती लहान असतानाच गेले होते. आई, मोठा भाऊ, वहिनी, एक भाचा आणि ती, अशी पाचच माणसं घरात! दहावी पास झाली आणि पुढच्याच वर्षी तिचं लग्न झालं. तिचं वय जेमतेम सतरा, पण गावाकडे एवढा विचार कोण करतं? मुलाचे वडील खूप आजारी होते. त्यांच्यासमोर मुलाचं लग्न व्हावं, म्हणून त्यांना घाई होती लग्नाची. शरद, मुलगा कंत्राटी कामगार होता बिल्डरकडे. आई-वडील आणि लग्न झालेली मोठी बहीण असं सुटसुटीत कुटुंब होतं. घरची थोडी शेती आणि राहायला छोटं का होईना पण वडिलोपार्जित घर होतं रामपूरमध्ये. अजून काय हवं? हां फक्त जरा लांब होतं, बारा तासांचा प्रवास होता गंगापूरपासून!

लग्नानंतर जेमतेम महिनाभरात सासरे दगावले आणि घरात कुरबुरी सुरू झाल्या. जावयानं, नणंदेच्या नवऱ्यानं तिचे कान भरले आणि वडलांच्या घर आणि शेतीत वाटणी मागायला लावली. त्यासाठी तिला त्रास द्यायला सुरुवात केली. ती वारंवार रडत माहेरी येऊन भांडण करायची वाटणीसाठी. खरंतर नणंदेचं सासर श्रीमंत होतं. जमीनजुमला भरपूर होता. शिवाय दोन किराणा मालाची मोठी दुकानं होती शहरात.

आई आणि शरदनं खूप समजावलं दोघांना. नणंदेच्या लग्नासाठी वडलांनी कर्ज घेतलं होतं. ते फिटलं नाहीत तोवर त्यांचं आजारपण उद्भवलं. उपचारासाठी पैसे नाही म्हणून परत सावकाराकडून कर्ज घेतलं. या कर्जासाठी जमीन गहाण ठेवावी लागली. पोटापाण्यापुरतंच जमिनीत पिकत होतं, आता तेही वांदे झाले. शरदची कमाई जेमतेमच. त्यात लग्नाचा खर्च आणि घरात एक माणूस वाढलं. सगळ्याचा मेळ घालणं अवघडच झालेलं. खर्चात वाटणी घ्यायला कोणी नाही. सासूनं दोन - तीन घरची धुणीभांडी करायचं काम धरलं. तेवढीच मीठ-मिरचीची सोय!

असंच एक दिवस घरी आलेल्या मेव्हण्यांशी, शरदचं जोरदार भांडण झालं. दोघंही हमरीतुमरीवर आले. मारामारीत मेव्हण्यानं जोरात ढकललं आणि शरद घरासमोरच्या रस्त्यावर दगडावर आपटला. डोक्याला जबर मार लागला आणि दवाखान्यात नेत असतानाच त्यानं राम म्हटला. लग्नानंतर सहाच महिन्यात संध्या विधवा झाली.

मुलगा तर गेला, आता मुलीचं तरी नीट चालू दे, या विचाराने सासूनं जावयाबद्दल पोलिसात जायला नकार दिला. जावयानी तिला तशी धमकीच दिली होती. त्यानं पैशाच्या जोरावर ते प्रकरण दडपून टाकलं. त्यामुळे सासूनं संध्यालाही गप्प राहायला लावलं.

आता पोट भरायला काही तरी करायला हवं होतं. पण संध्यानं बाहेर पडायलाही सासूनं विरोध केला. सासूला तरी कुठे फार पैसे मिळत होते? उपासमारीचीच वेळ आली होती. जावयाचा वाटणीसाठी तगादा चालूच होता. आता तर तो जास्तच मुजोरी करत होता. नणंदही सासूचे कान भरत होती. सासू आणि नणंद मिळून

संध्याला घालून-पाडून बोलत होत्या. तिच्या पायगुणामुळेच आधी सासरा आणि नंतर नवरा गेला, असं वारंवार तिला टोचून बोलत होत्या.

संध्याच्या भाऊ तिला माघारपणासाठी न्यायला आला, तेव्हा त्याला ही परिस्थिती दिसलीच होती. तो संध्यापेक्षा दहा वर्षांनी मोठा होता. आपल्या लहान बहिणीचं हे दुःख त्याला सहन होत नव्हतं. वहिनीचंही संध्यावर धाकट्या बहिणीगत प्रेम होतं. त्या दोघांनी आईला सर्व परिस्थिती सांगितली आणि संध्याला माहेरीच ठेवून घ्यायचं ठरवलं. ते श्रीमंत नसले तरी दोन वेळच्या जेवणाची तरी भ्रांत नव्हती.

काही दिवसांनी संध्यानंही काहीतरी काम मिळवण्याचा प्रयत्न करायचं ठरवलं. गावातल्या सरकारी दवाखान्यातल्या डॉक्टरांना दोन वर्षांची जुळी मुलं होती.

त्या दोघांना सांभाळताना डॉक्टरांच्या बायकोची दमछाक होई. मग तिची मदतनीस म्हणून संध्याला काम मिळालं. पण आठच दिवसांनी संध्या चक्कर येऊन त्यांच्या घरात पडली आणि ती गरोदर असल्याचं निदान झालं.

लग्नानंतर संध्याच्या आयुष्यात एकामागून एक घटना इतक्या वेगाने घडल्या होत्या, की स्वतःकडे लक्ष द्यायला तिला फुरसतच मिळाली नव्हती. त्यामुळे असं काही आपल्या बाबतीत असू शकेल याची तिनं कल्पनाच केली नव्हती. संध्याला माहेरी आणताना, पुढंमागं हिचं दुसरं लग्न करून देता येईल, असाच विचार भाऊ-भावजयीनं केला होता. पण आता हे धर्मसंकट उभं राहिलं होतं.

संध्याला घेऊन ते तिच्या सासूकडे गेले. कदाचित नातवंडाच्या चाहुलीने तिचं मन बदलेल असं त्यांना वाटलं. पण सासू पूर्णतः लेक आणि जावयाच्या कह्यात होती. जावई तर बेरकाच होता. हिचं होणारं मूल म्हणजे सासूचं घर बळकावण्यात अडथळाच! त्यामुळे संध्याबद्दल आपुलकी, सहानुभूती तर त्यांनी दाखवली नाहीच, उलट तिच्या चारित्र्यावर संशय घेतला. संध्याला घेऊन ते परत गंगापूरला आले. गर्भपात करण्याची त्यांची मानसिकता नव्हती. डॉक्टरांनीही त्यात धोका असल्याचं सांगितलं, त्यामुळे तो मार्गच खुंटला. लहान गावात सगळ्याच गोष्टींचा बोभाटा होतो. लोकं उलटसुलट बोलणार. फुकटचे सल्ले देणारे पण खूप!

संध्याचा मामा तालुक्याच्या गावाला राहात होता. तिथला सरपंच होता. आई आणि संध्यानं बाळंतपण होईस्तोवर तिकडे राहावं असं ठरलं, म्हणजे गावात हे समजून चर्चा होण्याचा प्रश्नच नाही. त्याप्रमाणे त्या दोघी मामाच्या गावाला गेल्या. मामाने आपल्या घराजवळ त्यांची राहण्याची चांगली सोय केली. नंतर यथावकाश संध्याला मुलगा झाला. तो तीन महिन्याचा झाल्यावर मामाच्या ओळखीने संध्याला तिथल्या हॉस्पिटलमध्ये आयाचं काम मिळालं. बाळाला आई सांभाळत असल्याने संध्याला ते शक्य झालं. तिथल्याच एका नर्सनं, तिची हकीकत ऐकून तिला नर्सिंगचा कोर्स करण्याचा सल्ला दिला. त्यासाठी संध्यानं बाहेरून बारावी केलं आणि मग नर्सिंगचा कोर्स केला. तोवर तिचा मुलगा, मंगेश चार वर्षाचा झाला होता.


नर्सिंगचा कोर्स करत असतानाच संध्याची ओळख सुरेशशी झाली. त्याचं जिल्ह्याच्या गावी, अहमदनगरला मेडिकल स्टोअर होतं. लग्नानंतर दोनच वर्षांनी त्याची बायको बाळंतपणात दगावली होती आणि ते बाळही. त्यानं संध्याला तिच्या मुलासह स्वीकारण्याची तयारी दाखवली. तिच्या दादा-वहिनींनी पुढाकार घेऊन हे लग्न

लावून दिलं. लग्नानंतर संध्याला अहमदनगरला सिटी हॉस्पिटलमध्ये नर्सची नोकरी मिळाली. मंगेश सुरेशलाच आपला बाबा समजत होता आणि शाळेत घालताना वडील म्हणून त्याचंच नाव लावलं होतं. सुरेशनंही मंगेशला पोटच्या पोराप्रमाणे जीव लावला होता. त्याच्या जन्माआधीची सगळी कर्मकहाणी त्या लहानग्याला कोणीच सांगायची नाही असंच सर्वांनी ठरवलं, कारण तेच त्याच्या हिताचं होतं.

मंगेश आता बारा वर्षांचा होता. आणि अचानक संध्याची आणि सासूची गाठ पडली होती. सासूची परिस्थिती नाजूक होती. घर ताब्यात घेतल्यानंतर जावयानं तिला हाकलून दिलं होतं. मुलगीही परकीच झाली होती. कुठेतरी मोलमजुरी करत भटकत ती दिवस ढकलत होती. त्यातच या कॅन्सरनं गाठलं. एका सेवाभावी संस्थेनं सरकारी दवाखान्यात दाखल करून तिच्यावर उपचार केले. पण तिची तब्येत ढासळत चालली होती. म्हणून तिला अहमदनगरला जिल्हा रूग्णालयात पाठवण्यात आलं होतं. आयुष्याच्या संध्याकाळी आता तिला आपल्या वागण्याचा पश्चात्ताप होत होता. तिचं म्हणावं असं जवळचं कोणीच राहिलं नव्हतं. आपण एखाद्या बेवारसाप्रमाणं मरणार हे डाचत होतं. संध्याच्या रूपाने तिला आशेचा किरण दिसला होता.

मंगेशचं वय अर्धवट! त्याला संध्या काय आणि कसं सांगणार होती तिच्या पूर्वायुष्याबद्दल? आणि ते सांगून का उलथापालथ करायची त्या लहानग्याची? एकीकडे हा प्रश्न तर दुसरीकडे सासूची मरणासन्न अवस्थेत नातवाला भेटण्याची इच्छा! इकडे आड नि तिकडे विहीर अशीच संध्याची अवस्था झाली होती. सूझनच काय पण कोणाकडेच या प्रश्नाचं उत्तर नव्हतं.

**सुश्री प्रणिता खंडकर -** मो. 98334 79845.



## लेख - केशवाय नमः - सुश्री अरुणा मुल्हेरकर



कोणत्याही घरात डोकवा आपल्याला छोटा, मध्यम आकाराचा अथवा मोठा देव्हारा दिसतोच. काही ठिकाणी देवघराची जागा स्वतंत्र असते. अगदी एकच खोलीचे छोटे जरी घर असले तरी भिंतीवर कुठेतरी कोपऱ्यात एखाद्या लाकडी फळीवर दोन-चार देवांच्या मूर्ती विराजमान असल्याचे दृश्य पाहायला मिळते.

याचाच अर्थ असा की प्रत्येकाच्या आयुष्यात देव या संकल्पनेला काही ना काही तरी स्थान आहेच.

आमच्या घरीही देव्हारा होताच, परंतु बाहेरच्या खोलीत भिंतीवर शंकराचा एक फोटो होता. आजी प्रत्येकाला बाहेर जाताना त्या फोटोला नमस्कार केल्याशिवाय जाऊ द्यायची नाही. लहानपणी कधी कधी तिचा राग यायचा, काय कटकट आहे असेही वाटायचे, परंतु आता मोठे झाल्यावर, संसाराच्या जबाबदाऱ्या पडल्यावर आपल्या सुरक्षिततेसाठी ही एक दृढ श्रद्धा आहे याची जाणीव झाली आहे.

सर्वसामान्यांना सुखाच्या क्षणी देवाची किती आठवण येते हे नाही सांगता येणार, परंतु संकटकाळी देवाला हात जोडल्याशिवाय आपण राहत नाही. दुःखाची, कठीण प्रसंगाची तीव्रता ज्याप्रमाणे असेल त्यानुसार देवाला लाचलुचपत देणे चालू होते. मला बढती मिळाली तर तुला सव्वा किलो पेढ्यांचा नैवेद्य दाखवीन, यंदा मुलीचे दोनाचे चार हात होऊ देत, देवीआई, तुझी खणानारळाने ओटी भरीन अशा प्रकारे निरनिराळ्या पद्धतीचे देवाला नवस बोलले जातात. देवच तर महान दाता आहे, आपण त्याला काय देणार? तो आपल्याकडे कधीच काही मागत नाही. तो फक्त भावाचा भुकेला आहे हे सगळे पुस्तकी विचार त्यावेळी पुस्तकातच राहतात.

रोज सकाळी स्नान उरकल्यानंतर देव्हाऱ्यातील देवांची पूजा करणे, त्यांना गंधाक्षता, हळद कुंकू, फुले वाहून तेला-तुपाचा दिवा लावणे हे घरोघरी नित्याचे काम असते. संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी, दिवेलागणीला लक्ष्मी घरात येते अशी आपल्या हिंदू संस्कृतीत धारणा आहे. म्हणून त्यावेळी आपण देव्हाऱ्यात धूपदीप लावून लक्ष्मीचे स्वागत करतो. संध्याकाळी हात पाय धुवून शुभंकरोती म्हणायचे

हे संस्कार लहानपणापासून प्रत्येक हिंदू घराने आपल्या मुलांवर केलेले असतात.

देव कोणी पाहिला आहे? त्याला आपणच सगुण साकार बनवले आहे. तो निराकार आहे, निर्गुण आहे, तो अगोचर आहे, चराचरात त्याचा वास आहे, तो आपल्याच अंतरंगात आहे हे जरी संतवाणीतून, संतवाङ्मयातून आपण शिकत असलो तरी आपल्यासारख्या सर्वसामान्यांच्या आयुष्यात परमेश्वराचे सगुणरूपच स्थानापन्न आहे.

सोमवार शंकराचा, मंगळवार गणपतीचा, देवीचा, शुक्रवारही देवीचा, शनिवार मारुतीचा हे आपणच ठरविले आहे आणि त्यानुसार आपली व्रतवैकल्ये, उपासतापास चालू असतात. आपल्या पापभीरू मनाला त्यामुळे एक प्रकारचे समाधान मिळते.

परमेश्वर ही एक शक्ती आहे, सकारात्मक ऊर्जा आहे असे माझे वैयक्तिक मत आहे. संसाराच्या रथाचे सारथ्य करताना अनेक वेळा निराशा पदरी येते, सर्व गोष्टी आपल्या मनाबर- हुकूम होतातच असे नाही. कित्येकदा हतबलता येते. अशावेळी शांत बसून नामस्मरण केले तर आंतरिक बळ आपोआपच वाढल्यासारखे वाटते आणि नव्याने काम करण्यास उत्साह वाटतो. जीवनाच्या या मार्गावर अनंत खाचखळगे, क्लिष्टता असणारच. सुतासारख्या सरळ मार्गाचा आपल्यालाच कंटाळा येईल. कठीण प्रसंगांना सामोरे जाणे हे आयुष्यातील एक मोठे आव्हान आहे आणि ते पेलण्याची समर्थता ही शक्ती देते असा माझा ठाम विश्वास आहे. देवावर विश्वास ठेवून अगदी मनापासून त्याला हात जोडले तर तो भक्ताच्या सेवेसाठी कोणत्या ना कोणत्या रूपात उपस्थित होणारच यात संशय नाही.

माझा मुलगा चार एक वर्षाचा असेल त्यावेळी. बाहेर वाडीत खेळत असताना कुठून तरी दोन गाई उधळत आल्या आणि त्याच्या अंगावर धावल्या. बापरे! काय झाले असते, त्या गाईने शिंग खुपसलं असतं कुठे तर? आमच्या ओटीवर बसणारा एक कुत्रा( आम्ही त्याला सकाळ संध्याकाळ जेवण द्यायचो ) तात्काळ त्या गाईंवर धावून गेला आणि त्यांना पळवून लावले. त्या कुत्र्याच्या रूपात येऊन देवानेच हा दुर्धर प्रसंग निभावून नेला.” परमेश्वराचीच कृपा" हे शब्द माझ्या मुखावाटे नकळतपणे निघाले.

जाता जाता एवढेच सांगेन - देव, परमेश्वर, ईश्वर, ही प्रत्येकाच्या मनातील श्रद्धास्थाने आहेत. ती निरनिराळी असू शकतील. कोणी विघ्नहर्त्या गणपतीला अधिक मानतो, कोणी कुटुंबाची देवता भक्तीभावे पुजतो तर कोणी शिर्डीचे साईबाबा, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, गोंदवल्याचे ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, कोणी शेगावचे श्री गजानन महाराज यांना आपापल्या अनुभवानुसार सर्वस्व मानतो, परंतु सर्व नद्यांचे पाणी शेवटी जसे एका सागराला येऊन मिळते, तद्वतच कोणत्याही देवाला केलेला नमस्कार एका केशवा प्रति पोहोचतो हेच खरे!

**श्री अरुणा मुल्हेरकर -** मिशिगन



## एकांकिका - तुझी सावली... - श्री अरविंद लिमये



**पात्र परिचय :**

**नेहा** - रोहनची आई. वय ५० चे आसपास.

**निरंजन** - रोहनचे बाबा. वय अनुररूप.

**रोहन** - कॉम्प्युटर इंजिनिअर. वय २५ ते ३०.

**सानिका** - कॉम्प्युटर इंजिनिअर, रोहनची वाग्दत्त वधू, वय अनुरूप.

**प्रवेश पहिला**

(**स्थळ :** नेहा-निरंजनचा कोल्हापूर येथील फ्लॅट. वेळ दुपारी ३ च्या आसपास. निरंजनची प्रवासाची तयारी सुरु आहे. नेहा आत किचनमधून बोलतेय.)

नेहा : (आतून) निरंजनऽ...

निरंजन : हां नेहा...

नेहा : बॅग भरुन झालीय कां रे?

निरंजन : हो. देतोय. तू आवर बघू लवकर. 'बाय' करायला तरी येतेयस ना, की तिथूनच निरोप देणारायस?

नेहा : (हसते. बाहेर येते) तुझंच काम करीत होते. घे.

निरंजन : हे काय?

नेहा : खोब-याच्या वड्या.

निरंजन : वॉव. मस्त...!

नेहा : फार दिवस टिकत नाहीत. आठवणीनं खा. संपव लवकर.

निरंजन : येस्स...! नागपूरला पोचल्याबरोबर लगेच फडशा पाडतो आणि पुन्हा दुसरा डबा न्यायला तसाच परत येतो. (हसतो)

नेहा : (गंभीर होते) ये पण तसा नको. ट्रान्सफर घेऊनच ये.

निरंजन : नो वेS...! ट्रान्सफर...? माझं प्रमोशन पोस्टींग होऊन अजून महिनाही नाही झाला. इथे कोल्हापूरला व्हेकन्सी व्हायला एक वर्ष तरी लागेल. ट्रान्झिट लिव्ह घेता आली, म्हणून आता आपल्या रोहनच्या साखरपुड्याला तरी येऊ शकलो. आता एकदम रोहनच्या लग्नालाच. त्या आधी नाही. एS... नेहा, लगेच नाराज व्हायला काय झालं...?

नेहा : मला ना निरंजन... रोहनच्या लग्नाच्या तयारीचं दडपणच आलंय. तू आठ दिवस होतास, तेवढ्यात लग्नाची आमंत्रणं पाठवून झाली नशीब.

निरंजन : एS... तू आपल्या प्रियाला मदतीसाठी थोडं आधीच बोलावून घे ना. आपली हक्काची लाडकी लेक आहे ती. नक्की येईल.

नेहा : छे रे. नको उगाच. ती येऊ दे पण आधीपासून असं मदतीला वगैरे नको. तिला तिचा जॉब, रुटीन हे व्याप आहेतच ना रे? माझ्या ऑफिसमधल्या मैत्रिणी माझ्या दिमतीला आहेत अरे. मी करेन मॅनेज. नेहमीसारखा दर विकेण्डला हा रोहन आला असता तर त्याची मदत पुरेशी होती. पण तो...

निरंजन : (हसतो) रोहनचं येणं विसर आता. तो आतापासूनच सानिकाचा झालाय. ती पुण्यात असताना रोहन विकेण्डला इकडे कोल्हापूरला कशाला येईल?

नेहा : तेच तर. पण असू दे. एकमेकांना भेटू-बोलू देत. परस्परांना समजून घेऊ देत. उगीच नंतर डोकेदुखी नको.

निरंजन : एS नेहा... हे असं एकदम डोकेदुखी वगैरे काय गं?

नेहा : लग्न रोहनचं. पण... मलाच दडपण आलंय.

निरंजन : कसलं दडपण?

नेहा : हल्लीची लग्नं म्हणजे घरादाराला विवंचनाच होऊन बसते. पूर्वी फक्त लग्न कधी ठरतेय याची काळजी असायची. आता त्या जोडीला ती लग्नं टिकतील ना याचीही काळजी असतेच.

निरंजन : आज हे भलतंच काय बोलतेयस? काय झालंय?

नेहा : आमच्या साने मॅडमच्या निलूचं लग्न होऊन अजून वर्षही व्हायचंय. ती घटस्फोट घेणाराय.

निरंजन : हो, पण त्याचं टेन्शन तू कशाला घेतेयस? प्रकरण असं घटस्फोटापर्यंत आलंय म्हणजे काहीतरी कारण असेलच ना?

नेहा : हो पण त्या कारणाचं निराकारण व्हायला नको का रे? घटस्फोट हे एखाद्या प्रश्नाचं उत्तर असूच कसं शकतं?

निरंजन : ते साने मॅडम समजावू देत ना दोघांना.

नेहा : त्यांनी खूप समजावलंय, पण उपयोग झाला कां काही? निरंजन, त्या खूप डिस्टर्ब आहेत रे. 'या हल्लीच्या मुलामुलीना कुणी समजवायचं न् शिकवायचं? ' म्हणत होत्या. मला ना... निरंजन, आपल्या रोहनची काळजी वाटते रे...

निरंजन : (हसतो) कमॉन नेहा... धीस इज टू मच. हे बघ, आपल्या प्रियाचा संसार छान, आनंदात सुरु आहे की नाही? रोहनचंही सगळं मार्गी लागेल. डोण्ट वरी.

नेहा : सानिका तशी शांत, समंजस, हसतमुख वाटत रे. पण रोहनचं काय? संताप आवरायला हवा बाबा त्याने. थोडं जरी मनाविरुध्द झालं, तरी कसा चिडतो, बघितलंस ना तू?

निरंजन : आणि लगेच शांतही होतो.

नेहा : हे तू न् मी समजून घेतो. पण सानिकाचं काय? घरी येणा-या त्या नव्या मुलीला ते नाही आवडलं, नाही सहन झालं, तर?

निरंजन : असं काहीही होणार नाही. बिलिव्ह मी. मी बोलेन रोहनशी. त्याला समजावेन. (पॉज) आता हसून निरोप देणारायस की असे डोळे पुसत...? नेहा... मला उशीर होतोय. प्लीज...!

नेहा : सॉरी. चल मी येते खालपर्यंत. (नेहाच्या मोबाईलचा रिंगटोन)

निरंजन : तुझाच मोबाईल वाजतोय. जा... बघ कुठं ठेवलायस. (तेवढ्यात रिंगटोन थांबतो)

नेहा : आल्यावर बघते. चल.

निरंजन : तुझ्या होणा-या सुनेचा असेल. सानिकाचा. (हसतो. तेवढ्यात पुन्हा रिंगटोन) तुमचं चालू दे. चल बाय. टेक केअर...

नेहा : बाय. फोन कर पोचल्यावर.

निरंजन : येस्स्. बाय... (जातो. रिंगटोन थांबतो)

नेहा : (स्वत:शीच) सानिका मला आत्ता कशाला फोन करेल? तिच्याकडे माझा नंबर कुठून असायला? (नंबर पहाते. मग स्वत:शीच) रोहन? बाबाला बाय करायला फोन करत असणाराय हा... (कॉल घेते) हां रोहन, काय रे?

रोहन : (फोनवर) आई कामात आहेस?

नेहा : छे रे. आज रजाच घेतली होती. निरंजनची नागपूरची ट्रेन होती ना आज!

रोहन : (नाराजीने) ओह शिट्...! बाबा गेले?

नेहा : हो. आत्ताच. कां रे?

रोहन : नाही... काही नाही. मी त्यांना फोन करीन नंतर. आधी तुझ्याशी बोलायचंय.

नेहा : बोल ना.

रोहन : तू... दडपण न घेता शांतपणे ऐकणार असशील तरच बोलतो.

नेहा : म्हणजे? असं का बोलतोयस? दडपण घेण्यासारखं आहे कां काही?

रोहन : आई... माझं ठरलेलं लग्न मोडायचंय.

नेहा : काSय? रोहन...? हे भलतंच काय बोलतोयस?

रोहन : (चिडून) आईS... प्लीज..., तू... तू पॅनिक होऊ नकोस...! मी फोन बंद करु कां?

रोहन : ना... नाही. नाही रोहन... मी... मी ऐकतेय. शांतपणे ऐकतेय. तू... तू बोल... सांग मला. काय झालंय?

रोहन : आई, या आजकालच्या मुलींचं ना, काही खरं नसतं. साध्या भोळ्या वाटतात. पण पार पोचलेल्या असतात.

नेहा : काहीही काय बोलतोयस रोहन? हे... हे तू सानिकाबद्दल बोलतोयस?

रोहन : होऽय. तिच्याचबद्दल बोलतोय. आणि खरं तेच बोलतोय... शी काण्ट बी अ परफेक्ट मॅच फॉर मी...!

नेहा : (चिडून) हो का? आणि हे इतक्या उशिरा लक्षात आलं का तुझ्या? पसंतापसंती, नंतरच्या भेटी, गप्पा, तुमच्याच इच्छेनुसार झालेला साखरपुडा, लग्नाची आमंत्रणं, सगळं झाल्यानंतर...?

रोहन : लग्न होण्यापूर्वी लक्षात आलं, हे नशीब समज. नाहीतर माझ्यावर अंगावरचे कपडे फाडत फिरायची वेळ आली असती.

नेहा : रोहन, तुमचं भांडण बिंडण झालंय का? सांग ना बाबा? नेमकं काय झालंय...? इतकं टोकाला जाण्यासारखं काय घडलंय?

रोहन : तिचं दुस-या मुलाबरोबर अफेअर सुरु आहे. त्यालाही झुलवत ठेवलं होतं तिनं.

नेहा : तुला कुणी सांगितलं? तिनं स्वत:?

रोहन : ती कशी सांगेल? तिला बोलायला तोंड कुठं आहे? त्या मुलाचाच मला फोन आला होता.

नेहा : तुझा मोबाईल नंबर त्याला कुणी दिला?

रोहन : मला काय माहीत. तिला स्वत: सांगायचं धाडस नाहीय, म्हणून तिनेच दिला असेल.

नेहा : हे बघ तू असा सूतावरून स्वर्ग गाठू नकोस. तू स्वत: एकदा भेट तिला. तिच्याशी बोल.

रोहन : मी बोललोय तिच्याशी. पार पोचलेली आहे ती भटकभवानी.

नेहा : तू स्पष्टपणे विचारलंस का?

रोहन : होऽ. ऐकून माझ्यावरच उखडली. 'तू कुठल्या युगात वावरतोयस? ' असं मलाच विचारतेय. निर्लज्ज. 'तू स्वत: ला धुतला तांदूळ समजतोयस कां? असं विचारलंन्. याला लग्न मोडण्याखेरीज दुसरं काही उत्तर असू शकतं काऽ?

नेहा : ए... एऽ रोहन, ऐक. मी काय म्हणते...

रोहन : आई, आता काय तो सोक्षमोक्ष एकदाच आणि आत्ताच लावून टाकायचा आणि मोकळं व्हायचं. मी आता लगेच बाबानाही फोन करून सगळं सांगून टाकणाराय.

नेहा : रोहनऽ... नाही. तू निरंजनला आत्ताच अजिबात काही सांगायचं नाहीस. त्याला केव्हा, काय आणि कसं सांगायचं, ते मी पाहीन.

रोहन : कां पण?

नेहा : ऐक. आत्ता तो प्रवासात असेल. तिकडे नागपूरलाही तो एकटा असणाराय. या सगळ्याचा त्याला खूप त्रास होईल. कळतंय तुला? हे बघ, आज रात्री मी पुण्याला यायला निघतेय.

रोहन : त्याची आता काय गरज आहे?

नेहा : मला गरज आहे. मी पहाटे पोचतेय. भेटू. शांतपणे बोलू. नेमकं काय करायचं ते ठरवू. मग तिथूनच मी स्वत: निरंजनला फोन करीन.

रोहन : आता ठरवायचं काय आणखी? लग्न मोडायचं हे ठरलंय आणि ते तुलाही सांगितलंय.

नेहा : (चिडून) काय करायचं हे ठरवून टाकलंयस रे... पण ते कसं करायचं, कसं निस्तरायचं हे ठरवायला हवं ना? की नको...? (पॉज. मग ठामपणे) आणि येतेच आहे पुण्याला तर सानिकालाही एकदा भेटून घेते.

रोहन : आईऽ... तू तिचे पाय धरायला अजिबात जायचं नाहीस.

नेहा : मी येते तरी आधी... मग बघू काय करायचं ते.

रोहन : ये, पण काही झालं तरी तिला भेटायचं नाहीऽस... बाय...! (फोन बंद करतो)

नेहा : रोहन... रोहन अरे! हा रोहन पण ना...! फोन कट् करुन प्रश्न सुटणार नाहीये रोहन, तू काहीही म्हण, मला एकदा कां होईना सानिकाला भेटायलाच हवं. तुमचं लग्न हा आता फक्त तुमचा प्रश्न राहीलेला नाहीये. मनात आलं की भांडून मोडून टाकायला भातुकलीचा खेळ नाहीये लग्न म्हणजे, हे खडसावून सांगणारच आहे तिला. आणि तिच्या पोरकटपणाबद्दल जाबही विचारणाराय. सॉरी निरंजन... तुला विश्वासात घेऊन काही करणं या क्षणीतरी शक्य नाहीये मला, हे समजून घेशील ना रे तू? या सगळ्यामागचं नेमकं कारण शोधून, माझ्या परीनं त्याचं निराकरण करण्याचा केविलवाणा प्रयत्न ठरेल हा कदाचित, पण... माझ्या समाधानासाठी मी तो करणाराय. मी सानिकाला भेटणाराय...!

**प्रवेश दुसरा**

(सानिकाचं घर. वेळ दुस-या दिवशी सकाळी ११ नंतरची. बेल वाजते. सानिका दार उघडते)

सानिका : काकू... तू... तुम्ही?

नेहा : हो. मीच. येऊ?

सानिका : हो... या... या ना. बसा, मी पाणी आणते.

नेहा : नाही... नको.

सानिका : तुम्ही कोल्हापूरहून कधी आलात?

नेहा : आज पहाटे. रोहन ऑफिसला गेला..., न् मी बाहेर पडलेय. त्याला न सांगता आलेय.

सानिका : मी चहा करते पटकन्. आलेच.

नेहा : सानिका..., थांब. मी पाहुणचार घ्यायला आलेली नाहीये, हे तुलाही माहिती आहे. तू घरी सगळं सांगितलंच असशील. हो ना?

सानिका : (दचकते) अं...? कशाबद्दल?

नेहा : तेही माझ्याच तोंडून ऐकायचंय का?

सानिका : मी... घरी... त्याविषयी अजून काही बोलले नाहीय.

नेहा : त्यासाठी मुहूर्त बघणारायस का? जा. तुझ्या आईला बोलव.

सानिका : (घाबरुन) काकू...?

नेहा : बाबाही असतीलच ना घरी? त्यानाही बोलव आणि तुला जे काही सांगायचंय ते सर्वांसमक्षच सांग एकदा. तू बोलवतेयस त्या दोघांना की मी...

सानिका : (अस्वस्थ) नाही काकू, प्लीज... मी... मी त्यांना नंतर सांगेन. खरंच सांगेन.

नेहा : सानिका, तुझ्याकडून माझी ही अपेक्षा नव्हती. एवढी बेजबाबदार कशी गं तू? लग्न म्हणजे पोरखेळ वाटतो का? तुझ्या या अशा वागण्यानं तू किती जणांच्या भावनांशी खेळतेयस, कल्पना आहे का तुला?

सानिका : (विचारपूर्वक शांतपणे) मी तुमचा राग समजू शकते. आपण थोडं शांतपणे बोलूया कां?

नेहा : सहनशक्ती संपलीय माझी आणि तुझ्यासारखी हातावर हात ठेवून शांत नाही बसू शकणार मीS...! आमच्या सगळ्या पत्रिका वाटून झाल्यात. सगळ्या खरेद्या झाल्यात, लग्नाची चार ठिकाणची केळवणाची आमंत्रणं आलीयत. हे सगळं कसं निस्तरायचं आम्ही? इथं तुझ्या घरची परिस्थितीही यापेक्षा वेगळी नसणाराय. तुझ्या घरच्यांचा तरी काही विचार केलायस कां तू? आता जे काही बोलायचं ते आज आणि आत्ताच. तू... तुझ्या आईबाबांना बोलव.

सानिका : (केविलवाण्या स्वरांत) आई आत्ता घरी नाहीय हो, खरंच... ती बाबांना चेकअपसाठी घेऊन गेलीय.

नेहा : हो कां? ठिकाय. ते दोघं येईपर्यंत थांबेन मी.

सानिका : असं नका करु. प्लीज ऐका माझं. माझे बाबा... हार्ट पेशंट आहेत. या सगळ्याचा त्यांना खरंच खूप त्रास होईल.

नेहा : हा सगळा विचार रंग उधळण्यापूर्वी करायला हवा होतास. आत्ता करुन काय उपयोग?

सानिका : मी कसलेही रंग उधळलेले नाहीयेतS... होSS... आणि तरीही मी हात जोडते, हवं तर पाया पडते तुमच्या, पण हा विषय इथं खरंच नका हो वाढवू. आत्ता कुठल्याही क्षणी माझे आईबाबा येतील. प्लीज... ऐका माझं.

नेहा : हे घोंगडं मला आता असं फार काळ भिजत ठेवायचं नाहीय.

सानिका : मलाही. मी भेटेन तुम्हाला. बोलेन तुमच्याशी.

नेहा : आधी तुझ्या आई-वडीलांशी बोल. मला रोहनकडून सगळं समजलंय.

सानिका : रोहनला स्वत:लाच अजून सगळं नीट समजून घेता आलेलं नाहीय... तो तुम्हाला काय सांगणार? पण मी भेटेन तुम्हाला. तुमच्याशी मनातलं सगळं मोकळेपणाने बोलेन. त्यानंतर तुम्ही म्हणाल ती पूर्वदिशा!

नेहा : माझ्याजवळ फार वेळ नाहीये. कधी भेटशील? आणि कुठे?

सानिका : आईबाबा आले की लगेच बाहेर पडेन. आज रजाच घेतलीय मी. तुम्ही जिथे असाल, तिथून जवळच बसू कुठेही. शक्यतो एखाद्या गार्डनमध्ये. म्हणजे विदाऊट डिस्टर्बन्स बोलता येईल. चालेल? मी निघाले की, लगेच तुम्हाला फोन करेन.

नेहा : कसा करशील? माझा नंबर तरी घे. आणि सेव्ह कर.

सानिका : आहे माझ्याजवळ.

नेहा : (आश्चर्याने) माझा नंबर? तुझ्याकडे? कसा?

सानिका : (आवाज भरून येतो) तुमचा आणि रोहनच्या बाबांचा, दोघांचेही आहेत. (अस्वस्थ) साखरपुड्यानंतर मीच रोहनकडून घेतले होते. (पॉज) मी येईन लगेच. आय प्रॉमिस...!

## प्रवेश तिसरा

(स्थळ गार्डन. वेळ तासाभरानंतरची)

नेहा : इथे बसू या?

सानिका : तिथे त्या बाकावर बसू या. तिथे सावली आहे.

नेहा : ओके. (पॉज)

सानिका : काकू. थँक्स.

नेहा : कशाबद्दल?

सानिका : तुमच्या जागी दुसरं कुणी असतं, तर माझे आईबाबा येईपर्यंत हट्टानं थांबून तमाशाही करु शकलं असतं. तुम्ही तसं केलं नाहीत. त्याबद्दल थँक्स!

नेहा : बाबांची तब्येत कशी आहे?

सानिका : रुटीन चेकअप होतं. रिपोर्टस् नॉर्मल आहेत.

नेहा : आपण मुद्द्याकडे वळू या?

सानिका : अं? हो.

नेहा : मघाशी तू ‘मी कसलेही रंग उधळलेले नाहीत’ असं म्हणाली होतीस. ‘रोहनलाच अजून सगळं नीट समजून घेता आलेलं नाही’ असंही तुझं स्टेटमेंट होतं. याचा अर्थ तुझी काहीच चूक नाहीय, असं म्हणायचंय का तुला?

सानिका : चूक किंवा बरोबर दोन्हीही व्यक्तिसापेक्ष असतं. माझं म्हणाल तर माझं काही चुकलंय का हे मी स्वत: नाही, तुम्ही ठरवायचंय.

नेहा : रोहन भेटला होताच की तुला. तुमचं दोघांचं बोलणं झालं आहेच ना?

सानिका : नाही. तो भेटला. पण आमचं बोलणं होऊच शकलं नाही.

नेहा : म्हणजे?

सानिका : आज तुम्ही ज्या शांत आणि समंजसपणे बोलता आहात, तसा 'अॅप्रोच' खरं तर रोहनकडून अपेक्षित होता. तसं झालं असतं, तर आज जे बोलणाराय, ते त्याच दिवशी त्याला सांगू शकले असते. मला तेच जास्त आवडलं असतं.

नेहा : रोहन तर तुझ्याशी बोलणं झालंय म्हणत होता.

सानिका : त्याने मला भेटण्यासाठी फोन केला होता, तोच चिडून. मला भेटायला आला, तोच संतापून. मला त्याचा मानसिक आधार हवा होता, पण त्याने तोच नाकारला. आमचा संवाद होणं अपेक्षित होतं, पण फक्त वादच झाले. आय ॅम सॉरी फॉर दॅट.

नेहा : तसंही तू सुध्दा तुझ्या घरी कुठं काय सांगितलंयस?

सानिका : रोहनचा राग शांत झाला, की तो फोन करेल असं वाटलं होतं. मी त्याच्या फोनची वाट पहात होते, म्हणून नव्हतं सांगितलं. आता... घरी... गेले की, आईबाबांना सांगेन सगळं, सांगावंच लागेल.

नेहा : मी बोलेन रोहनशी. तो फोन करेल तुला.

सानिका : नको. प्लीज.

नेहा : आता तुमचं लग्न हा तुम्हा दोघांचाच प्रश्न राहीलाय कां? नाही ना? तरी जे काही करायचं, ते तुला विश्वासात घेऊनच करेन. त्यासाठीच मी आलेय. बोल. सांग मला सगळं. तो मुलगा कोण होता? तुझं खरंच प्रेम आहे का त्याच्यावर?

सानिका : एखाद्या गाफील क्षणी, अनपेक्षितपणे जीवघेणा चटका बसतो ना, तेव्हाच माणसाचं खरं रूप समजतं. तसं झालंय माझं. तो माझ्याच कंपनीत काम करणारा, आमच्याच ग्रुपमधला माझा कलिग आहे काकू. त्याचं हसणं, त्याचं बोलणं, त्याचा डिसेन्ट प्रेझेन्स, आम्हा सगळ्याच मित्रमैत्रिणींना आवडायचा. मलाही, तरीही असं एका क्षणात इन्व्हॉल्व होणं, मोकळेपणानं वागणं माझ्या स्वभावातच नाहीय. मित्र म्हणूनही मी त्याचा कधी विचार केलाय, असं मला आजही वाटत नाहीय. आमच्या भेटी, गप्पा, कॉफीशॉपमधलं आमचं तासन् तास एकत्र असणं हे सगळं आम्हा मित्रमैत्रिणींचं एकत्रच असायचं. पण अलीकडे तो माझ्यात इंटरेस्ट दाखवतोय असं मला जाणवू लागलं होतं. आणि माझ्याही नकळत मी त्याला पारखत होते. जोखत होते.

नेहा : असं असतानाही त्याने रोहनला फोन कां करावा?

सानिका : माझा 'नकाराधिकार' त्याला मान्य नव्हता म्हणून असेल. त्याचा अहंकार डिवचला गेला म्हणून असेल. पण म्हणून त्याने फोन करणं, ही माझी चूक असूच कशी शकते?

नेहा : तुमचं काही अफेअर वगैरे नव्हतंच? तुम्हा दोघांत कधीच काहीच घडलं नव्हतं?

सानिका : म्हटलं तर काहीच घडलं नव्हतं. म्हटलं तर बरंच काही. एकदा एका विकेण्डला आमच्या ग्रुपमधले आम्ही सर्वजण पिक्चरला गेलो होतो, तो नेमका माझ्याच शेजारच्या खुर्चीवर होता. त्यात मला काही ऑकवर्ड फिलींग यायचा प्रश्नही नव्हताच. त्याचा एकदा ओझरता स्पर्श झाला. त्या क्षणी तो स्पर्श मला आवडलाही. तरीही एखाद्या प्रतिक्षिप्त क्रियेसारखी मी सावरुन बसले. तो 'सॉरी' म्हणाला. तेव्हा त्याची ती 'डिसेन्सी' ही मला मनापासून आवडली. अगदी खरं सांगायचं, तर कदाचित आमचे सूर जुळतील असं वाटूनही गेलं होतं त्याक्षणी! विशेषत: आय. टी. क्षेत्रात काम करताना परस्परांमध्ये रुजू पहाणारी निखळ मैत्री ही अतिशय कॉमन गोष्ट आहे.

नेहा : मग? बिनसलं कुठं?

सानिका : माझ्या आत्मसन्मानालाच ठेच लागली तेव्हा. त्या दिवशी पिक्चर संपल्यावर आम्ही सगळे एकमेकांचे निरोप घेऊन जाऊ लागताच त्याने मला थांबवलं... (हळूहळू अंधार. अंधारातच फ्लॅशबॅकमधले संवाद ऐकू येतात. )

तो : सानिका, चल मी सोडतो तुला.

सानिका : तू कोणत्या डिरेक्शनला जाणारायस? मला टिळक रोडवर जायचंय.

तो : माय प्लेझर. बैस.

सानिका : थँक्स. चल. (मोटरसायकल सुरु झाल्याचा आवाज. )

तो : एऽ कॉफी घेऊया?

सानिका : चालेल. (मोटरसायकलचा आवाज थांबतो. ) एऽ हा तर रेसीडेन्शीयल कॉम्प्लेक्स आहे.

तो : येस्स. माय होम. उतर. मी गाडी पार्क करतो. (अंधार विरतो. त्याच्या फ्लॅटमधील हॉलवर प्रकाशझोत. दोघेही प्रवेश करतात. ) ये... ही... माझी झोपडी. (हसतो. )

सानिका : मार्व्हलस. खूप छान आहे तुझी वेलफर्निश्ड सो कॉल्ड झोपडी. (दोघेही हसतात. )

तो : आजचा दिवस 'स्पेशल डे' आहे माझ्यासाठी.

सानिका : म्हणजे? मी नाही समजले.

तो : सानिकाऽ रिलॅक्स. मी कॉफी खूप छान करतो. माय स्पेशॅलिटी. तुलाही आवडेल. आय ऍम शुअर. लेट अस स्टार्ट वुईथ 'माझ्या हातची कॉफी'...! (तो कॉफी आणायला आत जाताच सानिकाच्या आवाजातील निवेदन आणि त्याबरहुकूम दोघांच्या हालचाली दृश्यरूप... )



सानिका : त्याच्या त्या हव्याहव्याशा गूढ बोलण्यातला सूचक अर्थ त्याने वाफाळलेल्या कॉफीचा मग माझ्यासमोर धरला, तेव्हा समजला. मी तो 'कॉफी मग' त्याच्या हातातून हळूच घेऊ लागताच त्याची उतावीळ बोटं माझ्या बोटांमध्ये गुंतू पहात, तिथंच रेंगाळू लागली. आणि मी चमकून त्याच्याकडे पाहिलं. त्याची नजर मला अनोळखी वाटली. तो लागट हसला. चकाकणारं सगळं सोनंच नसतं हे त्या क्षणीच समजलं. थिएटरमधे झालेला, त्या क्षणी मला आवडलेला ओझरता स्पर्श, मला आता किळसवाणा वाटू लागला. काहीशा नाराजीने मी त्याच्याकडे पाहीलं आणि सावरून बसले. तो मला खेटून माझ्याजवळ बसताच मी ताडकन् उठले... )

तो : ए सानू, रागावलीस...?

सानिका : काय चालवलेयस तू हे? प्लीज स्टॉप धीस नॉनसेन्स.

तो : कमॉन सानिका, एन्जॉय करु या ना... प्लीज...

सानिका : एS... तू समजलायस कोण मला? तू... तू थांब तिथंच. पुढे येऊ नकोस.

तो : किती पॅनिक होतेयस...? जस्ट एन्जॉय इट...

सानिका : एकदा सांगून समजत नाहीये काS...? बिहेव्ह युवरसेल्फ...

तो : एS... फार नखरे नकोयत. इटस् अ रुटीन मॅटर. त्याचा उगाच बाऊ का करतेयस?

सानिका : तुझ्यासाठी रुटीन मॅटर असेल, माझ्यासाठी नाहीS...

(ती त्याला झिडकारते. जाण्यासाठी पाठ वळवताच तो पुढे झेपावतो. तिची वाट अडवून उभा रहातो. संतापातिरेकाने थरथरत सगळी शक्ती एकवटून ती त्याला दूर ढकलते आणि स्वत:ची सुटका करुन घेते. निघून जाते. तो ती गेलेल्या दिशेला पहात धुमसत उभा रहातो. प्रकाशझोत त्याच्यावर. दृश्य गोठते. हळूहळू अंधार. फ्लॅशबॅक समाप्त. प्रकाशझोत पुन्हा बागेतील दृश्यावर. नेहा थक्क होऊन ऐकतेय. सानिका अस्वस्थ उभी. )

सानिका : जे घडलं, ते हे... आणि एवढंच...!

नेहा : किती हॉरिबल आहे हे सगळं... पण मग नंतर तू गप्प कां बसलीस? त्याच्याबद्दल तक्रार का नाही केलीस?

सानिका : त्यासाठीचे साक्षी पुरावे सगळं कुठून गोळा करणार होते मी? तरीही मी गप्प नाही बसले. ग्रूपमधल्या मैत्रिणींना विश्वासात घेऊन मी सगळं शेअर केलं. दुस-या दिवशी काही न घडल्यासारखा उजळ माथ्यानं तो ऑफिसमधे आला. तेव्हा ग्रुपमधल्या मुलींनीच नव्हे तर मुलांनीही त्याला घेरलं. हो नाही करत त्याने सर्वांसमोर कन्फेसही केलं. माझी माफी मागितली. मी लगेच सगळं विसरु शकले नाही, तरी हळूहळू सावरले. पण तो सगळं विसरलेला नव्हता, हे रोहनचा मला फोन आला तेव्हाच मला समजलं.

नेहा : तू रोहनला हे सगळं सांगितल्यानंतरही तो कां चिडला? तू त्याला राग येईल असं बोलली होतीस का काही?

सानिका : तो ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत असता, तरच सांगून उपयोग होता. तो मला भेटला ते स्वत:चा निर्णय मला सांगायला. मला समजून घ्यायला नव्हे.

नेहा : सानिका, तू खरंच नको काळजी करुस. मी बोलते, समजावते रोहनला.

सानिका : छे छे काकू, नको. तुमचा काहीतरी गैरसमज होतोय. मी त्यासाठी तुम्हाला हे सगळं सांगितलेलं नाहीय. खरंतर माझ्यापुढे रोहनच्या भेटीनंतर निर्माण झालेला प्रश्न वेगळाच आहे. आणि तो जास्त बोचरा आहे.

नेहा : म्हणजे?

सानिका : हे सगळं ऐकूनसुध्दा त्याने माझ्यावर विश्वास न ठेवता माझ्याकडे माझ्या निर्दोषत्वाचा पुरावा मागितला असता, तरी मला राग नसता आला. व्यवहाराचा भाग म्हणून मी ते समजूनही घेतलं असतं. माझ्या सगळ्या मित्रमैत्रिणींनी रोहनचा गैरसमज दूर केला असता. प्रश्न न चिघळता मिटला असता. (पॉज. स्वत:ला सावरते. ) पण… झालं ते एकदृष्टीने बरंच झालं. निदान मुखवटे न् चेहरे यातला फरक तरी समजला…

नेहा : असं का म्हणतेस?

सानिका : थोडं स्पष्टच बोलते. प्लीज रागावू नका. तुम्ही रदबदली करुन किंवा तुमच्या दबावाखाली रोहन लग्नाला तयार झाला, तर मलाच ते आवडणार नाही.

नेहा : पण तसं कां होईल?

सानिका : (आवाज भरुन आलेला) रोहन मला भेटायला आला, ते पुढे काय करायचं हे मनाशी ठरवूनच. तो चिडून बोलत राहिला. शांत रहायचा खूप प्रयत्न केला मी… पण शब्दाला शब्द वाढतच गेला. काकू, मला बोलायची एकही संधी न देता, कोणत्याही गोष्टीची शहानिशा न करता, अतिशय गंभीर आणि घाणेरडे आरोप केलेत रोहनने! का…? कधी काळा की गोराही पाहिला नाही अशा कुणा ति-हाईताने त्याला फोन करुन माझ्या… चारित्र्याबद्दल काहीबाही सांगितलं म्हणून? मग माझं काय? माझ्याशी बोलावं, माझी बाजू शांतपणे ऐकून घ्यावी याची गरजच त्याला वाटली नाही. ही ‘कॉशन नोट’ आहे माझ्यासाठी. मी त्याकडे दुर्लक्ष नाही करु शकत. मला हे लग्न व्हावं असं वाटतंय, आणि ते करायची भीतीही वाटतेय. तुम्हीच सांगा मी काय करु?

नेहा : तुला काय म्हणायचंय कळतंय मला….!

सानिका : आम्ही आजकालच्या मुली पार पोचलेल्या असतो, असं त्याचं ठाम मत आहे. आम्ही साध्याभोळ्या वाटतो, पण ते आमचे दाखवायचे दात आहेत असं तो समजतो. त्याची ही सरसकट मतं मला इम्मॅच्युअर्ड आणि म्हणूनच डेंजरस वाटतायत. त्याने स्वत:ची ही मतं स्वत:शीच एकदा नीट तपासून पहावीत एवढंच माझं म्हणणं आहे. आमचा संसार फक्त विश्वासाच्याच नव्हे, तर सामंजस्याच्या पायावर उभा राहिला, तरच ते हिताचं असेल. माझ्या न् रोहनच्याही. काकू… हे सगळं रोहनला पटलं तरच तिढा सुटेल असं मला वाटतं. (पॉज) आपण निघू या? प्लीज…?

नेहा : अं? हो... तू निघ. मी बसते थोडावेळ. (ती घुटमळते. ) तू निघ अगं. खरंच.

सानिका : तुम्ही रागावलायत माझ्यावर.

नेहा : नाही सानिका. रागावू कशासाठी...? इन फॅक्ट... आय ॲप्रिसिएट यू... एक सांगू...? तुझ्यापेक्षा रोहनला मी चांगला ओळखते. त्याचा आपण होऊन फोन आला... तर बोलशील त्याच्याशी...? (सानिका घुटमळते, अस्वस्थ. ) प्लीज...

सानिका : ठीक आहे. बोलेन.

नेहा : थँक्स. ये. जपून जा.

सानिका : बाय. (जाऊ लागते. )


नेहा : एक... एक मिनिट सानिका. (ती थांबते. वळून पहाते. ) घरी जाशील, तेव्हा आईबाबांना यातलं आत्ताच काही सांगू नकोस. त्यांना त्रास होईल... (सानिका कृतार्थतेने बघते. डोळे भरुन आलेले. होकारार्थी मान हलवते. )

सानिका : (भरुन आलेल्या आवाजात) थँक्स काकू... बाय. (जाते)

नेहा : (पॉज) सानिका... गेलीस, पण जाताना खूप काही देऊन गेलीस. मी आले होते, तुला खडसावून जाब विचारायला, पण तूच मला हालवून जागं केलंयस. स्वत:ची हुशारी आणि हाय पॅकेज हे एवढंच भांडवल लग्नासाठी पुरेसं नाहीय हे रोहनला समजावून सांगण्याची गरज का आहे, हे तू मला शिकवलंस! मी रोहनला समजावून सांगेन...! सानिका, मी इथे आले होते ते ‘रोहनची आई’ म्हणून, पण आता मात्र त्याच्या समोर जाईन, ते ‘तुझी सावली’ बनून...!!

- समाप्त -

**श्री अरविंद लिमये -** ‘त्रिदल‘, विनायक नगर, हरीपूर रोड, हरीपूर, सांगली - मो. ९८२३७३८२८८



## कविता - डोंगरातल्या घरात माझ्या... - श्री आशिष मुळे



डोंगरातल्या घरात माझ्या, रहायला येशील का?
मनातल्या अंधाऱ्या खोल्यांना, उजळून टाकशील का?
आहे घरात माझ्या, सजावट फक्त दगडांची
मनातल्या पाषाणाला, पाषाण-पालवी देशील का?

नाही कुठलीही कथा माझ्याकडे, तुझ्यावर बिंबवायला
फक्त प्रबळ इच्छा अन प्रेम, आहे तुला दाखवायला
सकाळ तुझी प्रसन्न असेल, शांत असेल संध्याकाळ
अन बर्फाळ मिठीत माझ्या, उबदार असेल निशाकाल

इथे नाही कुठला, धोका हिंस्त्र प्राण्यांचा
नाही वावर कुठल्या, बोलणाऱ्या श्वापदांचा
आहे इथे फक्त, निर्मळ अनुभवात पोहणे
पाण्याला आहेत इथे, फक्त नैसर्गिक वळणे

अशा जंगलात माझ्या, पाय तुझा टाकशील का?
मनातल्या हिरवळीवर माझ्या, निर्वस्त्र आत्मा धावेल का?
रोज एकटाच जगतो सुंदर, सोबत तुझी होईल का?
गुहेबाहेरच्या फुलांसोबत, मुखडा तुझा दिसेल का?

**श्री आशिष मुळे** - सांगली

## कथा - मन के”शोले” - श्री मंगेश मधुकर



साल 1994, जगनु कोकणातल्या गावच्या जत्रेला गेला. निसर्गाच्या हाकेसाठी जरा आडबाजूला गेला. तिथे झुडपात जुनाट दिवा पडलेला दिसला. उत्सुकतेपोटी जगनुने तो जुनाट दिवा घेतला.

“देवा, हा जादूचा दिवा असू दे, लय भारी काम होईल” म्हणत नमस्कार करून दिवा हाताने घासला पण काहीच झालं नाही, असे दोन तीन वेळा झाले. दिवा रुमालाने जोरजोरात घासायला सुरुवात केल्यावर एकदम धूर निघू लागला. जगनुला प्रचंड धुरामध्ये एक आकृती दिसली. जगनु घाबरला. एकदम ती आकृती समोर आल्यानं जगनुला दरदरून घाम फुटला”क$$क कोण?”

“तूच मला बोलावले म्हणून तर मी इथे आलो. काय काम आहे? व्हॉट कॅन आय डू फॉर यू?”

“ए भाऊ, मराठीत बोल. उगा इंग्लिश फेकू नको.”

“दादा, मी जीनू. तुझी इच्छा सांग. ती पूर्ण करायचा प्रयत्न करतो. मी तुझा गुलाम…”

“ए गप, फेकू नको, असं गुलाम वैगरे असतं का कुठं? उगीच आपलं xxxxxx बनवायचे नाही.”

“ओके, मला कशाला बोलावले? का ते सांग.”

“थापेबाजी नाही ना?”

“काम सांगायचे असेल तर सांग. नाहीतर मी निघालो.” जगनुने परीक्षा घ्यायचं ठरवलं.

“मला” शोले” सिनेमातल्या रामलाल, छोटी बहु, सांभा यांना भेटायचंय, जगनुने मुद्दाम खोडसाळपणा केला.

जीनू विचारात पडला,”ओके, मी सांगतो तसे कर. डोळे बंद कर.”

जीनूच्या सूचनांप्रमाणे जगनुनं वागायला सुरवात केली.

डोळे उघडले तेव्हा साक्षात रामलाल, छोटी बहु आणि सांभा यांना चक्क आपल्यासमोर पाहून जगनुला धक्का बसला. आनंदाच्या भरात नक्की काय करावे हेच समजेना. नुसतचं हसणाऱ्या जगनूकडे ते तिघे मात्र विचित्र नजरेने पाहत होते. थोड्या वेळाने धक्क्यातून सावरलेल्या जगनुनं आपल्याविषयी माहिती दिली आणि शोलेतल्या घटनांची माहिती देऊ लागला. मागच्या आयुष्यातील माहिती अनोळखी माणसाच्या तोंडून ऐकून तिघांनाही आश्चर्य वाटले. कुतूहल निर्माण झाले. भीती कमी झाली. चौघे आपसात बोलायला लागले. गप्पांच्या ओघात जगनुला समजले की, काळाच्या ओघात पुलाखालून बरेचसं पाणी वाहून गेलं होतं.

ठाकूरच्या हवेलीत फक्त रामलाल, छोटी बहु आणि सांभा हे तिघेच होते. बसंती - वीरू आपला मुलगा जयसोबत शहरात राहत होते. गब्बरला पकडल्यावर ठाकूर प्रचंड आनंदी, समाधानी होते. एके दिवशी पाय घसरून पडल्यानं मणक्याचे हाड मोडलं आणि ठाकूर अंथरुणाला खिळले. रामलाल आणि छोटी बहु यांनी सेवा केली पण मनाने खचलेल्या ठाकूरनी काही दिवसातच इहलोकीची यात्रा संपविली. जाता जाता हवेली आणि छोटी बहू दोन्हीची जबाबदारी रामलालकडे दिली. त्यांच्याकडून तसे वचन घेतले.

गब्बरला पकडल्यावर पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सांभा माफीचा साक्षीदार झाला. त्यामुळे शिक्षा कमी झाली. जेलमधून सुटल्यानंतर गेल्या पाच वर्षांपासून ते ठाकूरच्या हवेलीवर सिक्युरिटी आणि वॉचमन म्हणून तो काम करतो. ही नवीन माहिती जगनुला समजली.

तेवढ्यात छोट्या बहूने सगळ्यांना जेवायला बोलावले. जेवण झाल्यानंतर सांभा गेटवर गेले, छोटी बहू आवराआवर करत होत्या तर रामलाल पायऱ्यांवर पान खात बसले होते. ती संधी साधून जगनु बोलायला गेला.

“काका, थकलात आता.”

“मी आणि ही हवेली दोघेही!!, काय करणार, वय झालं, सत्तरी पार झाली.”

“आता दगदग कमी करा. आराम करा. ठाकूरचा तुमच्यावर फार विश्वास, खूप जीव होता. खरंय ना! ’

छोटी बहू लांब आहे याची खात्री करून रामलाल हळू आवाजात सांगू लागले,”त्यानेच तर घात केला ना, ठाकूरसाब एकदम दिलदार, चांगला माणूस. कामाची अतिशय गरज होती म्हणून हवेलीत नोकरीला लागलो आणि हवेलीचाच झालो.”

“म्हणजे….” जगनूने विचारले.

“अरे बाबा, माझाही परिवार आहे. बायको-दोन मुले, सुना, नातवंडं आहेत पण हवेलीच्या नोकरीमुळे सगळं सगळं सुटलं. दिवसरात्र इथंच. सुट्टी नाही, सणवार नाही. मागेल तेव्हा आणि तेवढे पैसे मिळायचे. माझा असा खर्च काहीच नाही. सगळे घरी पाठवायचो. सुरूवातीला घरच्यांनी तक्रार केली. त्रागा केला पण वेळच्या वेळी पैसे मिळत असल्यामुळे नंतर तक्रार करणे बंद केले. माझ्या नसण्याची सवय करून घेतली. हळूहळू माझ्याच लोकांमध्ये मी कधी परका झालो कळलेच नाही.”

“एकही सुट्टी घेतली नाही?”

“नाही. शक्यच नव्हते. जरी कधी घरी गेलोच तरी संध्याकाळी परत. ठाकूरचा कोणावरच विश्वास नव्हता. तसा ठाकूरसाब स्वभावाने राजा माणूस. पण माझ्याबाबतीत फार स्वार्थी वागले. आयुष्यभर राबवून घेतले. जिवंतपणी काम करून घेतलेच. पण मरतानासुद्धा हवेलीची आणि छोट्या बहूची जबाबदारी माझ्यावरच सोपवून गेले.”

“मग ठाकूर गेल्यानंतर घरी नाही गेला? नाहीतर घरच्यांना इथे राहायला आणायचे.”

“प्रयत्न केला. पण त्यांच्यासाठी मी परका होतो. त्यांना हवेलीत यायचे नव्हते, त्यांच्या आयुष्यात मला कुठेच जागा नव्हती.” डोळ्यात आलेले पाणी गळ्यातल्या पंचाने पुसत रामलाल दुसरीकडे शून्यात पाहू लागले.

त्यांच्या मनातला वेदनेचा ठणका जगनुला जाणवला.

रामलालना एकटं सोडून जगनू सांभा बसले होते तिथे आला.”थोडं तुमच्याशी बोलायचे आहे.” आपल्याशी बोलायला स्वतःहून कोणीतरी आले याचेच अमाप कौतुक सांभा यांच्या चेहऱ्यावर होते. अत्यंत उत्साहाने ते जगनुशी बोलायला लागले.

“तुम्ही गब्बरच्या टोळीत कसे आलात?” जगनुने विचारले.

“घरची परिस्थिती गरीबीची, दोन वेळेचे खायचे वांधे. शाळेचा तर विचारसुद्धा नाही. पण गावातला मास्तर चांगला माणूस. माझ्यावर त्यांचा जीव. त्यांनी मला थोडेफार लिहायला वाचायला शिकवले. पण त्यांची बदली झाल्यामुळे शिक्षण संपलं.”

“मग पुढे?”

“भूक भागविण्यासाठी हातपाय मारणं गरजेचं होते. मित्रांच्या नादानं चुकीच्या मार्गाला लागून भुरट्या चोऱ्या करू लागलो. त्यातूनच पुढे गब्बरच्या टोळीत आलो. तिथे मी एकटाच लिहिता वाचता येणारा. त्यामुळे टोळीत मला भाव. शिक्षणाचे महत्व त्यावेळेस कळले. थोड्याच दिवसात गब्बरचा माझ्यावर फार विश्वास बसला. काहीही काम असलं की सगळ्यात आधी मला विचारणार, हे ठरलेले.”

“म्हणजे तुम्ही गब्बरचे एकदम खासमखास!!”

“डोंबलं, कसलं काय, गब्बर एकदम तिरपगडा माणूस. कधी काय करेल याचा भरवसा नाही. कालीयाला कसा मारला माहिती आहे ना! विक्षिप्त माणूस. सगळे त्याला जाम टरकायचे. एकदम आतल्या गाठीचा. मनात एक आणि ओठात दुसरं. अट्टल राजकारणी, म्हणूनच आमचा लीडर झाला. त्याला माणूस आणि कोंबडं मारायला फार आवडायचं. दोघांच रक्त पाहून विकृत समाधान मिळायचं. जेलमध्ये त्याचा डायबेटीस आणि मूळव्याधीचा त्रास वाढला. सततची धावपळ, चिडचिड, जेवणाच्या अनियमित वेळा, सारखं तिखट आणि तंबाखू खाणं या अनेक वर्षाच्या सवयींनी आजारात भर पडली. पोलिसांपेक्षा त्या त्रासाला तो जास्त घाबरायचा. तब्येतीच्या तक्रारीमुळे फार हताश झाला, वैतागून त्यानं पथ्य, औषधे याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे आजार बळावला आणि त्यातच तो गेला.”

“कधी टोळी सोडावीशी वाटली नाही?”

“मेलो असतो तरच सुटका होती. गब्बरला पकडल्यावर टोळी संपली. पोलिसांच्या सांगण्यावरून माफीचा साक्षीदार झालो. कमी शिक्षा झाली. चांगल्या वागणूकीमुळे लवकर सुटलो. पुढे काय? घर ना दार. नातेवाईक चार हात लांबच. ठाकूरच्या हवेलीवर आलो. छोटी बहुने इथेच राहायला सांगितले. तेव्हापासून इथंच आहे.

कधी नव्हे तो आयुष्यात आनंदी, समाधानी आहे. देवाचे, हवेलीच्या मालकांचे उपकार आहेत." सांभा खूष होऊन सांगत होते.

"सांभाजी, पाहुण्यांना इकडे पाठवा," पहिल्या मजल्यावरून छोटी बहुने आवाज दिल्यावर जगनु तिकडे गेला.

"पाहुणे, आमच्याविषयी बरीच माहिती आहे तुम्हाला. कुठून आलात? इथे कसे? काय पाहिजे?"

"वहिनीसाहेब, तुमच्या विषयी कुतूहल, उत्सुकता आहे, म्हणून भेटायला आलो." वहिनीसाहेब म्हटलेले छोटी बहूंना फार आवडलं. खूष होऊन छान हसल्या; पण अगदी काही क्षणानंतर पुन्हा नेहमीसारख्या गंभीर झाल्या.

"आमच्याविषयी कुतूहल? आश्चर्य आहे. सरधोपट, नीरस, रोजचा दिवस सारखाच, असं आमचं जगणं. कधीकाळी रंगबेरंगी होते; पण हवेलीत आले अन सगळंच बदलून गेलं. गब्बरने हवेलीतील माणसे मारली. त्यादिवशी जे मेले ते सुटले आणि जे जिवंत राहिले ते फक्त शरीराने. मनाने कायमचे मेले. ठाकूरसाब फक्त सूड घ्यायचा या विचारानेच जगत होते. २४ तास तोच ध्यास. ना खाण्यात लक्ष, ना घरादाराकडे.."

"माहेरी का नाही गेलात?"

"तरुण विधवा मी. त्यात आई नाही. वडील आणि भावांना जबाबदारी नको होती. खूप मानसिक त्रास, अवहेलना, अपमान वाट्याला आले. हळूहळू लोक टाळू लागले. एकटेपणा अंगवळणी पडला. गर्दीची भीती वाटू लागली.

आलेला दिवस ढकलणे एवढेच काम. आख्ख्या हवेलीतले संध्याकाळी दिवे लावायचे आणि सकाळी विझवायचे हेच कंटाळवाणे काम आयुष्यभर केले. अचानकपणे एके दिवशी तो आला आणि........."

"तो म्हणजे?"

"देखणा, उंचापुरा, स्वभावाने एकदम शांत, माउथ ऑर्गन वाजवणारा 'जय'. एकमेकांना पहिल्यांदा पाहिलं तेव्हाच एक नातं निर्माण झाले. दोघेही अबोल. मी परिस्थितीने. तो स्वभावाने. पण तो डोळ्यांनी खूप बोलायचा. मला ते सगळं समजायचं. अशा आम्ही खूप गप्पा मारल्या आहेत. कधी आम्ही एकमेकांना आवडायला लागलो, कळलंच नाही."

"एकमेकांना सांगितले नाही कधी?"

"नाही. जयने कधीच पुढाकार घेतला नाही आणि मला तर ते शक्यच नव्हते. मनात स्वप्न फुलत होते; परंतु जय अचानकपणे जगच सोडून गेला आणि आयुष्यात मिसळलेले रंगीबेरंगी क्षण पुन्हा उडून गेले. उरले ते फक्त अफाट, न संपणारे पांढरे आयुष्य. मी परत विधवा झाले. एकदा लग्नामुळे आणि दुसऱ्यांदा प्रेमामुळे." कोरड्या, निर्विकार चेहऱ्याने छोटी बहू सांगत होत्या. जगनुचे डोळे वाहत होते.

सूर्यास्त होताना जगनु हवेलीच्या बाहेर पडला. दु:खी, कष्टी रामलाल, समाधानी, आनंदी सांभा आणि तटस्थ, निर्विकार छोटी बहु या सिनेमात पाहिलेल्या पात्रांची अनोखी व्यथा ऐकून तो नि:शब्द झाला. गेटमधून बाहेर पडताना त्याने मागे वळून पाहिले, तर तिघेही त्याच्याकडे पाहून हात हलवीत होते.

तिघे वेगवेगळ्या ठिकाणी उभे होते. अगदी आपल्या वेगवेगळ्या आयुष्यासारखे..

**श्री मंगेश मधुकर** - मो. 98228 50034

## चित्रकाव्य - तरीही... - सुश्री नीलांबरी शिर्के



पिकू लागले पान तरीही
पिवळसर हे रूप देखणे
तजेलदारता भुरळ पाडते
अन ताठपणे हे उभे रहाणे |



गळून जायचे आहे माहीत
परंतु त्याची भीती कशाला
पिकलो आपण गळणे नक्की
नको श्वास ते मोजायाला |

जोवर जगणे आहे तोवर
आनंदाने जगत रहावे
पिवळेपणातले देखणेपणही
जाता जाता समजून द्यावे |

**सुश्री नीलांबरी शिर्के** - मो. 8149144177 / 9370830030

**लेख - भारताची पंचाहत्तर वर्षांतील वैज्ञानिक प्रगती - श्री राजीव गजानन पुजारी**



हे वर्ष आपण स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करत आहोत. प्राचीन काळी भारत देश गणित, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, स्थापत्य, संगीत इत्यादी विषयांमध्ये जगात अग्रेसर होता. चरक, सुश्रुत, नागार्जुन, आर्यभट्ट, भास्कराचार्य यासारख्या वैज्ञानिकांनी आपापल्या क्षेत्रात क्रांतिकारक शोध लावले आहेत. आपल्या आयुर्वेद आणि योगासनांनी आज जगाला आरोग्यदायी जीवनशैली कशी प्राप्त करता येते याची दिशा दिली आहे. सुश्रृतासारख्या महान वैद्याने प्लास्टिक सर्जरी, मोतीबिंदू, अवयव प्रत्यारोपण या क्षेत्रात जगात पहिल्यांदा काम केले. भास्कराचार्यांनी ' लीलावती 'सारखा महान ग्रंथ लिहून भारताला गणितात पुढे नेले. शून्याचा शोध वराहमिहिराने लावला. नागार्जुनाने रसायनशास्त्रात अनेक प्रयोग करून त्या शास्त्राची प्रगती केली.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये डॉक्टर सी. व्ही. रमण यांनी 'रमण इफेक्ट 'हा महत्त्वपूर्ण शोध लावून विज्ञानासाठीचे आशिया खंडातील पहिले नोबेल पारितोषिक जिंकले. शंकर आबाजी भिसे यांना भारताचे एडिसन म्हणतात. त्यांचेही शोध जगाने वाखाणले. जगदीशचंद्र बोस यांनी वनस्पतींना भावना असतात हा महत्त्वपूर्ण शोध लावला. त्याचप्रमाणे बिनतारी संदेश पाठवण्याची किमया करून दाखवली. इ. स. १८६० साली जमशेदजी टाटा यांनी पोलाद उद्योग सुरु केला. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी तत्कालीन भारतामध्ये अनेक मोठमोठी धरणे स्वतःच्या प्रतिभाशाली बुद्धीने बांधली. ती आजही देशाला फलदायी ठरत आहेत. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी लोखंडी कृषी अवजारे बनविण्यास सुरुवात केली. अनेक क्षेत्रांत स्वातंत्र्यपूर्व काळीसुद्धा वैज्ञानिक प्रगतीचे वारे वाहत होते. टाटा मूलभूत संशोधन संस्था (Tata Institute of Fundamental Research-TIFR) ही १९४५ साली जे. आर. डी. टाटा आणि डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या पुढाकाराने मुंबई येथे स्थापन झाली. देशातील आजपर्यंतचे अनेक नामवंत शास्त्रज्ञ याच संस्थेतून घडलेले आहेत.

अशी काही प्रगती स्वातंत्र्यपूर्व काळात होत असताना भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्योत्तर काळात वैज्ञानिक प्रगतीचा पाया घालणाऱ्या अनेक संशोधन संस्था भारत सरकारने उभारल्या. यामध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी वैज्ञानिक प्रगतीशिवाय देशाला तरणोपाय नाही, हे जाणून आर्थिक स्थिती कमजोर असतानाही वैज्ञानिक संशोधन संस्था स्थापन केल्या. त्या फलस्वरूप आज आपला भारत देश विज्ञान क्षेत्रात एक आघाडीचा देश म्हणून ओळखला जातो.

आता आपण विज्ञानाच्या जोरावर विविध क्षेत्रांत भारताने गेल्या पंचाहत्तर वर्षांत केलेल्या प्रगतीचा आढावा घेऊ...

**१) कृषी क्षेत्र :-**

भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारतीय लोक अन्नधान्याच्या बाबतीत इतर देशांवर अवलंबून होते. भारताला कृषी क्षेत्रात स्वयंपूर्ण करण्यात आपले पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी पंचवार्षिक योजना चालू केल्या. त्या अंतर्गत भाक्रा नानगल, हिराकूड, कोयना आदि धरणे बांधण्यात आली. त्यामुळे देशातील जमिनीचा मोठा भाग पाण्याखाली आला.

... मला आठवतंय, आमच्या लहानपणी मिलो नावाचा अत्यंत निकृष्ट गहू आपण अमेरिकेकडून आयात करत होतो, तो देखील रेशनवर मिळत असे. भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी 'जय जवान जय किसान 'ही घोषणा देऊन कृषी क्षेत्राला दिशा दिली. विज्ञानाच्या सहाय्याने केलेल्या हरितक्रांती, धवलक्रांती/ श्वेतक्रांती, नीलक्रांती यासारख्या कृषी क्षेत्रातील क्रांतिकारक बदलांनी भारताने कृषी क्षेत्रातील समृद्धी गाठली आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

स्वातंत्र्यानंतर कृषी संशोधनासाठी जी. बी. पंत, राहुरी यांसारख्या अनेक कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. त्यात परजीवी शेती, फलन, कृत्रिम बियाणे, जनुकीय सुधारित बियाणे यावर भारतीय शास्त्रज्ञांनी संशोधन करून कृषीक्षेत्रात देश आत्मनिर्भर होण्यात मोलाची भूमिका निभावली. रासायनिक खतांची निर्मिती आणि वापर यामध्ये भारत जगभरात चौथ्या क्रमांकावर आहे. एकेकाळी कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेला देश आज मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारूनसुद्धा कृषी क्षेत्रात वैज्ञानिक शोधांच्या जोरावर मोठी कामगिरी बजावत आहे.

भारताच्या कृषी क्षेत्रातील आत्मनिर्भरतेत सहकार क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. श्री. विठ्ठलराव पाटील व श्री धनंजय गाडगीळ यांनी सहकाराची शास्त्रोक्त कल्पना मांडली. माजी मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी ती प्रत्यक्षात आणली. एकेकाळी धान्य आयात करणारा भारत आज जगाला धान्य निर्यात करतो. कापसासारख्या पिकामध्ये भारताने प्रगती केली असून अनेक संकरित जाती निर्माण केल्या आहेत. आज भारत या क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे. अनेक प्रकारची कडधान्ये आणि फळफळावळ यांच्या उत्पादनात भारताने आश्चर्य वाटेल अशी प्रगती केली आहे.

**२) दूध व दुग्धजन्य पदार्थ :-**

भारतामध्ये लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत दूध हे आहारातील मुख्य अन्न आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या गेल्या सात दशकांमध्ये दुधाच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली आहे. डॉ. वर्गिस कुरियन (Dr. Verghese Kurien) यांनी सुरू केलेल्या देशातील पहिल्या श्वेतक्रांतीनंतर, म्हणजेच १९७० पासून ते आजपावेतो या क्षेत्रात प्रचंड वृद्धी झालेली आहे. यामध्ये ‘ राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ ’ आणि ‘ इंडियन डेअरी असोसिएशन ’ यांचे योगदानही महत्त्वाचे आहे. दुग्धोत्पादन क्षेत्रात भारत जगातील प्रथम क्रमांकाचा देश बनला आहे. अमूल, वारणा, चितळे हे दूध व दुग्धजन्य पदार्थ यांचेबाबतीत जागतिक ओळख (brand) बनले आहेत. यामागे या कंपन्यांनी धरलेली विज्ञानाची कास महत्त्वाची आहे. गाई-म्हशींना पौष्टिक खाद्य पुरविणे, दूध काढणे, त्याची साठवण, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन हे सर्व वैज्ञानिक पद्धतीने केले जाते.

**३) दळणवळण :-**

एक काळ असा होता, जेव्हा माणूस काशीयात्रेला जातोय म्हटलं की तो दोन चार वर्षे तरी परत येणार नाही, अशी धारणा असायची. एका गावाहून दुसऱ्या गावाला जायचं म्हटलं, तर घोडा, बैलगाडी अशी साधने असायची. रस्ता डोंगरदऱ्यांतून जात असे. त्यामुळे उपवर मुलीला शक्यतो गावातच किंवा जवळच्या गावात दिली जायची. इंग्रजांनी त्यात थोडी सुधारणा केली. त्यांनी काही रस्ते, पूल वगैरे बांधले. काही भागांत रेल्वेमार्ग उभारले. स्वातंत्र्यानंतर दळणवळण क्षेत्रात प्रचंड वैज्ञानिक प्रगती झाली. हवाई वाहतूक, रेल्वे मार्ग, महामार्ग मोठ्या प्रमाणावर देशाच्या प्रगतीत योगदान देत आहेत. भारतामध्ये रेल्वेचे जाळे प्रचंड मोठ्या प्रमाणात उभारले गेले असून जगातील देशांचा विचार करता भारतीय रेल्वे ही क्रमांक एकचा रोजगारदाता आहे. आता जवळ जवळ प्रत्येक राज्याला ' वंदे भारत ' रेल्वे मिळाली आहे. तिचे उत्पादन पूर्णपणे देशांतर्गत झाले असून, ती परदेशांतून त्याचेसाठी आलेल्या निविदांपेक्षा बऱ्याच कमी किंमतीत व विक्रमी वेळेत बनवली गेली आहे. ती अत्यंत आरामदायी, वेगवान व सुरक्षित आहे. भारत आता बुलेट ट्रेनसारखे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याच्या तयारीत आहे.

एक काळ असा होता जेव्हा विमान प्रवास हे प्रत्येकाचे 'स्वप्न' असायचे. कारण एकतर विमानतळ गावाजवळ नसायचा आणि विमानप्रवास महागडा असायचा. आज बेंगलोरचा तरुण सकाळी घरून निघतो, कोल्हापूरला दुपारच्या लग्नाला हजर राहून संध्याकाळी परत बेंगलोरला घरी पोहोचतो. यामधून भारतातील विमान वाहतूकीची वैज्ञानिक प्रगती दिसून येते. आणि भारतीय विमान वाहतूक कंपन्यासुद्धा परस्परांशी स्पर्धा करून भारतीय नागरिकांना तत्पर सेवा देत आहेत.

महामार्ग या राष्ट्राच्या रक्तवाहिन्या आहेत, हे जसे अमेरिकेचे पूर्व राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांनी ओळखले, तसेच ते रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांनीसुद्धा ओळखले. त्यांनी महामार्ग सुधारणा आणि नवीन उत्तम दर्जाच्या महामार्ग उभारणीचा धडाकाच लावला. त्यामुळे हल्लीचे महामार्ग परदेशाच्या तोडीस तोड झाले आहेत. ते अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून तयार केले आहेत. त्यामुळे प्रवासाच्या वेळेत आमूलाग्र बचत होत आहे. वाहनांच्या देखभालीचा खर्च कमी झाला आहे. उदा. समृद्धी महामार्ग पूर्ण झाल्यावर मुंबईहून नागपूरला केवळ आठ तासात पोचता येईल. पूर्वी त्याला सोळा तास लागायचे. पूर्वी पुण्याहून मुंबईला कारने साडेतीन तास लागायचे आता एक्सप्रेस मार्गावरून आपण केवळ दोन तासात मुंबईला पोहोचू शकतो आणि तेपण पोटातील पाणीसुद्धा न हालता! !

**४) संदेशवहन:-**

प्राचीनकाळी निरोप पाठविण्यासाठी घोडेस्वार, सांडणीस्वार किंवा निरोप्या यांचा वापर व्हायचा.

इंग्रजांनी पोस्ट ऑफिसेस सुरु केल्यावर पोस्ट कार्ड, अंतर्देशीय पत्र वगैरेंचा वापर खुशाली कळविण्यासाठी तर टेलिफोन व टेलिग्राफ यांचा वापर महत्त्वाचे निरोप तत्काळ कळविण्यासाठी होऊ लागला. स्वातंत्र्योत्तर काळातसुद्धा ही पद्धत सुरू राहिली. पूर्वी फोन फक्त पोस्ट ऑफिस मध्ये असत. आपणास एखादी बातमी तत्काळ कळवायची असेल तर पोस्टात जावे लागे. नंतर पोस्टमास्तर फोन लावत. महत्प्रयासाने फोन लागे.

त्यात दोन तीन तास सहज जात असत. नव्वदच्या दशकाचा मध्य ते शेवट आपणाला गल्लोगल्ली STD, ISD, PCO असे काळ्या मोठया अक्षरात लिहिलेले पिवळ्या रंगाचे टेलिफोन बूथ दिसू लागले, ते दूरसंचार खात्यात झालेल्या वैज्ञानिक प्रगतीमुळे आणि त्यांनी राबविलेल्या 'connecting India' मोहिमेमुळे. त्यामुळे संदेशवहन सोपे झाले. एक रुपयात पुरेसा वेळ आपण संवाद साधू लागलो. त्यानंतरच्या दहा वर्षांत आला नोकियासारख्या मोबाईलचा काळ. त्यामुळे संबंधितांशी बोलणे आणखीन सोपे आणि तत्काळ होऊ लागले. त्यात निरोप लिहून तो पाठवायची सोयसुद्धा होती. पण बऱ्याच अंशी मोबाईल ही श्रीमंतांची मक्तेदारी होती, कारण एक तर मोबाईल महाग होते आणि आलेल्या कॉलसाठीही शुल्क आकारले जायचे. पुढच्या फक्त दहा वर्षांत आलेल्या दूरसंचार क्रांतीमुळे ( telecom revolution) मोबाईल स्वस्त झाले, मोबाईलवर बोलणे स्वस्त झाले आणि भारत ही मोबाईलसाठीची सर्वांत मोठी बाजारपेठ म्हणून उदयाला आली. जवळ जवळ प्रत्येक माणसाकडे मोबाईल दिसू लागला. त्यानंतर आलेल्या स्मार्ट फोन व इंटरनेट युगामुळे फोन कॉल करणे, व्हॉट्स ऍप सारख्या ऍपवर निरोप लिहिणे, जगभरात कुठेही बोलणे, व्हिडीओ कॉलिंग आदींमुळे जग खूपच जवळ आले आहे.

**५) अंतराळ क्षेत्र :-**

स्वतंत्र भारतामध्ये अंतराळ क्षेत्रातील प्रगतीची मुहूर्तमेढ डॉक्टर विक्रम साराभाई यांनी रोवली. ‘ मिसाईल मॅन ‘ म्हणून ओळखले जाणारे माजी राष्ट्रपती महान शास्त्रज्ञ भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचे या क्षेत्रात मोठे योगदान आहे. १९६२ साली अंतराळ संशोधनासाठी भारत सरकारने अंतराळ संशोधन समितीची (Indian National Committee for Space Research - INCISPAR) स्थापना केली तिचे कार्यक्षेत्र वाढवून १५ ऑगस्ट १९६९ रोजी तिचे नाव ‘ भारतीय अंतराळ संशोधन संस्था ‘ (Indian Space Research Organization- ISRO)असे करण्यात आले. सुरुवातीच्या काळात अग्निबाणाचे प्रक्षेपण करण्यासाठी त्याचे भाग बैलगाडीवरून प्रक्षेपण तळावर आणण्यात आले होते. तेथून सुरुवात करून आज भारत अंतराळ विज्ञानातील एक महासत्ता बनली आहे.

• १९ एप्रिल १९७५ रोजी भारताने सोवियत संघाच्या सहकार्याने आपला ‘आर्यभट्ट’ नावाचा पहिला उपग्रह पृथ्वीच्या कक्षेत स्थापित केला.

• १९८० साली पूर्णपणे स्वदेशी बनावटीच्या तंत्रज्ञानावर आधारित SLV-3 प्रक्षेपकाद्वारे ‘ रोहिणी ’ हा पहिला उपग्रह अवकाशात सोडण्यात आला.

• २२ ऑक्टोबर २००८ रोजी भारताची ‘चंद्रयान-१’ मोहीम यशस्वीरीत्या पार पडली.

• ‘मार्स ऑर्बिटर मिशन (MOM)’ ने २४ सप्टेंबर २०१४ रोजी यशस्वीरीत्या मंगळ ग्रहाच्या कक्षेत प्रवेश केला आणि भारत पहिल्याच प्रयत्नात आणि खूप कमी खर्चात मंगळ ग्रहाच्या कक्षेत यशस्वीपणे पोहोचणारा पहिला देश ठरला.

आता चंद्रयान -३ व सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आदित्य एल-१ या मोहिमा प्रगतीपथावर आहेत. पुढील वर्षी ‘ गगनयान ‘ मोहिमेद्वारे भारतीय अंतराळवीर अवकाशातून पृथ्वी प्रदक्षिणा करणार आहेत. विविध

प्रकारची अवकाशयाने निर्माण करण्याची क्षमता भारताकडे आहे. भारताने जवळजवळ ७० देशांचे उपग्रह अवकाशामध्ये प्रस्थापित केले आहेत. इस्रोने आजपर्यंत बऱ्याच अंतराळ-यंत्रणा विकसित केल्या असून, सर्वात महत्त्वाच्या 'INSAT' प्रणालीचा (भारतीय राष्ट्रीय उपग्रह यंत्रणा) उपयोग मुख्यतः दूरसंचार, दूरदर्शन प्रसारण, हवामानशास्त्र व नैसर्गिक आपत्तीबाबत पूर्व सूचना देण्यासाठी होतो. हवामान अंदाज यंत्रणा, संदेशवहनयंत्रणा, उपग्रहाद्वारे केले जाणारे दिक् चलन (navigation), यांमध्ये भारत विकसित देशांशी स्पर्धा करीत आहे.

**६) खगोलशास्त्र :-**

प्राचीन काळापासून भारताला खगोलशास्त्राची अभिमानास्पद परंपरा आहे. आर्यभट्ट ते भास्कराचार्य

(दुसरे), म्हणजे इ. स. ४७६ ते इ. स. ११७६ हा सुमारे सात शतकांचा काळ भारतीय खगोल शास्त्राचा सुवर्णकाळ होता. खगोल शास्त्रातील अनेक शोध या काळात लागले. आर्यभट्ट हे पहिले खगोलशास्त्रज्ञ होते, ज्यांनी इसवीसनाच्या पाचव्या शतकातच पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे दाखवून दिले होते. भास्कराचार्यांनी पृथ्वी गोल आहे व त्याला चुंबकीय क्षेत्र आहे हे दाखवून दिले. आपल्या खगोलशास्त्रज्ञांना विविध ग्रहांची सूर्यापासूनची अंतरे, पृथ्वीचा परीघ, सूर्यप्रकाश हा सात रंगांचा मिळून बनला आहे, ग्रहणे का होतात आदि गोष्टींचे सखोल ज्ञान होते.

स्वातंत्र्यानंतर डॉ जयंत नारळीकर, डॉ गोविंद स्वरूप अशा महान शास्त्रज्ञांनी खगोलशास्त्राची ही परंपरा पुढे नेली. खगोलशास्त्राच्या अभ्यासासाठी स्वातंत्र्यानंतरच्या काळात अनेक संस्थांची स्थापना करण्यात आली. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे :

अ) राष्ट्रीय रेडिओ खगोलभौतिकी केंद्र (National Centre for Radio Astrophysics (NCRA) ही रेडिओ खगोलभौतिकीच्या क्षेत्रातील एक अग्रगण्य संशोधन संस्था आहे. ही संस्था टाटा मूलभूत संशोधन संस्थेचा (टिआयएफआर) एक भाग आहे. याची स्थापना १९६० साली डॉ गोविंद स्वरूप यांचेद्वारे करण्यात आली. एनसीआरए मध्ये खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी यामधील अनेक विषयांवर संशोधन होते, ज्यामध्ये सक्रिय दीर्घिका, आंतरतारकीय माध्यम, पल्सार, विश्वनिर्मितीशास्त्र आणि विषेशत: रेडिओ खगोलशास्त्र आणि रेडिओ उपकरणशास्त्र यांचा समावेश आहे. NCRA ने डॉ. गोविंदस्वरूप यांच्या नेतृत्वाखाली १९७० साली उटी येथील रेडिओ दुर्बीण आणि २००० साली खोडद येथील जीएमआरटी या रेडिओ दुर्बिणी बांधल्या.

जगातील सगळ्यात मोठी रेडिओ दुर्बीण अशी ओळख असलेला 'जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप' (GMRT) हा महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर तालुक्यातील खोडद येथील तीस दुर्बिणींच्या समूह आहे. त्या अहोरात्र अवकाशस्थ घडामोडींचा आढावा रेडिओ तरंगलहरींद्वारे घेत असतात. खोडद येथील दुर्बीणीच्या मदतीने २०१५ साली एका महाकाय दुर्मिळ दीर्घिकेचा शोध लावण्यात आला. पृथ्वीपासून सुमारे ९ अब्ज प्रकाशवर्षे दूर असणाऱ्या या दीर्घिकेतून होणाऱ्या रेडिओ लहरींच्या उत्सर्जनांचाही या निमित्तानेच वेध घेण्यात आला आहे. या दुर्बिणीने गोळा केलेल्या माहितीच्या आधारे खगोलवैज्ञानिकांनी २०१७ साली विश्वातील दोन महत्त्वाच्या चमत्कारिक खगोलीय घटनांचा शोध लावला आहे. त्यात दोन जास्त वस्तुमानाची कृष्णविवरे व पृथ्वीपासून दोन अब्ज प्रकाशवर्षे दूर असलेल्या महाकाय दीर्घिकांची टक्कर यांचा समावेश आहे. 'एबेल:२२५६'

आकाशगंगा समूहाची तपशीलवार प्रतिमा टिपण्यात जीएमआरटीला या वर्षी जानेवारी महिन्यात यश मिळाले आहे. यावर्षीच २९ जून रोजी 'गुरूत्वीय लहरींच्या वैश्विक पार्श्वभूमीचा शोध' या महत्त्वपूर्ण संशोधनात GMRT चा सिंहाचा वाटा आहे.

ब) भारतीय खगोलभौतिकी संस्था (Indian Institute of Astrophysics - IIA) - ही भारतातील बंगलोर येथील महत्त्वाची राष्ट्रीय संशोधन संस्था आहे. येथे प्रामुख्याने खगोलशास्त्र, खगोलभौतिकी व त्याच्याशी संबंधित विषयांवर संशोधन होते. आयआयएला देशातील सर्वोत्तम संशोधन संस्था म्हणून ओळखले जाते.

स) आयुका (IUCAA - Inter University Centre for Astronomy and Astrophysics) या संस्थेमध्ये प्रामुख्याने खगोलशास्त्र, खगोलभौतिकी आणि सैद्धांतिक भौतिकी या विषयांवर संशोधन केले जाते. नियोजन आयोगाचे प्रा. यशपाल यांनी, देशामध्ये खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकीसाठी संयुक्त सुविधा असली पाहिजे, असा प्रस्ताव मांडला. यावर काम करून खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी अजित केंभावी आणि नरेश दधिच यांच्यासोबत १९८८ मध्ये आयुकाची स्थापना केली. डॉ. जयंत नारळीकर हे या संस्थेचे पहिले संचालक होते.

२८ सप्टेंबर २०१५ रोजी इस्रोने 'अस्ट्रोसॅट ' ही अंतरीक्ष वेधशाळा अंतराळात प्रस्थापित केली. एकाच वेळी क्ष, दृश्य आणि अतिनील किरणांच्या वर्णपटात खगोलीय स्त्रोतांचे निरीक्षण करणारी ही मोहीम आहे. हा उपग्रह अवकाशस्थ गोलकांविषयी अमूल्य अशी माहिती पाठवीत आहे. या वेधशाळेच्या रचनेत IUCAAचा सिंहाचा वाटा आहे.

गुरुत्व लहरींचा शोध घेणारी 'LIGO' सारखी वेधशाळा भारतात उभी करण्यासाठी 'LIGO - India' प्रकल्पाची उभारणी महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांपासून वेगाने सुरू आहे. 'LIGO - India' प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर त्याद्वारे अनेक मोठे संशोधन कार्यक्रम सुरू करण्याची भारताची योजना आहे. या प्रकल्पात देखील आयुका सहभागी आहे.

**७) संरक्षण क्षेत्र :-**

विज्ञानाचे भारताच्या संरक्षण क्षेत्रामध्ये प्रचंड योगदान आहे. १९७४ या वर्षी भारताने पोखरण या ठिकाणी अणुस्फोट करून निवडक अण्वस्त्रधारी देशांमध्ये स्थान मिळवले. डीआरडीओने क्षेपणास्त्र निर्मितीमध्ये प्रचंड प्रगती करून आंतरखंडीय क्षेपणास्त्रांची निर्मिती केली आहे. अग्नी, पृथ्वी-१, त्रिशूल आदि क्षेपणास्त्रे शत्रूच्या गोटात धडकी भरवत आहेत.

भारताचे हवाई दल हे जगातील चौथ्या क्रमांकाचे मोठे हवाईदल आहे. भारताच्या हवाई दलामध्ये राफेल, सुखोई, मिग, सारस यासारखी अत्याधुनिक लढाऊ विमाने आहेत. भारताने 'अग्नीवीर' सारखे सैन्यदल उभारले आहे. फायर पॉवर रँकिंगच्या अहवालानुसार जगामध्ये १३३ देशांपैकी भारताचे सैन्यदल चौथ्या क्रमांकावर आहे.

भारताचे नौदल अतिशय प्रभावी असून दक्षिण आशियातील ते पहिल्या क्रमांकाचे नौदल आहे. नौदलामध्ये अनेक मोठमोठी लढाऊ जहाजे आणि अण्वस्त्रधारी पाणबुड्या भारताकडे आहेत. भारताच्या नौदल प्रगतीचा धसका चीनसारखे देशसुद्‌धा घेतात. सर्वच प्रकारच्या अत्याधुनिक सुविधांनी आज भारताचे नौदल, वायुदल आणि भूदल सुसज्ज आहे.

**८) माहिती तंत्रज्ञान :-**

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञान आणि डिजिटल क्रांतीचे शतक आहे. भारताने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अनेक प्रकारचे विक्रम प्रस्थापित केले आहेत. परम महासंगणक हा सुपर कॉम्प्युटर मोठ्या मोठ्या महासत्तांची मक्तेदारी असूनही आपण निर्माण केला. सुपर कॉम्प्युटर तयार करणारा भारत हा जगातील तिसरा देश ठरला. आज भारतात शिकलेले, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील शास्त्रज्ञ प्रगत देशांमध्येसुद्‌धा मोलाची कामगिरी बजावत आहेत. उदाहरण म्हणून गुगलचे सीईओ सुंदर पिचाई, मायक्रोसॉफ्टचे सत्या नडेला यांची नावे घेता येतील.

सुपर कॉम्प्युटर, क्वाॅन्टम कॉम्प्युटर, फाईव्ह जी नेटवर्क, इ गव्हर्नन्स, डिजिटल अर्थव्यवस्था, शैक्षणिक क्षेत्रात डिजिटल क्रांती, डिजिटल बँकिंग या सर्व क्षेत्रात भारताने नेत्रदीपक प्रगती केली आहे.

भारताची आयटी क्षेत्रातील प्रगती निश्चितच जगासाठी दिशादर्शक आहे. विप्रो, टीसीएस, इन्फोसिस, टेक महिन्द्रा यासारख्या औद्‌योगिक क्षेत्रातील आयटी कंपन्या जगातील आयटी क्षेत्रावर आपला प्रभाव टाकत आहेत. आयटी क्षेत्रामध्ये भारतात प्रचंड रोजगार निर्मिती झालेली आहे. आऊटसोर्सिंग करून भारतीय प्रगत देशांच्या प्रगतीमध्ये वाटा उचलत आहेत.

आज भारतातला सामान्यातला सामान्य माणूसही जी पे, पे. टी. एम. सर्रास वापरतो. कोरोना काळात शाळा बंद होत्या; पण शिक्षक ऑनलाईन शिकवीत होते व विद्‌यार्थीही सहजपणे ऑनलाइन शिकत होते. कोरोना काळात लस घेतल्यावर ताबडतोब आपणास लसीकरण झालेले प्रमाणपत्र मिळत होते. त्याच काळात युरोप, अमेरिकादी प्रगत देशांत डॉक्टर्स हाताने भरलेले प्रमाणपत्र वितरीत करत होते. लाईनमध्ये उभे राहणे हे आता कालबाह्य झाले आहे. आज अगदी वयस्क नागरिकही वीज बिले, इन्शुरन्स प्रीमियम घरबसल्या ऑनलाईन भरताना दिसतात. बस, रेल्वे यांचे रिझर्वेशन असो; सिनेमा, हॉटेल्स यांचे बुकिंग असो किंवा रिक्षा, टॅक्सी मागविणे असो, हे सर्व व्यवहार आता सर्वसामान्य नागरिकही मोबाईलच्या सहाय्याने सर्रासपणे करतांना दिसतात.

**९) वैद्‌यक क्षेत्रातील भारताचे यश:-**

प्राचीन काळापासून भारत वैद्‌यकशास्त्रामध्ये मोठी प्रगती करीत आहे. स्वातंत्र्योत्तर काळामध्येही विज्ञानाच्या सहाय्याने भारताने वैद्‌यक क्षेत्रात मोठी कामगिरी बजावली आहे. अनेक वैद्‌यकीय महाविद्‌यालये भारतीयांना आज वैद्‌यकीय क्षेत्रातील ज्ञान देत आहेत. भारतीय डॉक्टर जगातील सर्व देशात उत्तम कामगिरी बजावत आहेत. जगातील प्रगत देशांचा विचार करता भारतातील वैद्‌यकसेवा अतिशय स्वस्त असून सर्वसामान्यांना परवडणारी आहे. सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया भारतामध्ये आज होतात. त्या सुद्‌धा अगदी परवडणाऱ्या दरात.

पोलिओ, देवी, पिवळा ताप यासारख्या रोगांचे उच्चाटन भारताने यशस्वीरीत्या केले आहे. एम्ससारख्या हॉस्पिटलची निर्मिती करून वैद्यकक्षेत्रात भारत उत्तम कामगिरी बजावत आहे. भारताचा वैद्यकीय क्षेत्रातील वाढीचा दर १८% आहे. विविध प्रकारच्या लसींची निर्मिती भारतात मोठ्या प्रमाणावर होते. अनेक देश भारताच्या औषध निर्मितीवर अवलंबून असतात. कोरोना काळामध्ये याची प्रचिती जगाला आलेली आहे. भारताने तयार केलेली कोविशिल्ड आणि कोवॅक्सिन ही कोरोनावरील लस जगभरात निर्यात केली गेली. इतर प्रगत देशातील कोरोना लसींपेक्षा भारतीय कोविशिल्ड आणि कोवॅक्सिन या लसी अधिक चांगल्या रीतीने प्रभावी ठरल्या आहेत.

**१०) वस्त्रोद्योग :-**

भारतातील वस्त्रोद्योगाचा इतिहास इसवी सन पूर्व १५०० इतका जुना आहे. भारतात विणलेली वस्त्रे इतकी तलम असत की ती घडी करून काड्यापेटीमध्ये सुद्धा ठेवता येत असत, असे म्हणतात. यातील अतिशयोक्तीचा भाग सोडला तरी, इंग्रज येण्यापूर्वी इथला वस्त्रोद्योग भरभराटीला आला होता व विविध देशात भारतीय वस्त्रांची निर्यात होत असे. इंग्रज आल्यानंतर त्यांनी इथून कापूस इंग्लंडला न्यायला सुरुवात केली व तेथील गिरण्यांमधून तयार केलेली वस्त्रे इकडे आणायला सुरुवात केली. त्यामुळे या उद्योगाचे कंबरडे मोडले. स्वातंत्र्यानंतर सरकारने वस्त्रोद्योगाला मोठी चालना दिली. त्यामुळे मुंबई व परिसरात असणाऱ्या कापड गिरण्या जोमाने काम करू लागल्या. त्यात कामगार म्हणून आजूबाजूच्या परिसरातून, खास करून कोकणातून अनेक लोक मुंबईला आले. त्यामुळे एक समांतर ग्रामीण अर्थव्यवस्था उदयाला आली. १९८२ च्या ऐतिहासिक संपानंतर मुंबईतील वस्त्रोद्योगाची वाताहात झाली, पण तो इतरत्र फोफावला. हातमागाच्या जागी यंत्रमाग(power looms) आले व कमी कर्मचाऱ्यांत जास्त उत्पादन निघू लागले. आज भारत हा जगात दुसऱ्या क्रमांकाचा कापूस उत्पादक देश आहे. एकूण औद्योगिक कामगारांपैकी २०% पेक्षा जास्त कामगार वस्त्रोद्योग व्यवसायात आहेत. देशात अंदाजे १८८ सार्वजनिक क्षेत्रातील व २३८४ खाजगी क्षेत्रातील कापड गिरण्या आहेत. जागतिक परिधान (wearables) निर्यातीमधला ५१% वाटा भारताचा आहे. सरकार देखील SAMARTH (वस्त्र क्षेत्रातील क्षमता वाढवण्याची योजना), ATUFS (सुधारित तंत्रज्ञान अपग्रेशन फंड योजना), टेक्स्टाईल पार्कस्, आदींद्वारा या उद्योगास भरीव मदत करत आहे.

**११) विद्युत निर्मिती आणि वितरण:-**

भारताने विद्युत निर्मिती क्षेत्रात चमकदार कामगिरी केली आहे. भारतातील सर्वच खेड्यांमध्ये आज वीज पोहोचली आहे. विज्ञानाच्या सहाय्याने तंत्रज्ञांनी अनेक मोठमोठी धरणे बांधून जलविद्युत प्रकल्प राबवले, तसेच अणुविद्युत, सौरऊर्जा, पवनऊर्जा या क्षेत्रात भरीव कामगिरी करून भारताला विद्युतनिर्मितीमध्ये स्वयंपूर्ण बनवले आहे. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सर्वदूर विजेचे वितरण केले आहे. विद्युतनिर्मिती व वितरणामुळे औद्योगिक व शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुधारणा होऊन देश प्रगतीपथावर घोडदौड करीत आहे.

**सारांश...**

स्वातंत्र्योत्तर ७५ वर्षांच्या कालखंडामध्ये भारत जगातील एक महत्त्वाची वैज्ञानिक महासत्ता बनला आहे. विविध क्षेत्रात भारतीयांनी वैज्ञानिक प्रगतीच्या जोरावर आपला ठसा उमटविला आहे. ही वैज्ञानिक प्रगती म्हणजे भारतासाठी येणाऱ्या सुवर्णयुगाची नांदी आहे. भारताची ७५ वर्षातील वैज्ञानिक प्रगती ही परकीयावर अवलंबून न राहता बरीचशी स्वयंसिद्ध आहे. भारताच्या या वैज्ञानिक प्रगतीने जगभरातील प्रगत देशांचे डोळे दिपले आहेत. प्रगत देशांनी आणि भारताच्या हितशत्रूंनी अनेकदा यामध्ये अडथळे आणले. तरीही भारताने आपली वैज्ञानिक ध्येये गाठताना आपला स्वाभिमान जपला. आज भारत क्रायोजनिक इंजिन, सुपर कॉम्प्युटर त्याचप्रमाणे उपग्रह प्रक्षेपण व दळणवळण या क्षेत्रात स्वावलंबी आहे.

सर्वच स्तरावर झालेली भारताची वैज्ञानिक प्रगती स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षामध्ये अचंबित करणारी असली तरी अजूनही देशाला अनेक क्षेत्रे खुणावत आहेत. 'एक भारत श्रेष्ठ भारत' ही घोषणा भारताला निश्चितच जगातील सर्वच क्षेत्रांतील प्रगतीचा उच्चांक गाठण्यास मदत करेल. चौदाशे वर्षांपूर्वी जगातील सर्वात श्रीमंत आणि प्रगत असणारा आपला भारत निश्चितच ते स्थान आता पुन्हा पटकावेल, यामध्ये मला अजिबात शंका वाटत नाही.

श्री राजीव गजानन पुजारी - विश्रामबाग, सांगली मो - 9527547629 rgpujari@gmail. com



## कविता - मी कुठे लिहीतो आहे कविता? - श्री सुहास रघुनाथ पंडित



मी कुठे लिहीतो आहे कविता?
ती तर फुलते आहे
रानावनातून, पानाफुलातून
फुलांनी आपसूकच फुलावी तशी!
टपटपावीत फुलं प्राजक्ताची अंगणात
तसे टपटपताहेत
कविच्या मनात शब्द
अम्लान सौंदर्याचा आस्वाद घेत
कवीही होतो आहे नि:शब्द!
अन्
रुप, रंग, रस, गंध
यांच्याही पलिकडचा शोधतो आहे भावार्थ !
शब्दात न बसणारं
कुंचल्यात न मावणारं
महाकाव्य लिहिणारा 'तो' महाकवी
टाकतो दान माझ्या झोळीत
प्रतिभेचं,
तेव्हा कुठे चार शब्द
उतरतात माझ्या लेखणीतून
आणि जन्म घेते एक कविता
मग सांगा ना,
मी कुठे लिहीतो आहे कविता?
मी कुठे लिहीतो आहे कविता?

**श्री सुहास रघुनाथ पंडित** - सांगली मो. 9421225491

## कथा - मृत्युंजयाचे उपासक - सुनील देशपांडे



डॉ. भाऊसाहेब आणि डॉ. संजय विमनस्कपणे हॉस्पिटलच्या दारातून बाहेर पडणाऱ्या शववाहिनीकडे पाहत होते. आजपर्यंत त्यांनी अनेक प्रकारची काऊन्सेलिंग केली. अनेक अवयवदाने, नेत्रदाने, त्वचादाने यांची यशस्वी अंमलबजावणी करून अनेकांना जीवनदान दिले. परंतु आजच्यासारखा उर्मट पेशंट पूर्वी कधी भेटला नव्हता. खरंतर बाळासाहेब हा भाऊसाहेबांचा मित्र आणि दूरचा नातेवाईक सुद्धा. अचानक छातीत दुखू लागल्यामुळे नातेवाईकांनी त्याला दवाखान्यात ॲडमिट केले. उपचार चालू असतानाच एक झटका येऊन हृदयक्रिया बंद पडली. तोपर्यंत बाळासाहेबांचा भाऊ प्रताप आलेलाच होता. त्याचा मृत्यू झाल्याचे संबंधित डॉक्टरांनी जाहीर केले. एकच हलकल्लोळ माजला. अनेकांचे चुकचुकणे, खरेखोटे रडणे, दुःखातिरेकाने ओरडणे या सगळ्या गोष्टी चालू होत्या. बराच वेळ झाल्यानंतर शववाहिका बोलावण्यात आली होती. बाकी सर्व कागदपत्रे बनत असतानाच नेहमीप्रमाणे डॉक्टरांनी हळूच प्रतापकडे नेत्रदान व त्वचादानाचा विषय काढला. अचानक प्रतापकडून अनपेक्षित प्रतिक्रिया मिळाली.” तू माझ्या दादाचा मित्र आहेस आणि डॉक्टर आहेस म्हणून मी स्वतःला सावरतो आहे, नाहीतर मी तुला झोडपूनच काढला असता. वेळ प्रसंग काय आणि तू तुझं मार्केटिंग करतोयस? लाज वाटायला पाहिजे तुला................." आणि अनेक असभ्य आणि गलिच्छ. भाषेमध्ये बराच आरडाओरडा करत तो बाहेर पडला.

**

बाळासाहेबांचा गंध मुक्ती कार्यक्रम आटोपला आणि काही नातेवाईक निघून गेले. काही बाळासाहेबांच्या बंगल्यावरच प्रतापसह आले. तो दिवस घरामध्ये शांत आणि शोकाकुल वातावरणातच गेला. दुसऱ्या दिवशी प्रतापचा मुलगा विजय, अतिशय हुशार, बारावीला सीईटी मध्ये चांगल्या मार्कांनी पास झाल्याचा व त्याचा मेडिकलचा प्रवेश निश्चित झाल्याचा रिझल्ट आला. परिस्थिती अशी की त्याचा आनंद व्यक्त करता येईना. सगळ्यांचीच घुसमट. प्रतापच्या पत्नीने मीनाने हळूच बाजूला घेऊन सांगितले”अहो, आज आपण आपल्या फ्लॅटवर परत जाऊ. पेढे वगैरे काही वाटता येणार नाहीतच, पण निदान विजयच्या आवडीचे काहीतरी गोडधोड करून घालावे आणि घरच्या घरी काही क्षण आनंदाचे घालवावेत असे वाटते.” प्रतापलाही पटले. काहीतरी महत्त्वाचे कामाचे कारण सांगून ते तिघेही पुन्हा फ्लॅटवर राहायला जातो, असे सांगून बाहेर पडले.”तसे आम्ही येऊन जाऊन असणारच.” असे घरात सगळ्यांना सांगून ते तिघे फ्लॅटवर परतले.

**

‘मेडिकलला ॲडमिशन मिळाली तर नवा आयफोन घेऊन देईन, ’ असे प्रतापने विजयला कबूल केले होते. त्यामुळे सकाळी प्रतापने विचार केला की विजयला बरोबर घेऊन जाऊ, त्याला नवीन आयफोन घेऊन देऊ

आणि पत्नीच्या सांगण्याप्रमाणे आवश्यक त्या गोष्टी खरेदी करून परत येऊ. गाडी वॉचमनला पुसायला सांगितली आणि विजयला गाडीत परफ्युम मारायला सांगितलं.

प्रताप बाळासाहेबांच्या मृत्यूच्या दिवशी कंपनीच्या बसने डायरेक्ट हॉस्पिटलमध्येच उतरला होता. त्यानंतर बाळासाहेबांची गाडी घेऊन आठ दहा दिवस फिरणं झालं होतं. त्यामुळे पंधरा-वीस दिवस गाडी, बाहेर निघालीच नव्हती. गाडी स्वच्छ धुतल्यावर प्रतापने विजयला परफ्युमची नवीकोरी बाटली देऊन गाडीच्या आत व्यवस्थित परफ्युम मारुन घ्यायला सांगितला होता. ब्रेकफास्ट आणि चहा झाल्यावर दोघेजण खाली आले गाडीमध्ये बसून गाडी स्टार्ट करताच मोठा आवाज झाला आणि गाडीने आग पकडली.

आवाज ऐकताच बिल्डींगमधील बरेच जण पार्किंगमध्ये आले. ताबडतोब त्यांनी दोघांना अर्धवट भाजलेल्या स्थितीत बाहेर काढले. गाडीला अनपेक्षितपणे आग लागल्यामुळे प्रतापला काय करावे समजत नव्हते. त्यात एकदमच आगीने भाजल्यामुळे तो गोंधळून गेला आणि त्यातच दोघेही आतल्या आत घुसमटून बेशुद्ध झाले आणि भाजलेही गेले होते. दोघांनाही ताबडतोब हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले.

**

डॉक्टर भाऊसाहेबांना ही बातमी समजताच ताबडतोब ते हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. एवढ्या मोठ्या प्रमाणात भाजल्यानंतर निश्चित जीव वाचवण्याचा उपाय म्हणून त्वचारोपण हाच प्रभावी जीवरक्षक उपाय असतो. डॉ. भाऊसाहेब व डॉ. नेहेते यांच्या प्रयत्नातून आणि रोटरीच्या सहाय्याने नाशिकमध्ये त्वचा बँकेची स्थापना करण्यात आली होतीच. भाऊसाहेबांनी ताबडतोब डॉ. नेहेते यांना फोन केला. डॉ. नेहेते त्वचा घेऊन आले. परंतु ती त्वचा फक्त एका व्यक्तीलाच पुरण्यासारखी होती. त्यांनी भाऊसाहेबांना सांगितले, मुंबई आणि पुण्यालाही त्वचा उपलब्ध नाही. कारण नुकतीच मुंबईमध्ये एका इमारतीला आग लागल्यामुळे अनेक लोक होरपळून गेले होते. त्यामुळे पुण्या-मुंबईतल्या स्किनबॅन्केतील सगळी त्वचा संपून गेली होती. प्रश्न असा पडला की एकाच व्यक्तीसाठी स्किन वापरता येईल. सर्व नातेवाईकांनी आणि डॉक्टरांनी विचारविनिमय करून स्क्रीन त्वचारोपण विजयवर करायचे ठरवले आणि त्वरित दोघांवरही उपचार चालू केले.

**

एका महिन्यातच विजय बरा झाला. हळूहळू त्याचं जीवन रुटीनला येऊ लागलं. प्रतापराव मात्र त्या हॉस्पिटलमध्ये तळमळ तळमळ करत दिवस काढत होते. त्वचारोपण न झाल्यामुळे त्यांच्यावर उपचार करणे अत्यंत अवघड आणि क्लेशदायक होतं. रोज विजय आणि प्रतापच्या पत्नी मीनाताई दवाखान्यात येऊन जात असत आणि प्रतापरावांची तडफड, तगमग, तळमळ त्यांच्याने बघवत नसे. त्यातच चार महिने अजूनही निघून गेले. एके दिवशी ट्रीटमेंट चालू असतानाच प्रतापरावांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

**

दोनच दिवसांनी विजय डॉ. भाऊसाहेबांना भेटायला आला.

अक्षरशः हमसून हमसून रडत होता. भाऊसाहेब त्याला थोपटत त्याची समजूत काढत होते. काही वेळाने रडणं थांबवून धीर करून विजय भाऊसाहेबांना म्हणाला,

"काका, सगळ्यात मला जास्त वाईट वाटतं, ते म्हणजे दादाकाकांच्या मृत्यूनंतर बाबा तुम्हाला हॉस्पिटल मध्ये जे बोलले त्याचं. इतर लोकांकडून ते मला कालच समजलं. तरीसुद्धा तुम्ही काहीही जाणवू न देता उपचारांसाठी धावपळ करून आमच्यावर फार मोठे उपकार केले आहेत. खरं म्हणजे त्या दिवशी जर दादाकाकाचं त्वचादान झालं असतं, तर आज बाबांचा मृत्यू झाला नसता."

"विजय, वाईट वाटून घेऊ नकोस. ज्या गोष्टी घडून गेल्या त्या गेल्या. आमच्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांना असा अनुभव पहिला थोडाच आहे? याआधीही असे अनेक अनुभव आले आहेत. असे अनुभव येऊनसुद्धा शांत रहायचं आणि माणुसकीच्या कारणासाठी जागृत राहायचं हे आम्ही शिकलो आहोत. तुला जर हे पटतंय, तर तूसुद्धा या कार्यामध्ये आम्हाला सामील होऊ शकतोस. तू डॉक्टर झाल्यानंतर आपण सर्व मिळून या अवयवदानाच्या चळवळीमध्ये आपल्या शहरात एक चांगला इतिहास घडवू. अनेकांचे प्रबोधन करून जास्तीत जास्त लोकांना मृत्यूच्या सीमारेषेवरून परत जीवनात आणण्याचा प्रयत्न करू. आपण मृत्युंजयाचे खरे उपासक बनूया!

"होय, काका मी तुमच्या बरोबरच आहे. डॉक्टर झाल्यावर मी तुमच्या या कार्यासाठीच केव्हाही तयार असेन याची खात्री देतो."

**श्री सुनील देशपांडे** - मो- ९६५७७०९६४०



## लेख - पेस्तनजी घड्याळजीवाला.. - श्री नंदकुमार पंडित वडेर





गिरणगावातली ती दुमजली चाळ.. त्या चाळीचा पुढचा तळमजल्याचा भाग विविध प्रकारच्या दुकानांनी व्यापलेला.. त्यात पेस्तनजी घड्याळजीवालाचे घड्याळदुरुतीचे छोटे दुकान.. इमारतीच्या जिन्याखाली.. चिंचोळ्या नि निमुळत्या जागेत... दर्शनी आडवे टेबल.. टेबलाला चिकटून फिरती काळी मोठया पाठीची खुर्ची... एका भिंतीवर शंभर व्होल्टचा तळपता सूर्य... टेबलावर एका कडेला सतत कुरकुरत नाही नाही म्हणून तीनशेसाठ कोनात वाऱ्यानेच फिरणारा लोकल कंपनीचा पंखा... साडेपाच फुटाचा काटकुळा, गोरा, नाकावर गांधीचष्मा, अंगावर बावाजीचे पांढरे शुभ्र डगले, त्याखाली काळी पाटलून, पायात इराणी जोडे.. डोक्यावर काळी उभी टोपी... असा जामानिमा परिधान केलेला उजव्या हाताची तर्जनी ने नाकावरून खाली घसरणारा पंतोजी चष्मा सतत वर ढकलण्यात गुंतलेली... पेस्तनजी असामी सकाळी नवाच्या ठोक्याला दुकान उघडी.. चार फळकुटाचे दार घड्या घालून बाजूला सारले कि पेस्तनजी बरोबर आलेली त्याची ती गोरीगोमटी गोलमटोल धर्मपत्नी आधी दुकानात शिरुन छोट्या स्टुलावर स्थानापन्न होई.. चिरमुऱ्याच्या पोत्याला नऊवारी लुगडयाने बांधून ठेवावे तसे दिसणारे तिचे ध्यान.. अजगराने माणसाला गिळंकृत केल्यावर जसे रवंथ करत निपचित पडून राहतो.. अगदी तसचं ती पेस्तनजीची बायको त्या स्टुलावर एकदाची बसली कि रात्री दुकान बंद करेपर्यंत अगदी तशीच दिसे.. पेस्तनजीला त्याच्या आयुष्यात या बाईने भंडावून सोडले होते.. तो शांत तर ही संतापी.. तो दयाळू तर ही कंजुष... तो प्रेमळ तर ही खवीस... असो.. असतात काहींच्या बाबतीत लिहिलेल्या अजोड नि विजोड जोड्या.. आता ब्रह्मदेव कुठे कुठे म्हणून मनुष्य स्वभावातील समानता शोधत फिरत बघणार... त्याला का तेव्हढेच काम असेल.. आणि हो. या बयेने का कमी खाल्ले असेल त्याचे डोके... मग त्यानेदेखील शेवटी वैतागून न चिडणारा, बर्फासारखा थंड डोक्याचा दिला शोहर बांधून तिच्या गळयात आणि आपण गंमत बघत बसला फुकटची.. धर्मपत्नी आसनस्थ झाली की पेस्तनजी दुकानात थोडे खाली झुकून शिरे.. त्या तळपणाऱ्या सूर्याच्या बाजूला लटकवलेल्या कुणाच्यातरी तसबिरीला त्याने आपल्या कमरेच्या नाडीचे चवरे ढाळत.. शुंग थयो.. मने आपो मने आपो.. जो तमे लागे ले जावो असे म्हणत तिरपा कटाक्ष तो आपल्या बायकोकडे हळूच टाके.. त्याची जहाँबाज बायको नेमके त्याच वेळी त्याच्याकडे बघून 'माझं लक्षं आहे बरं, ' असं दाखवत असे... 'मज्जा करू छूं, ' हसत हसत मग पेस्तनजी आपल्या त्या काळया खुर्चीत बसे... सह्याद्रीच्या दोन डोंगराच्या कातीव काळया दरीतून पांढरा शुभ्र धवलगिरीची रांग जावी तसं काहीसं इथेही दिसे... आता दुकानदारीला सुरवात होणार असते.. दुकानात जुन्या, फुटक्यातुटक्या, बंद पडलेल्या नि काही चालू असलेल्या घड्याळांचा हा खच पडलेला असतो... फक्त गजराचं घड्याळ.. या शिवाय दुसरे कुठलंच घड्याळ सापडणार नाही आणि तेही फक्त फॉवर लुबाचं.. घड्याळं आपली टिकटिक वाजवत असतात, पंखा

कुरकुरत असतो, मिसेस पेस्तनजीची बसल्यापासून टकळी सुरू झालेली असते... घरात सासू-सुनेचं मिनिटभर पटत नाही, हे लग्न केले त्या दिवशी लक्षात आले. तेव्हा पासून त्या साध्वीने जी नवऱ्याची पाठ धरली ती सोडलीच नाही.. इथं वारा खायला नाही मिळत महणून सकाळपासून रात्रीपर्यंत नवऱ्याचा जीव खात राहते... नि आमचा गरीब बिचारा पेस्तनजी खणातले नादुरुस्त घड्याळ टेबलावर ठेवून एका डोळयाला यांत्रिकी डोळा लावून तपासणी करायला सुरुवात करतो... किती आल्हाददायक वातावरण असावं ते... मिसेस पेस्तनजी मग दुरुस्त झालेल्या घड्याळाचे पैसे किती घ्यायचे याचा हिशोब लावत दिवसभर बसतात.. नजर चुकीने पेस्तनजीने कुणाला उधारी दिलीच, तर ही बया त्या गिऱ्हाइकाच्या मानगुटीवर बसून वसूल करणारच... कुणाचे येणे बाकी आहे, याची दिवसभर जंत्री डोक्यात फिरवत राहताना..

'तमे एटलो धंदो सुदीक जमुना नथी... रोकडी नथी उधारमा आपनु रोटी कोणे मिळे छे... 'असं तिचे सारखे मंत्रपठण चालत राही.. त्या वेळेस उघडलेल्या घड्याळातली स्प्रिंगची चकती उडून खाली पडली तर तिला उचलता उचलता हळू आवाजात पेस्तनजी स्वतःशीच बोलत,

'जो, छुट गयो नो.. एक पेच ढिला पडितो.. तो एम सुनना पडी गयो... आजो दिन काले संवर गयो.. रातमा शगुन नींद आवी जो.. ' खोचक बोलणं नि लबाड हसणं पेस्तनजीच्या चेहऱ्यावर दिवसभर फुललेलं असे... ते कधीही मावळलेलं दिसलंच नाही...

कुणी नवीन गिऱ्हाईक आले तर पेस्तनजीला खूप खूप आनंद वाटे.. कामाव्यतिरिक्त इतरही चार गोष्टी त्याच्याबरोबर बोलायला त्याला आवडत असे... पेस्तनजी त्याच्या त्याच्या भाषेत संवाद साधत असे.. अगदी अस्खलित नसला तरी आशय भाव एकमेकांना समजला तरी पुरेसे होई.. मग तो मराठी असो, हिंदी असो, बंगाली, नेपाळी, तेलगू... पेस्तनजीला एकदा चावी दिली कि मग तो सुरू...

'साला, तुमी लोग घड्याळ मिन्स काय समझते? तेला टायेमला तेलपाणी कधी करतेय काय? तुमी लोग दोन टायेमला खाते, पिते, तरीबी बीमार पडते.. मंग ये तर मशीन है.. केवा बी बंद पडू शकते ना बाबुराव! .. साला होल लाईफमंधी कोण कशी एक्सिट घेल काय सांगते येते? ... चल चल आज ठेवून जा आता.. तू असा कर. दोन चार दिवसानी.. नको नको. सनडेलाच येऊन जा.. साला तुझी घडी पक्की करून मिळेल! ... काय बोलते पावती पाहिजे? ... बाबुराव! अरे, दहाहजारात घड्याळ कुठे बी पडले असू दे. हा पेस्तनजी बरोबर तुझाच घडी तुझ्या हातावर ठेवेल! ... ही पेस्तनजीची ग्यारंटी आहे. समजलास? साला बावीस वर्षाचा हा आपला घड्याळ रिपेरिंग दुकान आहे हा.. साला होनेस्टी ईज द बेस्ट पालिसी हा पेस्तनजीचा लोगो नाय... कस्टमर आपल्याला लै मानते.. एकदा रिपेरिंग झालेले घड्याळ परत कधीच बिघडणार नाय अशी पेस्तनजीची करामत हाय... ते फॉवर लुबाचे कंपनी मालकांनी माझा बऱ्याच वेळा सत्कार केला... मला त्यांच्या कंपनीत मॅनेजरची ऑफर केला! शोरूमची ऑफर्स देतो बोलला! पण मी माझ्या स्वताच्या दुकानापासून कुठेच गेलो नाय.. ही माझी बायडी मला रोज शिव्या देत असते.. तुम्हाला फायदा तोटा काय बी समजत नाही.. लै भोळे वागता.. अशाने आपलं पोट कसे भरेल? पण गॉड कृपेने काय बी कमी पडलाच नाय! . '

असा वार्तालाप नव्याबरोबर तर जुन्याबरोबर काम करत करत कितीतरी गप्पा चालत... कोण गावाला गेला, का गेला, कधी येणार.. त्याच्या कुटुंबाची खुशाली, आईवडिलांची चौकशी, मुलीचं लग्न, मुलाचं शिक्षण,

आजारपण, राडा, दंगल, संप.... सगळ्या सगळया गोष्टी पेस्तनजी कस्टमर बरोबर करत असे.. लोकांनाही तो परधर्मी असूनही आपल्याबद्दल सहिष्णुता, माणुसकी दाखवतोय याचं अप्रुप असे.. कधी कधी बायकादेखील त्याच्याबरोबर त्याच्या बायकोशी संवाद साधत. पण ती बापडी बेतास बातच.. तिच्या मते आपल्या भोळया नवऱ्याचा हे लोक फायदा उचलतात.. अडीनडीला पैसे मागून घेतात नि परत तर कधीच करत नाहीत... आपण सोबत असतो म्हणून तर बराच आळा बसला आहे या गोष्टीला..

किल्लीच्या घड्याळांना किल्ली देण्याचं विसरलं गेलं कि घड्याळ बंद पडतं.. पुन्हा किल्ली फिरवायचा अवकाश कि लगेच घड्याळाची टिकटिक सुरू... गजर सुरू... पण तेच जर मानवी जीवनातही तसंच असतं तर! ... त्या दिवशी पेस्तनजी रात्री दुकान बंद करून बायडी सोबत घरी गेले... पण... पण दुसरे दिवशी सकाळी दुकान उघडले गेलेच नाही... दुपारपर्यंत सबंध चाळीत बातमी पसरली - पेस्तनजी गेले... संपूर्ण चाळ दुःखात बुडाली.. आजूबाजूच्या दुकानदारांनी आपली दुकानं बंद ठेवली.. एक सगळयांचं आवडतं हसरं खेळतं माणूस अचानक सोडून गेलं होतं.. पहाटेच्या सुमारास ॲटॅक आला होता... सगळी चाळ झाडून जमली होती.. तिथं जमलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यातून आसवांचा महापूर चालला होता.. मिसेस पेस्तनजी शेजारी बसून अश्रू ढाळत होत्या.. आणि आणि पेस्तनजीचा चेहरा त्यांना सांगत होता... जो माणस मा वो दिखाई दियो... बने कोई चिंता ना करु... भला हुई छे.. मायूस ना होणू..


अखेर तेच खरे ठरले.. ते दुकान एकही वस्तू न हालवता पेस्तनजीची आठवण म्हणून कायमचे कुलूपबंद करण्यात आले.. कंपनीही पुढे बंद झाली.. डिजिटल घड्याळांचा जमाना आला... आता या घड्याळांना कोण विचारणार? मिसेस पेस्तनजीने आपल्याला आता यातलं काहीही नको म्हणून आधीच जाहीर करून टाकले... म्हणून तिथली सगळी घड्याळे भंगारात विकण्याचे ठरले.. एक दिवस भंगारवाला येऊन ती सगळी घड्याळं पोत्यात भरून नेऊ लागला... सहा पोती घड्याळं भरली.. पाच पोती गाडीत ठेवून सहावं पोतं उचलून नेताना पोतं हातून खाली पडलं.. एक दोन घड्याळं पोत्याच्या तोंडाशी येऊन निखळली नि त्यात शंभर शंभर रूपयांच्या नोटा बाहेर डोकावल्या.. मग काय सगळीच घड्याळं तपासून पाहिली... तिथं बघ्यांनी आ वासला... घड्याळावर माया करणाऱ्या माणसानं इतकी माया गोळा केली कशी? असा त्या मायेच्या गोत्यावळ्यातल्या प्रत्येकाला प्रश्न पडला होता... कैक लाखात रक्कम हाती लागली होती.. मिसेस पेस्तनजी स्वतः तिथं आली. तिनेच त्या रकमेचं सगळयांना हसतमुखान दान दिलं... असं करताना तिलाही तिथं पेस्तनजीचं हसतमुख मिश्किल अस्तित्व जाणवत होतं...

**श्री नंदकुमार वडेर -** सांगली मो. 9920978470.



## पुस्तक परिचय - हिंदोळा - सुश्री विभावरी कुलकर्णी





**पुस्तकाचे नाव -** हिंदोळा (कविता संग्रह)

**कवियत्री -** मंगला दामगुडे

**संपर्क क्रमांक -** ८९७६३२५७१९

**प्रकाशक -** वेदांत प्रकाशन, सौ. सुप्रिया कुलकर्णी.

**पृष्ठ संख्या -** १४२

**किंमत -** १२५/

मुखपृष्ठ अत्यंत आकर्षक व कविता संग्रहासाठी समर्पक.

सुरुवातीची मिस्टर व मुलासाठी असलेली अर्पण पत्रिका बरेच काही सांगून जाते.

डॉ. श्रीपाल सबनीस, माजी साहित्य संमेलनाध्यक्ष, यांची प्रस्तावना.

मनातलं ऋण - मंगला ताई यांचा सुपुत्र डॉ. दामगुडे यांनी आपल्या आईसाठी लिहिलेले ऋण प्रत्येक शब्दातून जाणवते.

कवियत्रीचे मनोगत यात त्यांची वाचनाची गोडी, लेखनातील प्रेरणा असे अनुभव वाचू शकतो.

नंतरच्या पानावर वीर शहीद फ्लाईट लेफ्टनंट शशिकांत, मंगला ताई यांचा प्रिय चांद, त्यांचा सुपुत्र. सगळे वाचून, फोटो पाहून एक वेगळीच हुरहूर दाटते. नंतर दिसतो तो बाल मित्रमैत्रिणी यांचा आनंद मेळा.

या सर्व मिश्र हिंदोळ्यातून कवितेविषयी उत्सुकता वाढीस लागते.

मुलाने दिलेला आधार, लिखाणासाठी दिलेली प्रेरणा हे लक्षात येते. नियतीची चपराक डोळ्यात पाणी आणते.

या काव्यसंग्रहात विविध भावनांचे हिंदोळे अनुभवायला मिळतात.

पहिलीच 'शब्द खेळ' कविता वाचकांना साद घालते. जणू पुढच्या लिखाणासाठी शुभेच्छा मागते.

'सखा' सारखी हलकी कविता मन मोहून टाकते.

तर लगेचच ' मन ' कविता भावनांना हात घालते.

माय लेकरावरील कविता व त्यातून लेकराला दिलेले आशीर्वाद मन भारून टाकतात.

'मनोगत' कविता प्रेयसीचे मनोगत सांगते. तर 'मृगजळ' कविता अंगावर शहारा आणते.

'सावलीतील सावली' कविता नावापासून उत्सुकता लावते, आणि अप्रतिम वेगळी कल्पना वाचावयास मिळते.

'प्रिय शशी' आणि त्या नंतरच्या काही कविता डोळ्यात पाणी आणतात. तर 'सखी' व त्या नंतरच्या काही कविता मैत्रिणींशी संवाद साधणाऱ्या व हितगुज करणाऱ्या आहेत.

निसर्गाच्या जवळ नेणारी 'सु... मने' कविता फुलांची वैशिष्ट्ये सांगते.

कवियत्री मंगला यांचा हा कविता व भावनारूपी हिंदोळा निरनिराळे भावतरंग निर्माण करतो.

सगळ्या कविता म्हणजे भावनांचा अनुभवपट आहे.

बालपण, तरुणपण, मैत्री, मातृत्व, निसर्ग या सगळ्या भावना दाखवून, पुढे 'संध्यारंग' व 'अनंताच्या प्रवासा' पर्यंत हा काव्यसंग्रह अनुभव देतो व आपल्या मनाचा हिंदोळा झुलवत राहतो. उत्सुक मनाने एकामागे एक कविता वाचाव्याशा वाटतात. आणि असे पुस्तक नक्कीच संग्रही असावे असे वाचणाऱ्याला नक्कीच वाटते.

असे लेखनसाहित्य अधिकाधिक वाचायला मिळावे यासाठी कवयित्री मंगला दामगुडे यांना हार्दिक शुभेच्छा! आणि आता पुढच्या पुस्तकाची प्रतिक्षा आहेच!

**पुस्तक परिचय : सुश्री विभावरी कुलकर्णी** - मो. ८०८७८१०१९७




## कविता - जीवनातील इंद्रधनु - सुश्री दीप्ती कोदंड कुलकर्णी



जीवनाला रंग कसा
मानवा तू देशी तसा ॥

इवली पुष्पे धन्यही होती
गंधरुपाने मोहित करिती
तुला तरी रे सुंदर तनमन
वेचण्यास रे जीवनी मधुकण ||१||



तानापिहिनिपाजांतुनी
इंद्रधनुही खुणाविती
मानवता, श्रम, सहिष्णु वृत्ती,
सत्य, शीलातुनी घे कीर्ती ||२||

इंद्रधनुसम फुलव जीवनी
सद्गुण पाहता दिपेल अवनी
सार्थकता ही राहील नयनी
सजग होऊनी चाल तू झणी ||३||

कर्तृत्वा तुज, नाही मिती
अमोघ बुद्धी, अजोड शक्ती
कृतिशीलता ध्येय पुजूनी
रंग भरुनी घे सांगू किती ||४||

जीवनाला रंग कसा
मानवा तू देशी तसा...

**सुश्री दीप्ती कोदंड कुलकर्णी** - भ्र., ९५५२४४८४५१.

## कथा - काय रे... ओळखलंस का मला? - सुश्री मंजुषा सुनीत मुळे



"हाय विराज, कसा आहेस? ओळखलंस का मला?"... कोणीतरी माझ्या खांद्यावर धपकन् थाप मारून मला विचारत होतं, पण मला त्या आगंतुक माणसाकडे वळून पहावं असंही वाटत नव्हतं... त्याक्षणी मला फक्त एकांत हवा होता.. कुणाशीही बोलावसं वाटत नव्हतं. इतकंच काय.. कुणाचं तोंडही पहावसं वाटत नव्हतं. म्हणून तर घरातून तिरीमिरीने बाहेर पडून असा इथे येऊन बसलो होतो...

इथे... म्हणजे माझ्या घराच्या मागच्याच बाजूला असलेल्या या छोट्याशा टेकडीवर... ही जागा लहानपणापासूनच फार फार आवडायची मला...या आधी असंख्य वेळा मी इथे येऊन गेलेलो आहे... असंच.. उगीचच. इथे यायचं, थोडावेळ स्वतःला विसरून जायचं, आणि परत जातांना एक निखळ आनंद घेऊन जायचं .... जणू खिसे भरभरून ... पुन्हा येईपर्यंत तो पुरावा म्हणून..... पण आजकाल इथे यायला जमायचंच नाही मला. माझी मानाची नोकरी, भरपूर पगार, गरजेपेक्षाही कितीतरी जास्त सुविधा, आणि सतत समोरून खुणावणाऱ्या प्रगतीच्या वाढत्या आकांक्षा.... या सगळ्यातच मी पुरता गुंतून गेलो होतो... मी आपणहून गुंतलो होतो.. की माझ्याही नकळत त्या सगळ्यांनी मिळून मला विळखा घातला होता...कोण जाणे. आणि आता इतक्या वर्षांनी आज.. मनाच्या वैतागलेल्या अस्वस्थ अवस्थेत, माझी पावलं माझ्याही नकळत इकडे वळली होती... तिथल्या माझ्या आवडीच्या जागी मी तितक्याच नकळतपणे येऊन बसलो होतो.

आता पूर्वीपेक्षा ब-यापैकी मोठी झालेली काही झाडं सोडली, तर बाकी सगळं अगदी तसंच होतं... नुकताच पावसाळा संपल्याने प्रसन्नपणे हसत असल्यासारखी ती हिरवीगार टेकडी... त्या हिरवाईतून उगवून उत्सुकतेने सगळीकडे बघत डोलणारी... ती इवलीशी, नाजूकशी, सुंदर पिवळसर गवतफुलं आणि जणू त्या सगळ्या निसर्ग-सौंदर्याला नजर लागू नये म्हणूनच मधेमधे डोकावणारे काळेशार खडक. निळसर प्रेमळ आकाश... हलकेच फुंकर घालत मनाला फुलवणा-या थंड वा-याच्या झुळका... अस्ताला निघाल्याने उदासवाणा झालेला ... मावळतांना मवाळ झालेला सूर्य... आणि त्याच्या मागोमाग जावं लागल्याने रुसलेली, कसेतरी पाय ओढत चाललेली ती सूर्यकिरणं... सावल्यांनाही सोबत घेऊन चाललेली, पण तरीही हवीहवीशी वाटणारी. सूर्य आणि चंद्र, चांदण्या यांच्या पाठशिवणीतला हा एक सुंदर टप्पा...

हे सगळं सगळं मला फार आवडायचं... अगदी कळायला लागल्यापासून... दर रविवारी इथे येण्यासाठी मी हट्ट करायचो आई-बाबांजवळ. आणि आत्ताही तितकंच आवडंतय मला हे सगळं..... पण मग आज... आजही पूर्वीसारखंच हे सगळं मला माझं वाटत असलं, तरी ते पूर्वीसारखं माझ्या मनापर्यंत का पोहोचत नाहीये... का असं लांबूनच बघतंय माझ्याकडे? ... की माझं मनच लांब पळतंय् या सगळ्यापासून? माझं मलाच समजत नव्हतं काही. खरंतर मनाची अस्वस्थता कमी व्हावी म्हणून इथे आलो होतो मी, पण... पण आता आणखीच अस्वस्थ वाटायला लागलंय. काय करू...? जाऊ का परत...? जावंच...

असं म्हणत उठायला लागलो, तोच परत खांद्यावर तशीच थाप पडली... आणि तोच प्रश्न... "ओळखलंस का मला?" आता मात्र मी भांबावून गेलो...नुसता भांबावून नाही तर जरासा घाबरूनच गेलो होतो, " नाही ओळखलं..." कसंतरी म्हणालो. आणि दुस-याच क्षणी कुणीतरी माझ्याशेजारी.. अगदी मला चिकटल्यासारखं येऊन बसलंय् असं मला वाटायला लागलं. आता मात्र मी पार घाबरलो होतो. ...मान वळवून बघूया का? नको नको.... पण तितक्यात तो लगेच माझ्या पाठीवरून हात टाकत म्हणाला, "अरे मी काही कुणी भूत-पिशाच्च नाहीये इतकं घाबरायला... सारखेच तर आहोत आपण... नाही ओळखता येत आहे मला? असू दे... don't worry. थोड्या वेळाने नक्की ओळखशील... खात्री आहे मला..."

"अहो पण..." मी जरासा सावरलो, आणि विचारलं... हवेला विचारावं तसं... तर तो लगेच म्हणाला... "अरे, अहो काय म्हणतो आहेस मला? आपण अगदी एकाच वयाचे आहोत, आणि गंमत सांगू का.. माझं नावही विराजच आहे."

"मग आत्ता इथे काय काम आहे तुझं माझ्याकडे... मी तर ओळखतही नाही तुला..." आता माझी भीती थोडी कमी झाली होती...

अचानक तो मोठ्याने हसला...

" काय झालं इतकं हसायला?"

"काही नाही रे... माणसं इतकी विसराळू कशी असतात हे कळतच नाही मला.""

"म्हणजे? मी तर कधीच काही विसरत नाही. माझी स्मरणशक्ती फार तल्लख आहे म्हणून कौतुक होतं माझं नेहेमी"... मी गर्वाने म्हणालो... आणि तो परत तसाच गडगडाटी हसला...

"अरे बाबा, मला सांग.. तुझं लहानपण कुठे आठवतंय तुला? म्हणजे आईबाबांनी केलेले लाड, पुरवलेले हट्ट, तुझं रुसणं फुगणं... हे सगळं कदाचित् आठवत असेल तुला... मलाही आठवतंय्. पण तुझा तो निरागसपणा, लडिवाळ हसणं, स्वत:चं रुसणं स्वत:च विसरून जाणं... यातलं काही आठवतंय का तुला? नाही ना? ... बघ प्रयत्न कर. पण मला मात्र सगळं लख्खं आठवतंय् बरं का... सारखा तुझ्याबरोबरच असायचो ना मी? ..."

आता मला त्याच्या बोलण्यात रस वाटायला लागला होता. तिथून निघण्याचा विचार माझ्याही नकळत बारगळला होता.

"आणि आठवतो आहे का रे तुला तुझा शाळेचा पहिला दिवस? आपल्या शहरातील ती तेव्हाची एक नंबरची शाळा... तुला त्याच शाळेत घालायचं म्हणून आई-बाबांनी खूप आधीपासून तयारी सुरू केली होती. स्वत:चे खर्च कमी करून त्यासाठी पैसे साठवले होते त्यांनी... मला आठवतंय् ना सगळं. तिथे तुला ॲडमिशन मिळाल्यानंतर त्यांनी पेढे ठेवले होते देवासमोर, आणि आजूबाजूच्या सगळ्यांना वाटले होते... तुला पेढे फार आवडायचे म्हणून तू एकावेळी ४-५ पेढे खाल्ले होतेस... आठवतंय्?" ... मी मानेनेच नाही म्हटलं.

"पण पठ्ठ्या तू चीज केलंस बरं का त्यांच्या कष्टाचं... चिकाटीने कसून अभ्यास केलास... एकाही वर्षी पहिला नंबर सोडला नाहीस. सगळेजण तुझं खूप कौतुक करायचे... एक उत्तम खोखो-पटूही होतास तू. खेळात हरणं जिंकणं तर चालतंच, हे कुणी शिकवावं लागलं नव्हतं तुला.. आणि जिंकलेल्या टीमचं कौतुक सर्वात आधी

तूच करायचास...आठवतंय का? तुझी खिलाडू-वृत्ती कधी बदलली नव्हती इतक्या वर्षात... मला आठवतंय ना सगळं..."

..."मग दहावीला बोर्डात आलास. तुझ्या आवडीची साईड मिळाली तुला. सगळेच खूप आनंदले...तुझे आई, बाबा तर तुझ्याहून जास्त स्वप्नं पहात होते तुझ्या भविष्याची. पण तू कधीच गर्वाने फुगला नाहीस. पूर्वीसारखाच अगदी मन लावून, सिन्सिअरली अभ्यास केलास... extra curricular activities मध्येही पुढेच असायचास... तीच खिलाडूवृत्ती बाळगून... मला आठवतंय् ना..." तो क्षणभरही न थांबता बोलत होता, आणि आता मी ही त्या आठवणींमध्ये गुंगून गेलो होतो...

"आणि आठवतंय का तुझी वृत्ती किती आनंदी... प्रसन्न असायची नेहेमी...सगळ्यांना खूप आवडायचास तू. बघता बघता तरुण झालास... अगदी रुबाबदार... देखणा दिसायला लागला होतास... चेहे-यावर बुध्दीचं तेज... वागण्या-बोलण्यातला नम्रपणा...सगळ्यांशी सारखंच वागणं...बघताक्षणी कुणावरही छाप पडायची तुझी. आईबाबांच्या तुझ्याबद्दलच्या अभिमानाची जागा हळुहळू गर्वाने घेतली होती हे खरं, पण तुझे पाय मात्र जमिनीवर घट्ट रोवलेले होते... मी पाहिलंय् ना सगळं..."

"मग अपेक्षेप्रमाणे तुला एका मोठ्या इंटरनॅशनल कंपनीत नोकरी लागली. पॅकेजही छान होतं. एकीकडे रेवाबरोबरची कॉलेजमधली मैत्री आणखी, आणखी घट्ट झाली आणि मग तिच्याबरोबरच... 'शुभमंगल'... अगदी छान गुणी आणि हुशार आहे ना रेवा... सगळ्यांनाच आवडेल अशी..."

... आणि तो क्षणभर थांबला... बोलून बोलून दमल्यासारखा. आणि मग म्हणाला... "हे सगळं तरी नक्कीच आठवत असेल ना रे तुला? मग जॉबमध्ये एकेक पायरी वर चढत गेलास... कंपनीच्या कामानिमित्ताने जवळपास जगभर फिरलास. संसारवेलीवर एकाच वेळी, दोन सुंदर फुले उमलली... यश... आणि... जय... किती साजेशी नावे आहेत ना दोघांची... मला फार आवडली. किती खूश झाले होते सगळे... स्वर्ग ठेंगणा वाटत होता सगळ्यांनाच... मला आठवंतय् ना सगळं..."

आणि अचानक मला एक हुंदका ऐकू आला... अस्पष्टसा... मी शेजारी पाहिलं... तिथे कुणीच नाहीये हे माहिती असूनही... पण तो लगेचच पुन्हा बोलायला लागला... "आणि मग हळूहळू तुझे हात तर प्रत्यक्ष स्वर्गालाच टेकले आहेत असं वाटायला लागलं तुला.. बहुदा तुझ्याही नकळत. फिरता रंगमंच कसा क्षणात फिरून नाटकाचा वेगळाच रंग दाखवतो ना... तसंच काहीसं झालं विराज तुझ्या आयुष्यात... कानात वारं शिरलेला खोंड उधळतो ना... तसा उधळल्यासारखा वागायला लागलास तू ... फक्त तेव्हाच नाही... तेव्हापासून अगदी आजपर्यंत... मी बघतोय् ना सगळं..."

त्याचा आधीचा स्नेहभरला मधाळ आवाज आता गंभीर, दुखावल्यासारखा वाटायला लागला होता... मीही जरा सावरून बसलो... " विराज, आता तुझं तुलाही काही कळेनासं झालंय्, इतकं डोक्यात गेलंय् का रे यश तुझ्या? सहाजिकच आहे म्हणा... आयुष्यात कधी ठेचकाळावंही लागतं, हे विसरूनच गेला होतास की पार... आणि आज... आज तुझ्याआधी तुझ्या कलीगला प्रमोशन मिळालं आणि तिथेच ठेचकाळलास की रे तुझ्याही नकळत... जणू मनालाच जखम झाल्यासारखा घायाळ झालास... तुझ्या उपजत शहाण्या-समजूतदार वृत्तीला न शोभणारं वागलास त्या कलीगशी, आणि तुझ्या बॉसशीही... नको नको ते बोललास... वाट्टेल ते आरोप

केलेस. अरे, नुकतंच त्याच्या प्रोजेक्टला भरघोस यश मिळालं म्हणून तूच किती कौतुक केलं होतंस त्याचं... तूच सर्वांना पेढे वाटले होतेस... आपणहून... मनापासून... मी पाहिलंय ना..."

"आणि आता त्याच्या त्या यशाचं बक्षीस म्हणून कंपनीने त्याला अचानक प्रमोशन दिलं म्हणून अचानक इतका अस्वस्थ झाला आहेस... जळतो आहेस...का? अरे तुझ्या लक्षात आहे ना की तुझंही प्रमोशन ड्यू आहे... आणि ते २०० टक्के तुला मिळणारच आहे... बॉसनेच सांगितलंय् ना तसं? मग तरीही का इतका त्रास होतोय् तुला त्याच्या प्रमोशनचा. तुला आठवतंय की नाही कोण जाणे... पण इंटरस्कूल मॅचेसमध्ये टीमचा कॅप्टन कुणाला करायचं हा शिक्षकांना पडलेला प्रश्न तूच आपणहून सोडवला होतास... त्या मनोजचं नाव सुचवून... आणि त्याबद्दल तुला विचारल्यावर किती निर्मळपणे उत्तर दिलं होतंस की... "सर हा मनोजही माझ्याइतकाच या खेळात निपुण आहे... मग त्यालाही संधी मिळायलाच हवी"... कॅप्टन झाल्याबद्दल मनोजचं कौतुक झालं... पण त्याहून जास्त कौतुक झालं होतं ते तुझ्या या निर्मळ, निस्वार्थी विचारांचं आणि तुझ्या खिलाडूवृत्तीचं... आठवतंय् ना? नाही? पण मला आठवतंय ते सगळं." यावर मी माझ्याही नकळत मान हलवली... त्याला काय सांगायचं आहे ते आता हळूहळू माझ्या लक्षात यायला लागलं होतं...

"अरे मग आता कुठे गेला तो स्नेहभाव, इतरांचा विचार करण्याची निर्मळ वृत्ती, ती दिलखुलास खिलाडू वृत्ती... एक गोष्ट विसरतो आहेस रे तू विराज ...एखादी मॅच हरल्यावर तूच इतर मित्रांना सांगायचास ना की ' दुसरा कुणी आपल्यापेक्षा एक पाऊल पुढे गेला, म्हणजे आपण मागे पडलो, हरलो, असं नसतं ' म्हणून.. पण मग तरीही असा चुकीचा आणि नकोसा अर्थ काढून तू आता स्वत:लाच इतका त्रास का करून घेतो आहेस... आणि मला हेही माहितीये की त्यामुळे बाकी कुणाला काहीच फरक पडणार नाहीये, हे कळण्याइतका नक्कीच सुजाण आहेस तू. हो की नाही? इतक्या वर्षात आज पहिल्यांदाच मी तुला असा मनाने पराभूत झालेला पहातो आहे. आणि हे तू चुकीचं वागतोयस् हेही कळतंय् तुला, पटतंही आहे आतल्या आत. तरीही..."

मी एकदम भानावर आलो...मला जाणवलं की इतका वेळ परका वाटणारा त्याचा आवाज आता मला अगदी ओळखीचा वाटायला लागला होता.." कोण आहेस तू...तू सगळं पाहिलं आहेस, तुला सगळं माहिती आहे, असं सारखं म्हणतो आहेस ना? मग आता माझ्यासमोर येत का नाहीयेस?" ... मी न राहावून झर्रकन मान वळवून विचारलं आणि .... आणि अचानक् माझ्याशेजारी बसलेला मीच मला दिसलो... आणि मी पूर्णपणे भानावर आलो... एखाद्या कोमातून बाहेर आल्यासारखा. माझ्याही नकळत माझं मन एकदम हलकं झालं.... शांत झालं. मग मनाला केव्हापासून व्यापून राहिलेलं संतापाचं.. अपमानाच्या भावनेचं.. ईर्षेचं.. असूयेचं दाट मळभ कधी कसं विरून गेलं ते मलाही कळलं नाही. मीच माझ्यातल्या ' त्या' चे मनोमन आभार मानले. आणि माझ्याही नकळत मी तिथून उठून झपाझप घरी परत निघालो.... तितक्याच नकळत मी खिशातला मोबाईल काढला...

... "हॅलो यार अगदी मनापासून सॉरी...प्लीज मला माफ कर. प्लीज.." .... तो फोन अर्थातच माझ्या त्या कलीगला.. म्हणजे महेशला होता.

**सुश्री मंजुषा सुनीत मुळे -** मो. - 9822846762

## लेख - नारायण नारायण - श्री अमोल केळकर



आज देवर्षी नारदमुनी यांचा वाढदिवस. आपल्या परम भक्ताच्या जन्मदिवसाप्रित्यर्थ विष्णुलोकात आज जंगी कार्यक्रमाचा बेत श्री विष्णू आणि माता लक्ष्मी यांनी ठरवला आहे.

वेगवेगळ्या लोकातील देव, ऋषीमुनी, नवग्रह, गंधर्व, अप्सरा यांना निमंत्रणे गेली आहेत. कमळाच्या 'कळीचे' चित्र असलेला केक बनवला जात आहे.. जे विष्णू लोकात *__बाहेरुन__* येत आहेत त्यांना 'विष्णू आय टी' सेल प्रमुख चित्रगुप्त "**विष्णू लोक्यं, परम सौख्यं**" या व्हाटसअप ग्रुपवर तातडीने सामील करुन घेत आहेत, जेणेकरुन त्यांना कार्यक्रमासंबंधित सर्व अपडेटस देता येतील.

तिकडे कैलासावर मात्र वेगळीच गोष्ट घडलीय. ऐनवेळी महादेवांनी आपण येणार नाही आहोत, तू मुलांना घेऊन जा असे 'पार्वती' ला सांगितले आहे. कारण विचारता महादेव सांगत आहेत, तिकडे" **केदारनाथला** माझा एक भक्त तपश्चर्येला कालपासून बसला आहे. मी असं त्याला सोडून वाढदिवसाला येणं बरोबर दिसणार नाही. तेंव्हा तुम्ही जा आणि माझ्या शुभेच्छा नारदमुनींना द्या.

इकडे बाल गणेश आईला विचारतोय, माते वाढदिवसाला २१ मोदक असतील ना? यावर पार्वती माता गणेशाला रागावून सांगतीय, बास झाली हा तुझी नाटकं. लक्ष्मीमावशी जे देईल ते गप्पगुमान खायचं, तिथे हट्ट चालणार नाही. नाहीतर मी फक्त कार्तिकेयला घेऊन जाईन. आणि काय रे? तीन दिवसांनी तर संकष्टी आहे ना. या वेळेला थोडे जास्त मोदक करीन हा माझ्या सोन्याला. बरं ऐक. संकष्टीवरून आठवलं. संकष्टीच्या दुस-या दिवशी हिंदुस्थानातील लोकशाही निवडणूकीची मतमोजणी आहे. एकाच मतदार संघातील उमेदवार तुझ्या दर्शनाला येतील. ते सगळे भक्त तुला अनोळखी आहेत म्हणून मुद्दाम सांगतेय, उगाच सगळ्यांना ' विजयी भव! ' असा आशीर्वाद देऊन जास्त 'माया', 'ममता' दाखवून त्रिशंकू परिस्थिती होऊ देऊ नकोस. '

बरं! आज संध्याकाळी"इंद्रप्रस्थ कल्चरल फोरम" तर्फे काही अप्सरा खास कार्यक्रम सादर करणार आहेत. या कार्यक्रमात 'ब्रह्मदेवांना' लाईफ टाईम ॲचिव्हमेंट ॲवार्ड देणार आहेत. तर कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'सूर निरागस हो' हे गाणं तू म्हणणार का? असं ' माता सरस्वतीने' विचारले आहे. तीच या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पण करणार आहे. '

'मग काय सांगू? हो म्हणून सांगू? '

'हो'

'अं? '

'हो. हो म्हणून सांग. मी तयार आहे. '

'अहो...'

‘हो… हो…’

‘काय हो, हो करताय? कशाला तयार आहात? उठा लवकर. आज रविवार असला तरी मेलं, रविवार काय अन् कुठला वार काय, सकाळी उठून चालू लागायचं, वार्तांकन काय एक्झिट पोल काय, रिपोर्ट काय…. ’

‘पण आज संध्याकाळी जरा लवकर या. **नारद फाऊंडेशनचा 'यशस्वी पत्रकार' पुरस्कार घ्यायला जायचंय आपल्याला. लक्षात राहू दे’**

‘हो हो. आहे लक्षात, चल आवरतो’

***२४ x ७ पत्रकारितेला वाहून घेतलेल्या आणि त्यासंबंधीत क्षेत्रात काम करणा-या तमाम बंधू/ भगिनींना तसेच क्षणात फेसबुक, व्हाटसअपवर ब्रेकिंग न्यूज पाठवणा-या, तसेच आपल्याला विचारलं नसताना, त्या विषयाशी आपला संबंध नसताना, गरज नसताना, काहीही प्रतिक्रिया देऊन मूळ विषय भलतीकडेच वळवणा-या सर्व व्हाटसअप ग्रुपमधील *सर्वच बुद्धिमान 'नारद' बंधूंना *नारद जयंतीच्या शुभेच्छा****

नारायण, नारायण…!

**श्री अमोल केळकर -** बेलापूर, नवी मुंबई, मो ९८१९८३०७७९ - poetrymazi. blogspot. in, kelkaramol. blogspot. com - Email - a. kelkar9@gmail. com



## एकांकिका - पॅसिव्ह स्मोकर्स - डॉ. मिलिंद विनोद



### दृश्य पहिले

(एका वरातीचे दृश्य. साधारण निम्नस्तरीय वर्गातील लोकांचे लग्न असल्याने त्या दृष्टीने थोडासा तडक-भडक पोशाख. नवरदेवाने जरीचा शर्ट आणि नव-या मुलीने झगमगीत साडी, डोक्याला बाशिंग बांधलं आहे. खूपसे दागिने, मागे जोरदार डी. जे. आणि भारतीय संगीताचा लाऊडस्पीकर्सवरुन मारा. मिरवणूक वाजत गाजत एका झोपडीसदृष्य कच्च्या घराकडे येते. तिथे एक चाळीशीची बाई ओवाळण्यासाठी हातात आरती ताम्हन धरुन स्वागताला तयार. औक्षण केल्यावर दोघेही खाली वाकून नमस्कार करतात.)

रखमा : ये ग बये माझी लक्ष्मी, राम सीतेची जोडी. उजव्या पायाने ते मापटं उलट ग बये, या घरात तुज्या पायी खूप भरभराट, शिरीमंती, सुख-समृध्दी येऊ दे. देव तुम्हा दोघांनाबी खूप खूप लांब, सुदृढ आरोग्यासाठी दीर्घायुष्य देवो. (अचानक डोळ्यातली टिपं पुसत स्वत:शीच पुटपुटल्यासारखे करते.)

पर काय उपयोग या आशिर्वादाचा? २५ वरसामागं जवा मी आनं त्याआधी ४० वरसामागं माझी सासू लगीन करुन घरात आली, तवा आमच्या सासवांनी असाच दीर्घायुष्याचा आशीर्वाद दिला व्हता. (नवरा मुलगा आणि मुलगी तशीच ताटकळलेली.)

सुभान : आई, आशीर्वाद झाला का?

(अचानक खडबडून जागी झाल्यासारखी आई आशीर्वाद देते.) देव तुमा दोगांचे समद्या दुष्ट प्रवृत्तींपासून रक्षण करो - गृहप्रवेश कर ग बये या तुझ्या नवीन घरात!

### दृश्य दुसरे

(पडवीवर रखमा तुळशी वृंदावनाला पाणी, सडा-शिंपण करत आहे. आतून चंदा दोघींकरता चहा करुन आणते. कप जरा वेगवेगळ्या रंगाचे, बश्या अशाच वेगळ्या. मातीच्या गडूतून पाणी आणते. त्याआधी सासूला आणि तुळशीवृंदावनला नमस्कार करते.) दोघीही पडवीत जमिनीवर बसून बोलू लागतात.

रखमा : चंदा फार त्रास नाही ना दिला सुभ्याने?

चंदा : (चंदा लाजून खाली मान घालून 'नाही' असं दर्शवते) पण उंदराचं लई भ्या वाटतं मला - रातभर आपला सारखा दाराभाईर जातूय आणि फटीतून पुन्हा आत येतूय - मांजर बी तसंच, तिकडे दबा धरुन बसलेलं.

रखमा : (हसते) अग पलीकडंच कोठीची खोली हाय नव्हं. रातच्याला नेहमीच तिथं ये-जा असते उंदरांची. उद्यापासून पिंजराच लावते बघ. राजाराणीच्या संसारात कोणाची खुडबूड नको - उद्यापासून.

चंदा : अक्का SSS (लाजून आत जाण्यासाठी निघते.)

रखमा : ए चंदे - ये जरा. थोडं बोलायचं हाय.

चंदा : सुभानराव उठतील नव्हं आता. त्यांच्या चा पान्याचे -

रखमा : तो उठायच्या आतच बोलाया हवं. त्याचं डोस्कं आपलं बोलणं ऐकून फिरलं तर लई वंगाळ होईल बघ.

चंदा : असं काय बोलायचंय अक्का?

रखमा : बये त्या कॉन्ट्रॅक्टरचा निरोप आला होता.

चंदा : तो बिडी कारखानदारवाला का?

रखमा : व्हय व्हय तोच - आपला पोशिंदा.

चंदा : मला न्हाय आवडत तो - काल सोन्याची चेन गळ्यात घालताना फारच लगट करत होता. केवढ्या सगळ्या भेटवस्तू दिल्याती. त्याचा इरादा कायतरी वंगाळ हाय असं वाटतं मला.

रखमा : जोखलास त्याला बरं झालं. अग त्यानं निरोप धाडलाया तुला घेऊन एकदा मिसरीच्या शेतावर ये म्हणून.

चंदा : मला, मला कशापायी बोलिवलाय?

रखमा : आता असं बघ, सुभान त्याच्या शेरातल्या पेपर फॅक्टरीत कामाला. बिड्याची पाकीटं छापायची - सहा महिन्याचं कंत्राटी काम, उरलेले सहा महिने तो त्याच्या गावाकडल्या शेतावर मजूर म्हून कामाला, मी त्याच्या तेंडूच्या शेतात पानं वेचायला. ती कोवळी पानं तोडून त्याच्या विड्या वळून तेवढेच चार पैकं मिळवते. आपला अख्खा संसार, घरदार त्याच्याच कडल्या पैशावर चालतं ग बये.

चंदा : पन मला न्हाय त्याच्या शेतावर काम करायचं. त्याची नजर मला लई खराब दिसते.

रखमा : बये इथली पध्दतच आहे ती. एखादी रात्र. पण त्या बदल्यात तो आपली काळजी घेतो ग. पोराला दर महिन्याला पगार, उधार-उसनवारी, अडीअडचणीला हात उचल - बये यातून सुटका नाही ग.

चंदा : अक्का म्हणजे तुम्हीही मान्यता देताय त्याच्या या छछोर वागण्याला.

रखमा : बये मी १३-१४ वर्षांची होते लगीन करुन आले तेव्हा. माझ्या सासूनंबी हेच केलं माझ्या संग.

चंदा : काय? तुमच्या सासूनं, तिनं स्वत: नेलं?

रखमा : तिच्या सासूनं तिला - तिनं मला.

चंदा : अन तुम्ही मला.

रखमा : एक दुष्ट कुप्रथा हाय असं समज. बये एखाद्या रातीचा प्रश्न असतो अग तो, तेवढ्यावर जिंदगी भरच्या कमाईची, आयुष्यभराची ददात मिटेल ग बाई...

चंदा : नाही अक्का - न्हाय - माझ्याच्यानं हे काम नाही होणार - (हमसाहमशी रडून पळून आत जाऊ लागते. रखमा तिचा हात धरुन बसवते.)

रखमा : हे बघ. हे घर, ह्या चार भिंती, जमीन सगळं सगळं गहाण पडलंय त्याच्याकडे. देवाला माहीत कोणी आणि कधी हे सगळं त्याच्याकडे तारण म्हणून ठेवलं.

चंदा : आणि हे सगळं माझ्या घरच्यांना, माझ्या आई-वडिलांना माहीत होतं?

रखमा : अगं, इथल्या सगळ्या गावांची हीच परिस्थिती! मात्र एक चांगली गोष्ट. हे फक्त एकदाच, फक्त एका रात्री करताच गे बाये. इथे हीच पध्दत रुढ हाय. कोणालाच त्याचं काहीच वाटत नाही.

चंदा : (जोरात हुंदका देते. हाताला झटका देऊन आत घरात जाते पुटपुटत.) नाही अक्का. नाही. मी न्हाय जाणार.

(सुभानची एन्ट्री. चंदा त्याला घासून जाते.)

सुभान : काय झालं, काय झालं अक्का -

रखमा : काही नाही, आमच्या आपल्या संसाराच्या गोष्टी, प्रापंचिक-नेहमीच्या, वर्षांनुवर्षे चालत आलेल्या. होईल सवय. होईल तयार. (ती हळूहळू कपात चहा ओतू लागते.)

**दृश्य तिसरे**

(तंबाखूच्या शेतावरचा भाग. चंदा आणि इतर बायका, मुली शेतात पानं खुडण्याचे काम करत आहेत. कॉन्ट्रॅक्टर वैंकय्या - पांढरी लुंगी. वर पांढरा बुशशर्ट, हातात काळी बॅग, पांढ-या चपला, सोन्याचे कडे, दोन्ही हातांच्या बोटांत ३-३ अंगठ्या. वैंकय्याची एन्ट्री घेताना दोन बोटं डोळ्यांना लावण्याची लकब. त्याचप्रमाणे तोंडाने सारखा ‘ गोविंद हरी गोविंद हरी गोविंद’ चा जप. “जय अय्यप्पा” असं काहीतरी पुटपुटतो.)

वैंकय्या : मुलींनो, चला चला लवकर लवकर, काय ग चंदे आज किती टोपल्या पानं खुडलीस?

अण्णा

चंदा : चार झाल्या अण्णा - पानं कोवळी हिरवीगार आणि लुसलुशीत आहेत. तोडायला त्रास पडतो म्हणून वेळ लागला.

वैंकय्या : फक्त चार? तो मालक माझे केस उपटेल काळे असले तरी - कोवळी पानं म्हणे!

अण्णा

चंदा : होतील आणखीन ४ सांजच्या पर्यंत.

वैंकय्या : आणि काय ग, आज उशीर का झाला यायला?

अण्णा

चंदा : (डोळ्यात टचकन पाणी येते) सासुबाई लई आजारी हायेत - घरचं सगळं आटपेस्तोवर, त्यांचं उठणं बसणं.

वैंकय्या : ती म्हातारी, तिच्या शेवटच्च्या घटका जवळ आल्यात. मरु दे तिला सुखानं.

अण्णा

चंदा : म्हातारी - काय म्हणाला - ती म्हातारी?

वैंकय्या : व्हय तर - पंचेचाळीशीची म्हणजे लय झालं की वय. अग या तंबाकूच्या मळ्यावर ४०-४५ वर्षापर्यंत जगणारी माणसं खूप जगली म्हणायची.

अण्णा

चंदा : (स्वत:शीच पुटपुटत) ४०-४५, म्हातारी, माजं आजचं वय २५ म्हणजे माज्याकडे जगायला अजून फक्त २० वर्षं, जास्तीत जास्त?

वैंकय्या : बरं बरं हा घे तुझा या आठवड्याचा सुक्या तंबाखूचा आणि टॉईन दो-याचा कोटा. १-१ किलो जपून वापर. या आठवड्याअखेरीपर्यंत १० बास्केट भरुन वळलेल्या विड्या पोहोचत्या कर, फार्म हाऊसवर ट्रॅक्टर येणार हाय. १० फे-यात सगळा माल कोल्हापुरला, निप्पाणीला पोहोचायला हवा. पुढल्या हंगामाकरता लिलाव सुरू होतील पाडव्याला. जास्तीत जास्त माल गेला तरच ३ महिन्याची मजुरी मिळेल, नाहीतर उपासमारीचीच वेळ येईल.

अण्णा

चंदा : करते मी प्रयत्न. दहा काय, बारा टोपल्या भरण्याचा प्रयत्न करीन पण तीन महिन्याची मजुरी नका बुडवू.

(इतक्यात चार माणसे तिरडीवरुन एका प्रेताला नेत आहेत. रखमा अक्का अमर असो, रामनाम सत्य आहे. रखमाअक्का अमर असो. काय घडलय ते चंदाच्या लक्षात येतं. तिची शून्यात नजर. दूर जाणा-या प्रेताकडे पहाता पहात समोर ठेवलेल्या चार टोपल्या उचलून २-३ डोक्यावर ठेवते. दोन्ही हातात दोन उचलून एक खांद्यावर घेते पुटपुटते - “राम नाम सत्य है”)

**दृश्य चौथे**

(चंदाच्या घरचा सीन. चंदा विड्या वळत वळत खोकत खोकत सुभानशी बोलतेय. बाजूला १३-१४ वर्षांचा मुलगा आतबाहेर करतोय, मदत करतोय. सुभानही विड्या वळायला मदत करतोय.)

सुभान : चंदे काम पुरंच होत न्हाई नव्हं. रोजच्या रोज हजार विड्या वळायच्या. लय कठीण काम. बोटाची पेरं पार झिजून गेलंती, (तिचा हात हातात घेतो)

चंदा : मला वाटतं एखाद्या डागदरला दाखवायला हवं (खोकते) घरच्या काढ्याचा उपयोग न्हाय. थोडा येळ काढाल का माझ्यासंग यायला?

सुभान : अग हे हंगामाचं दिवस, सगळी शेतं तरारलीत. पुढचे ५-६ दिवस शेतीकामातून एक मिनिटाची पुरसत न्हाय बग. तू असं कर ना. आपली आपली एकटीच जातेस का? उशीर नको.

चंदा : मी आले जाऊन गावच्या हेल्थ सेंटरमध्ये.

सुभान : मग काय म्हणाले इथले डॉक्टर.

चंदा : कायबी बोलले नाहीत ते. औषधंही नाही दिली. छातीचे थ्री डी एक्स रे काढायला सांगितले. शेरात जावं लागेल, त्या करता.

सुभान : हम्म SSS, विचारतो वैंकय्याला. अर्ध्या दिवसाची सुट्टी आणि थोडा ॲडवान्स मिळला तर. कठीणच दिसतय सगळं.

**दृश्य पाचवे**

(पुन्हा फार्मवरचा सीन. चंदा कशीबशी ३ टोपल्या भरुन फार्महाऊसवर आणतेय. वैंकय्या त्यातील काही विड्यांचे सॅम्पलिंग करतो. थू थू करत चघळतो. काही काही फेकतो. काहींचा नाकाने वास घेतो. चंदाकडे बघून ओरडतो.)

वैंकय्या अण्णा : अग निष्काळजी बये! ही काय पध्दत झाली तुझ्या कामाची? तू माझ्या पाचशे रुपयांच्या तंबाखू, दोरा, पॅकींग मटेरिअलचं नुकसान केलंस. कोण भरुन देणार ते? तुझा बाप? (जोराने समोरील टोपल्या लाथाडतो.)

चंदा : भाऊ, नको लाथाडूस, नको टाकूस तो माल, मी, मी पुन्हा भाजून, कडक खुशखुशीत करीन, त्या विड्या.

वैंकय्या अण्णा : म्हणे खुशखुशीत कडक करेन, आणि काय ग, जाळ करायला, तवा गरम करायला, विटांची भट्टी लावायला, शेणाच्या गोव-या करता लागणारा पैसा आणणार आहेस कुठून? तुला माहीत आहे, चांगली ४-५ दिवस उन्हात वाळवायला लागतात ती पानं, पण नाही! सगळीकडेच कामचलाऊपणा, एकदाचं डफरावून द्यायचं का, झालं! कामचुकार!

चंदा : नाही नाही तसं नाही भाऊ, बादलीत एकदिस जास्त राहिली ती पानं. डोळा लागला, अक्सीर औषधाचा, परिणाम हाय तो. ग्लानीतच वळल्या विड्या.

वैंकय्या अण्णा : तेच तर म्हणतोय मी चंदे, अग वय झालं तुझं. निवृत्ती घे कामातून, अन बस शांत घरी.

चंदा : निवृत्ती? म्हातारीSSS न्हाय! न्हाय.. अजून मला माझ्या पोराचं लगीन करुन द्यायचं हाय. बारावीला हाय, फुडल्या वरसाला करीन त्याचं लगीन.

वैंकय्या अण्णा : पुढच्या वर्षाला का, या वर्षीच कर की. नवीन सून आण की यंदा घरी.

चंदा : भाऊ थोडी उचल हवी होती. हॉस्पिटलचं बील भरायचं हाय...

वैंकय्या अण्णा : ए चल, अग हरामखोर! या खराब झालेल्या मालाचे आणि तंबाखूचे पाचशे रुपये मी तुझ्या रोजगारीतून कापले तर तूच माझे २५७ रुपये देणं लागशील. उचल काय, थांब तुझी फुल ॲन्ड फायनल सेटलमेंटच करतो. (खिशातून हिशोबाची वही काढतो. खरडतो. पॅन्टच्या खिशातून काही नोटा आणि नाणी काढून तिच्या हातात कोंबतो.) "रुपये त्रेचाळीस आणि नवे पैसे ७५" - (चंदा रुपये घेऊन टोपल्यांवर कोसळते. सगळ्या टोपल्यांतील माल जमिनीवर इतस्तत: पसरतो. तिची पैसे, माल आणि विड्या गोळा करण्याची धडपड चालूच. मागून सायरन - ॲम्ब्युलन्सचा आवाज. रक्ताची उलटी होऊन चंदा आडवी पडते. निष्प्राण...

**- समाप्त -**

**डॉ. मिलिंद विनोद -** मुंबई - मो. नं. ८८२८८३९१५८



## कविता - व्योम व्यथांचे - श्री शरद कुलकर्णी



व्योम व्यथांचे व्यापक,

कसे पहावे दिठीत

वाट पहाण्याचे सुख,

नाही प्रत्यक्ष भेटीत......



वारा वाहतो प्रछन्न,

गूढ संदेश घेऊन

आश्वासक पावसाचे,

घन नभात भरून......

चिंब भिजावे धारांत,

व्हावे आतुर मनस्वी.

झटकून पाने पाणी,

वृक्ष सहिष्णू तपस्वी......

रेंगाळत्या पावसाचे,

यावे फुलांवर दव

अर्थ दुर्दम्य व्यथांचे,

व्योम मनात साठव......

**श्री शरद कुलकर्णी** - मिरज.

# कथा - दु:ख - सुश्री गौरी गाडेकर



बेल वाजली.....

बेडरूमचं दार बंद होतं. म्हणजे रात्रीची जयश्रीबाई बिझी असणार. आता मलाच उठलं पाहिजे, दरवाजा उघडायला.

स्वयंपाकाच्या सरूबाई आल्या होत्या. तेवढ्यात बेडरूमचं दार उघडलं. सरूबाई लगेच तिकडे धावल्या," काय म्हणताय आई? कशी आहे तब्येत?"

मग माझी सणकलीच." तुम्हाला माहीत आहे ना? तिला धड बोलता येत नाही. तरी रोज काय विचारत राहता -' काय म्हणता' म्हणून?"

"सॉरी, सॉरी!"

"नीट मराठीसुद्धा बोलता येत नाही. आणि हे 'सॉरी, सॉरी' कशाला?"

मग सरूबाई तर घाबरलीच, पण जयश्रीबाईही टरकली. तुझेही प्राण कंठाशी आले असणार.

त्या दिवशी अदितीचा फोन आला, तेव्हा ती म्हणाली," बाबा, उगीच चिडचिड करू नका. त्या बायकांना सांभाळून घ्या. त्या यायच्या बंद झाल्या, तर आईला सांभाळायची सगळी जबाबदारी तुमच्या एकट्यावरच येणार. मी काय, दादा काय - आम्ही दोघंही साता समुद्रापार...."

हल्ली का कोणास ठाऊक, पेपर उघडला, की पहिली नजर नाटका-सिनेमांच्या जाहिरातीकडे वळते. तुला नाटका-सिनेमाची खूप आवड. तसं बघितलं तर मला फारशी आवड नव्हती. अर्थात तुझ्याबरोबर नाटका-सिनेमाला जायला मी कधी नकार दिला नाही. तशी तूही मला नेहमीच साथ दिलीस. तू नोकरी करत नव्हतीस. तरी मी दिलेल्या पैश्यात घरचं सगळं सांभाळणं, मुलांची शिक्षणं-छंद, आले-गेले.... सगळं व्यवस्थित मॅनेज करत होतीस. या सगळ्यांत आपल्याला सिनेमा-नाटकं बघायला पैसे उरायचेच नाहीत. पण तुझ्या, माझ्या आणि आपल्या लग्नाच्या वाढदिवशी मात्र आपण सगळे, सिनेमा नाहीतर नाटक बघायला जायचो. त्यासाठी तू वर्षभर पैसे साठवत असायचीस.

पेपर उघडला तर ' बाईपण भारी देवा 'ची मोठ्ठी जाहिरात. दणक्यात चाललाय सिनेमा. तू बरी असतीस, तर मलाही घेऊन गेली असतीस. इतर बायका जातात, तशी गॉगल लावून आणि नथ घालून गेली असतीस.

तुला स्ट्रोक आला, तेव्हा कळवल्याबरोबर अदिती आणि आरंभ दोघेही धावत आले. अर्थात इकडे पोचेपर्यंत दोन-तीन दिवस लागले. तोपर्यंत भक्तेशने सगळी धावपळ केली म्हणा, पण भक्तेशलाही स्वतःचा संसार, स्वतःचे वयस्क आई-वडील... सगळी जबाबदारी आहेच ना. नेहमी नेहमी एवढ्या लांब तो थोडाच धावू

शकणार? म्हणून तर आरंभ म्हणाला," बाबा, आईला बरं वाटलं, की तुम्ही शिफ्ट करा. मावशीच्या जवळ एखादा फ्लॅट बघू या. म्हणजे भक्तेशला जास्त त्रास होणार नाही."

मला मेहुणीच्या जवळ राहायला जाण्याची कल्पना तेवढीशी आवडली नाही. पण तुला मात्र ते पटलं. तुला तर काय सगळंच पटायचं." पाच-सहा महिने माझ्याकडे या. पाच-सहा महिने दादाकडे राहा. म्हणजे तुम्हाला एकटं वाटणार नाही," असं अदितीने म्हटल्यावर तू लगेच तयार झालीस.

तसं एकएकदा दोघांकडेही जाऊन आलो. पण मला तिकडे फारसं आवडलं नाही. कंटाळाच यायला लागला नंतर नंतर. तू काय स्वयंपाकात, मुला-नातवंडांत बुडून गेलेली असायचीस. पुढच्या वर्षी त्यांचं आमंत्रण आल्यावर मी सरळ 'नाही' म्हणून सांगितलं. तू खूप हिरमुसलीस. माझी समजूत घालायचा प्रयत्न केलास. पण शेवटी मुलांना सांगितलंस," आमचं राहू दे. तुम्हीच येत जा आम्हाला भेटायला."

मग नातवंडांच्या सुट्या बघून मुलं यायची. ती येणार म्हटलं, की तुझ्या पायांना भिंगरी लागलेली असायची. ती परत जाताना काय काय करून, नाहीतर विकत आणून त्यांना द्यायचीस.

यावेळी मात्र अदिती आणि आरंभ दोघंच आले. तुझं हॉस्पिटल... त्यांनीच आळीपाळीने सांभाळलं. अदितीने स्वयंपाकासाठी बाई बघितली. तिला आपल्या पद्धतीचा स्वयंपाक शिकवला. तू घरी आल्यावर तुझी शुश्रूषा करायला दिवसाच्या आणि रात्रीच्या बायकांची व्यवस्था केली, एका ब्युरोकरवी.

तुला डिस्चार्ज मिळाला आणि आरंभ परतला. नंतर दोन-तीन दिवस थांबून, सगळं शेड्युल मार्गी लावून आदितीही आपल्या घरी परतली.

तसं सगळं व्यवस्थित चाललंय, याची खात्री दोन्ही मुलं फोनवरून करून घेत होती. म्हणायला गेलं, तर माझ्यावर काहीच पडलं नव्हतं. पण शेवटी सगळं मलाच करून घ्यावं लागत होतं ना. तिन्ही बायांना दारं उघडा. कोणी आली नाही, तर ब्युरोला फोन करून सबस्टिट्युट मागवा. तेच मला पुरे होत होतं.

"बाबा, तुम्ही तुमच्या तब्येतीला सांभाळा." …" रोज वॉकला जात जा."‥" सकाळी लाफ्टर क्लबला जात जा. नियमितपणे." मुलं फोनवर सांगत असायची.

सुरुवातीला मी जायचो नियमित. पण मी फिरायला म्हणून बाहेर पडलो, की तू अस्वस्थ व्हायचीस. तुला काहीतरी व्हायला लागायचं. मग बाई लगेच मला फोन करायची," काका, लवकर घरी या. काकींना....." मग मीही भराभरा चालत, अधूनमधून धावत, धापा टाकत घरी यायचो. वाटेत भेटणारे सगळे"अहो, सावकाश चाला"," पडाल-बिडाल कुठे"," धावताय कशाला? वहिनींचं जास्त झालं का?" असं विचारून डोकं उठवायचे. एरव्हीसुद्धा जो भेटतोय तो," मिसेस कशा आहेत?"" सुधारणा आहे ना?"‥ रोज रोज उत्तरं तरी काय देणार? नंतर नंतर लोकांचा राग यायला लागला. मग हळूहळू कमी करत करत बाहेर जायचाच बंद झालो. तेव्हा अगदी काळजीचा आव आणणारे लोक आता फिरकतसुद्धा नाहीत. भेटतात कोण, तर ही तीन तोंडं. त्यामुळेच तर चिडचिड होते ना माझी!

सरूबाईंनी चहा, उपमा आणून दिला.

" हे काय? पोहे, नाहीतर उपमा.... तुम्हाला दुसरं काही बनवता येत नाही?"

" दुसरं काही म्हणजे काय बनवू?"

" मला नाही माहीत. नेहमी हीच ठरवायची, काय बनवायचं ते."

मग थोडा वेळ विचार करून तीच म्हणाली," तुम्हाला इडली, डोसा, थालीपीठ चालेल?"

मी"हो" म्हटलं.

" मी बनवत जाईन."

अशा साध्या साध्या प्रश्नांची उत्तरंही का येत नाहीत मला? कारण तू! तू कधी विचारच करायला लावला नाहीस मला." यांना चहासुद्धा करता येत नाही," म्हणून कौतुक करत राहिलीस. ते शिकवण्याचं काही डोक्यात आलं नाही तुझ्या. आपण अगदी आदर्श गृहिणी, आदर्श पत्नी, आदर्श माता आहोत, याचाच अभिमान मिरवत राहिलीस तू.

मध्यंतरी तुला अशक्तपणा आला होता. तू भराभरा जेवायचीस. कदाचित कमी जेवत असशील, पण तेव्हा माझ्या ते लक्षातच आलं नव्हतं. तर मी आरामात जेवायचो. तू मला सांगायचीस," जरा मागचं तुम्हीच वाढून घ्या आणि सगळी भांडी झाकून ठेवा. मी जरा वेळ पडते. मग उठून मागचं आवरेन." तर ते भांडी झाकून ठेवायचं काम मला करावं लागायचं. तू नंतर उठून माझं ताट घासायला टाकायचीस. भांडी वगैरे आवरून टेबल-ओटा पुसायचीस.

कधीकधी मला माझीच लाज वाटते. तुझ्याऐवजी मी आजारी असतो, तर तू किती मायेने, काळजीने माझं केलं असतंस. तुझं शेड्युलच बदलून गेलं असतं. मागे मला टायफॉइड झाला, तेव्हा तू रात्री तीन-चारदा उठून माझं टेम्परेचर बघायचीस. ताप वाढला असेल, तर कपाळावर मिठाच्या पाण्याच्या घड्या घालत बसायचीस. ताप उतरल्याची खात्री करूनच मग झोपायचीस. एवढं सगळं करून सकाळी नेहमीच्या वेळी उठायचीस. सकाळच्या शाळेत जाणा-या मुलांची तयारी, त्यांचे डबे, स्वयंपाकपाणी, माझं पथ्याचं जेवण... सगळं करायचीस. मला त्यात विशेष काही वाटलंच नाही. मी नेहमीच तुला गृहीत धरत आलो.

लवकर बरी हो बघू तू. पूर्वी कधी सर्दी-ताप आला, की गोळ्या घेऊन दुपारी झोपायचीस आणि मी ऑफिसातून यायच्या वेळी ठणठणीत होऊन कामाला लागायचीस.

आताच काय झालंय मग? मला वाटतं, तुझी विलपॉवर कमी पडत असणार. विलपॉवर वाढव. स्वतःला सांग, ' पुरे झालं आजारपण. आता मी ठणठणीत होणार आणि पुन्हा माझ्या पायांवर उभी राहणार. पूर्वीसारखं घर सांभाळणार. '

त्या दिवशी मी प्रयत्न केला, तुला हे सांगायचा. पण जयश्रीबाई माझ्याचकडे विचित्र नजरेने बघायला लागली. मग मी बोलता बोलता गप्पच झालो. सीतेसारखा एका ना एका बाईचा पहाराच असतो तुझ्यावर.

मला मात्र या असल्या आयुष्याचा कंटाळा आलाय. घराचं अगदी हॉस्पिटल झालंय. अख्ख्या घरभर आजाराचा वास भरून राहिलाय.

" काका, लवकर या," महिमाबाईने घाब-या घाब-या हाक मारली," डॉक्टरांना बोलवा. काकी कसंतरीच करताहेत."

मी डॉक्टरांना फोन लावला.

पण मला धडकीच भरली. आता पुन्हा हॉस्पिटलच्या फे-या सुरू होणार. तशी दोन्ही मुलं येतीलच म्हणा. त्यामुळे मला जास्त धावाधाव करावी लागणार नाही. शिवाय पैशांचंही तेच बघतील.

मी आरंभला फोन लावणार, एवढ्यात डॉक्टर आले. तुझी नाडी बघितली, पापण्या वर करून बघितल्या, बीपी बघितलं.....

" डॉक्टर, हॉस्पिटलमध्ये ॲडमिट..."

" नाही. त्याचा काही उपयोग होणार नाही. शी इज नो मोअर."

आता स्वतःशी कबूल करायलाही लाज वाटते, पण तेव्हा क्षणभर सुटकेची भावना मनात दाटून आली. दुस-याच क्षणी मी भानावर आलो.

" मुलांना कळवा. फोन द्या. मीच कळवतो," डॉक्टर म्हणाले.

मी सोफ्यावर बसकण कधी मारली, ते मलाच कळलं नाही.

" शेजारी सांगू का?" महिमाबाईने विचारलं आणि माझ्या उत्तराची वाटही न बघता ती घराच्या बाहेर पडली.

भक्तेशलाही डॉक्टरांनीच कळवलं.

भक्तेश म्हणाला -" मुलं येईपर्यंत बॉडी मॉर्गमध्ये ठेवू या."

मी 'हो', ' नाही' काहीच नाही बोललो.

नातेवाईक, ओळखीचे, शेजारपाजारचे... रोज कोणी ना कोणी येतच होते. अदिती तर अख्खा दिवस रडतच असायची. घरभर मृत्यूची छाया भरून राहिली होती. नाही म्हटलं, तरी एकेक दिवस जात होता, तसतशी दुःखाची तीव्रता कमी होत होती. रात्री झोप आली नाही, की मनात वेगवेगळे विचार येत होते.

आपण पूर्वी प्लॅनिंग करत होतो, मी रिटायर झाल्यानंतर आपण कुठे कुठे फिरायला जायचं... पर्यटनाला. आधी भारतातच वेगवेगळ्या ठिकाणी. नंतर वेगवेगळ्या देशांत. त्यापैकी मुलांकडे गेलो, तेव्हा अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया झालं. नंतरही मुलं पुन्हा बोलावत होती. तुला त्यांच्याकडे जाण्यात जास्त इंटरेस्ट होता. माझं मात्र एकेकदा जाऊनच समाधान झालं. त्यामुळे मला इतर ठिकाणं बघायची होती. आपल्या या मतभेदात

तीन-चार वर्षं कधी गेली, कळलंच नाही. त्यात मध्ये तो करोना आला. मग तुझं आजारपण सुरू झालं. मी नेहमी तुला सांगत असायचो,” तू मनावर घेतलंस, तर तुला पटकन बरं वाटेल. मग आपण जाऊ या.” पण तुला मनावर घ्यायचंच नव्हतं. त्यामुळे मीही घरातच अडकलो.

तू गेल्यानंतरच्या आठव्या की नवव्या रात्री मी ठरवून टाकलं, तुझे दिवस वगैरे आटोपल्यावर मुलं आपापल्या घरी जातील. मग आपण फिरायला सुरुवात करायची. कुठच्या तरी टूरबरोबर जायचं, म्हणजे एकटेपणा वाटणार नाही. हो खरं… आमच्या ऑफिसमधला तो रामन एकटाच फिरत असतो. त्याला विचारलं पाहिजे. त्याची सोबत मिळाली तर बरं. तसं ऑफिसमध्ये असताना आपलं त्याच्याबरोबर तितकंसं पटायचं नाही. पण आता आपल्याला गरज आहे, म्हटल्यावर…… कदाचित तोही सुधारला असेल.

मी आझाद पंछी झाल्यासारखं मला वाटायला लागलं. आता माझ्या पायात कोणत्याच बेड्या नव्हत्या. आता साठवलेल्या पैश्यांचा व्यवस्थित उपभोग घ्यायचा. आणि जगभर फिरायचं.

तेराव्याच्या दुसऱ्या दिवशी आरंभ सकाळी लवकर उठून कुठे तरी गेला. परतेपर्यंत रात्र झाली. बराच वेळ त्याचं आणि अदितीचं खुसूपुसू चाललं होतं.

जेवणं झाल्यावर मागचं आटोपून अदिती बाहेर आली, तेव्हा आरंभने सुरुवात केली,” बाबा, आई मला नेहमी सांगायची - मला काही झालं, तर बाबांची काळजी घ्या. त्यांना चहासुद्धा करता येत नाही.”

"माझ्या किंवा दादाच्या घरी न्यायचं म्हटलं, तर तुम्हाला तिथे करमत नाही.”

"म्हणूनच आम्ही ठरवलं, पुण्याला 'आपली माणसं ' म्हणून एक संस्था आहे. रेग्युलर ओल्ड एज होम्स असतात, तशी अजिबात नाही. माझ्या एका मित्राचे वडील आहेत तिकडे. खूप छान व्यवस्था आहे. मनापासून काळजी घेतात ते. प्रत्येकासाठी वेगवेगळ्या रूम्स आहेत. काही कपल्सही आहेत. तिकडे सगळं चांगलं आहे, असं त्याने सांगितलं. तरीही खात्री करून घेण्यासाठी मी स्वतः जाऊन बघून आलो. मला आवडलं, म्हणून पैसेही भरून आलो. आपली ही जागा आपण भाड्याने देऊ या. भाडं तुमच्याच खात्यात जमा होत राहील. त्याचं रजिस्ट्रेशन वगैरे झालं, की आपण पुण्याला जायला निघू या. आम्ही दोघंही तुम्हाला तिथे सोडायला येतो. तुम्ही एकदा तिकडे रुळलात, की आम्ही परत जायला मोकळे.”

तुझ्या जाण्याचं दुःख मला झालं होतं. इतक्या वर्षांच्या सहजीवनानंतर तू मला सोडून गेलीस. मी एकटा झालो, याचं नक्कीच वाईट वाटत होतं. पण तरीही, खरं सांगतो, मुलं आता मला त्या संस्थेत डांबणार म्हटल्यावर मात्र मला तुझ्या मृत्यूचं मनापासून दुःख झालं. अगदी आकाश कोसळल्यासारखं वाटलं.

**सौ. गौरी गाडेकर -** 1/602, कैरव, जी. ई. लिंक्स, राम मंदिर रोड, गोरेगाव(पश्चिम), मुंबई 400104 फोन नं. 9820206306

## लेख :"दीड हजार नातवंडांचा 'श्रीमंत' आजोबा!" - श्री संभाजी गायके



त्याने खरं तर या दीड हजारांपैकी कुणाच्याही आई किंवा वडिलांना जन्म दिलेला नव्हता. तरीही तो त्यांचा आजोबा, पणजोबा लागत होता!



ब्रिटनमध्ये स्थायिक झालेल्या जर्मन-ज्यू पालकांच्या पोटी १९०९ मध्ये जन्मलेला तो.. म्हणजे निकोलस विन्स्टन, स्वत:च्या आयुष्यात अत्यंत सुखवस्तू होता. वयाच्या एकोणतीसाव्या वर्षी त्याने आपल्या व्यवसायात उत्तम प्रगती साधली होती. सुटीसाठी चक्क परदेशी जाण्याची चैन त्याला सहज परवडू शकत होती. १९३८ मध्ये असाच तो स्कीईंग खेळाचा आनंद घेण्यासाठी स्वित्झरलँडला निघालाही होता. पण इतक्यात त्याला झेकोस्लोवाकियामध्ये एका महत्त्वाच्या सामाजिक कामात मश्गूल असलेल्या त्याच्या मित्रांचा, म्हणजे मेरी स्कोल्म्का आणि डेरेन वॉरीनर यांचा निरोप आला. सुट्टीवर जाण्याचा बेत रद्द करून निकोलस झेकोस्लोवाकियाच्या प्राग शहराकडे निघाला.



दुस-या महायुद्धाची गडबड उडाली होती. युद्ध अजून अधिकृतपणे जाहीर झालेलं नव्हतं... पण हिटलरकडून एकतर्फी सुरू मात्र झालं होतं... अडॉल्फ हिटलर वेगाने एक एक देश पादाक्रांत करीत आगेकूच करीत होता. त्याचे मुख्य लक्ष्य असलेल्या ज्यू लोकांचा नायनाट करण्याचा चंगच त्याने बांधला होता. आणि त्याचे गेस्टापो हे तर त्याच्याही पुढे होते ज्यूंची अमानुष कत्तल करण्यात. गेस्टापो म्हणजे Geheime Staatspolizei या जर्मन शब्दाचं संक्षिप्त रूप. ग़ेहायमं स्टाटझपोलित्झाई! GeStapo. ग़ेहायमं म्हणजे गुप्त.

झेकोस्लोवाकियामध्ये जर्मन सैन्य कधीही घुसण्याची शक्यता होती. येथे राहणा-या ज्यू लोकांसाठी ही धोक्याची घंटाच होती. पण इतक्या मोठ्या संख्येने दुस-या देशात पळून जायचं तरी कसं? कोणता देश इतके शरणार्थी स्विकारण्याची तयारी दाखवणार? पण तरीही ब्रिटनची शरणार्थी साहाय्य समिती तिथे नाझी लोकांपासून असलेला जीवाचा धोका पत्करून काम करीत होती. त्यात प्रामुख्याने ट्रेव्हर चॅडविक, ब्रेट्रीस वेलिंग्टन, वॉरीनर हे आघाडीवर होते. हे जांबाज, मानवतावादी शूर लोक, जर्मन फौजा झेकोस्लोवाकियामध्ये घुसलेल्या असतानाही तिथेच तळ ठोकून होते!

निकोलस विन्स्टन झेकोस्लोवाकियात पोहोचल्यानंतर केवळ एकाच महिन्यानंतर जर्मन सैन्य इथं पोहोचलं होतं. ते पोहोचण्याआधीच निकोलस तिथून निघून ब्रिटनमध्ये आला होता. पण या एका महिन्यात त्याने झेकोस्लोवाकियातील विशेषत: ज्यू धर्मीय मुलांना ब्रिटनसह इतर देशांमध्ये शरणार्थी म्हणून पाठवण्याच्या कार्यात मन:पूर्वक भाग घेतला. त्याचं खरं काम सुरू झालं तो ब्रिटनमध्ये परतल्यानंतर. ब्रिटनमधील

नोकरशाहीला, पोलिसांना, राजकारण्यांना झेकोस्लोवाकियातील ज्यू मुलं स्विकारायला लावणं अजिबात सोपं नव्हतं. नोव्हेंबर १९३८ मध्ये जर्मनीत ज्यूविरोधी अभियान 'क्रिस्तनाट' सुरू झाल्यानंतर ब्रिटनने सतरा वर्षे वयावरील ज्यूंना काही अटींवर ब्रिटनमध्ये तात्पुरता आश्रय देण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी ज्यूंनी ब्रिटनमध्ये आपली आपण राहण्याची सोय करायची होती आणि त्यावेळचे पन्नास पौंड गॅरंटी म्हणून जमा करायचे, अशा त्या अटी. झेकोस्लोवाकियातून ब्रिटनला यायचं म्हणजे नेदरलॅन्डमधून यावं लागे. ही अशी परवानगी मिळणं दुरापास्त झालेलं होतं. डच सरकारने 'क्रिस्तनाट'मुळे ज्यूंसाठी आपल्या सीमा बंद करून टाकल्या होत्या. उलट त्यांच्या देशात सापडलेल्या ज्यूंना पुन्हा जर्मनीत धाडून दिले... मरण्यासाठी! पण निकोलस विन्स्टनने इथे आपले सर्व व्यावसायिक कौशल्य पणाला लावून ब्रिटिश सरकारकडून आवश्यक 'गॅरंटीज' मिळवल्या. काळजावर दगड ठेवून ज्यू पालक आपल्या लेकरांना परदेशी पाठवत होते... निदान आपली मुलं तरी जर्मनांच्या तावडीतून सुटतील, अशी त्यांना आशा होती. दुर्दैवाने असे अनेक पालक नाझींच्या छळाचे बळी ठरले नंतर.

निकोलसने मुलं झेकोस्लोवाकियातून रेल्वेने नेदरलॅन्डसमध्ये आणण्याची योजना आखली. त्यासाठी तेथील मेरी स्कोल्म्का, ट्रेव्हर चॅडविक, ब्रेट्रीस वेलिंग्टन, वॉरीनर यांनी पूर्वतयारी करून ठेवली होतीच. युद्ध कधीही जाहीर होऊ शकत होतं... मुलं तिथून लवकरात लवकर निसटली पाहिजेत... हीच सर्वांना काळजी लागून राहिली होती.

इकडे ब्रिटनमध्ये निकोलस विन्स्टनने आपले काम सुरू ठेवले. यात त्याच्या आईने त्याला खूप साहाय्य केले. तेथील पोलिस प्रशासनाकडून शरणार्थी मुलांसाठीच्या परवानग्या खूप दिरंगाईने मिळत होत्या. रोख गॅरंटीचा प्रश्न होताच. मागचा पुढचा विचार न करता विन्स्टनने चक्क बनावट परवानग्या तयार करून घेतल्या. या अपराधासाठी त्याला खूप मोठी शिक्षा होऊ शकली असती. पण मानवतेच्या कामासाठी त्याने हा धोका पत्करला. ६६९ मुलांसाठी विन्स्टनने त्यांना दत्तक घेण्यास तयार असणारी कुटुंबे शोधून ठेवली... त्यासाठी त्याला किती यातायात करावी लागली असेल याची कल्पनाच केलेली बरी! यासाठी त्याने चक्क एक वृत्तपत्रच प्रकाशित करायला सुरुवात केली.. त्यात तो या मुलांची छायाचित्रे छापत असे आणि लोकांना या मुलांना दत्तक घेण्याचे आवाहन करीत असे. त्याने थेट राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. पण फारसा उपयोग झाला नाही. जर रूझवेल्टनं मनावर घेतलं असतं तर आणखी दोन हजार मुलं आली असती ब्रिटनमध्ये! पण शेजारच्या स्वीडन देशाने मात्र अनेक मुलं स्विकारली! जगातली सर्वांत जास्त मुलं अजूनही स्वीडनमध्ये दत्तक म्हणून जात असावीत!

डोरीन वॉरीनर, ट्रेवर चॅडविक, निकोलस स्टॉपफोर्ड, ब्रेट्रीस वेलिंग्टन, जोसेफाईन पाईक, बिल बॅराझेटी इत्यादी कार्यकर्त्यांच्या मदतीने जमतील तेवढी मुलं रेल्वेनं धाडण्यात आली. कसं असेल ते दृश्य..... शेकडो पालक आपल्या लहानग्यांना निरोप द्यायला स्टेशनवर जमा झालेले... मुलांना वाटतंय की आपण सुट्टीसाठी निघालोय... पालकांना वाटतंय की युद्धाचं संकट येणार नाही.... आणि रेल्वेच्या वाफेच्या इंजिनांनी काळा धूर ओकायला आरंभ केलाय.... मुलं निघालीत! यातल्या अनेकांचे पालक त्यांना पुन्हा कधीही भेटणार नव्हते!

तीन रेल्वे झेकोस्लोवाकियातून निघू शकल्या... प्राग स्टेशनमधून.... ६६९ मुलांना घेऊन. आज एक सप्टेंबर १९३९. लहान मुलांनी खचाखच भरलेली ही रेल्वे सुद्धा थोड्याच वेळात मार्गस्थ होईल... आणि इतक्यात गेस्टापोंनी लाल सिग्नल दिला.... जर्मन सैन्याने ताबा घेतला होता रेल्वे स्टेशनचा. आता यापुढे कुणीही कुठं जाऊ शकणार नव्हतं... आणि जाणार असेलच तर छळ छावण्यांमध्ये... विषारी वायूने भरलेल्या तळघरांमध्ये, श्रमशिबिरांमध्ये किंवा अघोरी वैद्यकीय प्रयोगशाळांमध्ये... मानवी प्रयोगसाहित्य म्हणून.... ही शेवटची रेल्वे तिथून कधीच निघाली नाही त्या मुलांना घेऊन.. या रेल्वेत २५० मुलं होती... पुढे झालेल्या छळसत्रात यातील फक्त दोनच मुलं जगली! वर उल्लेख केलेल्या लोकांनी प्रयत्न नसते केले तर आधी तिथून निसटू शकलेल्या ६६९ मुलांची काही फार वेगळी गत नसती झाली... असं मानायला वाव आहे!

निकोलस विन्स्टनने खरं तर प्राग रेल्वे स्टेशनमध्ये कधीही पाय ठेवला नव्हता... पण आज त्याच स्टेशनवर त्याचा पूर्णाकृती पुतळा आहे... एका शरणार्थी मुलाला कडेवर घेतलेल्या अवस्थेत!

... दुसरं महायुद्ध महाभयानक परिणाम मागे ठेवून संपुष्टात आलं. निकोलस विन्स्टन आपल्या व्यवसायात गुंतले. त्यांचा ग्रेट जेल्स्ट्रेप यांच्याशी विवाह झाला, तीन अपत्ये झाली. त्यातील एक जन्मत:च मानसिक व्यंग असलेलं निघालं. त्याला एखाद्या दवाखान्यात दाखल करण्याऐवजी आपल्या घरातच त्याला उपचार मिळावेत म्हणून निकोलस यांनी स्वत:च एक रूग्णालय सुरू केलं. सहा वर्षांत त्यांचा हा लेक निवर्तला. पण हिंमत न हारता निकोलस यांनी नंतरही शरणार्थी, वृद्ध लोकांसाठी काम सुरू ठेवलं.... कित्येक वर्षे निघून गेली मध्ये. ६६९ मुलं आता मोठी झाली असतील... नव्हे झालीच होती. त्यांपैकी अनेकांना आपले झेकोस्लोवाकियामधले माता-पिता कोण आहेत, हे समजू शकलं नव्हतं!

पन्नास वर्षे निकोलस यांचं काम लोकांपासून अनभिज्ञ राहिलं. त्यांनी फक्त एकदा एका निवड्णूकीत त्यांच्या या कामाचा ओझरता उल्लेख केला होता, पण ते काही कुणाच्या फारसं लक्षात नाही आलं. आणि निकोलस यांनाही प्रसिद्धीचा तसा सोस नव्हताच मुळी! .... पण त्यांच्या पत्नीला त्यांच्या अडगळीच्या खोलीत एक वही सापडली.... ६६९ मुलांची नावे, छायाचित्रं, त्यांना कोणी दत्तक घेतलं, कधी दत्तक घेतलं, याची तपशीलवार नोंद होती त्या वहीत... जणू चित्रगुप्तचा खजिनाच! ग्रेट यांनी ही वही बीबीसी च्या एका वार्ताहराकडे सोपवली. याची निकोलस यांना कल्पनाही नव्हती. आपण इतक्या मुलांना नवजीवन देण्याच्या मोहिमेत सहभागी असल्याचे ते तसे विसरूनही गेले होते!

एके दिवशी बीबीसी दूरदर्शनवर एक कार्यक्रम घेतला. त्यात निकोलस विन्स्टन यांना भलतंच काही कारण सांगून आमंत्रित केलं. कारण ते युद्धाविषयी, त्यांच्या इतर कार्याविषयी व्याख्यानं देत असत अधून मधून. कार्यक्रम सुरू झाला... विषय होता ज्यू मुलांच्या सुटकेचा आणि विन्स्टन यांनी त्यात बजावलेल्या भूमिकेचा! तरीही निकोलस शांत होते! निवेदिकेने, ईस्थर रॅन्ट्जेनने, सभागृहात बसलेल्या शेकडो लोकांना विचारले.. तुमच्यापैकी झेकोस्लोवाकियामधून ब्रिटनमध्ये त्या रेल्वेतून आलेले कुणी आहेत का.... वीस बावीस लोक उभे राहिले... तिने पुढे विचारले तिथून आलेल्या त्या मुलांची नातवंडे, पतवंडे इथे आलेली आहेत का... उरलेला सर्व श्रोतृवर्ग उठून उभा राहिला...! निकोलस विन्स्टन एकदम आश्चर्यचकित आणि सदगदित झाले!


१९३८ ते १९८८... अर्ध्या शतकाचा काळ! ६६९ पैकी अनेक मुलं चांगल्या कुटूंबात वाढली, मोठी झाली, त्यांची लग्नं झाली... त्यांना मुलं झाली आणि त्यांच्या मुलांनाही मुलं झाली... ही संख्या जवळपास दीड हजार भरली! निकोलस विन्स्टन हे या एवढ्या मुलांचे आजोबा, पणजोबा ठरले!

'सर' सारखी उपाधी मिळवून, तसेच असे अनेक मानसन्मान मिळवून, तारुण्यात ब्रिटीश एअरफोर्समध्ये लढाऊ वैमानिक म्हणून सेवा बजावलेला हा माणूस एकशे सहा वर्षांचे प्रदीर्घ आणि समाधानी आयुष्य जगला. आणि १ जुलै, २०१५ ला शांत झोपेत असताना जग सोडून गेला!

एका बाजूला लाखोंचं शिरकाण घडवून आणणारा हिटलर असला, तरी दुस-या बाजूला शेकडो जीव वाचवण्याच्या कार्यात स्वत:ला झोकून देणारे निकोलस विन्स्टन सारखे देवदूतही असतात! यासारख्या देवदूतांमुळेच हे जग सुंदर होऊ शकलं हेच खरं! ...


(चांगल्या माणसांबद्दल सांगावं म्हणून हा लेखन प्रपंच!)

**श्री संभाजी बबन गायके** - पुणे मो. 9881298260



## पुस्तक परिचय - एका कोंबड्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य - सौ. वंदना हुळबत्ते





**कादंबरी--** एका कोंबड्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य

**लेखक--** श्री. नामदेव माळी

**प्रकाशक--** साधना प्रकाशन

**किंमत--** १२५ रू

**पृष्ठ संख्या--** ९२

**...... बालमनात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे बीज रुजवणारी कादंबरी......**

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. भाग एक अभ्यासक्रमासाठी नामदेव माळी यांच्या" एका कोंबड्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य" या कांदबरीची निवड करण्यात आली आहे ही अभिमानास्पद गोष्ट आहे. बालकुमार गटाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याची ओळख होण्यासाठी ही कांदबरी उपयुक्त ठरते.

मानव नेहमी आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी जागरूक असतो. आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी त्याची संघर्षाची तयारी असते. जसे मानवाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गरज असते तशीच पशुपक्ष्यांनाही अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गरज असते, हे अधोरेखित करणारी ही कांदबरी आहे. एका कोंबड्यांच्या अभिव्यक्ती-स्वातंत्र्यावर घाला घातला जातो, तेव्हा त्याचे स्वातंत्र्य परत मिळवून देण्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रयत्न केले गेले? त्यात कोणत्या, कश्या अडचणी आल्या? त्यावर मात कशी केली? हा या कादंबरीचा मध्यवर्ती आशय आहे.

शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात घरोघरी मोठ्या प्रमाणात कोंबड्यांचे पालन होते. ते कोंबड्यांवर जीवापाड प्रेम करतात. या कादंबरीतील आजीचे गब्रूवर असेच प्रेम आहे. गौरवला गब्रू आवडू लागतो. या गब्रूच्या आरवण्यामुळे शेजाऱ्यांची झोपमोड होते, अशी तक्रार ते करतात. तेव्हा गब्रूच्या अभिव्यक्ती- स्वातंत्र्यावर गदा येते. गब्रूच्या बाजूने आवाज उठविण्यासाठी सृजन कट्ट्यावरील मुले उभी राहतात. ते प्रयत्न करत असताना, लेखकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे काय? त्याची गरज काय? हे विशद केले आहे. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी कसे प्रयत्न केले पाहिजेत? विषयाची मांडणी कशी केली पाहिजे? या साऱ्या गोष्टींचा उहापोह या कादंबरीतून केला आहे. ' एका कोंबड्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य ' या कांदबरीचा खरा हीरो तर गब्रू कोंबडा आहे. कादंबरीचे कथानक कोंबड्यांभोवती घडते.

मुलांचे हात लिहिते ठेवण्यासाठी अखंड कार्यरत असणारे एक व्यक्तिमत्व म्हणजे माननीय श्री. नामदेव माळी. शैक्षणिक क्षेत्रात गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, सहायक संचालक पदावर ते कार्यरत होते. त्यांनी नेहमी मुलांना प्रोत्साहित करून, वेळोवेळी मार्गदर्शन करून, त्यांच्याकडून सकस लिखाण करून घेतले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांच्या उत्साहात कमी झाली नाही. आजही मुलांच्यात वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम ते राबवत आहेत. या उपक्रमातून मुले नक्की लिहिती होतील हा त्यांचा विश्वास आहे.

'एका कोंबड्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य'ही कादंबरी सोप्या भाषेत आहे. मुलांच्या अभिव्यक्तीला प्रेरणा देणारी आहे. कांदबरी साधना प्रकाशनाने प्रकाशित केली आहे. या कांदबरीचे मुखपृष्ठ गिरीश सहस्रबुद्धे यांनी अतिशय समर्पक केले आहे.

लेखकांनी मुलांचे भावविश्व लक्षात घेऊन या कादंबरीचे लेखन केले आहे. गौरवचे बहाद्दूरमध्ये झालेले रूपांतर रंजक आहे. मुलांचे कुतूहल जागृत करणारे आहे. पानोपानी उत्सुकता वाढवणारे प्रसंग आहेत. कादंबरीची भाषा सोपी आहे. लेखकाचे बालमानसशास्त्र चांगले आहे. पशुपक्ष्यांना समजून घेण्याची उत्सुकता मुलांना असते, पशुपक्ष्यांचे भावविश्व, त्यांचे विचार, समजुती-गैरसमजुती, याबद्दल सविस्तर चर्चा या कादंबरीत आहे. गौरव व त्याचे सृजन कट्टयावरील मित्र, आजी, मार्गदर्शक शिक्षक यांच्या संवादातून ही कादंबरी उलगडत जाते.

अभिव्यक्त कसं व्हावं याचं प्रशिक्षण काही वेळेस मिळते, पण अभिव्यक्तीवर बंधने आली तर काय करावं हे सांगितले जात नाही. तो उपाय कादंबरीतून सांगण्याचा प्रयत्न केला आहे असे वाटते.

'दुसऱ्याच्या सुतळीच्या तोड्याला हात लावू नये.'

'नमून वागावं पण लाचार होऊ नये.'

'मानानं पान खावं.' - या सारखी अनेक सुवचने आजीच्या तोंडी आहेत. त्यातून लेखक सहज संस्कार करतात.

केवळ शाळेत जाऊन अभ्यास होतो असे नाही. अभ्यास तर घरात, समाजात, निसर्गातही होतो. एके ठिकाणी लेखक म्हणतात... 'चार भिंतींच्या आत मुलांना शिकवणं म्हणजे मुलांना खुराड्यात कोंडल्यासारखं आहे. ' शाळा, परीक्षा, गुण, शिकणं, यावर सविस्तर चर्चा केली आहे. या कांदबरीतून खऱ्या शिक्षणाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. बालकांबरोबर मोठ्यांनाही ही कादंबरी दिशा देते. ही कादंबरी जरूर वाचली पाहिजे. समजून घेतली पाहिजे.

मुलांच्या मनाची अशी मशागत करणारा माळी मिळाला की फळा-फुलांनी बाग बहरून येणार हे निश्चित.


**पुस्तक परिचय - सौ. वंदना हुळबत्ते -** सांगली मो. ९६५७४९०८९२

## कविता - कंठातील गीत - डॉ. निशिकांत श्रोत्री



कंठातुन गीत निनादावे
जग धुंद होऊनी डोलावे
सूरसाज अंबरी विहंगता
आनंदे व्योम खिदळावे ||धृ|

माझिया मनात सुख विहरो
दु:खाची लहर वा लहरो
परी सूर कधी ना कंपावे
जग धुंद होऊनी डोलावे ||१||



या जगताने दिधले बोल
या जगताने दिधला ताल
गीताने त्यांना रिझवावे
जग धुंद होऊनी डोलावे ||२||

झंकार माझिया ह्रदयाचे
गीतात तरळुनीया यावे
नयनांतिल अश्रू होऊनिया
ओघळून गाली ना यावे ||३||

स्वर आर्त अंबरी गुंजावे
भावांनी ओथंबुनी गावे
पाषाणह्रदयी नयनातुनी या
भावाश्रू तरळुनी जावे ||४||

पीडेने व्याकूळ झालो तरी
नजरेत न तरळो कधी परी
कधी सूर असे ना मी गावे
आसू डोकावुनीया जावे ||५||

**डॉ. निशिकान्त श्रोत्री** एम. डी., डी. जी. ओ. - मो ९८९०११७७५४

## कथा -"घुसमट" - श्री व्यंकटेश देवनपल्ली



आज शनिवार असल्याने सकाळपासून क्षणाचीही उसंत म्हणून नव्हती. नंदिताताईने स्वत:हूनच घराची सगळी जबाबदारी अंगावर घेतली होती. मुळात त्यांना इतरांनी केलेले काम आवडायचे नाही. मग स्वत:लाच भोगावे लागतात आपल्या अति काटेकोर अन शिस्तशीर स्वभावाचे दुष्परिणाम. पण नंदिताताईंना तसे वाटत नाही. त्या सगळं मनापासून करतात.

एवढे करूनही एकाच गोष्टीचे दु:ख होते त्यांना. ते म्हणजे त्या बयेचे उद्धट बोलणे. सासू म्हणून कसलाच आदर नाही. त्याही गोष्टीकडे त्या दुर्लक्ष करायला शिकल्या आहेत.

आज अधिकच अगतिक झाल्यासारखे वाटत होते. बसल्या बसल्या मनात विचार सुरू झाले... रोज किती वेळा मी 'जाऊ दे' म्हणत असते. दोन वर्षापूर्वी अनंतरावांचं निधन झाल्यापासून माझं हे पालुपद जरा जास्तच होतंय का? .... की माझं वय झालंय म्हणून मी एकाद्या पराभूतासारखी अशी माघार घेतेय? ... सामना न करताच एखाद्या घटनेपासून मी अशी कशी पळतेय? ....

वाद घालून 'मी बरोबर आहे' असं सिद्ध करावंसं वाटतं. पण वादाच्या भरात सुनेचे मनाला कापत भेदून जाणारे अपशब्द अधिक घायाळ करून जातात. वाद जिंकेनही पण इतकी वर्षे एखाद्या दिव्याच्या तेवणाऱ्या वातीला जपून ठेवावे तसे जपलेले आपल्या मुलाचे मन जपता यावे, ही भावनाच वाद सोडून 'जाऊ दे' असं म्हणायला भाग पाडते आहे.

स्वत:पेक्षा दुसऱ्यांची मने जपताना मी स्वतःच्या आत्मसन्मानाकडे दुर्लक्ष करतेय. अपमान गिळतेय आणि मग त्याचा त्रास होऊन माझीच चिडचिड होते आहे. आतल्या आत घुसमटते आहे.... त्या अस्पष्टपणे बोलून गेल्या, ..."जाऊ दे!".

संध्याकाळी सखी मंडळाची मिटींग होती. त्या अंमळ आडव्या झाल्या. महिन्यातल्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी संध्याकाळी सहा वाजता, सहवास सोसायटीतल्या विहंगम सखी मंडळाची मिटींग व्हायची. दोन वर्षापूर्वी विहंगम ट्रॅव्हल्सने तीन दिवसांची एक धार्मिक स्थळांची टूर काढली होती. योगायोगाने या अगडबंब सोसायटीच्या या बारा महिलांची त्या प्रवासात पहिल्यांदाच ओळख झाली आणि नंतर ती घट्ट मैत्रीत रूपांतरित झाली. त्या सर्व महिलांत सामाजिक सेवा हे सूत्रदेखील त्यांना एकत्र बांधून ठेवायला पुरेसे होते.

मध्यंतरी आजूबाजूच्या सोसायट्यातल्या लोकांशी संपर्क साधून, जुन्या पडून असलेल्या सायकली त्यांनी एकत्र केल्या होत्या आणि त्यांची जुजबी दुरुस्ती करवून घेऊन जवळच्याच खेड्यातल्या गरजू मुलांच्यात वाटून टाकल्या होत्या. असे छोटे छोटे उपक्रम त्या हाती घेत राहतात.

त्या बारा महिलांमधल्या दहा जणी पन्नाशीवरच्या होत्या व दोघी तिशीच्या आसपासच्या वयाच्या होत्या. परंतु सख्य जमायला वयाची अडचण येत नाही. मने जुळायला हवीत. अधूनमधून जवळपासच्या एका दिवसाच्या सहलीला जाऊन येत असत. महिन्यातून दोनदा त्या गप्पा मारायला, मन मोकळं करायला सोसायटीच्या छोटेखानी राऊंड टेबलभोवती जमायच्या. यांचा ग्रुप हॉलमध्ये आला की इतरांना मज्जाव असायचा.

नंदितातांई हॉलमध्ये आल्या तेव्हा सगळ्याजणी आधीच हजर होत्या. पुढचा महिना श्रावणाचा असल्याने एखादी बारा सीटरची गाडी घेऊन जवळपास सहलीला जाता येईल काय हे ठरवण्यासाठी त्या जमल्या होत्या.

नंदिताताई येऊन स्थानापन्न होताच स्मितताईने गुगली टाकला,"काय नंदितातांई, काय म्हणतेय सून?"

नंदितातांई तोंड उघडायच्या आतच मंजूताई म्हणाल्या," तिला काय धाड भरलीय, गावभवानीसारखे उंडारत असते. नंदितातांईचे तर तिने तोंडच बंद करून टाकले आहे. मला तर वाटतं, नंदितातांईंच्या इतकं स्वातंत्र्य कुणीही आपल्या सुनेला देत नसावेत. मुलीला आपल्या सासूकडे सोडून कुठेही हिंडत असते बया आणि वरून सासूबद्दल आपल्या नवऱ्याचे कान भरते ते वेगळंच."‥ मंजूताईनं आपला मुद्दा उपस्थित केला.

मानसीताई तिरीमिरीनं पुढं सरकून म्हणाल्या," तुम्हा बायकांचा हाच प्रॉब्लेम आहे. सुमारे शंभर वर्षापूर्वी निरक्षर असलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी म्हटलेली ओवी मला आठवते. 'बाईचं सुख पाहून‥ बाईच आतून पेटते‥ खरं सांगतो बाईच‥ बाईच्या जिवावर उठते. '‥ स्त्रियांच्या स्वभावाचे दर्शन घडवणाऱ्या या ओळी आजही पटण्यासारख्या आहेत. तुम्ही तुमच्या तारुण्यात काही केलं नाही म्हणून तिनेही तसंच वागावं असा अट्टाहास का करता? तुम्ही घरकोंबडे होऊन राहिला होता त्याला कोण काय करणार? तुम्ही तक्रारीच करीत रहा. तुम्ही सून असताना सासू चांगली नसते. वहिनी असताना नणंद चांगली नसते. तुम्ही नणंद असताना भावजय चांगली नसते आणि सासू झाल्यावर तुमची सून चांगली नसते. हा सगळा तुमच्या मनाचा खेळ आहे."… तरीही नंदितातांईनं तोंड उघडलं नाही.

मंजूताईच बोलल्या," मानसीताई, तुम्हाला सून नाही. त्यामुळे हे दुःख कळणार नाही. सून नसलेली सासू हीच जगातली आदर्श सासू असते. तुमचा आक्षेप कबूल आहे. पण ज्या स्त्रीने तुम्हाला एवढा प्रेमळ, संस्कारी अन निर्व्यसनी नवरा दिला आहे, किमान त्यासाठी का होईना तुम्ही तिचा मान राखाल की नाही? दोन वर्षापूर्वी जोडीदार गेल्यापासून त्या आतल्या आत घुसमटून जात आहेत. असो. बहिणाबाईनी असंही म्हटलेलं आहे, 'सून घरी आली की सासूलेच खूपते‥ खरं सांगतो बाईच बाईच्या जिवावर उठते. ' परंतु बदलत्या परिस्थितीत काही जीवनमूल्ये ही बदलत गेली आहेत. मी म्हणते, ' सून घरी आली की सासूलेच झापते‥ खरं सांगतो बाईच बाईच्या जिवावर उठते. '‥ आता बहुतेक घरात अशीच परिस्थिती आढळताना दिसते."

सर्वांत पोक्त व उच्चशिक्षित सीमाताई म्हणाल्या,"अशी परिस्थिती निर्माण व्हायला कारण आहे. बदलत्या काळानुसार चौकोनी कुटुंबात मुलामुलीत भेदाभेद कमी होत चाललाय. मुलांना शाळेत ज्या काही गोष्टी शिकवल्या जात नाहीत, त्या गोष्टी मुलींनाही शिकवल्या जात नाहीत. घरी आई वडीलही तेच करताहेत. स्त्रीचा मान कसा राखावा हे मुलांना सांगितले जात नाही, तसेच एक स्त्री म्हणजे काय असते हे मुलींना सांगितलं जात नाही. मुलगा कोणाबरोबर फिरतो, कुठे जातो हे पाहायला आणि मुलांवर संस्कार घडवायला

वडीलांकडे वेळ नाही. तसेच नारीत्व, महन्मंगल मातृत्व, संस्कार, परंपरा, वरिष्ठांचा आदर, यांचा त्या कन्येच्या आईलाच विसर पडत चालला आहे. आपल्या मुलीला संस्कार देण्यासाठी खुद्द तिच्या आईकडेच काही नाही. ती कन्येला काय देणार? एक मात्र खरं की मुलांना उच्च शिक्षण घेता यावे आणि त्यांना कुठेतरी नोकरी मिळावी म्हणून आजकालचे आईबाबा वाटेल ते कष्ट घेताना दिसतात. केवळ उच्च शिक्षणाने सगळं काही साधलं जाईल हा त्यांचा भ्रम आहे. घट्ट संस्कारही तितकेच महत्वाचे आहेत."....

... सीमाताईंचा मुद्दा सगळ्यांना पटण्यासारखाच होता. सगळ्या शांत बसल्या.

मीराबेन म्हणाल्या,"अगदी खरं आहे. आजकालच्या मुली माहेराहून सासरी जाताना, एक स्वत:च्या शिक्षणाचा अहंकार आणि स्वत:ला नोकरी असल्याचा गर्व सोडला, तर काय घेऊन जातात? नात्यातल्या इतरांविषयी ना कसला स्नेह ना कुणा वरिष्ठ नात्यांविषयी श्रध्दा! हे तर तिला शिकवलेलेच नसते. नवरा ठीक निघाला तर ठीक. नाहीतर आईवडिलांनी उच्चशिक्षित करून पाठवलेच आहे, आपल्या तर पायावर उभी आहेच."

"अहो घर म्हटलं की भांड्याला भांडं वाजणारच. ' तू कसं काय ऐकून घेतलंस हे सगळं? तिथंच त्यांना... असं सुनवायला हवं होतंस. ' हे तिला माहेरावरून भरवलं जातं."

"आमच्या तरूणपणी अर्धांगी म्हणजे आम्ही फक्त अर्धं अंग असायचो. अख्खं डोकं मात्र नवरोबाचेच असायचे. आता संघर्षाची भाषा बदलली आहे. संघर्षाच्या वेळी पत्नीदेखील आपल्या पुरुषी आक्रमकतेचे डोके बाहेर काढते."

"एका पती पत्नीचं भांडण जाऊन ते दोन पुरुषी डोक्यांचे भांडण होऊन जाते. एक तर तिला ना गृहलक्ष्मी व्हायचे असते, ना गृह-स्वामिनी. फक्त स्वत:च्या मर्जीने जगायला हवे असते. किंबहुना तिचा तसा हट्टच असतो. बाकी काही नाही. पण ते फार काळ टिकत नाही. विवाहाचा अर्थ केवळ संततीला जन्म देणे नव्हे. पती पत्नी या दोघांनी एकमेकांसाठी पूरक बनून राहण्यात पुरुषार्थ आहे."

एवढ्यात नीरजा साळसूदपणे म्हणाली," खरंच तरुण सुनांनी आपल्या वृद्ध सासू सासऱ्यांना मानाने वागवावे. त्यांना आपल्या आईवडिलांच्या जागी मानायला काय हरकत आहे?"

वाक्य संपायच्या आत तिशीतलीच तिची जोडीदार अनया म्हणाली," तुला काय जातेय बोलायला? म्हणतात ना, ‘ सासू ना सासरा.. रोजच दिवाळी दसरा. ’ तुझा राजा राणीचा संसार आहे. तुला कसं कळायचं? सासरी येऊन दहा वर्षे झाली, माझ्या सासूच्या 'सारख्या सूचना' संपतच नाहीत. खलबत्त्यात वेलदोडे कुटतांना ते कसे कुटावेत इथपासून, मसाल्याच्या डब्यात कुठल्या साईजचा चमचा ठेवावा, इथपर्यंत सांगतच राहतात. तिकडे सासरेबुवा ‘लेकी बोले सुने लागे’ सारखे बोचरे टोमणे मारतच राहतात. केवळ सुनांनाच दोष देऊन चालणार नाही. वरिष्ठांनीही आपला मान राखून वर्तन ठेवावे हेच बरे."

कुणीच काही बोलत नाही असं पाहून, स्मिताताई वंदनाताईंवर घसरल्या." वंदनाताई तुम्ही मात्र खूप लकी आहात. कसलीही धावपळ न करता तुम्हाला दोन्ही सुना लक्ष्मीसारख्या सुंदर आणि गुणी लाभल्या आहेत हो. ना पत्रिका, ना गोत्र. प्रेमविवाहात कुठली पत्रिका आणि कुठलं गुणमीलन असतं म्हणा!"

वंदनाताई शांतपणे म्हणाल्या," हे पहा, कागदावर जुळलेली पत्रिका आणि त्यातले गुणमीलन याहून महत्वाची असते ती मनामनांची जुळली जाणारी पत्रिका. तुम्ही म्हणता तसं माझ्या दोन्ही सुना सुंदर आहेत यात वादच नाही. पण एखाद्या व्यक्तीच्या आकर्षक व्यक्तिमत्वाने भारावून जाणं हे काही काळापुरतेच उरते. केवळ त्याचं व्यक्तिमत्व किंवा तिचं सौंदर्य एकमेकांचे नाते टिकवून ठेवायला पुरेसे नसते. समोरच्या व्यक्तीला समजून घेण्याची त्या व्यक्तीची कुवत अन त्या व्यक्तीच्या स्वभावातील आपुलकी, गोडवा आणि सगळ्याच नात्यांबद्दल असणारा योग्य तो आदर, हेच खरे महत्वाचे गुण असतात. भले ती व्यक्ती किती का सुंदर असेना, परंतु तिचा अहंकार, स्वार्थी वृत्ती, आक्रस्ताळेपणा या गोष्टी कुणालाही नकोशा वाटतील. देवघरातल्या निरांजनाचा मंद प्रकाशच जसा आपल्या मनाला प्रसन्न करणारा असतो, अगदी तसंच आपल्या सहवासातील माणसांचंदेखील असतं. आपल्यातील सात्विकताच इतरांना प्रसन्न करणारी ठरू शकते."

"एकाद्या भगिनीला वाटेल की, 'इतरांना प्रसन्न वाटावं म्हणून मी कशासाठी तडजोड करायची? ते माझ्या व्यक्ती-स्वातंत्र्यावर मीच लादून घेतलेले निर्बंध ठरतील. ' एकत्र राहायचं असेल तर मात्र फक्त प्रेम आणि आपसातील असलेल्या विश्वासामुळेच एकमेकातील नाती टिकतात. ज्या क्षणी तुम्ही व्यावहारिक किंवा जशास तसे वागायला लागता, तेव्हाच नात्यातला गुंता वाढत जातो. म्हणतात ना नारळ आणि सून चांगली निघेल की नाही हे घरी आणल्यावरच कळतं. याबाबतीत मी खरंच भाग्यवान ठरले. माझ्या दोन्ही सुना अतिशय गुणवान आहेत. पण मीदेखील त्यांना लेकींच्यासारखेच प्रेमाने वागवते. वेगळ्या वातावरणात तगवलेली रोपटी काढून तुमच्या दारात लावली की त्या लगेच बहरून कशा येतील? त्या रोपट्यांना वेगळ्या वातावरणाशी जुळवून घ्यायला त्यांना वेळही द्यायला हवा. आपला काळ संपला. आपणही सुनांना योग्य ते स्वातंत्र्य द्यायला हवे. म्हणतात ना सासू म्हणजे 'सारख्या सूचना' आणि सून म्हणजे 'सूचना नकोत' यातला अतिरेक टाळावा. माझ्या दोन्ही सुना काही दिवसातच दुधात साखर मिसळल्यागत आमच्यात एकरूप झाल्या. ही ईश्वराचीच कृपा म्हणायची.".. वंदनाताई कृतार्थपणे म्हणाल्या.

नंदिताताईच्या खांद्यावर हात ठेवत त्या पुढे म्हणाल्या," तुम्ही तोंड उघडणार नाही. वास्तविक आपल्या भोवताली असलेल्या, वरवर शांत दिसणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मनांत किती तरी कहाण्या दडलेल्या असतात. डोळ्यांच्या आड लपलेली असंख्य दु:खं बाहेर पडून कुणाला तरी सांगायला धडपडत असतात. कुणासमोर मन मोकळं करायला संकोच वाटत असेल तर वेळ मिळाला की दिवसभरातील तुमची घालमेल, मनाला झालेले आघात एका डायरीत लिहून ठेवा. लेखिका नसलात तरी डायरीला मित्र करा. मग पहा. डायरी नियमित लिहित राहण्याने तुमच्या मनावरचे ओझे हलके झालेले दिसेल. आणि आपल्या अपरोक्ष ती डायरी कुणाच्या हाती पडेल याची भीती बाळगू नका. मी म्हणते, पडू द्या न कुणाच्या तरी हातात, कळू द्या त्यांना, तुमच्या मनांत काय चाललंय ते. तुम्ही चुकीचं काही लिहित नाही. त्यांनाही समजेल कुठे चुकीचे वागताहेत ते. अन झालाच तर त्यांच्यात बदल होईल."

चहाची किटली आत आली. कपबश्यांच्या किणकिणाटाने पुढील चर्चा आपोआप थांबली.

**श्री. व्यंकटेश देवनपल्ली -** बेंगळुरू - मो. - ९५३५०२२११२.

## लेख –"सफर सौर कुटुंबासह." - सौ. पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई





सांगायची गोष्ट म्हणजे, मला एका वेगळ्याच संमेलनाला जाण्याचा योग आला. एक कुतूहल म्हणून आणि एक जिज्ञासा म्हणून, मी जाण्याचे ठरविले आणि गेलेही. त्या संमेलनाचे वर्णन ऐकून तुम्हाला मजा वाटेल. गंमत वाटेल. पण एका कुटुंबाचं असंही संमेलन कसं आहे बघा हं.

रात्रीच्या वेळी आपण आकाशाकडे पाहिलं तर, आपल्याला अगणित लहान-मोठे लुकलुकणारे तारे दिसतात. असंख्य ताऱ्यांचा एक पट्टा दिसतो. ती आकाशगंगा. त्याचाच एक भाग म्हणजे आपली सूर्यमाला. सूर्याचे कुटुंब. त्यांचे हे संमेलन. आपण सकाळी नमस्कार करतो, ते सूर्यनारायण हे सगळ्या ग्रहांचे जनक -- बाबा. बुध, शुक्र, वसुंधरा, अनेक लघुग्रह, मंगळ, गुरु, शनि, आणि खूप दूर दूर असणारे युरेनस, (हर्षल ), नेपच्यून (वरूण )आणि प्लुटो. तर असं हे कुटुंब-- सूर्यमाला.

आता प्रत्येक जण मी कसा आहे, असं म्हणून स्वतःची ओळख करून देतोय. प्रथम बुधबाळ म्हणतो,"मी बाबांचा लाडका. सतत त्यांच्याजवळ आणि त्यांच्या भोवतीच असतो. बाबांचा गरम आणि तापटपणा माझ्या मध्येही आलाय. त्यामुळे माझ्याजवळ येण्याचे कोणी धाडस करत नाही. कोणी आले तर जळून जातील. मी तसा छोटासाच आहे हं."

शुक्राला आपल्या सौंदर्याचा ताठा. ताठ्यातच तो सांगायला लागला."बुधबाळा, मी तुझ्यापेक्षा थोडा मोठा. तुझ्या इतका कडक मात्र नाही हं! माझ्याकडे चुंबकत्व नाही. माझ्या गाभ्याभोवती जाड सिलिकेटचा थर आहे. पण दिसायला मात्र मी किती सुंदर, किती तेजस्वी, कायम आकाशात तेजाने चमकणारा! . माझ्या सौंदर्याकडे सगळेजण पहात बसतात. एखाद्याला सौंदर्याची उपमा द्यायची असेल ना, तर ‘ शुक्राची चमचमती चांदणी ‘ असं म्हणून माझं नाव घेतलं जातं. माझ्यावर कविताही केल्या जातात. निराशेने दाटलेल्या दाट अंध:कारातील आशावादाचे प्रतीक म्हणजे मीच हो! माझ्यावरची कविताच ते सांगते."घनतमी शुक्र बघ राज्य करी रे, खिन्न मना बघ जरा तरी".

आता शुक्राचं कौतुक ऐकल्यावर वसुंधरेला तरी गप्प कसं बसवेल बरं? तावातवाने तीही सांगायला लागली स्वतःचा महिमा." हे बघ शुक्रा, अति ताठा करू नकोस. तू सुंदर आहेसच. पण माझ्याकडे बघ ना, मी कितीतरी नाजूक, सुंदर, कशी छान झिरझिरीत निळीशार साडी, त्यावर बर्फाचे पांढरे, वनश्रींचे हिरवे बुट्टे कसे उठून दिसतायत ना! आणि माझ्या अंगाखांद्यावर प्राणी, पक्षी, जलचर, जंगलं, महासागर, नद्या, पर्वत, आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे हा ज्ञानी मानव.... हे असं आहे माझं वैभव. असं कोणाकडेच नाहीये ना?

या सगळ्यांची जीवनदायिनी मीच आहे. मी बाबांभोवती लंब वर्तुळाकार कक्षेत फिरत असल्याने माझ्याकडे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतूही होतात. आपल्या सबंध कुटुंबात मी एकटी सौंदर्यवती. आणि हो, माझा 'चंद्र 'हा मुलगा तर सगळ्यांचाच लाडका आणि आवडता. माहीत नसेल तर सांगते, या माझ्या चंद्रबाळाचा स्वभाव, त्याचं रूप, जवळून अनुभवण्यासाठी या मानवाने चंद्रयान पाठवले बरं! आता ते त्याच्या अंगाखांद्यावरही खेळायला लागलं आहे. इतकी वर्ष या बाळावर कितीतरी कविता केल्या जायच्या. त्याच्या रूपाचं वर्णन व्हायचं. मी किती आणि काय काय सांगू? हा मंगळ बसलाय ना बोलायला...”

मंगळ वसुंधरेचा जवळचा भाऊ. तो म्हणतो,” हे बघ वसुंधरा ताई, अति कौतुक करू नकोस. तू आणि मी आपण सारख्याच देहयष्टीचे. माझा तांबूस रंग किती छान आहे ना! अग पण रंगावरूनच मला कुणी तापट म्हणतात. ग्रीक संस्कृतीत तर मला 'युद्धदेवता ' मानतात. मग हे देवतेचं रूप मिळणं किती भाग्याचं ना! माझ्यामध्ये लोहाचे प्रमाण जास्त असल्यामुळे मी तांबूस दिसतो. ताई, तू खरं सांग.. तुझ्याकडचा मानव माझ्यापर्यंत यायला लागलाय ना? येऊ दे. मला सुद्धा डोमस आणि फोगोस अशी दोन मुलं आहेत बरं. हो आणि माझ्या अंगावर बर्फाच्या टेकड्या आहेत. आणि वसुंधरा ताई, अगं मी आणि आपला बडा दादा ' गुरु ' यांच्या मध्येमध्ये करणारे, ज्यांना आकार ना उकार असे लघुग्रह म्हणजे अशनी खूप आहेत. खडकाळ वस्तू, धुलीकण, चिकणमाती, निकेल, लोह, यासारखे धातू, ऊर्टचा मेघ, यापासून बनलेल्या उल्का आहेत. असे लाखो लघुग्रह बडबड आणि वटवट करत असतात. म्हणून मीच त्यांची ओळख करून देतोय झालं. ९५० किलोमीटर व्यासाचा एक आणि चारशे किलोमीटर व्यासाचे तीन लघुग्रह (वेस्टा, पॅलास, हायगिया) असून, आतापर्यंत वीस हजार लघुग्रह शोधले गेले आहेत. ३० जून हा आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिन मानला गेलाय बरं का. आता मी गप्प बसतो बाबा! . आपला बडा दादा बोलतोय ना!”

गुरु-- बृहस्पती उठल्याबरोबर सगळे कसे चिडीचुप. सगळ्या भावंडांमध्ये अगडबंब. जणू सुमो.... कुस्तीतला पैलवान. तो म्हणतो,” माझ्या ९५ मुलांना घेऊन मी फिरत असतो, म्हणून मला हसू नका रे. माझ्या मुलांसह माझी ताकद इतकी मोठी आहे की, कोणी खोडी काढणं शक्यच नाही माझी. मी एक मोठा चुंबकच आहे. माझा अंतर्भाग द्रवरूप लोखंड आणि बाहेरच्या भागात दाट ढग, त्यामुळे सतत वादळे होत असतात. मी सर्वात मोठा असलो तरी सर्वात वेगाने फिरतो बरं! हं.. आणि या मानवाच्या जन्म कुंडलीतही मला मानाचे स्थान आहे बरं. मी आणि शनिदेव आम्ही जणू हायड्रोजन आणि हेलियम वायूंचे राक्षस आहेत म्हणा ना.”.... ‘ आता पुरे झालं तुझं ‘ असं म्हणून सगळेजण त्याला गप्प बसवतात.

शनिदेव म्हणजे निळ्या रंगाचा. ‘ स्वतःच्या पोटाभोवती बर्फ आणि खडकाच्या लहान कणांनी झालेली तीन गोल कडी गुंडाळून, डुलत डुलत चालणारा विदूषक ‘ असेच म्हणतात मला. हसू नका रे. बडा दादा गुरूपेक्षा मी थोडासाच लहान. पण माझी घनता सगळ्यात कमी बरं का. मला सुद्धा ८३ मुलं आहेत हो. त्यातही टायटन हा जरा जास्तच महत्त्वाचा आणि लाडका. अगं वसुंधरा ताई, तुझा तो मानव काहीही त्रास झाला तरी ' शनीची पिडा ' म्हणून माझ्यावरच खापर फोडतो बघ. खरंतर मी कोणालाच त्रास देत नाही हं.”

नाराजीत असलेला युरेनस (हर्षल) म्हणतो,” बाबानी आम्हाला किती दूर लोटलंय. मी सुद्धा खूप मोठा आहे. माझं गुरुत्वाकर्षण जास्त. आणि मी एक मोठा चुंबकच आहे म्हणाना. मला सुद्धा २७ मुलं आहेत.

माझ्यामध्ये द्रवरूप लोखंड, आणि माझा ऑरा म्हणजे दाट दाट ढग असल्याने सतत वादळे होत असतात. माझा रंग निळा आहे. सर्वात हलका आणि गाभा इतरांपेक्षा थंड. मला खूप कंटाळा येतो हो. त्यामुळे मी स्वतःभोवती सर्वाधिक वेगाने आणि बावळटासारखा उलटा-सुलटा कसाही घरंगळत असतो."

नेपच्यून ( वरूण ) हर्षलच्या फिरण्याला हसत राहतो. तो म्हणतो," मला सुद्धा १४ मुलं आहेत बरं का! तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल की माझ्यावरचा एक ऋतू ४१ वर्षांचा असतो. माझ्याभोवतीसुद्धा मिथेन या विषारी वायूचे वातावरण असून वेगवान वारे वाहत असतात. माझ्याजवळ येण्याची कोणाची ताकद नाही. वाईट वाटतं, पण आहे हे असं आहे."

प्लूटो रडत रडत बोलला," इतकी वर्ष या भावंडांनी मला बटुग्रह म्हणून, त्यांच्यातला एक भाऊ म्हणून समाविष्ट करून घेतलं. पण आता मात्र मला कायपरच्या पट्ट्यातील दगड आणि बर्फाची खगोलीय वस्तू म्हणून बहिष्कृत केलंय. कुटुंबापासून बाजूला केल्यानं मला वाईट वाटतं रे! पण मी तरी काय करू? मला असलेलं एक मूल आणि मी एकमेकांच्या भोवती फिरताफिरता बाबांना प्रदक्षिणा घालत असतो."

" या कुटुंबामध्ये कधी कधी काही दिवसांसाठी आम्ही पाहुणे म्हणून येतो. काही दिवस राहतो. आणि ठराविक काळ झाला की परत जातो. आम्हाला ' धूमकेतू ' असं म्हणतात. आमचा भाऊ हॅले हा दर ७५ वर्षांनी वसुंधराताईला भेटायला येतो. आमचा आकार खराट्यासारखा. धूळ आणि ढगांसह आम्ही मुक्तपणे संचार करत असतो. आम्हाला बघून लोक अनेक तर्क-कुतर्क काढत असतात. पण काय करणार?"

सगळ्यांचं सगळं शांतपणे ऐकून, आता सगळ्यांचे बाबा सूर्यनारायण आपल्या कुटुंबाच्या जन्माविषयी सांगायला लागले."आपल्या कुटुंबाची निर्मिती एका विशाल आंतरतारकीय अण्विक ढगाच्या गुरुत्वाकर्षणामुळे झालीय. कधी झालीय म्हणाल, तर ४. ५६८ अब्ज वर्षांपूर्वी. मुलांनो आणि नातवंडांनो, आतापर्यंत तुम्ही सगळेजण किती पद्धतशीर, नियमबद्धतेत, न भांडता राहिलात. हर्षल सोडून तुम्ही आणि तुमची मुलं घड्याळाच्या काट्याच्या उलट दिशेने आणि लंब वर्तुळाकार असे माझ्याभोवती फिरत आहात. माझ्या शब्दाप्रमाणे माझ्या अधिपत्याखाली राहिलात. असेच रहा हो."


या मजेशीर संमेलनाला गेल्याने मला ज्ञानाचं भांडारच जणू बघायला मिळालं असं मला वाटलं. माझं मत पण मग मी सगळ्यांना सांगितलं.....

"तुमचे बाबा-- सूर्यनारायण-- पितामह, तेजाची, प्रकाशाची वेगळी शक्ती, आणि अधिष्ठात्री देवता आहे. ऋग्वेदामध्ये श्लोक आहे ना,"आ प्रा, द्यावा, पृथ्वी,""अंतरिक्ष, सूर्यो, आत्मा जगत स्तुस्थु च //" सर्व देवांचा, तेजाचा नेता असा हा सूर्य द्युलोक, पृथ्वी, अंतरिक्ष व्यापून उरला आहे. सर्व चराचराचा आत्मा तोच आहे. तुम्ही सर्वजण उत्तमरीत्या कर्तव्य बजावत आहात. ही समाधानाची आणि आनंदाची चांगली गोष्ट आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सने विज्ञान कितीही प्रगत झाले तरी तुमच्यासारखे ग्रह कोणी निर्माण करू शकेल असे वाटत नाही. सगळी भावंडं मजेत रहा. आनंदात रहा...."

**सौ पुष्पा प्रभुदेसाई -** मिरज मो. नं. ९४०३५७०९८७

# पुस्तक परिचय - भिक्षेकऱ्यांचा डॉक्टर - सौ. सुनंदा शिवाजी कदम






**पुस्तकाचे नाव :** भिक्षेकऱ्यांचा डॉक्टर (डॉक्टर फॉर बेगर्स... ) एक प्रवास

**लेखक :** डॉ. अभिजीत सोनवणे

**प्रकाशक :** डॉ. मनिषा सोनवणे

**पृष्ठे :** ३६८

**मूल्य :** रु. ५००/-

हे पुस्तक म्हणजे लेखकाचे आत्मकथन आहे. पुस्तक दोन भागात विभागलेले आहे. पहिल्या विभागात लेखकाच्या आयुष्याचा प्रवास.. आणि दुसरा विभाग आहे 'साठवणीतील आठवणी'. यामध्ये लेखकाने भिक्षेकऱ्यांसाठी करत असलेल्या कामात आलेल्या अनुभवांचे शब्दबद्ध केलेले प्रसंगचित्रण आहे.

वडील डॉक्टर असणाऱ्या घरी जन्म, म्हसवड मधील बालपणीच्या आठवणी, आईचे संस्कार, आजीचं नाव घेऊन बोलवण्याइतपत मोकळीक तेच आजीशी असणार नातं, हे वाचताना समोर दृश्य तरळतात.

वडिलांच्या नोकरीनिमित्त पुढील शिक्षण सावंतवाडीमध्ये होतं. नन्स असणाऱ्या शिक्षिका, त्यांची सेवाभावी वृत्ती.. लेखकांनी अंगीकारली. पण वडिलांची परत सावंतवाडीहून साताऱ्याला बदली होते. आणि आयुष्याला एक वेगळीच कलाटणी मिळते. शांत असणारे लेखक वाईट संगतीला लागतात. शाळा चुकवणे, दमदाटी करणे, गुंडगिरी करणे, .. थोडक्यात काय वाया जातात.

पुढचा प्रवास चालू होतो तो पुण्यातून. आई-वडिलांच्या प्रयत्नांनी मेडिकलला प्रवेश मिळतो. डॉक्टर अजनाळकर सरांमुळे साहित्याची आणि डॉक्टर गुप्ता सरांमुळे अभ्यासाची गोडी लागते. आणि गाडी रुळावर येते. आणि लेखक 'अभ्या 'चा ' डॉक्टर अभिजीत ' होतात. कोथरूडमध्ये झोपडपट्टीत चालू केलेली प्रॅक्टिस, वेगवेगळ्या जागा बदलत शेवटी होम व्हिजिट.. घरी जाऊन तपासण्या करणे. यातही यश मिळत नाही.

याच दरम्यान निराश अवस्थेत असणारे एक आजोबा, ज्यांना लोक भिकारी म्हणत, त्यांच्याशी लेखकाचा स्नेह जुळतो. ते नेहमी म्हणत," बाळा डॉक्टर म्हणून ऍलोपॅथी वापरशील, नॅचरोपॅथी वापरशील, यांनी शरीरं बरी होतील, पण मन बरं करायचं असेल तर सिम्पॅथी आणि एम्पॅथीची गरज आहे. या दोन पॅथी वापरशील तर तू चांगला डॉक्टर आणि माणूस होशील." या बाबांनी.."'गेम ऑफ सपोर्ट' म्हणजे मदतीचं गाठोडं पुढं पुढं

सरकवत राहायचं, परत घ्यायचं नाही, परतफेड घेतली तर या खेळातून बाद..... हा खेळ जमलं तर खेळ” असं लेखकाला सांगितलं.

लेखकांना ‘Ipas development foundation‘ नावाच्या आंतरराष्ट्रीय संस्थेत खालच्या पदावर काम करायची संधी मिळते. आपल्या मेहनतीने तीन-चार वर्षातच त्यांना प्रमोशन मिळतं आणि ते महाराष्ट्राचा प्रमुख म्हणून कार्यरत होतात. या कालावधीत रस्त्यात एक्सीडेंट झाला तर प्रथमोपचार, मोफत तपासण्या, शरीर विक्रय करणाऱ्या महिलांसाठी एचआयव्ही टेस्ट, अशी बरीच समाज कार्य करतात. लाखाच्या घरातला पगार, अनेक वेळा विमान प्रवास, बंगला, गाडी.. सारी सुखं.

मध्येच ‘गेम ऑफ सपोर्ट ‘च्या बाबांची आठवण होते. त्यांना भेटण्यासाठी लेखक गावी जातात. चौकशी अंती कळतं की बाबांचा मृत्यू झालेला असतो. भिकारी म्हणून बेवारस समजून क्रियाकर्म आटोपलेलं असतं. यावेळी दुःखाने लेखकाचे मन हेलावते. या वेदनेतूनच भिकाऱ्यांसाठी काहीतरी करण्याची इच्छा लेखकाच्या मनी येते. नोकरीचा राजीनामा देऊन ‘डॉक्टर फॉर बेगर्स‘ चा प्रवास चालू होतो.

ज्या भिकाऱ्यांसाठी लेखक लाखो रुपये पगाराची नोकरी, पद, प्रतिष्ठा सोडतात, तेच भिकारी त्यांना शत्रू मानतात. तेव्हा गेम ऑफ सपोर्ट च्या खेळात साथ मिळाली ती त्यांच्या पत्नी डॉक्टर मनीषा सोनवणे यांची.

कुटुंबाची आर्थिक जबाबदारी पत्नीने पेलल्याने अभिजीत सरांना आपल्या कार्यात पूर्ण वेळ देता आला. शिवाय मानसिक आधार मिळाला तो त्यांच्या आई-वडील, बहिण, भाऊ, यांच्याकडून. कुटुंब पाठीशी असेल तर माणूस कोणतीही लढाई जिंकू शकतो.

आपल्या निस्वार्थी कामाने डॉक्टर अभिजीत सरांनी भिकाऱ्यांच्या मनात ‘आपला माणूस ‘म्हणून स्थान निर्माण केले. आणि खऱ्या अर्थाने ‘डॉक्टर फॉर बेगर्स’ च्या कार्याला सुरुवात झाली.

‘साठवणीतील आठवणी‘ मध्ये लेखकाने आयुष्यात आलेले भिक्षेकऱ्यांचे हृदयाला स्पर्श करणारे अनुभव कथन केले आहेत. कोणीही आनंदाने भिकारी बनत नाही. परिस्थिती माणसाला भिकारी बनवते, असे या डॉक्टरांचे ठाम मत आहे.

भिक्षेकऱ्यांच्या हाताला काम देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे, वयस्कर भिक्षेकऱ्यांची सेवा शुश्रूषा करणे, योग्य ती आरोग्य विषयक मदत, ऑपरेशन, औषध उपचार करणे, लहान मुलांच्या शिक्षणाची सोय करणे, हे कार्य डॉक्टर अभिजीतसर आणि त्यांच्या पत्नी डॉक्टर मनीषा सोहम ट्रस्टच्या माध्यमातून करत आहेत. लोकांच्या सहकार्यातून, देणगीतून, आणि लेखकांच्या निस्वार्थी मायेने, कष्टाने हे कार्य अविरत चालू आहे.

“डॉक्टर फॉर बेगर्स“ हे पुस्तक म्हणजे अभिजीतसरांचा बिघडण्यापासून घडण्याचा प्रवास आहे. ‘वाया गेलेला मुलगा‘ इथपासून ते त्यांच्या आजच्या ‘ तरुण पिढीसाठी आदर्श ‘ बनण्याचा हा प्रवास आहे.

... भावी पिढीसाठी प्रेरणादायी, आणि माणूस म्हणून जगायला शिकवणारे हे पुस्तक प्रत्येकाने जरूर वाचावे.

**सौ. सुनंदा शिवाजी कदम** - मो. 8421084161

## कविता - पुतळ्यांचे मनोगत - सौ. विद्या पराडकर



निघालो गाव पाहण्यास कुतुहलाने
वाटेत मला पुष्कळ पुतळे दिसले
त्यांनी मला खुणावले कौतुकाने
लगेच वाहत्या गंगेत हात मी धुतले

एकच होता पुतळ्यांचा सूर
मनमोकळे करीत होते आपले मन
हर्षित झाल्याने होता समरसतेचा स्वर
मन हलके करण्याचा त्यांचा तो क्षण

एका सुरात ते म्हणाले, पोहोचले हार तुमचे
आम्ही तुमचे आभारी खरे
जिवंतपणी आम्हांस अव्हेरले
मेल्यानंतर हा देह किंमती कां बरे?

अंत्ययात्रेत काय मजा केली
कमाल केली आपुलकीच्या प्रेमाची
नक्राश्रूना भरतीच आली
शोकसभेत गंगा वाहिली वक्तृत्वाची

दुःख सांगतो आम्ही सारे
आम्हालाही कळते बरे
ढोंगी स्वार्थांधांनी भरली घरे
श्रीमंतांनी भरली कोठारे

यांच्या विरुध्द होतो आम्ही
म्हणून आम्ही पुतळे बनलो
स्मृति चिन्हाने गौरविले गेलो
भूतकाळ हा भूतच राहिला

भविष्यकाळ हा तुमच्या हाती
खोटी वल्गना नको हो आता
कृतिशील आदर्श आचरण आता
पुढील नेते पहा हो आता.

हेच मनोगत आमचे वाटे
समाज मार्गावर आहेत काटे
जनकल्याणा फुलवा गुलाब
हाच खरा पुतळ्यांचा जवाब

**सौ. विद्या पराडकर** - वारजे, पुणे

## कथा - स्थळ... - सौ. नेहा लिंबकर



उच्चशिक्षित असलेली मुग्धा कुलकर्णी तिशीतली. अतिशय हुशार आणि तितकीच हजरजबाबी. एका मोठ्या आय. टी. कंपनीत उच्च पदावर कार्यरत. घरी आई वडील आणि धाकटी बहीण मुक्ता. तीही सी. ए. फायनलला. आई गृहिणी तर बाबा नुकतेच संरक्षण विभागातून रिटायर झालेले. एकूण सुखवस्तू कुटुंब.

रविवारी सकाळी १० ची वेळ. सगळे नाश्त्याला टेबलवर विराजमान. खूप दिवसांनी एकत्र नाश्त्याला असल्याने आईसाहेब खूश होत्या. बाबा पेपर वाचनात गुंग, तर दोन्ही मुली मोबाईलमध्ये गर्क. आईने सर्वांवर नजर फिरवली आणि मोठ्यांदा म्हणाली," आज सकाळी कधी नव्हे ते एकत्र नाश्ता करतोय त्यामुळे प्रत्येकाने आपल्या हातातील वस्तू बाजूला ठेवा बरं!" असा आदेश येताच बाबांनी ताबडतोब पेपर बंद केला. मुक्ता आणि मुग्धा एकमेकींकडे बघून हसल्या. तशी आई पण हसली. गप्पात नाश्ता सुरू झाला. आणि मुग्धाने सहज बाबांना विचारले," बाबा आपण नवीन घर बघणार होतो त्याचे काय झाले?" त्यावर बाबा म्हणाले की," अग हे घर छान आहे की. ३ बी. एच. के., टेरेस... मोठा फ्लॅट आहे. अजून काय हवे?" त्यावर मुग्धा म्हणाली की" बाबा, इथे रेंजचा प्रॉब्लेम आहे. घरून काम करताना मध्येच मला टेरेस वर जाऊन कॉल घ्यावे लागतात, खूप कसेतरी वाटते." यावर बाबा काही बोलणार तेवढ्यात आईच म्हणाली," काही नकोय मोठा फ्लॅट. तुम्ही दोघी लग्न होऊन जाणार आणि करायचाय काय हयापेक्षा मोठा फ्लॅट? त्यापेक्षा आधी तुझ्या लग्नाचे बघू. तू तर सगळ्याच स्थळांना नाही म्हणत्येस. तुझे काही ठरले आहे का? आम्हाला सांग. आमची काही हरकत नाहीये." मुग्धाने लगेच 'तसे काही नाहिये ग आई,' म्हणून आईला गप्प केले. आईने पण त्याला प्रतिउत्तर दिले नाही आणि मग म्हणाली," तू ७४ स्थळं नाकारलीस आणि ह्या परवाच्या ७५ व्या मुलाने तुला." हे ऐकताच मुग्धा अचंबित झाली आणि पटकन म्हणाली," काय मला नकार दिला, का?" आई एकदम गप्प झाली. तिने बाबांकडे बघितले. बाबांनी, 'काय हे? कशाला बोललीस? ' असा अविर्भाव दर्शवला. आई सावरून घेत म्हणाली," अगं त्यात काय एवढे? तू नाही का ७४ स्थळांना नकार कळवलेस. तसा त्याने कळवला." पण मुग्धा हट्टाला पेटली. 'माझ्यात काय कमी आहे म्हणून नकार आहे, ते मला कळले पाहिजे'. तिने आईला त्याचा प्रोफाईल आणायला सांगितला. मुलाचा प्रोफाईल उत्तम होता. चांगलं कमावत होता. सर्व परिस्थिती त्यांच्या तोडीस तोड होती. सोहम बर्वे नाव होते आणि पत्ता त्यांच्या घराच्या पुढचे दोन बंगले सोडूनच होता. बाबानी पण समजावून सांगितले. ती म्हणाली," बाबा मी आलेच जाऊन" आणि उठली. आई, बाबा मुक्ता सगळे बघायलाच लागले तिच्याकडे. पण ऐकेल ती मुग्धा कसली?

ती निघाली ती थेट बर्वे यांच्या घरी. दार सोहमच्या आईने उघडले आणि तिला ओळखून विचारले, "तू मुग्धा ना ग!" तिने हो म्हणताच तिला आत यायला सांगितले. समोरच बहुतेक सोहमच्या आजी बसल्या होत्या. बाबा काहीतरी काम करत होते तेही बाहेर आले. तिने सोहमला भेटायचे आहे असे सांगितले. त्यांनी 'तो वरच्या रूममध्ये आहे. गिटार वाजवतोय' असेही सांगितले. 'तरीही भेटायचे आहेच' असे म्हणाली. त्यांनाही थोडे आश्चर्य वाटले. ते व आई आत गेले. ते म्हणाले भेटायचे आहे तर भेटू देत. इकडे आजींनी तिचा ताबा

घेतला आणि प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. काय करतेस? लग्न झालय का? कुठे राहतेस? वगैरे.... वगैरे... तिला कळेना काय करावे तशी आजी म्हणाल्या, 'तुला भेटायचं आहे ना मग जा वर.'

ती उठली आणि वरती आली. सोहम सुंदर गिटार वाजवत होता. ती शांतपणे उभी राहिली. थोड्या वेळाने त्याचे लक्ष गेले. तो थांबला आणि आश्चर्याने विचारता झाला की 'तू इकडे कशी?' त्यावर तिने 'तुझ्याशी बोलायचे आहे' असे सांगितले। तोही 'ठीक आहे बाहेर बसू' म्हणून आला. तिने स्पष्टपणे मुद्द्यालाच हात घातला आणि मला नकार देण्याचे कारण जाणण्यासाठी मी आलीये हे सांगितले. त्यावर तो म्हणाला की कसे सांगू? ती म्हणाली स्पष्ट काय असेल ते सांग. तो सांगू लागला आणि तिला एकावर एक धक्के बसू लागले.

तो म्हणाला, "खरं तर तुला नकार देण्यासारखे काही कारण नाहीये. पण ऐक सांगतो..." तू व मी एकाच शाळेत होतो. नंतर एकाच कॉलेजमध्ये होतो. तू नेहमीच टॉपर असायचीस. त्यामुळे तुमचा ग्रुप वेगळाच होता. मी सांस्कृतिक विभागाचा मुख्य होतो. तुझी प्रगती बघत होतो. नंतर योगायोगाने आपण एकाच कॉलनीत रहायला आलो. इथेही तुझी घोडदौड नजरेत होतीच. कॉलनीच्या सांस्कृतिक कला मंडळात माझा सक्रिय सहभाग असतो. तू कधीही गणेशोत्सव, नवरात्र अश्या कार्यक्रमात दिसायची नाहीस. मला माहितीये की तुझा तो प्रांत नाहीये. बघायला पण यायची नाहीस. त्यामुळे जेव्हा तुझे स्थळ आले तेव्हा मी आपण होऊनच त्यातून माघार घेतली. कारण मी कलाप्रेमी तरीही माणसात रमणारा, निसर्गाला जवळ करणारा असा आहे. मला एकत्र कुटुंबात रहायला आवडते. आणि तू आपल्याच कोषात रमणारी, अभ्यासू, ध्येयवादी. तुझ्या करियरचा चढत्या आलेखाला माझ्यामुळे खीळ बसू नये एवढीच माझी इच्छा होती. बस्स. म्हणून मी नकार दिला. इतर कुठलेही कारण नाही."

हे सर्व ऐकल्यावर तिला दोन मिनिटे कळेचना काय बोलावे. तिला त्याच्या उदारपणाची आणि समंजसपणाची जाणीव झाली होती, पण तिचा अहंभाव तिला स्वस्थ बसू देईना.

ती 'ठीक आहे' म्हणाली, पण तिने त्याला विचारले की," माझ्यासाठी एक करशील" मला माझ्या कुठल्याच बाबतीत नकार चालत नाही. तर तू फक्त माझ्यासाठी खाली जाऊन तुझ्या आईला सांग की माझ्या घरी तुझा होकार आहे असे कळव." हे ऐकताच तो अचंबित होऊन म्हणाला,"अगं, काय बोलते आहेस, असे कसे करता येईल? सांगितले ना तुला आपल्या दिशाच भिन्न आहेत." त्यावर तिने दिलेल्या उत्तराने तो हैराण झाला. ती म्हणाली" की हो मला मान्य आहे की हे वेगळेच आहे. पण तरीही मला माझ्या स्थळांमध्ये एकही नकार नकोय. फक्त एकदाच माझ्यासाठी सांगायला सांग."

त्याला कळेचना की ही अशी का करत आहे. पण सोहम मोठ्या मनाचा, प्रगल्भ विचारांचा होता. पण त्यानेही तिला बजावले की" मी सांगतो. पण तू घरी गेलीस की मला नकार कळवला पाहिजेस." ती काहीच बोलेना.

शेवटी तिच्या वेड्या हट्टापायी त्याने खाली येऊन आईला सांगितले की" लगेच हिच्यासमोर हिच्या घरी फोन कर आणि होकर कळव." त्यांनाही कळेना पण आनंदाने त्यांनी तसे केले. इकडे मुग्धाचे आई बाबा काळजीतच होते.. ही सडेतोड मुलगी काय करेल म्हणून. मुग्धाच्या आईला फोन आल्यावर खूप आनंद झाला. दोन्ही घरचे वातावरण एकदम उत्साहित झाले.

सोहमच्या आजींनी मुग्धाला गजरा दिला, त्याच्या आईने सोहमला तिला सोडून यायला सांगितले. तो निघाला तिच्याबरोबर आणि तिला घरी जाऊन नकार कळव याची आठवण करत राहिला आणि" तू बघितलस ना सगळे वातावरण कसे बदलले आहे. त्यामुळे तू घरी जाऊन लगेच नकाराचा फोन कर" हे तिला बजावू लागला.

आत्तापर्यंत स्वतःच्या कोषात असणाऱ्या मुग्धाला आपली चूक कळली होती. सोहमचा चांगुलपणा तिच्या मनात ठसला. त्याने काहीही सांगितले तरी तिच्या मनाने सोहमला कौल दिला होता...

थोड्या दिवसांनंतर मुग्धाकडचे सोहमच्या घरी गेले. सोहम घरी होता. मुग्धाने तिचा नकार न सांगितल्याने सगळे आनंदात होते. सोहमला कळेना आता कसे बोलावे. तरीही मनाचा हिय्या करून त्याने सांगितले की" माझा आजही नकारच आहे. मुग्धा हुशार आहे पण आत्मकेंद्री आहे. आमचे स्वभाव भिन्न आहेत. मुग्धाने स्वतः च्या हट्टासाठी मला असे करायला लावले." आणि सर्व झालेला प्रकार सांगितला. आमचे खरंच जमायचे नाही हेही गोडीत सांगितले.

मुग्धा रडवेली झाली. तिला तिची चूक कळली होती, पण असे घडेल याची कल्पना नव्हती. दोन्ही घरच्या मंडळींना काय नि कसे करावे कळेना. शेवटी आजी मधे पडल्या आणि थोडे दिवस थांबूया असा मध्य त्यांनी सुचवला.

सोहम कामानिमित्त बाहेरगावी निघून गेला.

काही महिन्यांनंतर एका सामाजिक उपक्रमात सोहम गेला असताना त्याला मुग्धा दिसली. तब्येत खूप खराब झाली होती. त्याला मुग्धाची काळजी वाटली. तिची हुशारी त्याला माहिती होतीच. त्याने चौकशी केली असता त्याला कळले की फावल्या वेळात ती 'आदिवासी विकास प्रकल्प' यात काम करते आणि समाजासाठी खूप मदत करते.

एक दिवस त्याने तिला आजीबरोबर जाताना बघितले. घरी येऊन त्याने आजीला विचारले की 'मुग्धा बरोबर तू काय करत होतीस?' तिने त्याला तिच्यात झालेला बदल सांगितला आणि ती खरंच तुझी वाट बघतेय असेही सांगितले. आता ती आत्मकेंद्री नाही. त्याने मुग्धाची गाठ घेतली आणि कौतुक केले. ती तरीही शांत होती. काहीच बोलत नव्हती. सोहमला तिच्याबद्दल आत्मीयता वाटू लागली होती आताशा बऱ्याच कार्यक्रमात तिची भेट घडू लागली होती.

त्याने स्वतःहून तिला मागणी घातली. मुग्धा बहरली.

आणि....

थोड्याच दिवसात कुलकर्णी - बर्वे कुटुंब परत एकत्रित आले ते सोहम - मुग्धाच्या लग्नाची गाठ बांधायलाच...

**सौ. नेहा लिंबकर** - मो. ९४२२३०५१७८

# रसग्रहण -"टाकीचे घाव'- सुश्री ज्योत्स्ना तानवडे



प्रत्येकालाच आयुष्यात अगदी भरभरून यश सुख-संपत्ती हवी असते. अगदी आर्थिक, बौद्धिक उच्च स्तरातील सर्वांपासून सर्वांच्याच अशा इच्छा असतात. पण प्रत्यक्षात त्यातले किती मिळते हा ज्याच्या त्याच्या नशिबाचा भाग असतो. ' जसे ज्याचे कर्म तसे सुख घेती ' हेच जगण्याचे सार सांगितले आहे कवी डॉ निशिकांत श्रोत्री यांनी त्यांच्या ' टाकीचे घाव ' या कवितेमधून. आज आपण या अतिशय आशयघन, उदबोधक कवितेचा रसास्वाद घेणार आहोत.

**॥ टाकीचे घाव ॥ - डॉ निशिकांत श्रोत्री**

नुसत्या महाराष्ट्राचीच नव्हे

साऱ्या भारतभूची देखील

छाती अभिमानाने फुलून येते

त्या सह्याद्रीच्या

एका छोट्याश्याच टेकडीतून

खपाटीला गेलेल्या आपल्या पोटाची

खळगी भरण्यासाठी

ओरबाडून काढले मला माणसाने

तेव्हा....

आता पुढे काय वाढून ठेवलंय

काहीच जाणीव नव्हती.

'टाकीचे घाव सोसल्याखेरीज

देवपण येत नाही'

त्याच माणसाच्या संस्कृतीतील

नुसते बोजड शब्दच कानावर आले नाहीत

त्याबरोबरच घणाघण

टाकीचे घावही माझ्यावर पडायला लागले
निर्घृणपणे

पाषाणहृदयी म्हणून हिणवणाऱ्यांना
काय समजणार
माझ्यासारख्या पाषाणाच्या भावना!

कपच्या उडत होत्या देहाच्या
वेदना होत होत्या घावागणिक
तरीही कुठेतरी मनात असणाऱ्या
अंधुकशा आशेने
देवपण मिळण्याच्या
झेलत होतो मी तेही घाव
निमूटपणे, सोशिकतेने.

घावागणिक प्रत्येक
येत होता आकार
कसला ते मात्र
मला काहीच कळत नव्हतं.

घडवणाऱ्याने बाजूला ठेवले
छिन्नी - हातोडा समाधानाने
अन् माझ्या लक्षात आलं
आपली मूर्ती झालीच नाही
कसं ठेवणार आपल्याला आता
त्या पवित्र गाभाऱ्यात

अन् कसं येणार आपल्याला
ज्या आशेवर सोसत आलो
टाकीचे घाव
ते भव्य देवपण!

मी हळूच पाहिलं
माझ्या बेढब आकाराकडे
दोन गोल तळी
एकीला तर वशिंड
अन् त्यात देखील केवढं तरी भोक!
शिवाय कडेला एक
खुंटीही ठोकलेली!
शीः!
काय आहे नशिबात?
टाकीचे घाव सोसलेल्या
त्या देवालाच ठाऊक!

एकावर एक दोन तळी
गरागरा फिरवत
तोंडानं कसलंसं गाणं गात
कोणीतरी ओतले
माझ्यातल्या त्या भोकातून
धान्याचे दाणे
अन् आपसूकच बाजूने पडले
कोणाचं तरी पोट भरणारं
जाडभरडं पीठ!

मन कसं सुखावून गेलं

पण ते सुखही
टिकलंच नाही फार!
गावात शिरली सुधारणा,
आली झगमगवणारी वीज
अन् घरात शिरला मिक्सर
झालं ....
आमची रवानगी झाली
घरामागच्या अडगळीत
कुसमत पडायला.
वाहनं असोत सुसाट
किंवा झुळूक असो वाऱ्याची
माखून काढत होते मला
धुळीच्या खकाण्यानी
त्यातच मधून मधून
चिंब भिजवणाऱ्या
पावसाच्या त्या सरी!
चिंब व्हायला मजा यायची
पण नंतर काकडायला व्हायचं की

समजलंच नाही मला
त्याच धुळीत रुजून
माझ्यातच न भरडल्या गेलेल्या दाण्यांना
त्या पावसाच्या थेंबांनी

मोड येऊन ते
जीव घेऊन केव्हा बाहेर आले ते!

खूप धन्य वाटलं
अगदी ब्रह्मदेवासारखं

नसेल मला आकार मूर्तीचा
नाही कधी पाहिला
तो राऊळाचा गाभारा
पण भुकेजल्या पोटांना
अन्न भरवले
ऐन उमेदीत
अन् आता निवृत्तीनंतर तर
नवीन जीवांना जन्म दिले.
केवढं थोर कार्य घडलंय माझ्याकडून!

हेच तर मिळालंय मला
टाकीचे घाव सोसल्यानंतरचं
थोर देवपण!
माणसं म्हणतात ते देवपण!
आणखी काय पाहिजे!

**कवी : डॉ. निशिकांत श्रोत्री**

ज्याच्या कर्तृत्वाचा अभिमान आणि शौर्याचा मान फक्त महाराष्ट्राची नव्हे तर अख्ख्या भारत देशाची मान अभिमानाने उन्नत करतो त्या सह्याद्रीच्या पर्वतरांगांतील एका छोट्याशा टेकडीचा मी भाग आहे. एका पोटासाठी घाम गाळणाऱ्या कष्टकऱ्याने त्या टेकडीतून अक्षरशः मला तोडून बाहेर काढले. त्यावेळी स्वतःच्या भविष्याबद्दल मनात पूर्ण अंधार होता. आता आयुष्यात पुढे नक्की काय घडणार याबद्दल काहीही कल्पना नव्हती.

'टाकीचे घाव' ही मुक्तछंदातली कविता प्रथम पुरुषी एकवचनातील आहे. एका दगडाचे हे मनोगत आहे. तो दगडही साधासुधा नाही. देशाचा अभिमान असणाऱ्या सह्य कड्यातील एका टेकडीचा भाग आहे. त्याचे आता पुढे नक्की काय होणार याबद्दल तो अनभिज्ञ आहे. तो दगड आपले मनोगत, भावभावना, अनुभव सांगतोय. हे चेतना गुणोत्ती अलंकाराचे छान उदाहरण आहे. तो दगड एखाद्या माणसाप्रमाणे मनमोकळेपणाने व्यक्त होतो आहे.

टाकीचे घाव सोसल्याशिवाय

देवपण येत नाही

त्याच माणसाच्या संस्कृतीतील

नुसते बोजड शब्दच कानावर आले नाहीत

त्याबरोबरच घणाघण

टाकीचे घावही माझ्यावर पडायला लागले

निघृणपणे

पाषाण हृदयी म्हणून हिणवणाऱ्यांना

काय समजणार

माझ्यासारख्या पाषाणाच्या भावना!

मानवी संस्कृतीत अनेक मूल्ये एखाद्या वाक्प्रचार, म्हणीतून सांगितली जातात. वर्षानुवर्षाच्या अनुभवातून ही सूत्रे बनत जातात. असेच एक मोठे सूत्र म्हणजे ' टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही. ' हे सूत्र आता त्या दगडाच्या नुसते कानावरच पडत नाही तर त्याबरोबर त्याच्यावर निर्दयपणे घाव घातले जाऊ लागतात. त्यामुळे दुखावला जाणारा तो दगड म्हणतोय," एकमेकाला पाषाण हृदयी म्हणून हिणवणाऱ्यांना माझ्यासारख्या साक्षात पाषाणाच्या भावना कशा समजणार?"

'टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही' किंवा 'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण ' ही जीवनाची सूत्रे व्यवहारातील दीर्घकाळाच्या अनुभवातून सिद्ध झालेली आहेत. प्रत्येकालाच कधी ना कधी अशा अनुभवातून जावे लागते. त्यातून तावून सुलाखून निघाल्यावर त्याचे व्यक्तिमत्व सिद्ध होते. असाच अनुभव कवितेतला दगड पण घेतो आहे.

आपण व्यवहारात पाहतो की, जो आपल्या भावना खुलेपणानं व्यक्त करत नाही किंवा वागण्यात कठोर, निर्दयी असतो, त्याला समाज पाषाण हृदयी म्हणतो. पण त्या खऱ्याखुऱ्या पाषाणाला सुध्दा भावना असतात. त्या त्याच्या दृश्य स्वरूपात व्यक्त होतात. प्रसन्न हसरी देवाची मूर्ती अखिल विश्वावर कृपेची, मायेची

बरसात करीत असते. तर अक्राळ विक्राळ मोठा पहाड किंवा राक्षसी मूर्ती भय निर्माण करते. पण या भावना जाणीवपूर्वक समजून घ्याव्या लागतात, हा विरोधाभास कवी येथे छान व्यक्त करतो.

कपच्या उडत होत्या देहाच्या

वेदना होत होत्या घावागणिक

तरीही कुठेतरी मनात असणाऱ्या

अंधुकश्या आशेने

देवपण मिळण्याच्या

झेलत होतो मी तेही घाव

निमूटपणे, सोशिकतेने

त्या दगडातून काहीतरी घडवताना त्याला असह्य घाव सोसावे लागतात. त्या वेदना देहाला पिळवटून टाकतात. पण त्याच्या मनात एक आशा असते की ; कदाचित आपल्याला देवपण मिळू शकते. त्यासाठी तो सगळे घाव निमूटपणे सोसत असतो. मानवी मनाचे पण असेच असते. दुर्दम्य आशावाद, चिवट जीवनेच्छा ही माणसाची अंगभूत मोठी शक्ती आहे. कोणतेही संकट आले, कितीही त्रास सहन करावा लागला तरी यातूनही काही चांगले घडेल, उद्याचा दिवस चांगले काहीतरी घेऊन येईल अशी आशा त्याला बळ देत असते. त्या जोरावरच तो प्रतिकूल परिस्थितीतही स्थिर राहून झगडत असतो.

घावागणिक प्रत्येक

येत होता आकार

कसला ते मात्र

मला काहीच कळत नव्हतं.

घडवणाऱ्याने बाजूला ठेवले

छिन्नी-हातोडा समाधानाने

अन् माझ्या लक्षात आले

आपली मूर्ती झालीच नाही

कसं ठेवणार आपल्याला आता

त्या पवित्र गाभाऱ्यात

अन् कसं येणार आपल्याला

ज्या आशेवर सोसत आलो

टाकीचे घाव

ते भव्य देवपण!

मी हळूच पाहिलं

माझ्या बेढब आकाराकडे

दोन गोल तळी

एकीला तर वशिंड

अन् त्यात देखील केव्हढं तरी भोक!

शिवाय कडेला एक

खुंटीहि ठोकलेली!

शी:!

काय आहे नशिबात?

टाकीचे घाव सोसलेल्या

त्या देवालाच ठाऊक!

तो दगड घाव सोसत होता. पण आपल्याला नक्की कोणता आकार येणार हे त्याला कळत नव्हतं. कारागिराने समाधानाने हातातील छिन्नी हातोडा बाजूला ठेवला आणि दगडाला समजले की, ' आपली मूर्ती बनलेलीच नाही. मग आता आपल्याला कोण गाभाऱ्यात ठेवणार? कोण पूजणार? ज्या आशेवर हे घाव सोसले ते देवपण आता नाहीच मिळणार. हे काय होऊन बसले? नुसती दोन गोल तळी. एकाला मोठं भोक असलेलं वशिंड आणि खुंटी सुद्धा. काय हे बेढब रूप मिळाले? आता माझ्या नशिबात काय आहे हे तो टाकीचे घाव सोसलेला देवच जाणतो आहे. '

ही संपूर्ण कविता एक छान मोठे रूपक आहे. जात्याची तळी हे मनुष्य जातीचे रूपक आहे. आपल्याला देवपण मिळेल या आशेने तो दगड घाव सोसतो. पण त्याची जात्याची तळी बनवली जाते. तसंच माणसाचं पण होतं. एखादी मोठी कल्पना मनात घेऊन व्यवसाय सुरू करावा पण त्यात असंख्य अडचणी येऊन शेवटी वेगळेच काहीतरी सुरू होते. आपल्या आवडत्या मोठ्या करिअरच्या आशेने भरपूर अभ्यास करून परीक्षा दिली. पण अपेक्षेएवढे मार्क्स मिळाले नाहीत की जे मिळालेत त्यात चांगले काहीतरी करिअर निवडावे लागते. शेवटी आपले प्राक्तन हे वेगळेच काहीतरी असते जे आपल्याला कधीच समजत नाही. त्याप्रमाणेच आपल्याला फळ मिळत असते आणि आपण फक्त आपल्या इच्छेप्रमाणे प्रयत्न करीत राहतो. 'टाकीचे घाव' म्हणजे आपल्यावर होणारे संस्कार असतात. त्यातूनच आपण माणूस म्हणून घडत जात असतो.

एकावर एक दोन तळी

गरागरा फिरवत

तोंडानं कसलंसं गाणं गात

कोणीतरी ओतले

माझ्यातल्या त्या भोकातून

धान्याचे दाणे

अन् आपसूकच बाजूने पडले

कोणाचं तरी पोट भरणारं

जाडभरडं पीठ!

मन कसं सुखावून गेलं

त्या दगडाचे मूर्ती ऐवजी छानसे जाते बनवले गेले. ते गरागरा फिरवत आणि तोंडाने ओवी गात कुणीतरी त्यावर धान्य दळलं. त्यातून कोणाचं तरी पोट भरणारं पीठ तयार झालं. हे पाहून जात्याचं मन आनंदानं सुखावून गेलं. कुणाच्यातरी उपयोगी पडतोय हे खूप मोठं समाधान असतं.

हेच जगण्याचे सार आहे. आयुष्यात आपल्याला सगळंच आपल्या मनाप्रमाणे, इच्छेप्रमाणे मिळेल असे नाही. पण जे मिळेल त्यातच आनंद मानत शांतपणाने वाटचाल केली तर आयुष्यात खूप समाधान मिळते. म्हणूनच इच्छा खूप मोठ्या, चांगल्याच करायच्या, पण नशिबाने जे आणि जेवढे मिळेल त्यात सुखी समाधानी राहायला शिकायचे.

पण ते सुखही

टिकलंच नाही फार!

गावात शिरली सुधारणा,

आली झगमगवणारी वीज

अन घरात शिरला मिक्सर

झालं

आमची रवानगी झाली

घरामागच्या अडगळीत

कुसुमत पडायला.

वाहनं असोत सुसाट

किंवा झुळूक असो वाऱ्याची

माखून काढत होते मला

धुळीच्या खकाण्यानी

त्यातच मधून मधून

चिंब भिजवणाऱ्या

पावसाच्या त्या सरी!

चिंब व्हायला मजा यायची

मग नंतर काकडायला व्हायचं की

त्या दगडाला आता त्याचे जाते बनवल्यावर वेगळेच काम मिळाले ज्यातून खूप समाधान मिळत होते. पण त्याचे हे समाधान फार काळ टिकले नाही. गावात सुधारणा झाली आणि वीज आली. त्यामुळे गावात आता गिरणी आली. घराघरात मिक्सर आले. मग जात्याची रवानगी आपोआपच घरामागच्या अडगळीत झाली. तिथे त्याचे हाल सुरू झाले. वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीने ते माखून निघायचे. पावसाने ओले चिंब झाल्यावर हुडहुडी भरायची.

काळ बदलला की, बदलत्या गोष्टींनी आपल्याही आयुष्यात चांगले वाईट बदल होतात. गृहिणीचे दळायचे श्रम वाचून चांगला बदल झाला, तर जात्याच्या नशिबी मात्र उपेक्षा आली. एकच बदल प्रत्येकाच्या आयुष्यावर वेगवेगळा परिणाम करतो तो असा.

समजलंच नाही मला

त्याच धुळीत रुजून

माझ्यातच न भरडले गेलेल्या दाण्यांना

त्या पावसाच्या थेंबांनी

मोड येऊन ते

जीव घेऊन केव्हा बाहेर आले ते!

खूप धन्य वाटलं

अगदी ब्रम्हदेवासारखं

अडगळीतल्या जात्यात न भरडता तसेच पडून असलेले धान्याचे दाणे पावसामुळे त्या धुळीत रुजून वाढत जाऊन जात्यातून बाहेर आले. या गोष्टीचा जात्याला अतिशय आनंद झाला. या निर्मितीला सहाय्यभूत

झाल्याने निर्माणकर्त्या ब्रह्मदेवासारखी धन्यता वाटली. आपले जीवन नुसती अडगळ न रहाता अशा निर्मितीला पूरक ठरले यामुळे त्याला परमानंद झाला.

प्रत्येक वेळी आपण कार्यरत असूच असे नाही. पण म्हणून आपण निरुद्योगी होतो, आपले जगणे निरर्थक होते असे होत नाही. अशा एखाद्या सत्कार्याला सहाय्य किंवा कुणाच्याही मदतीला येण्याने जीवनाचे सार्थकच होते.

नसेल मला आकार मूर्तीचा

नाही कधी पाहिला

तो राऊळाचा गाभारा

पण भुकेलेल्या पोटांना

अन्न भरवले

ऐन उमेदीत

अन आता निवृत्तीनंतर तर

नवीन जीवांना जन्म दिले

केवढं थोर कार्य घडलंय माझ्याकडून!

हेच तर मिळालंय मला

टाकीचे घाव सोसल्यानंतरचं

थोर देवपण!

माणसं म्हणतात ते देवपण!

आणखी काय पाहिजे!

त्या दगडाची मूर्ती बनलीच नाही. त्यामुळे गाभारा बघायचा प्रश्नच नव्हता. पण ऐन उमेदीत पीठ दळून भुकेजलेल्यांचे पोट भरले आणि निवृत्तीनंतर त्याच्यातून दाण्याची रोपे उगवून आली. नवे जीव जन्माला आले. हे खूप मोठे कार्य घडल्याने त्याला वाटते आहे की, 'टाकीचे घाव सोसल्यानंतरचे हे मोठे देवपण त्याला मिळाले आहे. आणखी काय हवे? '

या कवितेत या रूपकाच्या माध्यमातून कवीने फार मोठा संदेश दिला आहे. आपल्याला आपल्या आयुष्याकडून खूप अपेक्षा असतात. त्यानुसार आपण नियोजन करीत असतो, कष्ट घेत असतो. पण आपल्याला हवे ते आणि तसेच घडते असे नाही. त्यामुळे जे आणि जेवढे मिळेल तेच स्वीकारावे लागते. प्रत्येकाची कहाणी वेगळी असते. एका हाताची पाच बोटे तरी कुठे सारखी असतात? त्याप्रमाणे एकाच घरातील भावंडांनासुद्धा

वेगवेगळ्या उपलब्धी होतात. प्रत्येक दगडाची मूर्तीच बनेल असे नाही. कुणाचे जाते बनते तर कुणाचा चिराही बनतो. कारण प्रत्येकाला आपापल्या प्राक्तनानुसार भागधेय मिळत असते. याची पूर्ण जाण ठेवून जे आणि जेवढे मिळते त्यात समाधान मानायला हवे. वाट्याला आलेले आयुष्य आनंदात व्यतित करायला हवे.

कवीने इथे आणखी एक संदेश दिला आहे. त्या दगडाला मूर्ती बनण्याचे भाग्य लाभले नाही. पण त्याचे जाते बनवल्यावर ऐन उमेदीत त्याने भुकेजलेल्यांचे पोट भरण्याचे सत्कर्म केले. तसे सगळ्यांनी सदैव दुसऱ्यांचे हित जपले पाहिजे आणि निवृत्तीनंतरही इतरांना आनंद दिला पाहिजे. इतरांसाठी जगण्यासारखे मोठे काम नाही. यासारखे समाधान नाही. देवपण हे याहून वेगळे नसतेच. देव मूर्तीत नसतोच. तो प्रत्येक प्राणीमात्रात वसत असतो. गरजवंताला मदत करणे हेच आपल्यातले देवपण असते... असे मोलाचे संदेश डॉ. निशिकांत श्रोत्री यांची 'टाकीचे घाव' ही अतिशय भावपूर्ण, आशयघन कविता देते.

**सुश्री ज्योत्स्ना तानवडे** - पुणे

## कविता - उमज - सुश्री शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी)



-आयुष्याच्या गतीमध्ये...
पुढे पुढे मी चालले..
पावलांना ओढ होती..
परि वळूनी पाहिले...

- पापणीच्या काठावरी...
थेंब मोतियांचा होतो..
आठवांचा पूर येता..
मनं भिजवून जातो...

- आपुलकीच्या नात्यांचे...
रंग जरा फिकुटले..
गोफ गुंफलेले सारे..
काही कसे निसटले...

- अंतरात जपलेला...
प्राजक्ताचा ओला गंध..
मोरपंखी भावनांचे..
नाजूक रेशमी बंध..

- कशी थांबवू कळेना...
एकटीच पानगळ..
उगा जीव कासावीस..
का मनाचे असे खेळ..

- माझे मला उमजले...
कोण माझे-मी कुणाची..
अवघे गोकुळ माझे..
अन् मी या गोकुळाची..
--- मी या गोकुळाची....

**सुश्री शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी)** - कोथरूड-पुणे - मो. ९५९५५५७९०८

## कथा - झिंग - सौ. राधिका भांडारकर



सातारा जिल्ह्यातलं शेरेवाडी हे एक लहानसं खेडेगाव. तीन-चार हजार डोकी असलेलं, नकाशावर नावच नसलेलं चिमुकलं गाव. ध्यास, ध्येय, जिद्द, प्रगती या सर्वच विशेषणांपासून कित्येक मैल दूर असणारं हे गाव आणि गावातलं जीवन.

त्याच गावातली"आदिती स्वामी" ही एक नऊ दहा वर्षाची मुलगी.

नदीच्या पल्याड, डोंगराच्या मागे, कुणी एक"तारा" नावाची स्त्री पडक्या इमारतीच्या ओसरीवर शाळा भरवत असे. खूप पायपीट करून, उन्हात, थंडीत, कधी पावसातही आदिती त्या शाळेत झपाटल्यासारखी जायची. हातातल्या पिशवीत पाटी, पेन्सिल आणि आईने दिलेला पोळी भाजीचा डबा. वास्तविक झपाटण्याचं तिचं वय नव्हतं, पण तिला शाळा आवडायची. त्या अजाण, न कळत्या वयातही एक झिंग तिला जाणवायची." आपण वेगळे आहोत, निराळे आहोत" असे आतून तिला वाटायचे.

एक दिवस ताराबाईंनी तिला दोन गोष्टी सांगितल्या. एक एकलव्याची आणि दुसरी अर्जुनाची. दोन्ही गोष्टी धनुर्धारींच्या.... तिरंदाजींच्या.

पाण्यातल्या अस्थिर प्रतिबिंबाकडे पाहून गरगर फिरणाऱ्या यांत्रिक पोपटाचा डोळा बाणाने अचूक टिपणारा अर्जुन जितका अदितीच्या मनावर ठसला, तितकाच गुरुविना तिरंदाजीत प्राविण्य मिळवणारा एकलव्यही तिला खूपच थोर वाटला. एकलव्याने गुरुदक्षिणा म्हणून द्रोणाचार्यांना स्वतःच्या उजव्या हाताचा अंगठाही कापून दिला. या कथेने तिचे बालमन खूप द्रवले. एकलव्याच्या कथेने तिला निश्चित घेरले आणि त्याच क्षणी कसलं तरी स्वप्नबीज तिच्या मनात नकळत रुजलं.

एक दिवस तिने सहज एका झाडाच्या फांदीला अर्धवर्तुळाकार देऊन त्याची दोन्ही टोकं दोरीने बांधली. त्यावर एका काडीला स्वार करून तिने दोरी ताणली आणि काय आश्चर्य... ती काडी लांब सरळ रेषेत उडाली. आदितीला कोण आनंद झाला! पण त्याचवेळी तिच्या 'माय'नं तिला जोरात हाकारलं,

"अग ए भवाने! केरवारा करशील की नाय? मोरीवर खरकटी भांडी साचलीयत. चुलीसाठी सरपण नाही. काही हातभार लावशील की नाय? उनाड कार्टी.."

त्याच वेळी तिचा"बा" तिचा खेळ दुरून पाहत होता आणि त्याच्याही मनात काहीतरी चमकलं." हे काहीतरी वेगळं आहे" असं वाटलं."आपल्याला या पोरीसाठी काहीतरी कराया हवं" हे त्यानं जाणलं आणि त्या क्षणापासून त्याच्यासाठीही तो एक ध्यासच बनला.

गावकुसात कुणीही न पाहिलेलं सपान आदितीच्या"बा" ने पाहिलं." संघर्ष करू, खस्ता काढू, पण आदितीला या खेळात नाव मिळवूनच देऊ."

सातारा शहरातलं एक स्टेडियम त्याने आदितीला दाखवलं. इतरही काही अशीच खेळांची मैदानं त्याने तिला दाखवली. तेथे खेळले जाणारे खेळ आणि त्याला जुजबी माहिती असलेल्या क्रीडा प्रकारांपैकी काहींची ओळख त्याने आदितीला करून दिली. आदिती प्रचंड खुशीत होती."बा" कडून हे सारं ऐकायला तिला खूपच मजा वाटत होती. परतीच्या वाटेवर त्यांना एक आर्चरी प्रशिक्षण केंद्र दिसलं. सुरुवातीला ते थोडे घुटमळले पण नंतर ते दोघं आत गेले. तिथल्या त्या वेगळ्याच वातावरणात, धनुर्विद्येचं शिक्षण घेणाऱ्या खेळाडूंना पहात असताना आदितीलाही एक प्रकारची अनामिक नशा चढत होती.

'बा'ने एका प्रशिक्षकांना सहज विचारले,

"हिला शिकवाल का?"

"काही चाचण्या घ्याव्या लागतील, त्यानंतर ठरवू" असे ते प्रशिक्षक म्हणाले.

इथूनच आदितीच्या तिरंदाजीचा प्रवास सुरू झाला.

संघर्ष खूप होता, अडचणी खूप होत्या. शिक्षणासाठी आणि सरावासाठी घरापासून दूर राहायचं, पैशाची समस्या कशी सोडवायची, कुठे राहायचं, राहण्याचा खर्च, शिक्षणाची फी, क्रीडा साहित्यासाठी करावा लागणारा खर्च 'बा'ला कसा पेलवेल? माय शेतावर जायची. रोजंदारी करून घराला हातभार लावायची. 'बा' जवळपासच्या गावात सुतारकाम करायचा. कला होती त्याच्या हातात म्हणून कामे मिळायची. पण भरवशाचं असं काही उत्पन्न नव्हतं. मग आदितिच्या स्वप्नांची पूर्तता कशी होणार?

"पण इच्छा असेल तिथे मार्ग मिळतो" ही 'बा'ची श्रद्धा! लक्ष्य साधण्याचं आदितीला जणू वरदानच मिळालेलं होतं हे प्रशिक्षकाने जाणलं आणि तिला केंद्रात प्रवेश मिळाला. 'बा' तिच्या पाठीशी सदैव उभा राहिला. 'माय'नेही नंतर साथ दिली. अंगावरचं किडुक मिडुक विकून, काही उसनवारी करुन सुरुवात तर केली. गावकऱ्यांची बोलणी खाल्ली. त्यांनी नाव ठेवली. आदितीला दांडगट उनाड ठरवले." कोणी करेल का लग्न हिच्याशी" असं भय दाखवलं. पण सोबत होती एक झिंग, प्रचंड नशा, लक्षवेधी जिद्द.

आदिती शिक्षणाच्या एकेक पायऱ्या चढत होती. लक्ष्यावर अचूक बाण मारणे, आपले बाण लक्ष्याच्या मध्यभागी शक्य तितक्या जवळ सोडणे, हॅण्डल, राईजर यांची ओळख, बोस्टिंग मध्ये बसणारे स्ट्रॅन्ड, ९. ३ व्यासाचे बाणांचे शाफ्ट आणि टिपांचे व्यास, खेळाचे नियम, या सर्वांचा सखोल जाणीवपूर्वक अभ्यास ती आता करत होती. हेड टू हेड एलिमिनेशन फॉरमॅटच्या हिशोबाने ठरल्या जाणाऱ्या स्पर्धेतल्या रँकिंगबद्दल ती जाणून घेत होती. जागरूक होत होती. हळूहळू ती वैयक्तिक आणि सांघिक स्पर्धेतही भाग घेऊ लागली. त्यात यशाबरोबर थोडे फार पैसेही मिळू लागले. प्रतिस्पर्धीही होते. तिच्याच बरोबर शिकणारे उद्दाम, धनवान खेळाडू तिचा 'पत्ता कसा कट होईल' याचे राजकारण करू लागले. तिच्याबरोबर असणाऱ्यांपेक्षा या मत्सरी वृत्तीच्या लोकांची संख्या आणि बळ खूप मोठं होतं. पण याही प्रवाहाविरुद्ध तिला पोहायचं होतं.

एक दिवस सरांनी तिला केबिनमध्ये बोलावलं. चौदा पंधरा वर्षांचे वय. प्रचंड दडपण होतं तिच्या मनावर." का बोलावलं असेल? बहुतेक मला पुढील ट्रेनिंगसाठी बाद करण्यात आलं असेल."

"बा"चे डोळेच तिला दिसले." भिऊ नकोस मी पाठीशी आहे"

आदिती सरांच्या केबिनमध्ये आली. त्या थंड वातावरणातही एक घामाची लकेर तिला जाणवली.

"सर..." ती चाचरत म्हणाली.

"आदितीsss! पेढे काढ प्रथम!".. प्रचंड सातमजली हसत सरांनी आदितीच्या खांद्यावर थोपटलं.

"ॲकॅडमी इज प्राऊड ऑफ यु आदिती! भारतीय तिरंदाजांच्या संघात तुझी निवड झाली आहे. संघात तू सर्वात कमी वयाची खेळाडूही ठरली आहेस."

त्या दिवशी बा आणि मायच्या आनंदाला उधाण आले. ' गरीब, अडाणी, कसलीही क्रीडा पार्श्वभूमी नसलेले माझे हे भोळे भाबडे जन्मदाते आणि त्यांची झिंग! ' अदिती भरून पावली. अभिमानाने तिचं ऊर भरून आलं. जगातलं काहीही आपण मिळवू शकतो याची तिला खात्री झाली.

त्या दिवशी मायने केलेली खीर तिने चाटून पुसून खाल्ली. त्यानंतर आदितीने मागे वळून पाहिलंच नाही. स्वित्झर्लंड, थायलंड, इराक, शारजा, येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तिला सुवर्णपदके, रौप्य पदके मिळाली. अनेक विश्वविक्रम तिने मोडले. सातत्याने मिळणाऱ्या यशामुळे तिला स्पॉन्सररही मिळू लागले. आर्थिक प्रश्न आपोआपच सुटत गेले. एक यशस्वी"तिरंदाज" म्हणून तिची जागतिक क्रीडा क्षेत्रात ओळख निर्माण झाली.

आज शेरेवाडी गावात तिचा सत्कार होता. जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून महिलांच्या कंपाऊंड प्रकारात आदितीने जागतिक अजिंक्यपद मिळवले होते. एक महाराष्ट्रीयन, गाव कुसाकडची, कसलीही क्रीडा पार्श्वभूमी नसलेली आदिती. तिने आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात देशाचे नाव उज्वल केले होते.

टाळ्यांचा कडकडाट झाला. आदिती व्यासपीठावरून बोलत होती,

"अशक्यही शक्य होते. फक्त एक झिंग भिनायला हवी.. अजूनही वाट बाकी आहे. पल्ला लांबचा आहे क्षितिजापलीकडची स्वप्नकिरणे बोलावत आहेत. मनात झिंग आहे, डोक्यात नशा आहे. दमदार पावलांसाठी आकाशही लहान आहे....." आदिती बोलत होती... बोलतच राहिली. लोक टाळ्या वाजवत होते... टाळ्या वाजवतच राहिले.

**सौ. राधिका भांडारकर** - ई ८०५ रोहन तरंग, वाकड पुणे ४११०५७ - मो. ९४२१५२३६६९ Email - radhikabhandarkar@yahoo. com

## लेख - कवयित्री शांता शेळके स्मरण - सुश्री सुरेखा कुलकर्णी



मराठी सारस्वताच्या मुकुटात मानाचे तुरे अनेक आहेत. त्यातील एक सुंदर तुरा खोवला कवयित्री शांता शेळके यांनी! शांताबाईंनी मराठी साहित्य सोनियाच्या खाणीत विविध शब्दरत्नांची भर घातली आहे.

त्यांनी काव्याचे विविध प्रकार रसिकांपुढे मांडले आणि ते सारे रसिकांना भावले. भक्तीगीते, प्रेमगीते, विरह गीते, कोळीगीते, लावणी, 'ऋतू हिरवा' सारखी निसर्ग गीते, स्त्रीसुलभ भाव मांडणारी भावगीते आणि बालगीते, असे विविधरंगी काव्य त्यांनी लिहिले. जणू साहित्यातील रंगतदार इंद्रधनुष्य रसिकांपुढे सुरेख मांडले. हे सर्वच रंग सुंदर आहेत. त्यांच्या कविता लय-तालांनी सजलेल्या असल्यामुळे त्याची सुरेल गीते झाली आणि त्यांनी रसिकांचे कान आणि मन तृप्त झाले

यातील बालगीतांचा रंग मला अधिक भावला. बालमनातील भावना अगदी त्यांच्या शब्दात या कवितांमधून व्यक्त झालेल्या दिसतात आणि म्हणूनच त्याची सुरेल बालगीते झाली अगदी मुंगीपासून ते बालवयात आवडणाऱ्या विविध विषयांवर त्यांनी कविता लिहिल्या आणि त्या बालांबरोबरच सर्वांना प्रिय झाल्या.

त्यापैकी एक कविता प्रातिनिधिक स्वरूपात मी आपल्यापुढे मांडत आहे. हे लोकप्रिय बालगीत आहे,"किलबिल किलबिल पक्षी बोलती"! या गीतातील कल्पनेतला गाव लहानांसह सर्वांना आवडणारा आहे. यात आलेले निसर्गवर्णन, पक्ष्यांची किलबिल, झुळझुळ झरे, पाने-फुले व भिरभिरणारी फुलपाखरे, हे वर्णन अगदी कोणालाही मोहून टाकणारे आहे. यात प्रत्येक शब्द अगदी यथार्थ व परिपूर्ण आहे. कवीची प्रतिभा म्हणजे 'शब्द' जणू हात जोडून उभे आहेत. ओळीओळीत बाल मनातील भावना व्यक्त होत आहेत. कवी- कल्पना, खरंच 'जे न देखे रवी' अशाच असतात. या गावात सर्वजण मुलेच असतात. कारण तिथे लहान-मोठे हा भेद नाही. तसेच इथे शाळा, पुस्तके असे मुलांना कंटाळवाणे वाटणारे काहीच नाही. फक्त खेळावे, बागडावे असे हे गाव आहे. मुलांना आवडणारी गाणी, हसऱ्या प-या, आणि झाडावरच चेंडू आणि ब्याटी आहेत.

असा बहरलेला गाव लहानांसह सर्वांना आवडणारच! मग ही कविताही गीतरूपात सर्वांना आवडते. ही सारी गंमत कवीच्या शब्दांनी निर्माण केली. त्यातील शब्दांचा गोडवा, भावपूर्ण मांडणी, चित्रमय वर्णन, हे सारे कवीचे प्रतिभासंपन्न असे यश आहे. अशा बालगीत-लेखनाने शांता शेळके यांनी मराठी बालगीतांना साज चढवला आहे.

म्हणूनच थोडक्यात असे म्हणावेसे वाटते," असेन मी नसेन मी तरी असेल गीत हे." हेच खरे!

नवोदितांना प्रेरणा देणाऱ्या शांताबाईंच्या काव्य स्मृतीस विनम्र अभिवादन!

**सुश्री सुरेखा कुलकर्णी**, सातारा. ९४२११४२४६६

## चित्रकाव्य - मागे वळून बघतो तेव्हा - श्री प्रमोद जोशी





तेव्हा थरथर मनास होती,
आता थरथरणारे हात!
पाठमोरी माळून घेता,
अजुन हुळहुळे काही आत!

परस्परांची काठी झालो,
सावरायला अपुला तोल!
शुष्क त्वचा जरी दिसली वरवर,
आत चिरंजीव आहे ओल!

निर्माल्याच्या मनात कुठली,
रंगाची, गंधाची भूक?
घडेल ते ते सर्व बरोबर,
कुठे झेपते आता चूक!

तारुण्याने निरोप घेता,
साहचर्य हे अधीक खुलले!
वार्धक्याचा श्रावण करण्या,
भावधनु दोघांवर झुलले!

बाकी शिल्लक किती राहिली,
दोघानाही नाही ठावूक!
रोख हातीची इतकी निर्मळ,
घाऊक होतो आपण भावुक!

देह जरी का थकला आता,
तू असण्याने तरूण होतो!
दृष्टीआड तू जाता क्षणभर,
अर्थ सुखाचा करूण होतो!

निमित्त केवळ गजरा आहे,
मोगऱ्याहुनी तुलाच दरवळ!
जरा बदलल्या वागण्यातुनी,
कशी कळे हृदयाची खळबळ?

सप्तपदी वा माप सांडणे,
त्याचा हल्ली अर्थ लागतो!
तुझी झोपही छळते बाई,
हालचाल बघण्यास जागतो!

कुशीवरी तू वळल्यानंतर,
तगमग थांबे.. मिळे दिलासा!
वार्धक्याला नको विचारू,
तारुण्यातील काही खुलासा!

वळून मागे बघतो तेव्हा,
सर्व ऋतूंचे दिसती विभ्रम!
आधी? नंतर? एकावेळी?
कसे जाऊ? हा छळतो संभ्रम!



**श्री प्रमोद जोशी,** देवगड मो. 9423513604

# लेख - वस्त्रप्रावरण चिरस्वरुपी आनंद - सौ. दीपा नारायण पुजारी



वर्तमानपत्रात छापून आलेला 'सस्टेनेबल फॅशन' हा लेख वाचत होते. बदलत्या काळानुसार फॅशन या शब्दाची व्याख्या बदलत जाते. मी कॉलेजमध्ये असताना बेलबॉटमची फॅशन होती. मध्यंतरी लुप्त झालेली ही बेलबॉटम आज थोडी मोकळीढाकळी होऊन प्लाझोचं आरामदायी रूप घेऊन फलकारताना दिसते. मग फॅशन चिरस्वरुपी कशी बरं? असा प्रश्न पडतो. बरोबरच आहे. जिथं कशाचीच शाश्वती नाही तिथं फॅशन चिरस्वरुपी!? लेख वाचल्यावर लक्षात आलं, हे तर खूपच सोपं आहे. म्हणजे असं, की आपल्या नातीसाठी आजीनं तिच्या साडीचं परकरपोलकं शिवणं... इतकं साधं सहज उत्तर आहे या मोठ्या शब्दाचं! किंवा आईच्या साडीची लेकीनं कुर्ती शिवली आणि त्या कुर्तीचा पुढे नातीसाठी टॉप झाला. आहे ना गंमत? हो, पण इतकी वर्षे टिकणारा कपडा मात्र हवा. म्हणजेच तो सस्टेनेबल हवा.

आताच्या साठीच्या पिढीला हे नवीन नाही. पुस्तकं, कंपासपेट्या, खेळ, कपडे इ. मोठ्यांचे लहानांना मिळणं हे सर्रास बघायला मिळे. तेच तर या फॅशनच्या दुनियेत प्रवेश करतं झालंय. पण मुळात ही गरज का भासली बरं? हा प्रश्न स्वाभाविकच आहे. कापड तयार करून त्यापासून कपडे बनवणं ही एक पर्यावरणाचा समतोल बिघडवणारी प्रक्रिया आहे. पर्यावरण संतुलित राखणं ही काळाची गरज आहे. म्हणूनच चिरस्वरुपी कपडे आणि फॅशन हा विचार सुरू झाला असावा.

'एक अंगावर एक दांडीवर 'चे दिवस गेले. पाच दहा म्हणता म्हणता शेकडो कपडे कपाटात गर्दी करू लागले. अनेक प्रकारच्या कपड्यांची आवश्यकता निर्माण झाली. (की आपणच केली? ) दिगंबराच्या रुपात जन्माला आलेला माणूस 'एक नूर आदमी दस नूर कपडा' अशा विचित्र अवस्थेमध्ये कधी गेला हे त्याचं त्यालाच कळलं नाही. कपड्यांचं अवडंबर एवढं मोठं झालं की आतला माणूस कसा आहे हे बघणंच विसरलो आपण. वरलिया रंगाला भुलणारे आपण, आकर्षक, प्रचलित, महागड्या कपड्यांना अवाजवी महत्त्व देऊ लागलो. कपड्याची श्रीमंती माणसाचा मोठेपणा ठरवू लागली. आकर्षक कपडे तयार करण्यासाठी कृत्रिम धाग्यांची निर्मिती होऊ लागली. कृत्रिम धाग्यांपासून तयार होणाऱ्या कपड्यांची निर्मिती, त्यांचं रंगकाम, यासाठी रसायनांचा वापर वाढला. वस्त्रोद्योग प्रदूषणाचं कारण बनला आणि या पृथ्वीवरील वाढणारं प्रदूषण रोखण्यासाठी चिरस्वरुपी कपडे हा विचार मूळ धरू लागला.

चिरस्वरुपी वसनं ज्याला मिळाली तो सूर्यपुत्र कर्ण आठवला ना सगळ्यांना? जन्मजात तेजस्वी कर्णकुंडलं लाभलेला कर्ण! आदिमानव ते होमोसेपियन.. म्हणजे आपण, अर्थातच आधुनिक मानव, यांच्या शरीरयष्टीत हळूहळू बदल झालेला दिसतो. हा बदल काही प्रमाणात जनुकीय आहे. असा काही बदल जनुकांमध्ये व्हावा की समस्त मनुष्यजातीला जन्मजात कवचकुंडलं मिळावीत. एवढं वरदान लाभल्यावर तरी कपड्यांचा हव्यास थांबेल का हो? अर्थातच नाही थांबणार. सगळ्यांनाच एकसारखी कवचकुंडलं कशी बरं चालतील? समतेतसुद्धा वैविध्य हवचं ना! माझ्याकडं आहे तश्शीच साडी आणखी कोणाकडं आहे हा विचार स्वप्नात देखील सहन

होत नाही, हो ना? (माफ करा हं, हा जळफळाट फक्त महिलांपुरताच असेल. समस्त पुरूष या बाबतीत पुरुषोत्तम असतील.) मग जनुकांमध्ये झालेल्या बदलामुळे सगळे खरेखुरे एकसारखे दिसू लागले तर? एवढी समानता झेपेल का आपल्याला? या विचारानं मलाच हसू आलं.... असो.

अन्न, वस्त्र, निवारा या सजीवांच्या मूलभूत गरजा आहेत. सर्व सजीवांना जिवंत राहण्यासाठी हवा, पाणी आणि अन्नाची गरज असते तितकीच निवाऱ्याचीही गरज असते. परंतु मानव हा एकमेव प्राणी आहे ज्याला आणखी एक गरज असते. वस्त्रं, कपडे ही मानवाची चौथी मुलभूत गरज आहे. हे कपडे एकदा शिवले किंवा एकदा अडकवले आणि काम संपलं असं नाही ना होत. बिच्चारा माणूस! ! वेगवेगळे कपडे शिवणं, घालणं आणि त्यांचं प्रदर्शन करणं हा एक मोठ्ठा कार्यक्रम होऊन बसला आहे. आपण कपडे सहजपणानं बदलू शकतो. गरजेप्रमाणं आपल्याला ते बदलावेही लागतात.

गदिमांनी किती छान सांगितलंय ना?

"मुकी अंगडी बालपणीची

रंगीत वसने तारुण्याची

जीर्ण शाल मग उरे शेवटी

लेणे वार्धक्याचे....."

लहानमुलांच्या शारीरिक वाढीनुसार त्यांना नवे कपडे घ्यावे लागतात. दिवसा कामाला जाताना औपचारिक, रात्री झोपताना सैलसर, दिवसभर घरात घालायचे वेगळे, लग्नसमारंभात आकर्षक; महागडे, विद्यार्थ्यांना, लष्करात जवानांना, सरकारी कार्यालयात गणवेश... किती वैविध्यपूर्ण पेहराव करतो आपण! आपल्या शरीराची आपण जास्त काळजी घेतो. मन, आत्मा आणि शरीर यात आपल्या देहाचा विचार आपण प्रथम करतो. सुंदर दिसण्यासाठी प्रयत्न करत राहतो. सुंदर दिसणं, चांगलं दिसणं हा तर प्रत्येकाचा अधिकार आहे. पण सुंदर विचारांची वसनं मनाला घालणं जास्त योग्य नाही का? मन निखळ, निरलस असेल, मनात चांगले विचार येत असतील तर ती व्यक्ती आपसूकच सुंदर दिसेल. सुयोग्य विचारांची कवचकुंडलं असतील तर वरवरचा देखावा महत्त्वाचा वाटणार नाही. अर्थातच म्हणून गबाळं, अव्यवस्थित राहण्याची आवश्यकता नाही. विचारांच्या नेटकेपणाइतकाच राहणीमानात देखील नेटकेपणा असावा. दिखाऊपणा नसावा, हो ना? पण आधुनिक जीवनशैलीमुळे कपड्यांची आवश्यकता, त्यांचा डामडौल, त्यांचा दिखाऊपणा फारच वाढला आहे. क्षणभंगुर आयुष्यासाठी किती हा हव्यास? आपल्यानंतर आपल्या आप्तस्वकीयांना त्या ढीगभर कपड्यांच्या ढिगाऱ्याचं व्यवस्थापन करताना नाकी नऊ येऊ नयेत, हा विचार करणं योग्य नाही का?

"वासांसि जीर्णानी यथा विहाय

नवानि गृह्णानी नरोपराणी ॥

तथा शरीराणी विहाय जीर्णान्यनानी

संयाति नवानि देही ॥"

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी मानवी शरीरालाच एका वस्त्राची उपमा दिली आहे.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात सर्व माणसांच्या शरीरात एकच आत्मा वास करत असतो. गीताईमध्ये विनोबा भावेंनी या संस्कृत श्लोकाचा अर्थ सोपा करून सांगितला आहे.

"सांडूनिया जर्जर जीर्ण वस्रे,

मनुष्य घेतो दुसरी नवीन.

तशीच टाकूनी जुनी शरीरे,

आत्मा ही घेतो दुसरी निराळी."

आत्मा दिसत नाही, त्यावर सामान्य माणूस विश्वास ठेऊ शकतोच असं नाही. विज्ञानाला देखील न दिसणाऱ्या गोष्टी मान्य नाहीत. परंतु एक दिवस हा प्रवास संपणार आहे. पैलतीर गाठावाच लागणार आहे. तो गाठण्यापूर्वी आपलं गाठोडं सत्कर्मांनी भरून घेऊया. मोह, माया, अभिलाषा, मत्सर, स्पर्धा, अशा अनेक मायाजालांनी भरलेल्या घागरी यमुनेच्या पाण्यात सोडून दिल्या आणि ज्ञानाची, परमार्थाची, त्यागाची, माणुसकीची वसनं लेवून, ज्ञानाची सावली देणाऱ्या कदंबावर ठेवलेली बोधवस्त्रं अंगी चढविता आली तर खऱ्या अर्थानं जन्माला येण्याचं सार्थक झालं असं म्हणता येईल. एकाच सुखाच्या आणि शंभर दु:खांच्या धाग्यांनी विणलेलं हे मनुष्य देहाचं वस्त्र खरंखुरं जरतारी होईल. त्यासाठी कान्हा भेटायला हवा. गोपिकांना अध्यात्माची वसनं देणारा कान्हा! परमार्थाचं ज्ञान देणारा, ज्ञानाची परिभाषा शिकवणारा, आत्म्याची ओळख परमात्म्याशी करून देणारा, अध:पतनापासून वाचवणारा, द्रौपदीचं शीलरक्षण करण्यासाठी धाव घेणारा माधव भेटायला हवा. आडव्या उभ्या धाग्यांनी विणलेलं बाह्य वस्त्र जाडभरडं आहे की मखमली हे महत्त्वाचं नाहीच मुळी. माणसाचं अंत:करण.. बाहेरून न दिसणारं आतलं अस्तर, मलीन होणार नाही असं ज्ञानामृत पाजणाऱ्या श्रीकृष्णानं अवघ्या मानवजातीच्या जीवनरथाचं सारथ्य करायचं ठरवलं तर? असे चिरस्वरुपी आनंद देणारे कपडे कसे तयार करायचे याचं शिक्षण देणारा, अवघ्या सजीव सृष्टीस चिदानंद आनंद मिळवून देणारे कपडे शिवून देणारा तो अर्जुनाचा सारथी, तो मधुसूदन निदान भेटायला तरी हवा. तसा तो भेटला तर... तर दिखाऊपणाच्या नावाखाली वेगवेगळ्या समारंभासाठी कपडे आणि दागिने भाड्यानं घेऊन मोठेपणा दाखवणं थांबेल. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात,

"तू माणसा नियमुं करीं

मग निश्चयु होय अंतरी"

स्वतः च्या मनावर ताबा ठेवणं, संयमानं वागणं म्हणजेच श्रीकृष्णाचं सारथ्यं स्वीकारणं हे बरोबर आहे ना? चिरस्वरुपी आनंद देणारी वसनं विणून देणारा हा सारथी सर्वांनाच आनंदबोध देवो.

**सौ. दीपा नारायण पुजारी** - ज्ञानभाषा मराठी प्रतिष्ठान, इचलकरंजी मायबोली कट्टा. मो. ९६६५६६९१४८
Email - deepapujari57@ gmail. Com

## कथा - घटस्फोटाची कागदपत्रे - सौ. सुनिता अनंत जोशी



गेली १० मिनिटे ती keyboard वरती काहीतरी टाईप करत होती आणि बॅकस्पेस दाबून लिहिलेले परत काढून टाकत होती. आणि तिच्या या क्रियेत काहीही फरक पडत नव्हता. अक्षरं जुळवून नवे शब्द तयार करत होती, नवे शब्द घेऊन नवी वाक्यरचना करत होती. पण मनासारखे जमत नव्हतेच. आणि म्हणून टायपिंग आणि backspace ने delete असा खेळच केव्हाचा चालूच होता. त्याबरोबर मनात सुरू झालेल्या विचारांच्या द्वंद्वाचा एक हलकासा, नको असलेला मेकअप तिच्या चेहेऱ्यावर चढत चालला होता. ती आता खूपच थकली आणि शेवटी तिने तो प्रयत्न थांबवला. विचार करू लागली की keyboard वरच्या backspace ने जसे शब्द काढून टाकता येतात तसे आपले मनातील विचार backspace दाबून काढून टाकता आले असते तर.... तिला त्याही परिस्थितीत स्वतः च्या कल्पनेची गम्मत वाटली. खरंच काय हरकत आहे ना! .. तोंडाने बोललेले कडू शब्द, मनाने भोगलेल्या कडू आठवणी अशा backspace ने काढता आल्या असत्या तर आयुष्यात गैरसमज झालेच नसते. कितीतरी घडून गेलेल्या अप्रिय गोष्टी पुन्हा undo करून प्रिय करता आल्या असत्या तर किती बरं झालं असतं.... एखादी चुकून Delete झालेली फाईल आपल्याला रिस्टोअर बीनमधून परत Restore करता येते, तसे आपल्या आयुष्यातल्या काही हरवलेल्या गोष्टी आपण परत Restore करु शकलो असतो तर.... असा विचार तिच्या मनात आला, आणि गेल्या दोन वर्षातलं तिचं आयुष्यच जणू तिला समोरच्या स्क्रीनवर एखादं चित्र दिसावं तसं दिसायला लागलं......

... सर्वसामान्य रिवाजांप्रमाणेच ज्या वयात घरातले आपलं लग्नाचं बघत होते, नेमक्या त्याचवेळी आपली आणि अनिकेतची गाठ पडणं, त्याच्यावर आपलं प्रेम जडणं.. त्याला आपला जीवन साथीदार बनवणं हा निर्णय आपण स्वत:हून घेतला. पण जो अनिकेत आपला जीव की प्राण होता त्याच्यापासून आज २ वर्षांनी आपल्याला सुटका हवीय. खरं तर ह्या सगळ्यात आपलंही नेमकं काय चुकलं? ......

... 'आपली पहिली चूकच अनिकेतवर प्रेम करण्याची. त्या चुकीची शिक्षा आपल्याला आज भोगावी लागतीय का? आपल्याला हवी ती कोणतीही गोष्ट मिळवण्याचा त्याचा स्वभावच आपल्याला आवडला होता ना, मग आज तो स्वभावच त्याच्या माझ्या नात्यातला दुरावा बनत चालला आहे एवढं नक्की. एखाद्या प्राजक्ताच्या फुलाच्या बहरासारखा तो माझ्या मनाच्या अंगणात फुलला. आणि ओंजळभर भरून राहिला. मनामनात आणि विचारात. Paying guest म्हणून आला आणि माझ्या स्वप्नातला राजकुमार कधी झाला माझे मलाच समजले नाही. तो मला अवचित भेटला आणि माझ्या हळव्या, नाजूक स्वभावाला त्याचं असं स्ट्रेट फॉरवर्ड वागणं आवडायला लागलं. मीही त्याच्याबरोबर सात पाऊले चालत स्वत:ला बदलवत चालले होते. '

तिच्यापुढे मागचे सारे आयुष्य असे सिनेमासारखे उलगडू लागले. पण लक्ष होते keyboard कडे. ती उगीचच space button दाबत बसली होती. आणि त्यामुळे पानावर खूप जागा मोकळी पडत चालली होती. तिने

पटकन space वरचा हात काढला. खरंच आपल्या जीवनात अशी आपल्याला हवी तेवढी आणि हवी तिथे space टाकता आली असती तर. किती बदल घडवले स्वतःमध्ये तिने त्याच्याशी जुळवून घेण्याकरिता हे तिचे तिलाच माहिती. नातं टिकवण्यासाठी, फुलवण्यासाठी ती क्षणोक्षणी तडजोड करत राहिली.

अनिकेत खूपच अभ्यासू आणि मेहनती होता. आपल्या हुशारीच्या जोरावर त्याने नोकरी, हवं असलेलं सर्व काही खूप कमी वेळात मिळवलं. आणि त्यामुळेच त्याच्यावर प्रेम करणं कदाचित मनाला जास्तच पटत गेलं.... आता तिच्या बोटांनी पानावरच्या विनाकारण टाकलेल्या स्पेस काढल्या होत्या. आणि ती बोटे पुन्हा एकदा काहीतरी लिहिण्याचा प्रयत्न करू लागली. नेहमी तिचं असंच होत होतं. आपली चूक नसली तरी ती स्वतःवर खूप आरोप लावून घेत होती. त्याला समजून घेण्याचा मनापासून प्रयत्न करत होती.

दोन तीन वाक्य तिने अशीच लिहिली आणि enter key दाबली. परिच्छेद टाकण्यासाठी नवीन ओळ, थोड्या समासासह मिळाली याचं तिला उगाचच कौतुक वाटलं. पण खरंच होतं तिचं, का नाही कौतुक वाटणार? कारण कौतुक हा शब्दच ती गेल्या काही वर्षात विसरून गेली होती. कुणाच्याही आयुष्यात enter key दाबून सामील होता येतं, पण समरस होता येत नाही हे एव्हाना तिला समजले होते. ' तुला नाही कळणार या गोष्टी ' ...अनिकेतचे सततचे हे वाक्य तर तिच्या मानगुटीवर भुतासारखे बसले होते. तिचा आत्मविश्वास पावलागणिक कमी होत चालला होता. काय होऊन बसलं होतं आज.... तिच्या आणि अनिकेतच्या प्रेमाने सुरू झालेल्या या नात्याचं. तिने वेळोवेळी शिवण्याचा प्रयत्न केला पण प्रेमाचा धागा आता तुटतच चालला होता आणि सगळं उसवत जात होतं.

ती पुन्हा २ वर्षे पाठीमागे चालली होती. आईबाबा, इतर नातेवाईक यांचा कोणताही विचार न घेता आपण निर्णयच घेऊन टाकला होता त्याच्याशी लग्न करण्याचा, आणि तो प्रत्यक्षात आणला देखील होता. अनिकेत अनाथ होता. जवळचे असे कुणी नातेवाईकही नव्हते त्याला. स्वतःचे निर्णय तो स्वतःच घ्यायचा. अगदी तडकाफडकी. मागचा पुढचा विचार नाहीच. अनिकेतनेच पुढाकार घेऊन सगळे केले होते. त्याचेही प्रेम होते आपल्यावर असं आजही आपल्याला वाटतं आहे. तो बरोबरच वागत होता त्यावेळी. चूक काढण्यासारखं तिला त्याच्यात काही दिसत नव्हतं आणि तेवढं एकमेकांना समजून घेण्यासाठी अनिकेतकडे वेळ कुठे होता. त्याला सगळं पटापट हवं होतं. आणि मग नकळतच तीही त्याच्या स्वप्नात आणि सत्यात रमत गेली. श्रावणात बहरणाऱ्या जाईजुईच्या वेली कशा फुलांच्या भाराने वाकतात अन् जमिनीवर फुलांचा भरगच्च सडा टाकतात, सुवासाने वातावरण भारून टाकतात, तसे होते ते माझ्या आणि अनिकेतच्या संसाराचे पाहिले काही दिवस. मनाला मोहवून टाकणारे.

नंतर मात्र प्रत्येक नवीन क्षणी ती वाद न होण्यासाठी, शक्यतो जमवून पटवून घेण्याकरिता हक्काची अशी परिच्छेदाची जागा हुडकत होती, पण तिला तेव्हा ती कधीच सापडली नव्हती. त्यामुळे सगळं कधी एकसुरी, गचाळ, एका प्रश्नात दुसरा प्रश्न मिसळल्यासारखे, मोहात न पाडणारे झाले ते तिचं तिलाही कळलंच नव्हतं. उत्तर सापडत नव्हतं आणि ते शोधायला तिला वेळच मिळाला नव्हता. आणि कदाचित त्या उत्तराची अनिकेतला अपेक्षाही नव्हती. कारण कसेही केले तरी चुकीची तीच असणार होती. नुसते आरोप होत होते

अनिकेतकडून... किंवा आज्ञा आणि अपेक्षा. बाकी समजून घेणं संपलं होतं. यशाची दुसरी बाजू अशीही कुणावर तरी अन्याय करणारी किंवा कुणाला तरी न समजून घेणारी असू शकते, हे तिला पचनीच पडत नव्हते.

तिने एक उसासा टाकला आणि ती आता काही आकडे टाईप करू लागली. Num lock बंद केले की आकडे टाईप करता येत नाहीत हे माहीत असूनही त्याच्याशी खेळ करत बसली. सर्वात जवळच्या माणसाबरोबर काढलेल्या या संसाराच्या २ वर्षांचा ताळमेळ ती घालू लागली. बेरीज कमी आणि वजाबाकीच जास्त होऊ लागली. प्रेमाचं साधं सरळव्याज नाही, तर मत्सराचे चक्रवाढव्याज वाढू लागले होते तिच्या आणि अनिकेतच्या नात्यात. आपल्या प्रेमाने बांधला गेलेला अनिकेत आता कोणत्याच आकड्यात तिला मांडता येईना. तो फक्त काम आणि कामच करत होता. नवीन प्रोजेक्ट, महिना दोन महिने झाले की परदेश वारी, मीटिंग आणि बरंच काही. तिला द्यायला त्याच्याकडे थोडाही वेळ नव्हता. आणि तिला फक्त तेवढाच हवा होता.

आता मधूनच तिने दचकून पुन्हा कीबोर्डवर हात चालवणे सुरू केले. काही ठिकाणी अर्धविराम, काही ठिकाणी पूर्णविराम, अवतरण चिन्हं, hash, dollar, कंस, स्टार मार्क अशी चिन्हे देताना तिला पुन्हा काही बाही आठवू लागले. अनिकेतला लिहिलेल्या प्रेमपत्रात केलेला या सगळ्यांचा वापर आठवून चक्क ती लाजली. पण क्षणात भानावर आली. आयुष्य असं निसटून जात असताना मी कुठे पूर्णविराम देऊ व कुठे कंस घालू हेच तिला समजेनासे झाले होते.

लग्न हा एक व्यवहार म्हणून अनिकेतने तिच्याशी ते केले होते असे त्याने परवाच तिला सांगितले होते. त्याला फक्त स्वतःला सिध्द करायचे होते.. या जगात. पैसा, मान मिळवून. ते मिळवताना बाकीचे हातून निसटले तरी चालणार होते त्याला. तो तिला पैसा देत होता आणि तिला मात्र अनिकेत हवा होता, त्याचा वेळ हवा होता. त्याच्यासोबत छोटी छोटी संसारसुखं वाटून घ्यायची होती. पण तो फक्त व्यवहारी होत चालला होता. तो हे कॉर्पोरेट आयुष्य जगण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी keyboard वरच्या shortcut keys आणि function keys च्या वापरासारखा माणसांना वापरू लागला होता. साधे सोपे जगणे त्याला पटत नव्हतेच आता. सतत पुढे जाण्याची घाई.

तिला मात्र बकुळीच्या मंद सुवासासारखं दरवळायचं होतं त्याच्यासोबत. हवेच्या अस्तित्वासारखं घरात भरून राहायचं होतं. एकमेकांच्या सुखदुःखात समरस व्हायचं होतं. पण त्याला मात्र हे हवं होतं की नव्हतं हेच तिला समजत नव्हतं. ती त्याला कीबोर्ड वरच्या a to z सर्व अक्षरांचा वापर करून समजावून सांगत होती, पण तो मात्र विंडोज की प्रमाणे सतत नवीन खिडक्या उघडत होता आणि त्यातून पुढेच जात होता. तिला अलगद मागे टाकत.

आता तिला पुन्हा जाणीव झाली ती तिच्या अस्तित्वाची. काय नाही सोडले तिने त्याच्यासाठी. 'मी'पण सुध्दा सोडलं. तरीही तो मात्र keyboard वरच्या त्या कंट्रोल की सारखं इतर कीजच्या सहाय्याने.. म्हणजेच साम, दाम, दंड, भेद वापरून सर्व काही नियंत्रित करत होता. आणि हे सर्व तिच्यासाठी धक्कादायक होतं. काय नव्हतं तिच्याकडे... त्याने तिला सगळं दिलं होतं. पैसा, गाडी, फ्लॅट, दागिने, मान मरातब हे सर्व. आणि तेही फक्त २ वर्षात. पण तिला मात्र हे इतकं घाईने मिळालेलं सारं भावत नव्हतं. कारण इतकं मिळूनही तिची ओंजळ मात्र रितीच राहिली होती.

अनिकेत आता खूप पुढे गेला होता आणि त्याला तिच्यासाठी अजिबात थांबायचे नव्हते. म्हणूनच आज ती अशी सैरभैर झाली होती. तिने काहीतरी निर्णय घ्यायचे ठरवले. मधूनच परत keyboard वरून बोटं फिरवू लागली. पेज-अप आणि पेज-डाऊन की वापरून पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत एक नजर टाकून झाली तिची. २ वर्षाच्या संसाराची कथाही अशीच रोज या दोन कीजचा वापर करून पहिल्यापासून आजच्या दिवसापर्यंत तिला आठवत राहते, काय चूक काय बरोबर.. ती विचार करत राहते. मनातून तडजोडीचे सारे प्रयत्न करत राहते.

पण आज शेवट झाला होता या विश्वासाच्या नात्याचा. त्याने तिला फक्त शोभिवंत बाहुली बनवले होते. त्याच्या इशाऱ्यावर नाचणारी. त्याला हवं तसं वागणारी. हवी तशी दिसणारी. हवं ते मिळवून देणारी. हवं तेव्हा हसणारी. बाकी इतर वेळी गप्प बसणारी. स्वतः चांगलं शिकलेली असूनही ती हे सर्व फक्त त्याच्या प्रेमासाठी सहन करत राहिली. पण आता प्रश्न आला होता तिच्या स्वाभिमानाचा, अस्तित्वाचा. आणि तो ती नाकारू शकत नव्हती. पोटात एक नवा जीव जन्माला येत होता. तिला तो हवा होता. कारण तिच्या जगण्याचं आता ते एकच कारण होवू शकत होतं आणि अनिकेतला मात्र आत्ता ही जबाबदारीच नको होती. ती स्वत: एकवेळ हे असं किल्ली दिलं की नाचणारं बाहुलं बनून राहिली असती पुढेही. पण... पण तिच्या बाळाने असे राहू नये असे तिला वाटू लागले. एक नवीनच बळ आता तिच्या अंगात संचारले होते. अनिकेतच्या होय-नाही उत्तरावर जगत दोन वर्षे तिने अशीच मन मारून घालवली होती. पण आता ते तिला असह्य झाले होते. त्याचे प्रत्येक गोष्टीतले so called planning तिच्या या आई होण्याच्या गोड चाहूलीने तिला फोल वाटू लागले होते.

..... बस् खूप झालं आता. वर मान करून तिने स्क्रीनकडे पाहिलं, तर तिचे टायपिंग कामही तेव्हाच संपले होते. तिला अचानक असं जाणवलं की रोज या कीबोर्ड वरच्या keys किती निर्विकारपणे ती हाताळत असते. पण आज मात्र प्रत्येक key चा एक वेगळाच अर्थ तिला सापडत होता आणि तिचे न सुटलेले कोडे सोडवत होता कदाचित. तिने एक मोठा सुस्कारा सोडला आणि आनंदाने गाण्याची एक ओळ गुणगुणत कंट्रोल की आणि एस बटण दाबत टायपिंग केलेली फाइल save केली. आणि आत्मविश्वासाने त्या फाईलला नाव दिलं" Documents of divorce" –घटस्फोटाची कागदपत्रे....

आज फिर जीने की तमन्ना हैं... नेमकं ती गुणगुणत असलेलं गाणंच स्पीकरवर लागलं होतं.

**सौ. सुनिता अनंत जोशी** जी-३, चंद्रला अपार्टमेंट, रानडे गल्ली, ब्राह्मणपुरी मिरज ४१६४१०- ९७६३३४०७३४



# पुस्तक परिचय - अडगुलं मडगुलं - सुश्री प्रेमा माधव कुलकर्णी






**पुस्तकाचे नाव -** अडगुलं मडगुलं - (वाडवडिलांच्या बोलीचालीचा मऱ्हाटी मागोवा)

**लेखक -** विश्वनाथ खैरे

**प्रकाशक -** संमत प्रकाशन.

**अडगुलं मडगुलं सोन्याचं कडगुलं ।**

**रुप्याचा वाळा, तान्हया बाळा तीट लावू ॥**

आपल्या बाळाला तीट लावताना हे गाणं आई कौतुकानं म्हणते. हजारो वर्षे हे गाणं चालत आलं आहे. मराठी माय माऊली आनंदानं गात आली आहे. ह्या गाण्याचा अर्थ पूर्णपणे लागत नाही. भाषेचा अभ्यास करताना, त्यातील पहिल्या दोन शब्दांचा अर्थ तरी समजत नाही.

संस्कृत ही भाषांची जननी आहे. मराठी भाषेचे मूळही संस्कृतमध्ये शोधले जाते. पूर्वी शक, कुशाण, हूण इ. आदिवासी टोळ्या होत्या. कानडी, तेलगू इ. भाषांशीही संपर्क आला असावा. एका भाषेचा प्रभाव दुसऱ्या भाषेवर पडतो. नवीन शब्द येतात. कालांतराने सवयीने आपलेच होऊन जातात.

'अडगुलं मडगुलं' या बोलीभाषेतून प्रचारात आलेल्या लोकगीताचा अर्थ लावताना तमिळ भाषेतील शब्दांची मदत लेखकाने घेतली आहे. अडगुलं (तमिळमध्ये 'अटकुलं') याचा अर्थ ठेवीची वस्तू. मडगुलं (मडक्कु) मातीची थाळी, भांडे. ही ठेव ठेवून बाळासाठी सोन्याचं कडं घेतलं. रुप्याचा वाळा घेतला. बाळाला नजर लागू नये म्हणून तीटही लावली. ह्याचेही स्पष्टीकरण लेखकाने दिले आहे.

लेखकाने संस्कृत - मराठी - तमिळ (संमत) या भाषांतील अनेक शब्दांचे साम्य उलगडून त्याचे स्पष्टीकरणही दिले आहे. मराठीतील बहुसंख्य शब्दांची पीठिका सं-म-त भाषांच्या आधाराने कळू शकते. त्यामुळे भाषाभ्यास करणाऱ्या आणि शब्दांचा अर्थ व व्युत्पत्ती जिज्ञासेने शोधणाऱ्या सामान्य व्यक्तीसाठी सुध्दा हे पुस्तक वाचनीय आहे.

पंढरपुरचा विठोबा - विठाई - रकुमाई लोकप्रिय दैवत. 'जोतिबा', वाडी रत्नागिरी, शुभकार्यानंतर घातला जाणारा परंपरागत 'गोंधळ' प्रथा. आपली नातीगोती, भोजनातले अनेक पदार्थ, अशा अनेक गोष्टींचा घेतलेला मागोवा, स्पष्टीकरण, व्युत्पत्ती इ. वाचून मौज वाटते. ज्ञानात भर पडते.

लेखक विश्वनाथ खैरे यांचे ‘अडगुलं मडगुलं‘ (वाडवडिलांच्या बोलीचालीचा मऱ्हाटी मागोवा) या पुस्तकाची पहिली आवृत्ती १९८१ व दुसरी आवृत्ती २००१ ला प्रसिद्ध झाली. प्रथम साधना साप्ताहिकात त्यावरील लेखमाला प्रसिद्ध झाली होती. या पुस्तकाला महाराष्ट्र राज्य शासनाचा १९८१-८२ चा भाषाशास्त्र व व्याकरण विभागातला उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार मिळाला.

लेखक विश्वनाथ खैरे यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यातील काही अशी –

एकलव्य, वंशाचा व्यास, युरेका, हिरकणी, घोड्यापुढं गीता, युगाणी, अक्षरे, इमराठी गाणी, द्रविड महाराष्ट्र, मराठी भाषेचे मूळ, भारतीय मिथ्यांचा मागोवा, ज्ञानेश्वरांचे चमत्कार, वेदातील गाणी, साहित्य मिथ्य साहित्य इ.

लेखक विश्वनाथ खैरे यांनी तमिळ भाषेचा परिणाम मराठी भाषेवर कितपत आणि कसा झाला हे स्पष्ट केले आहे. संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांची लिपी देवनागरी अशी एकच आहे. कानडी, तमिळ, तेलगु किंवा गुजराथी या भाषांची लिपी थोडी वेगवेगळी आहे. असे असले तरी त्या भाषांचा मराठी भाषेशी संपर्क आला आणि आपली मराठी जास्त प्रभावी झाली. तरीही लेखक विश्वनाथ खैरे यांनी तमिळ भाषेतील ‘अडगुलं मडगुलं’ या पुस्तकाचा घेतलेला मागोवा महत्त्वाचा वाटतो.

**पुस्तक परिचय : प्रेमा माधव कुलकर्णी -** कोल्हापूर मो. 7387678883



## लेख - त्यांनी मला शिकवलं... - प्रा. डॉ. सतीश शिरसाठ



पुणे विद्यापीठात प्रौढ शिक्षण प्रकल्प अधिकारी म्हणून मी नोकरीला लागलो. तेव्हा पुणे, अहमदनगर, नाशिक, जळगाव आणि धुळे जिल्ह्यातील कॉलेजं विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात होती. ऑफिसबरोबरच भरपूर फिल्ड वर्कचं आमचं काम होतं. महिन्यातून दहा- पंधरा दिवस आम्ही बाहेरगावी जात असू. कॉलेजमध्ये गेल्यावर विद्यार्थ्यांपुढे भाषण, प्राध्यापकांशी चर्चा, प्रौढ शिक्षणातील संघटनांबरोबर बैठक, असा दिवसभरातील व्यग्र कार्यक्रम. नंतर दुपारचं जेवण. थोडीशी विश्रांती झाल्यावर दूरवर कुठंतरी गावात प्रौढ शिक्षण केंद्र पहायला जायचा कार्यक्रम असायचा.

असाच एकदा एका कॉलेजला गेलो होतो. नुकतीच दिवाळी संपली होती. हवेत गारठा होता. सायंकाळी कॉलेजच्या प्रौढ शिक्षण कार्यक्रम अधिकारी असणाऱ्या प्राध्यापकांसोबत दूरवरच्या खेड्यातल्या एका प्रौढ शिक्षण केंद्रावर आम्ही पोहोचलो. ते महिलांचे प्रौढ शिक्षण केंद्र होते. घरातील जेवणं, भांडी धुण्याची कामं आटोपून केंद्रात महिला यायला वेळ होता. तोपर्यंत प्राध्यापकांबरोबर गप्पा मारत बसलो. महिला आल्यावर प्राध्यापकाने माझी ओळख करून देऊन माझे स्वागत केले... ‘ पुण्याहून आलेले हे साहेब तुम्हाला आता मार्गदर्शन करतील ‘ असं सांगून ते बसले हाताची घडी घालून.

महिला मी काय बोलतो हे कान देऊन ऐकू लागल्या.”मार्गदर्शन वगैरे नाही. आपण सगळेजण गप्पा मारू" असं सांगून मी ते टेन्स वातावरण हलकं केलं.

"हे बघा, नुकतीच दिवाळी संपली आहे. कुणी कुणी काय काय केलं हे सांगा. सगळ्यांनी बोलायचं बरं का”.

"आम्ही लाडू, करंज्या, शंकरपाळया केल्या, मुलांनी फटाके वाजवले, आकाशकंदील लावले इ. इ.” हे मला अपेक्षित होतं. पण महिलांनी दिलेली उत्तरं ऐकून मी बधिर झालो.... काय म्हणाल्या महिला? ......

"सायेब, आम्ही गावातल्या अमक्या तमक्याच्या वावरात कामाला गेलो वतो. पोरांना शाळेच्या सुट्ट्या होत्या. त्यांना पन घिवून गेलो वतो.”

"आवं सायेब, आमाला कुनीच नौतं बोलौलं. घरीच वतो या दिवाळीला”.

"पोरांचा आजा कवापासून आजारीच हाये. वरल्या आळीतल्या रामू पवाराकडून गंडा बांदून घेतला या दिवाळीत. पण नौरात्राच्या चौथ्या माळेला म्हतारा ग्याला”.

... खरं तर मी यांना मार्गदर्शन करावं अशी अपेक्षा होती. मात्र झालं उलटं. या महिलांनीच मला स्वतंत्र भारतातील करूण वास्तव शिकवलं. कुठल्याच पुस्तकात मी हे वाचलं नव्हतं.

**प्रा. डॉ. सतीश शिरसाठ,** सेवानिवृत्त प्राध्यापक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे मो. ९९७५४३५१५२ ईमेल- sks.satish@gmail. Com

## कथा - मिरॅकल - सौ अर्चना देशपांडे



आमची रत्नागिरीहून पुण्याला बदली झाली. एका बंगल्यात भाड्याने जागा मिळाली होती. समोर भलं मोठं अंगण, अंगणात पारिजात आणि सोनचाफा बहरलेला. दारासमोर तुळशी वृंदावन व वाऱ्यासह डुलणाऱ्या मंजिऱ्या. सर्व सोयींनी युक्त असलेला बंगला पाहून मी तर खूश झाले. नवीन गाव, नवीन जागेत नव्याने पुन्हा डाव मांडायचा होता. हे जरा कठीणच वाटत होते. रक्ताची नाती नसली तरी नवीन नाती जोडावी लागणार होती

आम्ही पहाटे रत्नागिरीहून निघालो. साधारणपणे साडेअकरा वाजता स्वारगेटला पोचलो. तिथे चहा व नाश्ता घेऊन साडेबारा वाजता नवीन घरी पोचलो. आवश्यक तेवढे सामान उतरून घेईपर्यंत दोन वाजले. बरोबर आणलेल्या तिखट मिठाच्या पुऱ्या व शिरा खाऊन रिलॅक्स होण्यासाठी जरा आडवे झालो. पाचच्या सुमारास दारावरील बेल वाजली. नवीन गावात ओळखीचे तर कोणी नाहीत, मग कोण आले असतील बरं.. हा विचार करत दार उघडले.

समोर साधारणपणे पन्नास वर्षे वयाचे एक गृहस्थ उभे होते. त्यांनी आपली ओळख करून दिली.

"मी विनायक साने. समोरच्या बंगल्यात राहतो. तुम्ही इथे नवीनच राहायला येणार असे समजले होते आणि आज दुपारी तुम्हाला पाहिले. आता चहाची वेळ आहे आणि मी तुम्हाला आमच्या घरी चहा घेण्यासाठी यावे असे सांगायला आलो आहे."

मी म्हटले,"आम्हाला तुमच्या घरी यायला, काकींचीओळख करून घ्यायला आवडले असते. पण आता थोड्याच वेळात हयांच्या ऑफिसमधली लोकं सामानाची खोकी खोलण्यासाठी येणार आहेत. आम्ही दोन दिवसांनी तुमच्या घरी नक्की येऊ"

"ठीक आहे. मीच तुमच्यासाठी चहा घेऊन येतो." माझ्या उत्तराची वाट न पाहता ते पाठ फिरवून निघूनही गेले. पंधरा मिनिटात थर्मासमध्ये चहा, मग व बिस्किटे घेऊन आले. थर्मासमधील चहा मगमध्ये ओतून मग आमच्यापुढे धरले. चहाबरोबर बिस्किटे खाण्याचाही आग्रह केला. दमून आल्यामुळे व चहाची वेळ असल्यामुळे चहाची आवश्यकता होतीच. गरम गरम चहा प्यायल्यावर खूप बरे वाटले. चहा घेऊन जुजबी चौकशी करेपर्यंत सामानाचे बॉक्स उघडण्यासाठी ऑफिसमधले लोक आले. त्यामुळे साने आमचा निरोप घेऊन निघून गेले. गडबडीत त्यांचे आभार मानायचे राहून गेले.

दुसरे दिवशी"गुड मॉर्निंग" म्हणत, काही मदत हवी का? असे विचारायला ते विसरले नाहीत. थोडयाच दिवसांत साने कुटुंब व आमच्यात चांगला भावबंध निर्माण झाला आणि ते" विनू काका" केव्हा झाले हे समजलेच नाही.

विनूकाका लहान असताना त्यांचे वडील वयाच्या अवघ्या ४५ व्या वर्षी अचानक गेले." बापाविना पोर" म्हणून आजोबांनी परिस्थिती नसताना सुद्धा त्यांचा सांभाळ केला. विनूकाकांनी मन लावून अभ्यास करून स्वतःच्या

हुषारीवर इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली आणि पुण्यासारख्या शहरात आपल्या आजोबांसह आले. नोकरीमध्ये सेटल होताच टुमदार बंगला बांधला. अतिशय हुशार, सुस्वभावी, प्रेमळ होते काका. खूप कष्टातून त्यांनी आपले आयुष्य उभे केले होते. इंजिनीयर झाल्यावर परदेशी नोकरीची आलेली संधी त्यांनी नाकारली आणि आपल्या आजोबांची काठी बनून पुण्यातच राहिले. त्यांच्या स्वभावाला साजेशी पत्नी त्यांना मिळाली. दोघांनी आजोबांची अतिशय प्रेमाने देखभाल केली.

काका आमच्याशी खूप गप्पा मारायचे. आमचे कौतुकही करायचे. मी कथा लिहिते हे ऐकल्यावर ते मला मार्गदर्शन करायचे. ऑफिसच्या लायब्ररीतून वेगवेगळी पुस्तके आणून मला वाचायला द्यायचे. त्यांनी मला लिहिण्यासाठी प्रोत्साहित केले. तसेच मार्गदर्शन करता करता आयुष्याबद्दलच्या सुंदर गोष्टी त्यांनी मला शिकवल्या.

माझ्या पहिल्या बाळंतपणासाठी त्यांनी खूप मदत केली. माझ्या नवऱ्याला ऑफिसच्या कामानिमित्त परगावी जावे लागले. आईला यायला पंधरा दिवस होते. अचानक माझ्या पोटात दुखू लागले. तेव्हा काकी देवासारख्या धावून आल्या. त्यांनीच मला दवाखान्यात दाखल केले. आईच्या मायेने धीर दिला. काकांनी दिवसभर थांबण्याची ड्युटी निभावली. पती गावाहून परत येताच"तुम्हाला पुत्ररत्न प्राप्त झाले आहे" ही आनंदाची बातमी प्रथम त्यांनी दिली. अशा रीतीने मी त्यांची लेकच झाले. काका- काकी माझे कौतुक करून आपली मुलीची हौस पूर्ण करून घेत होते. बारशाचा उत्साह तर विचारूच नका. सगळी जबाबदारी काका काकींनी उचलली. माझ्या मुलाची हौस, कौतुक तेच करत होते. त्यांचा मुलगा दहावी पास होऊन ज्युनियर कॉलेजला होता. त्याच्यासाठी आमचा मुलगा एक खेळणंच होता. आमच्या अमेयला दादा खूप आवडायचा. तो त्याच्या वयाचाच होऊन त्याच्याशी खेळायचा. काही वेळा तो घोडा होऊन त्याचा हट्ट पुरवायचा.

काकांच्या घरी गणपती उत्सवाचा थाट काही औरच असायचा. त्यांचा गणपती असायचा दीड दिवसाचा! आदल्या दिवशी काकी आपल्या मैत्रिणीसह १००० तळलेले मोदक बनवायची. गणपती चतुर्थीच्या दिवशी उकडीचे मोदक बनायचे. मोदक आणि नारळ दूध खाण्यात तर काका व माझे पती यांची स्पर्धाच असायची. संध्याकाळी कॉलनीतल्या सर्व लोकांसह उच्च स्वरात आरती व्हायची. रात्री जेवणानंतर गप्पा व अंताक्षरी ठरलेली असायची. दुसऱ्या दिवशी गणपती विसर्जन अंगणात मोठ्या बादलीत केले जायचे. त्यानंतर भेळ आणि कॉफीचा कार्यक्रम असायचा. आग्रहाने भेळ वाढली जायची. खूपच धमाल यायची.

चार वर्षांनी यांची बदली कोल्हापूरला झाली. पुणे आणि काका, काकांचा सहवास सोडताना खूप जड गेले, पण जाणे तर भागच होते. आम्ही दूर असलो तरी फोनद्वारे, पत्राद्वारे आमचे संवाद सुरू होते. एकदा दोनदा काकांच्या घरी जाण्याचा योग आला. काकाही एकदा कोल्हापूरला येऊन आठ दिवस राहिले. या काळात मुलांबरोबर पन्हाळा, ज्योतिबा, उत्साहाने जाऊन आले. घरातही कुठं कांदा चिरून दे, कुठे कोथिंबीर निवडून दे, ही हलकीशी कामे करून काका मला मदत करायचे. आठ दिवस कसे निघून गेले कळलेच नाही.

कोल्हापुरात दोन वर्षे झाल्यावर यांना कामानिमित्त जर्मनीला जाण्याची संधी आली. ठरल्याप्रमाणे आम्ही जर्मनीला गेलो. नवीन देश, नवीन भाषा यामुळे रुळायला थोडा वेळ लागला. वेळेमध्ये फरक असल्यामुळे फोन अधून मधून होऊ लागले. हळूहळू आम्ही जर्मनीत रमत होतो.. एक दिवस अचानक काकांच्या मुलाचा फोन आला, ‘ किरकोळ आजाराचं निमित्त होऊन आई आम्हाला सोडून गेली. ’ काकांच्या जीवनरथाचे एक

चाक तुटून पडले होते. बातमी ऐकून आम्हाला धक्का बसला. मी काकांना जाऊन भेटून आले. दिवस पूर्ण झाल्यावर त्यांचा मुलगा व सून नोकरीला जाऊ लागली. नातू आपल्या पुढील शिक्षणासाठी परदेशी गेला. त्यामुळे काका अगदी एकटे पडले. पण पत्नीच्या वियोगानंतर कुढत न राहता हळूहळू आपल्या मित्रांबरोबर ट्रीपला जाणे, नाटक पाहायला जाणे, यात ते आपला जीव रमवत होते, आपला छंद जोपासत होते.

दिवाळीच्या आदल्या दिवशी"शुभ दिवाळी" हा शुभेच्छा देणारा काकांचा फोन आला. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर त्यांनी दिवाळीच्या दिवशी" दिवाळी पहाट"कार्यक्रमाला जाणार आहे असे उत्साहाने सांगितले. त्याच रात्री त्यांच्या मुलाचा फोन आला.." बाबा सकाळी स्कुटीवरून कार्यक्रमाला जाताना चक्कर येऊन पडले. एका कारचालकाने त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. शुद्धीवर असताना त्यांनी माझा फोन नंबर दिला. त्या गृहास्थांनी फोन करून मला कळवले. मी धावतच गेलो. त्यांना दाखल केलेल्या हॉस्पिटलमध्ये सर्व सोयी उपलब्ध नसल्यामुळे मी त्यांना सह्याद्री हॉस्पिटलमध्ये भरती केले आहे. त्यांच्या डोक्याला मार लागला असल्यामुळे ते बेशुद्ध झाले. आता त्यांना आय. सी. यू. मध्ये ठेवले आहे."

त्यांना बीपीचा त्रास तर होताच, त्यातून इतर काही त्रास होऊ लागला. आजाराला दया, माया, नाती, जिव्हाळा, काळ वेळ काही नसतो. अचानकपणे बेसावध क्षणी घाव घालतो आणि होत्याचे नव्हते होते. ही बातमी ऐकून आम्ही हतबल झालो। लगेच निघणे शक्य नव्हते. सवडीने आम्ही त्यांना भेटून आलो. हळूहळू त्यांची तब्येत सुधारू लागली. ते सगळ्यांना ओळखू लागले पण पाय जड झाले होते. चालणे अशक्य झाले होते. फिजिओथेरपी सुरू होती पण फारसा उपयोग होत नव्हता. हळूहळू पायाची हालचाल बंद झाली. शर्थीचे उपचार व्यर्थ ठरले, पायात शक्ती राहिली नव्हती. पुढचे आयुष्य व्हीलचेअर शिवाय शक्य नव्हते.

थोड्या दिवसांनी डॉक्टरने त्यांना घरी घेऊन जाण्याची परवानगी दिली. आपल्याला घरी जायला मिळणार म्हणून काका खूश होते. पण सून व मुलगा दोघेही नोकरी करत असल्यामुळे थोडे दिवस ज्या ठिकाणी २४ तास डॉक्टर आणि नर्स आहेत अशा वृद्धाश्रमात त्यांना ठेवण्याचा निर्णय त्यांनी घेतला. वृद्धाश्रमात ठेवल्यावर त्यांचे मित्र, नातेवाईक, मुलगा दररोज किंवा एक दिवस आड त्यांना भेटायला जात. तास, दोन तास गप्पा मारत."तुम्ही लवकर बरे होऊन घरी येणार"हा दिलासा सर्वजण देत. हळूहळू ते तिथे रमले. तब्येतही व्यवस्थित साथ देत होती. पण कोरोनाचे महासंकट आले. त्या काळात वृद्धाश्रमात सर्वच ज्येष्ठ नागरिक व पेशंट असल्यामुळे इतरांच्या भेटण्यावर गदा आली." कोणीही येत नाही, मला भेटत नाही, माझा मुलगा माझ्याकडे ढुंकूनही पाहत नाही. म्हणजे मी माझ्या मुलाला व सुनेला नकोसा झालोय. नातवाचे माझ्यावरचे प्रेम आटले आहे. आता मी कोणालाही नको झालोय, मी म्हणजे सर्वांच्या दृष्टीने अडगळ आहे" अशा नकारात्मक विचारांनी त्यांना ग्रासले. रिकामे मन सैतानाचे डोके या म्हणीप्रमाणे त्यांच्या मनात नको ते विचार येऊ लागले. 'मी माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर आईचे आजारपण काढले, नोकरी सांभाळत तेही दिवस ढकलले. तिला हॉस्पिटलमधून घरी आणून ब्युरोमधली बाई नर्स ठेवून तिची देखभाल केली. पण आपला मुलगा हे संस्कार विसरला.'

बंदिस्त आयुष्याबद्दल त्यांना घृणा वाटू लागली. आता मला जगायचेच नाही या विचाराने त्यांनी अन्न पाणी कमी केले. त्यामुळे अशक्तपणा येऊन अनेक व्याधी डोके वर काढू लागल्या. डॉक्टरांनी तर आता आशाच सोडली होती.

पण तिथल्या वॉर्डबॉयने साथ दिली. व्हिडिओ कॉल करून त्यांचा आमच्याशी संपर्क करून देऊ लागला, येता जाता त्यांच्याशी संवाद साधू लागला. आजारी माणसाशी संवाद साधला गेला की माणसाला आजाराचे विस्मरण होते, काही अंशी आजार कमी होतो. जेवणाचा डबा खाताना तो त्यांच्याशी गप्पा मारू लागला, त्यांच्या मनातील नकारात्मक विचार काढून टाकण्याचा आटोकाट प्रयत्न त्याने केला. प्रेमाने त्यांचा हात हातात घेऊ लागला. त्यांना हवा होता प्रेमाचा स्पर्श जो त्यांनी गमावलेला होता, तो त्यांना मिळाला. त्याने मानसपुत्र होऊन त्यांना जीवनाची दिशा दाखवली. त्यांची तब्येत हळूहळू सुधारू लागली. आपल्याला चालता आले नाही तरी व्हीलचेअरवर बसून आजूबाजूच्या मुलांना आपण काहीतरी शिकवू शकतो हा विचार त्यांच्या मनात आला आणि त्यांनी तो बोलून दाखवताच वार्डबॉयने त्या विचाराला दुजोरा दिला. त्यांना काहीसे बरे वाटले. त्यांच्या मनातील प्रश्नांना योग्य दिशा मिळाली. त्यांनी मनात ठरवलेला निश्चय मनातल्या मनात गिरवला. निश्चय दृढ होताच त्यांच्या मनावर चढलेले नैराश्याचे मळभ दूर झाले. त्यामुळे उत्साह वाढलाच आणि विस्कटलेले मनाचे धागे पुन्हा नीट जुळवले गेले आणि आयुष्यात काहीतरी मिळवण्याचे सात्विक समाधान त्यांना मिळाले. त्यांनी विचार केला की आनंद आपणच निर्माण करायचा असतो. त्यांनी आजूबाजूच्या झोपडपट्टीतील मुलांना गणित विषय शिकवायला सुरुवात केली. ते संध्याकाळी त्यांना गोष्टी सांगू लागले, त्यांना श्लोक शिकवू लागले. असे हे काका, मुलांचे" काका आजोबा" म्हणून मुलांना प्रिय झाले.

काका थोडेसे सावरल्यावर त्यांचे चिरंजीव त्यांना घरी चलण्याचा आग्रह करू लागले, पण त्यांनी घरी परतण्याला नकार दिला." मला श्रावण बाळ हवा होता, पण खांद्यावर कावड घेऊन काशीला घेऊन जाणारा नव्हे, तर प्रेमाने हाताला धरून उठवून बसणारा, चालताना आधार देणारा, मायाळू, प्रेमळ, आई वडिलांची भावना जपणारा, माझ्या संध्याकाळी प्रेमाचा ओलावा देणारा. आम्हाला या वयात काय हवे असते? चार घास अन्न, थोडी औषधे आणि प्रेमाचा सुखसंवाद. मग आमचे मन आनंदाने नाचू लागते. ह्या वयात काळजी घेणारा श्रावण बाळ हवा असतो." ठीक आहे. आता हेच माझे घर. मी इथेच राहणार. तुला शक्य झाले तर मला नातवासह महिन्यातून एकदा, दोनदा भेटायला ये." असं सांगताना त्यांचा आवाज घोगरा झाला. त्यांचे डोळे भरून येत होते. त्यांचे काळीज तुटत होते. पण जे सत्य होते ते त्यांनी मोकळेपणाने बोलून दाखवले, आपल्या मनातील शल्य व्यक्त केले. तो जाण्यासाठी वळला त्या क्षणी त्यांचा बांध फुटला. त्यांनी मनसोक्त रडून आपले मन मोकळे केले.

वार्डबॉयने त्यांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांना दिलासा दिला. त्यांना आता योग्य दिशा सापडली होती. त्यांना मिळणाऱ्या पेन्शनमधून ते मुलांसाठी वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल पुरवत होते. वृद्धाश्रमातील सहका-यांसह मुलांचे वाढदिवस साजरे करत होते. त्यातच त्यांना समाधान आणि आनंद मिळत होता. अशा रितीने आपण उभ्या केलेल्या कार्यात ते रमत होते. बा. भ. बोरकरांनी आपल्या काव्यात सांगितल्याप्रमाणे

"सल कालची विसरून सगळी भले जमेची जीवी स्मरू
शिशु हृदयाने शुश्रृदयाने पुन्हा एकदा या जगतावर प्रेम करू"

... असा त्यांनी सकारात्मक विचार केला आणि आनंदाने आपले जीवन सुरू केले.

**सौ. अर्चना देशपांडे पुणे** मो. - ९९६०२१९८३६

# लेख – चिंता आणि चैतन्य - श्री सतीश मोघे



पावसाळ्याच्या मध्यावर सर्वच शाखा छाटण्यात आलेल्या अशोकवृक्षाशी माझा संवाद सुरू होता. मी त्याला प्रश्न केला. 'तुला चिंता नाही का वाटत भविष्याची? छाटलेल्या शाखा पुन्हा कधी वाढतील, त्यावर पर्णसंभार कधी येईल? असे विचार कधीच का त्रास देत नाहीत तुला? '...

यावर निर्विकारपणे तो म्हणाला, .....” ही छाटण्याची सहावी वेळ.. खूप वर्षापूर्वी जेव्हा पहिल्यांदाच माळीदादाने शाखा छाटल्या तेव्हा ग्रासलो होतो मी चिंतेने. ही चिंता मी जगेन की मरेन? याची अजिबात नव्हती. कारण आपलेपणाने, काळजीने मला ज्याने वाढवलं, तो माळीदादा मारणार नाही, असा पूर्ण विश्वास होता. चिंता होती ती, आपल्या शाखा छाटल्यावर आपण कसे दिसू? खूप कुरूप तर दिसणार नाही ना? याची... आणि शाखा छाटल्यावर आपल्या आश्रयाला असलेल्या पक्षांचे, आपल्या सावलीत विसावणाऱ्या माणसांचे काय होईल? याची. पण काळाच्या ओघात या चिंताही निमाल्या. आपल्याकडे, आपल्या रुपाकडे पाहायला फारसा कुणाला वेळ नसतो, हे उमजले. रिकामा वेळ असला की आपण शेजारी डोकावतो. आमची वृक्षजमात सृजनात आणि कर्तव्य पालनात एवढी व्यग्र असते की दुसऱ्याकडे पाहण्यासाठी कुणाकडे वेळच नसतो. त्यामुळे दुसऱ्या कुठल्या वृक्षाने माझ्याकडे पाहून माझ्या रूपावर व्यंग करण्याचा प्रसंग उद्भवलाच नाही. आणि माणसांविषयी बोलायचं तर, एखाद्या गोष्टीचे सौंदर्य लोप पावले की त्या गोष्टीवरुन नजर काढून, पर्यायी सौंदर्यस्थळे शोधून, तिकडे धाव घेण्याची त्यांची वृत्ती. त्यामुळे माणसेही माझ्या त्या रूपाकडे पाहत नव्हती. त्यामुळे कुरुपतेची चिंता निमाली. काही दिवसातच माझ्या आश्रयाला असलेल्या पक्षांनी बागेतल्या दुसऱ्या वृक्षांवर आसरे शोधले. माणसेही दुसऱ्या वृक्षांच्या सावलीत आसऱ्याला बसू लागली... आणि त्यामुळे त्यांचे काय होणार? ही चिंताही निमाली. पहिल्या वेळेसच या चिंता आल्या आणि निमाल्याही. त्यानंतर या चिंता आता पुन्हा कधी ग्रासत नाहीत. बाह्यरुप, बाह्यसौंदर्य लयाला जाण्याची आणि अनेकांना माझा असलेला आधार, आश्रय लयाला जाण्याची भ्रामक चिंताच लयाला गेली. त्यामुळे आता नेहमीच जगण्याची इच्छा मुळात आणि वाढण्याची इच्छा खोडात कायम राहते. देहात, मनात चैतन्य सळसळत राहते, सृजन सहजपणे कार्यरत राहते. हा अनुभवातून आणि चिंतनातून लाभलेला अखंड चैतन्याचा स्त्रोत आहे. पुन्हा चार-सहा महिन्यात मी शाखा आणि पर्णसंभाराने बहरलेला असेन. तेव्हा तू आता माझी चिंता करणे सोड. मला तर नेहमी तुम्ही माणसेच चिंतातूर दिसता. त्या कशा दूर करता येतील, यावर चिंतन कर.. आणि देहात आणि मनात कायम चैतन्याचा स्त्रोत सळसळत राहील, असा मार्ग शोध”.

अशोकवृक्षाचे बोलणे सहज असले तरी त्याने सांगितलेली गोष्ट कृतीत आणण्यातले काठिण्य विचारात घेतले तर ते अधिकच चिंता वाढविणारे होते. पण त्याचवेळी, आलेल्या अनुभवातून आणि योग्य दिशेने केलेल्या चिंतनातून चिंतामुक्त होता येते, असा दिलासाही त्यातून मिळाला होता.

'चिंता' या विषयावर अनेक संत-सत्पुरुषांनी, मानसशास्त्रज्ञांनी चिंतन करुन साररूपाने बरेच काही आधीच सांगून ठेवले आहे. ते कृतीत आणले तरी खूप आहे. पण हे सोपे नाही. कारण.... चिंता हा असा गंज आहे की तो बुद्धीची, स्मरणशक्तीची झळाळी, तेज नष्ट करून तिला दुर्बल बनवितो. ' चिंता से चतुराई घटे, घटे रूप और ज्ञान ', असेही होते. त्यामुळे समजूतदार असूनही, सर्व समजत असूनही, एखादा माणूस त्यावेळी असा का वागतो? हा प्रश्न त्याच्यासह अनेकांना पडतो.

समस्या, अडचणी यांची निर्मिती ही चिंतेच्या मुळाशी असते. या समस्या, अडचणींचा आकार आहे त्यापेक्षा मोठा वाटणे, त्या प्रत्यक्षात आलेल्या नसतांना, त्या भविष्यात येतील असे गृहीत धरून त्यांचा भार वर्तमानातच वाहणे, असे चिंतेचे रूप असते. चिंतेला कारण मनातले विचार असले तरी ती मनासोबत देहाच्या स्वास्थ्यावरही परिणाम करत असते. म्हणून चिंता करण्याच्या वृत्तीत, स्वभावात वेळीच बदल करणे आवश्यक आहे. बऱ्याचदा देहाच्या व्याधी मनात लपलेल्या सुप्त चिंतेशी संबंधित असतात. पण आपण हे मान्य करायला तयार नसतो. कारण असे मान्य करणे म्हणजे आपले मन कमकुवत आहे, आपले मनावर नियंत्रण नाही हे मान्य करण्यासारखे असते. हे आपल्याला कमीपणाचे वाटते. म्हणून चिंता लपवून आपण व्याधींवर अनेक वैद्यकीय उपचार करू पाहतो. पण ते व्यर्थ ठरतात.....

पोटांच्या विकाराचे तज्ज्ञ डॉक्टर जोसेफ मॉंटेग्यू त्यांच्या पुस्तकात एका ठिकाणी म्हणतात, ' You do not get stomach ulcers from what you eat. You get ulcers from what is eating you '.

संत कबीर म्हणतात, ' चिंता ऐसी डाकिनी, काट करेजा खाए, वैध बिचारा क्या करे, कहा तक दवा खवाय'. कोणत्याही शारीरिक व्याधी नसतानांही देहाचे स्वास्थ्यावर विपरित परिणाम करणाऱ्या या चिंतेचे निर्मितीस्थान मनाच्या कमकुवतपणात असते. ' नाना चिंतेची काजळी, व्याधीवाचून तळमळी ' असे चिंताग्रस्त व्यक्तीचे होते.

चिंता मनापर्यंतच सीमित असते तोपर्यंत ठीक आहे. पण ती जेव्हा शरीरावर परिणाम करायला लागते, तेव्हा तिला गांभिर्याने घ्यायला हवे. चिंता असतांना, त्यावर एकटयाने मात करणे शक्य नाही हे माहित असतांना, ती लपविणे ही आपली स्वतःचीच फसवणूक असते. याची किंमत कधीतरी मोजावीच लागते. एका संस्कृत सुभाषितात म्हटल्याप्रमाणे ' चिंता ' ही" चिते"हून भयंकर आहे. कारण 'चिता' निर्जीवाला आणि तेही एकदाच जाळते. पण 'चिंता' मात्र सजीवालाच जिवंतपणी आणि तेही वारंवार जाळते. तेव्हा या चिंतेला आपल्याला जाळू द्यायचे की आपणच तिला जाळायचे, हे ठरवायला हवे.

मनाच्या ठिकाणी नानाविध चिंता येणारच. त्या कुणालाही चुकल्या नाहीत. कारण समस्या, अडचणी आहेत, तिथे चिंता आहेच. तिच्या मुळाशी असलेल्या समस्येशी दोन हात करून, लवकरात लवकर तिला संपविण्याचे कौशल्य ज्याने त्याने प्राप्त करून घेणे गरजेचे आहे. त्या कौशल्याने प्रत्यक्ष उपाय करणेही गरजेचे आहे.

चिंता निर्माण होताच तिला गांभिर्याने घेणे आवश्यक आहे. चिंतेच्या मुळाशी जाऊन ती निर्माण होण्याचे कारण जाणून घेऊन, त्यावर उपाय शोधणे आवश्यक आहे. चिंता एकच असली तरी तिचे निराकरण होत नाही तोपर्यंत वारंवार ती आघात करत असते. त्यामुळे एकाच चिंतेचे दीर्घकाळचे वास्तव्य तिचे उपद्रवमूल्य वाढविणारे असते.

बंदिवानांच्या छळ छावण्यात, त्यांचे हात पाय बांधून, त्यांच्या डोक्यावर एक पाण्याने भरलेली पिशवी बांधून तिला असलेल्या एका छिद्रातून एक एक थेंब पाणी, चोवीस तास डोक्यावर पाडण्याची शिक्षा नाझी सैन्याकडून दिली जात असे. एकच थेंब पाणी पडत असे.. पण ते सारखे... असे म्हणतात की काही तासात त्या थेंबाचा आवाज घणाघातासारखा डोक्यात घुमायला लागून तो असह्य, वेदनादायी होत असे. चिंतेची सुरुवात देखील अशी थेंबाथेंबानेच होते. अशावेळी हात-पाय बांधून न घेता, गलितगात्र न होता, योग्य ती कृती करून वेळीच त्या थेंबापासून दूर जाणे आवश्यक आहे. असे केले नाही तर तीच चिंता काही वेळाने असह्य वेदनादायी घणाघात करायला सुरुवात करते.

चिंता गांभीर्याने घेऊन, तिच्या निराकरणासाठी उपाय शोधूनही बऱ्याचदा ते सापडत नाहीत. आपल्याकडून एखादी चूक होते किंवा दुसऱ्याची चूक असूनही आपल्याला अप्रत्यक्षपणे जबाबदार धरले जाते. अशावेळी असे काहीसे होते. अशावेळी, जास्तीत जास्त काय वाईट होईल? यावर विचार करून ते स्वीकारायची मनाची तयारी ठेवणे व दरम्यानच्या काळात वाईट होण्याची, नुकसान होण्याची मात्रा कमी करण्याचे प्रयत्न करणे उचित असते. अनेकदा कुटुंबात, कार्यालयात, जावू तिथे सर्व जबाबदाऱ्या अंगावर घेऊन, त्या पार पाडून स्वतःचा विशेष ठसा उमटविण्याची काहींची वृत्ती असते. असे करणे म्हणजे इतरांच्या चिंता आपण वाहणे असते. हे चिंता वाहणे क्षमतेबाहेर झाले की खरे तर थांबायला हवे. पण असे होत नाही. चिंतांचे नियोजन फसते, गोष्टी हव्या तशा घडत नाहीत. याची परिणिती इतरांवर राग, शरीर स्वास्थ्यावर परिणाम यावर होते. हे टाळायचे तर वेळीच जबाबदाऱ्यांचे वाटप आणि त्या पार पाडण्यासाठी आवश्यक अधिकारांचे संबंधितांना प्रदान होणे आवश्यक ठरते.

संकटं, समस्या यांचे अंदाज आणि त्यांच्या परिणामांची काळजी चिंतेच्या मुळाशी असते. तेव्हा हे अंदाज, आडाखे आणि त्यांचे परिणाम यांना सहजतेने स्वीकारण्याची मनाची तयारी असली की चिंता त्रास देत नाही. पावसाळ्यात पाऊस पडला, पूर आला तर चिंता त्रास देत नाही. कारण आपण तशी मनाची तयारी केलेली असते, शक्य ते उपायही करून ठेवलेले असतात. अवकाळी पाऊस मात्र चिंता वाढवितो.

आयुष्य म्हटल्यावर अडचणी, समस्या अवकाळी उद्भवणारच. त्यांना सामोरे जाण्याची मनाची तयारी आणि 'मी त्या समस्यांवर मात करेन, ' असा आत्मविश्वास या दोन अमूल्य गोष्टी, जीवन चिंतामुक्त करतात.

'राही मनवा दुखकी चिंता क्यू सताती है, दुख तो अपना साथी है', हे सहजपणे स्वीकारले की दुःखाची तीव्रता, झळ आणि पाठोपाठ येणारी चिंता कमी होते. समस्या, अडचणी आपण सहजपणे स्वीकारतो. पण अशा रीतीने स्वीकारूनही काही वेळेस त्यांच्याशी एकाकी लढणे शक्य होत नाही. अशावेळी शस्त्र खाली टाकून युद्ध हारण्यापेक्षा कृष्णाला मदतीसाठी हाक मारावी. असा एक तरी कृष्ण आयुष्यात शोधून, जपून ठेवावा, जो हाक मारताच धावून येईल आणि आपली चिंता दूर करेल. धावून येणारा कृष्ण आर्थिक चिंता, विवंचना सहज दूर करू शकतो. पण चिंता मनाच्या ठिकाणी असेल, तर ती घालविणे त्यालाही कठिण जाते.

जिवलगांवरचा भरोसा, अपेक्षा, त्या अपेक्षांच्या विपरित असे त्यांचे वागणे, यातून निर्माण झालेल्या भावनिक आणि भविष्याच्या चिंता या प्रकारात मोडतात. अशावेळी निष्काम कर्मयोग आणि गीताच आत्मसात करायला

हवी. 'आस' आहे म्हणून 'त्रास' आहे. ही आस संपायला हवी. 'मी सोडणार नाही आता कधी उसासे, एकेक आस माझी बुजवून चालले मी', असे कवयित्री अनुराधा टल्लू यांनी म्हटल्याप्रमाणे व्हायला हवे.

चिंता हटविणे प्रयत्न करूनही जमले नाही तर आस्तिकांसाठी, देवावर श्रद्धेने चिंतेचा भार टाकून ''चिंताते पळाली, गोकुळाबाहेरी, प्रवेश भीतरी केला देवे" याचा अनुभव घेण्याचा एक उपाय उपलब्ध आहे, जो तात्कालिक का होईना दिलासा देणारा आहे. मात्र आस्तिक असा वा नास्तिक, दोघांनाही चिंता करणाऱ्या मनाच्या बाबतीत 'जेथे जेथे जाय मन, आड घाल सुदर्शन' असे स्वसामर्थ्याने, सुदर्शनचक्राने, चिंता निर्माण करणारे विचार अडविणे जमायला हवे. त्याशिवाय कायमची चिंतामुक्ती नाही. यासाठी आवश्यक चिंतन घडावे आणि 'चिंतने अचिंत राहिलो निश्चल' याचा अनुभव घेत राहावे.

**श्री सतीश मोघे -** मो. 9167558555



## कविता - ऐकू येई अंतर्नाद - सुश्री प्रभा सोनवणे



माझी पंचाऐंशी वर्षांची मावशी,
सुखवस्तू, सुखासीन आयुष्य,
जगत असताना ----
व्यक्त करते नेहमीच,
एक खंत,
"बोलायलाच कोणी नाही"!
 माणसांना बोलायचं असतं
अखेर पर्यंत....
साधायचा असतो संवाद...
पण अलिकडे,
कुठे कोण ऐकून घेतं कुणाचं?
मावशीचं वास्तव्य,
उच्चभ्रू सोसायटीत,
चोवीस तास दिमतीला बाई,
होतच असेल की,
तिच्याशी संवाद... असा तसा...

मावशी चोखंदळ वाचक,
पुस्तकं साद घालतात....
पण आता नजर साथ देत नाही!
तिला हवंय कोणीतरी गप्पा मारायला....
"सेन्सीबल" व्यक्ती!

परवा खूप दिवसांनी
एका जुन्या मैत्रीणीचा फोन आला,
भेटूया गप्पा मारायला,
मध्यवर्ती रिस्टॉरंट मधे!

दोन तासांचीच गप्पांची
मैफल,
आणि छत्तीस वर्षांच्या मैत्रीच्या
आठवणी....
मैत्रीण म्हणाली भावूक होत...
"सगळ्यांशीच नाही साधू शकत,
आपण नीट संवाद,
परवाच मी म्हणाले,
कुणाशी बोलताना ----
अशी एक व्यक्ती आहे,
जी समोरच्याचं नीट ऐकून घेते,
आणि योग्य प्रतिक्रिया देते...."
मी उत्सुक,
त्या व्यक्तिचं नाव ऐकायला!

आत्मस्तुतीचा दोष पत्करून,
सांगतेच आता,
 चक्क मीच की!

"ओह, यू मेड माय डे"
इतकंच म्हणाले आणि विषय बंद!

मलाही वाटतं माझ्या मावशी सारखंच,
साधावा संवाद समविचा-यांशी.....

पण ही पावती मिळाल्यापासून वाटतंय.....
 साधावा स्वत:शीच संवाद
 ऐकू येई अंतर्नाद!

**- प्रभा सोनवणे -** "सोनवणे हाऊस", ३४८ सोमवार पेठ, पंधरा ऑगस्ट चौक, विश्वेश्वर बँकेसमोर, पुणे 411011 मो. ९२७०७२९५०३ Email- sonawane.prabha@gmail.com

## कथा - प्राजक्त - सुश्री संगीता कुलकर्णी



उष्णतेने लाही लाही झालेल्या धरणीचे पावसाच्या जोरदार कोसळणा-या जलधारांनी अंग अंग मोहरून गेलंय. तिच्या मातीतून दरवळणारा तो मातीचा सुगंध. त्या मातीच्या सुगंधानी मोहक नाजूक असलेल्या प्राजक्तालाही कशी भुरळ पाडलीय पहा..!

झाडावरून अलगद सर्व फुले धरतीवर सांडत तो प्राजक्तं आपल्या प्रेमाची कबुली देतोय आणि त्याची फुलंही कशी अगदी त्यांच्याच सुगंधात तल्लीन झाली आहेत. पण… हे सर्व पाहून एरव्ही तटस्थ वाटणारा हा गुलमोहर बघा कसा इर्षेने पेटलाय नुसता… जणू काही आपल्या गडद केशरी रंगाच्या रागाने तो लालबुंद झालाय…. पण अलगद तोही शिंपडतोय की त्याच्या लाल केशरी फुलांच्या रंगाचा सडा त्या भिजलेल्या धरतीवर..

पण धरतीवर सर्वस्व झोकून दिलेला हा प्राजक्त जराही पाहत नाही ह्या गुलमोहराकडे.. तो त्या मृदगंधात इतका रममाण झालाय की त्याचं अस्तित्वही आता त्या मातीत मिसळून एक सुगंधाचं अद्‌भूत रसायनच जन्माला येतंय बघ..

…"मी ही अशीच तुझ्या आयुष्यात त्या प्राजक्ताच्या फुलासारखी दरवळत राहीन. अगदी खरं.. वचन देते मी तुला..". समीरा हे सर्व अलंकारिक वर्णन सुबोधला सांगत होती. समीराला छंदच होता अलंकारिक भाषेत बोलण्याचा आणि निसर्गाची किमयाही सांगण्याचा… त्यालाही तिचे ते बोलणे आवडायचे आणि तो तिच्या त्या बोलण्यात गुंतून जायचा. कसलेही भान नसायचे त्याला. तो तिच्याकडे एकटक बघत बसायचा.

या दोघांचं कॉलेजमध्येचं मेतकूट जमलं होतं. समीराला प्राजक्त खूप आवडायचा म्हणून तिने त्याला कधी काळी प्राजक्ताचं रोपं गिफ्ट केलं होतं. यावर तो खोडकरपणे, गंमतीशीरपणे म्हणालाही,"वा..! ! वाढदिवस माझा आहे. गिफ्ट मात्र तुझ्या आवडीचं.".. ती म्हणाली"हो तसं समज हवं तर.. नाही तरी काही काळानं मी येणारच आहे तुझ्या घरी कायमचीच राहायला आणि तेव्हा हा प्राजक्त मोठा होऊन रोज फुलांचा सडा घालील आपल्या अंगणात आणि तू अंगणात पडलेली फुलांची ही रास माझ्यासाठी वेचून आणत जा".. मग तोही लाडिकपणे म्हणाला,"जो हुकूम मेरे आका…."

दिवस, महिने, वर्षं अशीच सरली. गप्पा मारत. भावी जीवनाची स्वप्ने रंगवत. प्राजक्ताच्या रोपाचं आता झाड झालं होतं. आता तो मस्त फुलून आला होता.

आणि अचानक त्या दिवशी मुसळधार पाऊस सुरू झाला. सगळं अंधारून आलं. काही वेळाने सर्व लाईट्सही गेल्या. मोबाईल, फोन यांची कनेक्टिव्हिटी गेली.. मुसळधार पावसानं रस्ते तुंबले. वाहनं ठप्प झाली. लोक मानेपर्यंत साचलेल्या पाण्यातून मार्ग काढून चालत होती आणि समीराही रस्त्यात कुठे तरी अडकली होती.

तिचा फोन बंद झाला होता. तसेच सुबोधचाही फोन बंद झाल्यामुळे तो तिच्याशी संपर्क करू शकत नव्हता. त्यांचा शेवटचा संपर्क झाला तेव्हा ती ऑफिसमधेच होती.

काल सकाळपासून बरसणाऱ्या प्रचंड रौद्र सरी आताशा थांबल्या होत्या... रवीराजाने कितीतरी वेळाने दर्शन देऊन धरा सोनेरी केली. तो उठून अंगणात आला आणि बघितलं तर प्राजक्ताचं झाड सुरक्षित होतं. त्या पावसातही त्याला काहीही झालं नव्हतं. सुबोध त्या प्राजक्ताला पाहून सुखावला. मनोमन खूश झाला आणि त्याच्या मनात विचार आला की ह्या इतक्या पावसातही समीराने ह्या प्राजक्ताच्या झाडाचाच विचार केला असणार. आली असेल का एव्हाना ती घरी? असं म्हणतं त्याचं लक्ष सहजच खाली पडलेल्या प्राजक्ताच्या फुलांच्या सड्याकडे गेलं आणि ही फुलंच तिच्यासाठी ओंजळीत भरून घेऊन जावीत हा विचार करून त्याने ती फुलं वेचायला सुरुवात केली. प्राजक्ताच्या फुलांनी ओंजळ भरून गेली आणि त्याची पावलं समीराच्या घराकडे निघाली. अति उत्साहात तो तिच्या घराजवळ पोहचला पण त्याला तिच्या घराभोवती गर्दी दिसली.. काय झालं असेल? असा विचार मनात येताच त्याने पावलांचा वेग वाढवला आणि लगबगीने तिथे पोहोचला. पाहतो तो काय? तिचं मृत शरीर फक्त त्याच्यासाठीच ताटकळत ठेवलं होतं. आदल्या दिवशी झालेल्या मुसळधार पावसाने तिचा बळी घेतला होता... झाकण नसलेल्या गटारात तिचा पाय अडकून तिचा देह त्यात पडला... पण जेव्हा पाणी ओसरलं तेव्हा तिचा तो मृतदेह त्या गटारात अडकलेला काही माणसांना मिळाला. तो हे सारं ऐकून आणि पाहून जागीच खिळून राहिला निःशब्द होऊन... फुलांनी भरलेली प्राजक्ताची ओंजळ त्याने तिच्या पार्थिवावर रिती केली आणि डोळ्यातले अश्रू तसेच गोठवून तिथून कुणाशीही न बोलता जड अंतःकरणाने निघाला.

अचानक विजांचा कडकडाट झाला आणि भूतकाळात डोकावणारे त्याचे (बंद डोळ्याआडचे )मन भानावर आले. तो तसाच हताश होऊन त्या प्राजक्ताच्या बुंध्याजवळ येऊन बसला व समीराच्या आठवणीत हरवला.. तो मनात विचार करू लागला की आजचा पाऊस तिचीच आठवण घेऊन आलाय.. तिला खूप आवडायचं पावसात भिजायला. त्यात ती अगदी बेधुंद होऊन नाचायची. पण या प्रचंड कोसळणाऱ्या पावसानेच तिला कायमचं माझ्यापासून दूर केलं. बहुतेक माझ्या प्रेमापेक्षाही पावसाचंच तिच्यावर अधिक प्रेम होतं आणि तो भरलेल्या डोळ्यांनी मिस्कीलपणे हसला... सगळ्या आठवणी अगदी काल घडल्यासारख्या आठवत होत्या त्याला.. डोळ्यांतील आसवांनाही बऱ्याच दिवसांनी बाहेरची वाट सापडली होती आणि तो प्राजक्त त्याच्याकडे शांतपणे स्तब्धपणे पहात होता. जणू काही प्राजक्त त्याला त्याच्या मनातलं गुपित सांगू पाहत होता. पण तो काही ते ऐकायच्या मनस्थितीत नव्हता... मग खोडकर वाऱ्याने मध्यस्ती करायची ठरवली आणि तो उनाड वारा सैरावैरा वाहू लागला. वाहता वाहता शेजारच्या प्राजक्ताची ती मृदुगंधाशी लगट करणारी फुलं हळूच त्याने त्याच्या पायाशी आणून ठेवली आणि तिथल्या तिथेच वाराही घुटमळू लागला. प्राजक्ताची फुलंही आता त्याच्या पायाशीच रुंजी घालत होती. त्याच्या पावलांना फुलांचा नाजूक स्पर्श होत होता.. मध्येच तो खोडकर वारा वाहताना ते प्राजक्ताचं मृदगंधाशी एकरूप झालेलं अद्भुत रसायन त्याच्याबरोबर घेऊन आला आणि मग प्राजक्ताच्या नकळत मातीच्या गंधासह त्याच्या हृदयाचा ठाव घेऊ लागला... ती फुलं त्याने हातात घेतली व शांत होऊन डोळे मिटले..

समीरा त्याच्या समोरच होती. तेच निखळ हास्य तिच्या चेहऱ्यावर विलसत होतं. त्याच्या हातातली प्राजक्ताची फुलं पाहून समीरा सुखावली व म्हणाली.."माझ्याचसाठी आणलीस ना ही फुलं, मग दे इथे" असं म्हणून तिने सुबोधकडून ती फुलं घेतली आणि आनंदाने डोळे मिटले.. त्या फुलांच्या गंधात क्षणमात्र सगळं हरवून गेलं आणि सुबोधही.. तिच्या त्या चेहऱ्यावरच्या आनंद..

आता त्याला त्याचं अस्तित्वच राहिलं नव्हतं. तो फक्त आणि फक्त समीराच्याच प्रेमात आकंठ बुडाला होता. समीरा म्हणाली," घे ही फुलं अगदी सुकली तरी जपून ठेव. त्यात मी आहे.. तू आहेस आणि आपल्या गंधित आठवणी..."

धो धो पाऊस आता त्या प्राजक्ताच्या जाळीदार छत्रीतून सुबोधवर सरींचा अभिषेक करू लागल्या.. त्या सरींचे ओघळ मातीचा गंध आणि प्राजक्ताचा तो दरवळणारा सुगंध याने आता त्याचं तन मन व्यापून उरलं. तो ह्या सर्वात कुठेतरी हरवून गेला होता. त्याने आता स्वतःला शोधणं बंद केलं होतं कारण त्याचं अस्तित्वचं मुळी तिच्या प्रेमात होतं आणि ती त्याला सापडली होती...

अनंतात विलीन झालेली समीरा त्याला प्राजक्ताच्या फुलांच्या गंधात सापडली होती.. प्राजक्तही तो त्यांच्या अंतरातला प्रेमाचा सोहळा पाहून मुग्ध झाला होता. ज्या पावसाने त्यांची ताटातूट केली होती त्या पावसानेच सुबोधला समीराच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली होती...

प्राजक्तही खुश होऊन आपल्या केशरी फुलांचा त्याच्यावर वर्षाव करू लागला... कदाचित त्याला समीराच्या अस्तित्वाचं गुपितच सांगायचं होत. पुन्हा एकदा विद्युल्लता मेघगर्जनेसह आसमंतात चमकली आणि त्याची प्रेमात विरून गेलेली समाधी भंग पावली. त्याने हळूच बंद मूठ उघडली. त्या मुठीत असलेली ती दोन फुलं त्याच्या हाताच्या उष्णतेने कोमेजलेली त्याला दिसली तरीसुद्धा.. ती फुलं त्यांचा तो गंध त्याच्या तळहातावर ठेऊन गेली होती.. जसं समीरा आपलं अस्तित्व त्या फुलांना देऊन गेली होती ना अगदी तस्सचं....

सुबोधने पुन्हा मूठ बंद केली व उठून एकवार प्राजक्ताच्या झाडाकडे पाहिलं आणि त्याला कडकडून मिठी मारली. मग दोन्ही हात पसरवून बरसणाऱ्या सरींना आपल्या कवेत घेतलं. ती फुलं खिशात ठेवली आणि समीरासह तो आपल्या घरी जाण्यासाठी निघाला.. तिच्या आठवणी सोबत....

**सुश्री संगीता कुलकर्णी -** ठाणे मो. - 9870451020



## लेख - पर्णपाचू - सौ. अमृता देशपांडे



संत तुकाराम महाराजांनी चारच शब्दात एक मोठा संदेश दिला आहे..."वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे". निसर्गातले वृक्षवेली हे आमचे सोयरे आहेत. सोयरे म्हणजे नातलग. जसे आपण नातलगांशी बोलतो, हसतो, दुःखात सहभागी होतो. अडचणीत मदत करतो. त्यांची काळजी घेतो, त्याचप्रमाणे अवतीभवतीचे वृक्ष, वेली, फळ झाडे, फुलझाडे हे सुद्धा आपले सगेसोयरे. त्यांच्याजवळ मनोगत व्यक्त केलं की नक्कीच ते आपल्याला प्रतिसाद देतात. त्यांची भाषा मात्र आपल्याला कळायला पाहिजे.

निसर्गाचं हे हिरवंगार लेणं नेहमीच माणसाच्या सोबतीला असतं. विविध आकार, विविध रूपे, काही मोठे वृक्ष, लहानमोठी झुडुपे, वेली, शेतमळे... किती किती विविधता... पण रंग एकच ..." हिरवा"... समृध्दी, शांती आणि एकात्मकतेचा सजीव आविष्कार!

एका एका झाडाचं पान किती बोलकं! भारतीय संस्कृतीत केळीची पाने, आंब्याची पाने, विड्याची (नागवेलीची) पाने, वडाची पाने, बिल्वपत्र, आपट्याचं पान, शमी, मंदार, रुई, तुलसी, अशी पाने देवादिकांनीच अंगिकारलेली आहेत. त्यानुसार काही कथाही सांगितल्या जातात. वरील प्रत्येक पानाचे धार्मिक महत्त्व आणि त्यांचे आयुर्वेदिक गुणधर्म हे आपल्या ऋषीमुनींनी संशोधनात्मक कार्य करून पुढील शतकानुशतके येणा-या पिढ्यांना बहाल केले आहे. आणि आता २१ व्या शतकातही आपल्या संस्कृतीचा एक अभिमानास्पद असा अविभाज्य आणि मौलिक मानदंड आहे.

श्रावणात मंगळागौर पूजा, हरितालिका पूजा, गौरी पूजा, यावेळी आंब्याची पाने तोरणाला, कलशपूजेला वापरतात. केळीची पाने नैवेद्याला, पंगतीला हवीतच. दक्षिण भारतात अजूनही जेवण्यासाठी केळीची पानेच वापरतात. असे वाचले आहे की, केळीच्या पानांच्या शिरांमधून एकप्रकारचा द्रव पाझरतो, केळीच्या पानावर जेवल्यास तो द्रव अन्नात मिसळतो, व त्यामुळे अन्न सुलभरित्या पचते. विड्याची पाने तर प्रत्येक पूजेत मानानं उपस्थित असतात. त्यांचाही गुणधर्म पचनक्रियेस योग्य पुष्टी देण्याचाच आहे.

बिल्वपत्राने शंभूमहादेवाच्या पिंडीवर स्थान पटकावले आहे. महादेवांनी हलाहल प्राशन केले, त्याची शरीरात होणारी जळजळ शांत होण्यासाठी बेलपत्रे व बेलफळे यांचा उतारा केला. तामसी देहप्रकृतीसाठी हा उतारा आयुर्वेदात सांगितलेला आहे.

आपट्याच्या पानाला सुवर्णमान दस-याच्या दिवशी मिळाला आहे. तसेच शमी मंदार दूर्वा आघाडा या पर्णवनस्पतींना गणपतीबाप्पाने जवळ केले आहे. चाफ्याची पाने गंगागौरीला, तर रुई शनिदेवांना आणि मारुतीरायांना...

तुळशीपत्र श्रीकृष्णाला आणि नैवेद्यावर ठेवायला.

पळसाची तीन पाने त्याच्या ठाम वृतीचं द्योतक. कमळाची तरंगणारी सुंदर गोल पाने फुलांइतकीच सुंदर दिसतात. वडासारख्या काही पानांचा पत्रावळी, द्रोण करण्यासाठी अजूनही वापर होतो.

वटवृक्षाचे पूजन करून सुवासिनी पतीला दीर्घायुष्य मागतात. सावित्री-सत्यवानाच्या कथेप्रमाणे पतीचे प्राण यमराजाकडून परत आणण्यासाठी वटवृक्ष पुजला असे जरी असले तरी दुसरी एक बाजूही आहे. वटवृक्ष हा शंभर वर्षे आयुर्मान असणारा वृक्ष आहे. त्याच्या बुंध्याचा घेर आणि फांद्यांचा पानांचा गोलाकार बघता त्याच्या सान्निध्यात प्रचंड प्रमाणात प्राणवायू मिळतो. म्हणून वटवृक्षाचे पूजन करावे, हा शास्त्रीय नियमही असू शकतो. पूर्वजांनी त्या काळात असे अनेक शास्त्रीय नियम, त्याकाळच्या सामाजिक रूढींप्रमाणे धार्मिक बंधनात गुंफून त्या आचारांचे संस्कार पुढे चालवायचे संकेत दिले आहेत. त्याबाबतीत चटोर विनोद, चेष्टा न करता केवळ स्त्रियांनीच नाही तर प्रत्येकाने वटवृक्षाच्या सान्निध्यात वर्षातून किमान एक दिवस रहावे, असा आधुनिक संकेत पाळायला काय हरकत आहे?

आयुर्वेदाने मसाल्याच्या जिन्नसातील तमालपत्र, दालचिनी पत्र, हळदीची पाने, गवती चहा, पेरू, डाळिंब, सीताफळ, अडुळसा, जांभूळ, लिंबू, कढीलिंब, कडुलिंब, कोथिंबीर ही सर्व पर्णवर्गातल्या वनस्पतींची विशेष दखल घेत, त्याचे महत्व विषद करून निरामय आरोग्यासाठी कसा उपयोग करायचा हे सांगितलं आहे.

मेंदीच्या पानावर झुलणारं मन आणि खुलणारं सौंदर्य शुभकार्याचा पहिला मंगल सोहळा असतो.

पर्णवर्गातील सर्वात मोठे पान माडाचे, म्हणजेच नारळाचे. संयुक्त पानांच्या जातीतलं हे भलं मोठं पान! नारळाच्या झाडाला पृथ्वीवरचा कल्पवृक्ष म्हणतात. कारण त्याच्या प्रत्येक घटकापासून अनेक प्रकारचे जिन्नस बनवले जातात. माडाची पाने म्हणजे ' झावळं '. त्यापासून हिराचा झाडू ( खराटा), तट्टा, चटया बनवल्या जातात. झावळांमधून दिसणारा चंद्र कविमनाला नेहमीच आकर्षित करतो.

रस्त्याच्या कडेनं जाताना आढळणारी विविध प्रकारची गवत, चिमणचारा आणि लाजाळूची नाजूक इवलीशी आणि स्पर्श होताच हळूच हलकेच मिटणारी पाने म्हणजे तर निसर्गाचं कोमल रूप.

वसंत ऋतुत फुललेला आम्रवृक्ष मोहोराचे तुरे आणि सुगंधी दरवळ घेऊन येतो. आंबा काजूसारखे वृक्ष बहरून येतात. फुलारलेले सौंदर्य फलद्रूप होतं. झाड लेकुरवाळं होतं. भरपूर फळं देऊन तृप्त झालेला वृक्ष पर्जन्यवृष्टीने डवरतो. हिरवाईचं असीम सौंदर्य दिसतं ते श्रावण भाद्रपदात. गर्भार नवतरूणीच्या मुखावर जसे पाचव्या महिन्यात एक वेगळेच तेज, टवटवी, कोवळेपण दिसते, तशीच निसर्गातही श्रावणातली पर्णसृष्टी टवटवीत होते." जागोजागी हिरवाकंच ऐना... सृष्टीला पाचवा महिना" असं वर्णन कवी करतात.

पानगळीचा ऋतू सुरू झाला की, झाडांनी धरित्रीला दिलेले पूर्ण समर्पण नतमस्तक करायला लावते. धरणीमातेने दिलेल्या जन्माचे पूर्णत्व सारा पर्णसंभार तिलाच अर्पण करून निसर्ग कृतार्थ होतो.

निसर्गातला हा पानांचा पसारा आणि पिसारा आपल्याला न बोलता खूप काही शिकवतो. गुरू, सगेसोयरे, मित्र, जिवलग, या सा-या भूमिका निभावत तो आपली सोबत करतो. आवश्यकता आहे ती आपल्या संवेदना जागृत ठेवण्याची. वृक्षसंपदा जतन करण्याची व योग्य प्रकारे विनियोग करण्याची.

..."अनंत हस्ते कमलावराने देता, किती घेशील दो कराने" असं परमेश्वरानं दिलेलं सृष्टीचे हिरवं लेणं, हा पर्णसंभार चराचरातला ईश्वरीय साक्षात्कारच आहे ना!

**सौ. अमृता देशपांडे -** पर्वरी गोवा मो. 9822176170

## कथा - अपुरा त्रिकोण - श्री प्रदीप केळूसकर



"आई, उद्या मी बेंगलोरला जायला निघतो."

आई आणि मी डायनिंग टेबलावर जेवायला बसलो असताना मी म्हणालो. आई आश्चर्यचकित झाली. "अरे काल तर आलास बेंगलोरहून, आठ दिवसांची रजा घेऊन आलास असे म्हणालास?" मी गप्प. हळूच म्हणालो, "कंपनीची केबल आलीय. परवा जॉबवर यायला कळवलंय. पण तुझी बँकेची कामे राहिली होती ना? ती उद्या पूरी होतील. उद्या रात्रीच्या प्लेनने निघणार." आई हळूच पुटपुटली, 'आणि शुक्रवारचे मिताचे लग्न? ' मला एकदम ठसका लागला. आई म्हणाली," अरे! हळू, हळू पाणी पी. कुणीतरी आठवण काढली वाटतं." .... आई आणि मी अन्न फक्त चिवडत होतो. दोघांचेही जेवणात लक्ष नव्हते. हसतमुख मिताचा चेहरा डोळ्यासमोर आला. मी हात धुवायला उठलोच. पाठोपाठ आईपण ताटे आवरत उठली. मी म्हणालो," बॅग भरतो उद्याची. दिवसभर खूप कामे आहेत."

मी माझ्या खोलीत आलो. पाठोपाठ आई पदराला हात पुसत आली. " मिता आलेली परवा. वल्लभला लग्नाचे कळले काय? हे विचारत होती. तशी ती येत असते नेहमीच. आली की, घराची सर्व आवराआवर करुन देते. मुन्नीची खोली स्वच्छ करते. तुझीही खोली ठीक ठाक करते. मला स्वयंपाकात मदत करते. आता चालली लग्न करुन. " मी गप्प...." वल्लभ, मिताला तुझ्याबद्दल फार वाटायचं रे, मलाही वाटायचं मिता या घरची सून होईल. तशी बातमी तू किंवा मिता द्याल अशी वाट पाहत होते. पण शनिवारी मुन्नीचा फोन आला. ती म्हणाली, मिताचे लग्न ठरले. मिताने तिला पहिला फोन केला. शेवटी गेली दहा वर्षे त्यांची मैत्री. मुन्नी फोनवर म्हणाली, ' दादाने बहुतेक मिताला लग्नाचे विचारले नाही शेवटी. या दादाच्या मनातले काही कळत नाही. स्पष्ट काही बोलत नाही. माणूसघाणा आहे नुसता. ' मुन्नीला पण वाटत होते, तुझे आणि मिताचे लग्न होईल. तिला पण आश्चर्य वाटले. तुझ्या मनात मिताबद्दल होतं ना वल्लभ? मला तर तसं वाटत होतं. मग का नाही विचारलंस तिला?" आईचे एका पाठोपाठ एक प्रश्न.

मी काहीही न बोलता बॅग भरायला सुरुवात केली. आईला काय उत्तर द्यावे कळेना. माझे चित्त कुठे ठिकाणावर होते? मिताच्या लग्नाची बातमी ऐकली आणि वाटले साऱ्या स्वप्नांची राख रांगोळी झाली. चार वर्षात कंपनीत जीव तोडून मेहनत केली. गेली दोन वर्षे एक्सटर्नल एम. बी. ए. सुरु होतं. ते दोन महिन्यात संपेल की मग मी कंपनीचा असिस्टंट मॅनेजर होईन. आणि मिताला लग्नाचे विचारीन असे मनात मांडे खात असलेला मी, मिताच्या लग्नाच्या बातमीने उध्वस्त झालो. बॅगेत थोडे कपडे, लॅपटॉप टाकून मी बॅग बंद केली. लाईट बंद करुन बेडवर पडलो. डोळे मिटले तरी झोप कुठली यायला. डोळ्यासमोर १६ वर्षाची मिता दिसायला लागली. इंजिनिअरींग पहिल्या वर्षात ॲडमिशन मिळाली तो दिवस. व्हि. जे. टी. आय. सारख्या मुंबईतील प्रख्यात इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये सहज ॲडमिशन मिळाली म्हणून आई-बाबा खुश. मुंबईत जेमतेम

दोन इंजिनीअरिंग कॉलेजेस. त्यात व्हि. जे. टी. आय. चे नाव मोठे. आमच्या कॉलनीत गेल्या कित्येक वर्षात कुणाला व्हि. जे. टी. आय. मध्ये ॲडमिशन मिळाली नव्हती. पण यंदा मला ॲडमिशन मिळाली म्हणून कॉलनीतले सर्वजण माझ्याकडे कौतुकाने पाहत होते. सकाळपासून फुले आणि पेढे घेऊन लोक येत होते. आई आणि मी ते आनंदाने स्वीकारत होतो. लोकं थोडी कमी झाली, आणि आई आणि मी माझी आवडती कडक कॉफी घ्यायला बसलो. एवढ्यात दरवाजावरची बेल वाजली. आई म्हणाली, मुन्नी आली बहुतेक. जा दार उघड. मी उठून दार उघडले. बाहेर मुन्नी होती. "अरे दादा किती वेळ बेल वाजवतेय मी, ऐकायला येत नाही काय? " असे नेहमीप्रमाणे बडबडत मुन्नी आत येताना मागे वळून म्हणाली, "अग, ये ग, आत ये. " मी बाहेर पाहिलं. हातात वह्या पुस्तके घेऊन एक मुलगी उभी. मुन्नीच्याच वयाची. निमगोरी, लाजाळू. खाली मान घालून वह्या पुस्तके सावरत होती. मुन्नीने हात धरुन तिला आत घेतले. आईला ओरडून म्हणाली, "आई ही बघ मिता, अगं ही शेजारच्या रामनगर मध्ये राहते. गेल्या आठवड्यात माझी ओळख झाली. " मुन्नी आणि तिची मैत्रिण माझ्यासमोरच बसल्या. आईने कॉफीचे कप त्यांच्या हातात दिले. आई मुन्नीला, आज कोण कोण माझे अभिनंदन करुन गेले ते सांगत सुटली. मुन्नी कॉफी घेता घेता कौतुकाने माझ्याकडे पाहत होती. एवढ्यात मुन्नीच्या काहीतरी लक्षात आले. ती तिच्या मैत्रिणीला म्हणाली," मिता, तू काय आणलस दादाला?" मिताने हळूच पर्समधून गुलाबकळी काढली आणि माझ्या हातात ठेवली. "अभिनंदन" म्हणाली. हे म्हणताना किती घाबरली होती, हे तिच्या चेहऱ्यावरून आणि थरथरणाऱ्या हातावरून समजत होते. मिताला पहिल्यांदा बोलताना मी पाहिले ते असे. मग मिता मुन्नीबरोबर वारंवार घरी येत राहिली. दोन महिन्यानंतर आलेल्या माझ्या वाढदिवसाला आई, मुन्नी आणि मिता यांनी मोठा बार उडवून दिला. त्यादिवशी रोज आपल्या व्यवसायात अडकलेल्या वडिलांना सक्तीने घरी थांबविले. मी कॉलेजमधून आलो, तर माझी खोली फुलांनी सुशोभित केली होती. माझ्या टेबलावर 'हॅपी बर्थ-डे' चे ग्रीटींग चिकटवलेले होते. माझ्या शाळेतील, कॉलेजमधील वेगवेगळे फोटो भिंतीवर चिकटविलेले होते. खोलीत माझ्या प्रिय किशोरीताईंची कॅसेट मंद आवाजात सुरू होती आणि माझ्या आवडीचा गोड शिरा आणि कडक कॉफी तयार होती. मी आश्चर्यचकित झालो. एवढे वाढदिवस झाले माझे, पण अशी वाढदिवसाची तयारी पाहिली नव्हती. मी आईला म्हणालो," अगं केवढं हे कौतुक माझे? एवढ्या वर्षात कधी नाही आणि आज?" मुन्नी म्हणाली," अरे दादा - ही सगळी मिताने केलेली तयारी. तिनेच बाबांना घरी थांबायला लावले. आणि तुझ्या खोलीची सर्व तयारी पण तिचीच. तिने लवकर येऊन मला उठवले. आणि हे सर्व तुझे फोटो वगैरे मागून घेतले. नाहीतरी आपल्या घरात कुणाचे वाढदिवस असे साजरे करतो का आपण? आणि बाबा कधी दुकान सोडून वाढदिवसाला थांबतात का?" मी मिताकडे पाहिले. ती हळूच हसली आणि मला प्रचंड आवडून गेली. कोजागिरी साजरी करायला जुहू बीचवर मी, मुन्नी आणि मिता गेलेलो तेव्हा मी आणि मिता जास्त जवळ आलो. मी घरी असलो आणि माझ्या खोलीत अभ्यास सुरु असला तर मुन्नी कधी कधी मोठ्याने बोलायची. मग मिता मुन्नीला ओरडायची," मुन्नी! दादांचा इंजिनिअरिंगचा अभ्यास सुरु आहे, हळू बोल." मग मुन्नी तिच्यावर चिडायची." माहिती आहे गं, चार महिन्यापूर्वी या घरात यायला लागलीस आणि दादाच्या अभ्यासाची काळजी करायला लागलीस." या सर्व गोष्टी मी आणि मिता एकमेकांच्या जवळ यायला कारण होत होत्या. पण माझे मन म्हणत होते - ' प्रेम, लग्न हे नंतरचे. आधी करिअर महत्त्वाची. नुसते इंजिनिअरिंग नाही, पोस्ट ग्रॅज्युएशन पण करायचे. लहान वयात मोठ्या पदावर पोहोचायचे. त्याकरिता मनावर लगाम हवा. तेव्हा प्रेम वगैरे सर्व काही मनात. '

इंजिनिअरिंग पुरे झाले आणि कॅम्पसमधून बेंगलोरमधील कंपनीत माझी निवड झाली. आमच्या घरातून मुंबईबाहेर कोणी राहिले नव्हते. त्यामुळे आईबाबा नर्व्हस झाले. पण माझा बेंगलोरला जायचा निर्णय पक्का होता. एकतर बेंगलोर आय. टी. चे मुख्य केंद्र होत होते. त्यामुळे बेंगलोरमध्ये एकसे एक हुशार माणसे जमा झाली होती. दुसरं म्हणजे, बेंगलोरमध्ये पुढील शिक्षणासाठी चांगली सोय होती. आणि अतिशय महत्त्वाचे कारण - मुंबईच्या घामट हवेपेक्षा बेंगलोरची थंड हवा मला मानवणारी होती.

शेवटी बेंगलोरला जायचा दिवस उजाडला. माझी सायंकाळची ६ ची ट्रेन होती. सकाळपासून मिता आमच्याकडेच होती. आईला जेवणात मदत कर, माझे कपडे इस्त्री करुन दे, माझ्या बुटांना पॉलिश कर. मिता नुसती धावत होती. शेवटी दुपारी ४ वाजता मी, आई, मुन्नी आणि मिता टॅक्सी करुन निघालो. बाबा परस्पर सीएसटी स्टेशनवर येणार होते. मी एवढ्या लांब जाणार म्हणून आई फार नर्व्हस झाली होती. टॅक्सीत सर्वजण गप्प गप्प होते. टॅक्सी स्टेशनवर पोहोचली, मिताने माझ्या दोन्ही हॅण्डबॅग खांद्याला लावल्या. मी एक सुटकेस घेतली. मिताने आईला आणि मुन्नीला घ्यायला काहीच सामान ठेवले नाही. गाडी लागलेली होती. माझ्या आधी मिता गाडीत चढली आणि बर्थ नंबर शोधून माझे सामान बर्थवर लावलेसुध्दा. आई म्हणाली, “ मुन्नी ती मिता किती चटपटीत आहे बघ, नाहीतर तू. ” मुन्नीला पण लटका राग आला.” हो, हो, मिता चटपटीत आणि मी आळशी. बसवून ठेव मिताला मांडीवर.” सर्वजण खूप हसलो.

गाडी सुटायची वेळ झाली आणि मी सोडून सर्वजण खोली उतरले. मला सर्वजण खिडकीतून हात दाखवत होते. मी पाहिलं, मिता रडवेली झाली होती. पर्समधील छोटा रुमाल हलवत होती। परत डोळ्यांना लावत होती. मी मुन्नीला आणि मिताला म्हणालो,”आईबाबांना सांभाळा गं.” आणि गाडी सुटली. गाडी बरोबर मिता धावत धावत रुमाल दाखवत होती. गाडीचा स्पीड वाढला आणि प्लॅटफॉर्मवर आई, मुन्नी आणि मिता लांब लांब दिसायला लागली.

मी बेंगलोरला आलो. कंपनीने जागा दिली होती. कंपनीत जीव तोडून काम केले. पदोन्नती मिळत होती. मुंबईला सहा महिन्यानंतर जात होतो. दरम्यान मुन्नी आणि मिता ग्रॅज्युएट झाल्या. मुन्नीला संस्कृतमध्ये पी. एच्. डी. करायचे होते म्हणून तिने पुणे युनिव्हरसिटीमध्ये ॲडमिशन घेतली. आणि ती पुण्याला गेली. मिता अभ्यासात यथातथाच होती. ग्रॅज्युएशननंतर तिने शिक्षण थांबविले आणि तिच्या आवडत्या कथक नृत्यामध्ये तिने जीव झोकून दिला. मी बेंगलोरमध्ये आणि मुन्नी पुण्याला. बाबा नेहमीप्रमाणे त्यांच्या व्यवसायात. आई घरी एकटी होती. पण मिता सकाळ संध्याकाळ घरी येऊन सर्व काही पाहत होती. आईला घेऊन बाजारात जाणे, डॉक्टरकडे जाणे, बारीकसारीक सर्व गोष्टी मिताच पाहत होती. मिता आईजवळ येऊन जाऊन असते म्हणून मी आणि मुन्नी निर्धास्त होतो. मी मुंबईत आलो कि, मिता तिच्या क्लासची वेळ सोडून आमच्या घरी येत होती. माझ्या आवडीचे पदार्थ घरात शिजत होते. माझ्या खोलीत आवडती पुस्तके, कॅसेट ठेवली जात होती. पण मी मुंबईत जास्त काळ राहू शकत नव्हतो. आता फक्त एक वर्ष. एम. बी. ए. पुरे करावे आणि मिताला लग्नाचे विचारावे. मी तिचा होकार गृहित धरला होताच. पण....

काल मी मुंबईत आलो, आणि आईने मिताच्या लग्नाची बातमी सांगितली आणि मी सटपटलो. आईने सांगितलेली हकिकत अशी, तिच्या मावशीने हे स्थळ आणले. मुलगा मावशीचा पुतण्या. गेली चार वर्षे

ऑस्ट्रेलियात असतो. इंजिनिअर आणि देखणा. एकुलता एक मुलगा. नकार देण्यास काही कारणच नव्हते म्हणे.

संपूर्ण रात्रभर, मिताला पहिल्यांदा पाहिले त्यापासून आतापर्यंतचा काळ चित्रपटासारखा समोर येत होता. या कुशीवरुन त्या कुशीवर होत रात्रभर जागा होतो. आयुष्याची जोडीदार म्हणून मिताशिवाय कुणाचा विचारच केला नव्हता. आता पुढे काय? ओळखीच्या अनेक मुली मिताच्या जागेवर उभ्या करुन पाहिल्या. पण छे. माझं मन समजणारी मिता म्हणजे मिताच. तिची जागा दुसरी कुणीच घेऊ शकत नाही.

पुरी रात्र न झोपता मी अंथरुणातून बाहेर पडलो. चहा घेताना आई माझ्याकडे पाहून म्हणाली,"अरे वल्लभ चेहरा असा काय? डोळे किती लाल. रात्रभर झोपला नाहीस की काय? काल मिताच्या लग्नाची बातमी ऐकलीस तेव्हापासून तू बेचैन झालास. अरे गोष्टी वेळच्यावेळी कराव्यात रे. मग पश्चाताप करुन काय उपयोग?" चहा घेऊन मी उठलो आणि बाहेर जायची आवराआवर करु लागलो. एवढ्यात बेल वाजली. आईने दरवाजा उघडला." अग मिता, ये ये आत. मुन्नीने बातमी कळवली. पण तू केव्हा सांगणार म्हणून वाट पाहत होते. बस, बस, वल्लभ आलाय काल. आठ दिवसांची रजा घेऊन आलो म्हणाला, पण काल रात्री म्हणाला, उद्या रात्री म्हणजे आजच्या रात्रीच्या विमानाने निघणार. इथे आल्यानंतर काहीतरी बिनसलं त्याचं. "मी माझ्या खोलीतून आईचे बोलणे ऐकत होतो. "तुम्हाला आधी कळविले नाही. मुन्नीच्या आई राग मानू नका, सारे कसे अचानक झाले. "मिताचा रडवेला आवाज मला ऐकू आला." मावशीने माझ्या आईला तिच्या पुतण्याबद्दल विचारले. तो ऑस्ट्रेलियाहून आलाय आणि लग्न करुनच जाणार म्हणाली, आई बाबा एवढे खूश झाले की मला विचार करण्याची संधी न देता सर्व काही ठरवून मोकळे झाले. माझा काही निर्णय होत नव्हता. तोपर्यंत लग्नाची तारीख, हॉल सर्व काही ठरवून झाले. " आता मिताचे हुंदके मला स्पष्ट ऐकू येत होते. मला काय वाटले कोण जाणे. तिरमिरीत खाड्कन माझ्या खोलीचा दरवाजा उघडला. बाहेर पडण्याच्या दरवाजाजवळच आई आणि मिता बोलत होत्या. रडवेली मिता मला पटकन सामोरी आली. तिच्याकडे दुर्लक्ष करुन मी आईला म्हणालो, 'आई मी बँकेत जातो. ' मी बाहेर पडणार एवढ्यात आई म्हणाली," अरे वल्लभ, मिता तिच्या लग्नाचे सांगायला आलीय रे.." मी चटकन मागे आलो आणि जळजळीत नजरेने तिच्याकडे पाहून "अभिनंदन" म्हणालो, आणि धाड्कन दरवाजा लावून बाहेर पडलो. बाहेर आलो. पोर्चमध्ये जाऊन किल्लीने गाडीचा दरवाजा उघडला. आत बसलो. गाडीचा दरवाजा, खिडक्या सर्व बंद केल्या आणि स्टिअरिंगवर डोके ठेवून ओक्साबोक्सी रडू लागलो.

- मिता -

धाड्कन दरवाजा बंद करुन वल्लभ बाहेर चालता झाला. मला माझे अश्रू आवरतच नव्हते. मुन्नीच्या आईने मला जवळ घेतले. 'योग्य वेळी मन मोकळं करावं गं मिता. एकदा वेळ सटकली की हळहळण्याशिवाय हातात काही राहत नाही.' माझं रडू काही आवरत नव्हतं. शेवटी मुन्नीच्या आईला, येते म्हणून सटकले. आता कसला निर्णय घेण्याची क्षमता आहे का माझ्यात? बाबा कालपासून आमंत्रणे द्यायला नातेवाईकांकडे जाऊन आलेसुध्दा. मनात असेल तर वल्लभने आणि वल्लभच्या आईने पुढाकार घ्यायला नको?

चार दिवसापूर्वी तिला पाहून गेलेला मावशीचा पुतण्या विनोद आठवला. खरंच त्याच्यात काहीच दोष नव्हता. सुशिक्षित, उमदा, देखणा, स्थिरस्थावर सर्व काही उत्तम. पण वल्लभ....

कॉलेजच्या पहिल्या वर्षी मुन्नीची ओळख झाली आणि तिच्या बडबड्या स्वभावामुळे ती मैत्रीणच झाली. एक दिवस ती फार आनंदात होती. म्हणाली, माझ्या दादाला व्हि. जे. टी. आय. मध्ये ॲडमिशन मिळाली. त्यांच्या एवढ्या मोठ्या कॉलनीत प्रथमच. तिच्या घरी फार आनंद होता म्हणे. मला म्हणाली, 'तू चल आमच्या घरी. ' मी तिच्या घरी जायला निघाले. तिच्या दादाचे कसे अभिनंदन करावे? असा विचार करताना कॉलेजमधल्या आवारात पिवळ्या गुलाबावर कळी फुलली होती. कोणी पाहत नाही हे पाहून हळूच ती खुडली आणि पर्समध्ये टाकली. मुन्नीच्या घरी गेलो. तर मुन्नीची आई आणि भाऊ खुर्चीवर बसून कॉफी पीत होते. मुन्नीच्या भावाकडे मी पाहत राहिले. अनोळखी तरुण मुलाकडे सतत पाहू नये हे माहित असूनही त्याच्यावरुन नजर बाजूला करु नये असे वाटत होते. विलक्षण आकर्षण होते त्याच्यात. सरळ नाक, गोरा रंग, चेहऱ्यावर हुशारीची लकाकी आणि हसतमुख. मी पर्स उघडून गुलाबकळी बाहेर काढली आणि हळूच त्याच्या समोर धरली. त्याने माझ्याकडे पाहून स्मित केले आणि गुलाबकळी घेण्यासाठी हात पुढे केला. माझ्या बोटांना त्याच्या बोटांचा ओझरता स्पर्श झाला. त्याच्या बोटांचा स्पर्श होताच, सारं शरीर थरारलं. पुरुषांचा स्पर्श घरीदारी होतच असतो. पण शरीरात अशी स्पंदने झाल्याचे कधी जाणवले नाही. मुन्नीच्या दादात काहीतरी विलक्षण जादू होती खरी.

मग मी या घरी कधी मुन्नीसोबत कधी एकटी जातच राहीले. मुन्नीचा दादा नेहमी कॉलेजात किंवा घरी असेल तेव्हा त्याच्या खोलीत बंद दाराआड अभ्यास करत असायचा. मला आता पक्के माहित झाले होते, त्याच्या खोलीचा दरवाजा आतून बंद असेल तर तो घरी आहे, आणि त्याच्या खोलीचा दरवाजा उघडा असेल तर समजावं, तो घरी नाही. मुन्नी खूपच लाडात वाढलेली. त्यामुळे तिचा घरात आरडाओरडा चालायचा. मग मी तिला दटवायची. दादाचा अभ्यास सुरु आहे ना, आवाज कमी कर. मुन्नीची आई गालातल्या गालात हसायची. मुन्नीच्या घरचं वातावरण मला आवडायचं. सर्वजण प्रेमळ आणि एकमेकांची थट्टा मस्करी करत रहायचे. मुन्नीचे बाबा फक्त रविवारी घरी असायचे. पण घरी असले की, दोन्ही मुलांसमवेत गप्पा, आपल्या धंद्यातल्या गोष्टी, मुलांचा अभ्यास, नातेवाईकांकडे जाणे असा मस्त कार्यक्रम असायचा. मुन्नीची आई म्हणजे मुन्नीची मैत्रीणच. मुन्नी आणि मुन्नीचा दादा आपल्या आईला कॉलेजमधील मित्र-मैत्रिणींच्या गंमती जमती सांगायचे आणि एकदम मोकळं वातावरण ठेवायचे. उलट आमच्या घरी हिटलरशाही. बाबा रागीट आणि हेकेखोर. त्यांच्यापुढे कुणाचे काही चालायचे नाही. आमची आर्थिक स्थिती यथातथाच. बाबा एका केमिकल कंपनीत केमिस्ट म्हणून नोकरी करीत होते. ते एकटेच मिळवणारे आणि आम्ही चार जणं खाणारे. माझी आई मात्र कमालीची सोशिक. संसार काटकसरीने करणारी. तिचे सर्व गुण माझ्यात आहेत असे सर्वांचे म्हणणे. पण बाबांसमोर बोलायला मला भिती वाटते. त्यांनी एकदा निर्णय घेतला म्हणजे घेतलाच. आई बिचारी भांडण नको म्हणून पडतं घ्यायची. आमच्या घरच्या या कोंदट वातावरणामुळे मी मुन्नीच्या घरी वारंवार जायला लागले आणि कळायच्या आधी मुन्नीच्या दादाच्या प्रेमात पडले. मुन्नीचा दादा इंजिनिअर झाला आणि बेंगलोरला निघाला पण. माझे काळीज कासावीस झाले. आता तो नेहमी नेहमी दिसणार नाही

हे समजत होते. पण मला वाटत होते तो मला आपल्या प्रेमाबद्दल बोलेल. अगदी ट्रेन सुटेपर्यंत मला आशा वाटत होती. त्याच्या डोळ्यात माझे प्रेम दिसत होते. मग ओठांवर का येत नव्हते?

मुन्नीचा दादा बेंगलोरला गेला आणि काही महिन्यात मुन्नी पुण्याला गेली. मी मुन्नीच्या घरी जातच राहिले. मुन्नीच्या दादाची खबरबात घेत राहिले. मला वाटायचे, मुन्नीची आई तरी मला विचारेल? ती पण गप्प होती. मी मुलगी... आपल्या संस्कृतीत मुली असे उघड उघड प्रेम दाखवतात का? केव्हा केव्हा वाटत असे, मी नोकरी करणारी नाही म्हणून मुन्नीचा दादा माझा विचार करत नाही की काय? हल्ली सर्वांना नोकरीवाली बायको हवी असते. मुन्नीचा दादा आपले प्रेम व्यक्त करील यासाठी जीव आसूसला होता. तीन महिन्यांपूर्वी मुन्नीची आई म्हणाली, 'अगं वल्लभ कंपनीत असिस्टंट मॅनेजर झाला. आता एक्सटर्नल एम. बी. ए. करतोय. ' तेव्हा मात्र मी मनात घाबरले. हा असाच शिकत राहणार असेल तर माझे काय?

आमच्या घरी गेली दोन वर्षे माझ्या लग्नाचा विचार सुरु होता. मी गप्पच होते. पण गेल्या आठवड्यात पुण्याच्या मावशीने तिच्या पुतण्याचे म्हणजेच विनोदचे स्थळ आणले. आणि सर्वजण हुरळून गेली. आईवडीलांचे म्हणणे सोन्यासारखा मुलगा आहे. असा नवरा मिळणे म्हणजे मिताचे भाग्य. माझ्या इतर मावश्या, मामा यांचे हेच म्हणणे. मी विनोदला कोणत्या तोंडाने नाही म्हणणार होते. वल्लभकडून निश्चित काही कळत नव्हते, किंवा वल्लभची आई ठोस काही बोलत नव्हती. माझं मौन हीच सम्मती समजून आई-बाबा तयारीला लागलेसुध्दा. मी मुन्नीला फोन करुन माझे लग्न ठरतयं हे कळविले. म्हटलं वल्लभकडून किंवा वल्लभच्या आई वडिलांकडून काही हालचाल होते का हे पहावे. दोन दिवस वाट पाहून काल शेवटी वल्लभच्या घरी गेले. आईंना सर्व कसे गडबडीत ठरले हे सांगत होते. आता लग्न करुन पुढील आठवड्यात ऑस्ट्रेलियाला जावे लागणार हे सांगताना डोळ्यातून पाणी वाहू लागले. एवढ्यात खोलीचा दरवाजा उघडून वल्लभ बाहेर आला. एक क्षणभर त्याची आणि माझी नजरानजर झाली. रात्रभर झोप न झाल्याने ताठरलेल्या डोळ्यांनी त्याने माझ्याकडे पाहिले. माझ्याकडे दुर्लक्ष करुन आईना बँकेत जाऊन येतो असे म्हणून तो निघाला. आईने त्याला हाक मारुन, मिता लग्नाचे सांगायला आली रे वल्लभ असे म्हणाली. आणि बाहेर पडणारा वल्लभ मागे आला. आणि "अभिनंदन" असे म्हणून धाड्कन दरवाजा लावून बाहेर पडला.

- आई -

काल मिता आणि विनोद यांचे लग्न झाले. मुन्नी मैत्रिणीच्या लग्नासाठी मुद्दाम पुण्याहून आली. मी मुन्नीच्या बाबांना एक दिवस घरी थांबायला सांगितले. आणि आम्ही तिघेही लग्नाला गेलो. मुन्नी कार्यालयात गेली ती मिताच्या खोलीत तिची लग्नाची तयारी करायला. लग्नात मिताच्या शेजारी विनोदला पाहताना खूप त्रास होत होता. मुन्नीचे बाबापण गप्प गप्प होते. लग्नाच्या मंगलाष्टका सुरु झाल्या आणि मला वाटले या आनंदाच्या प्रसंगी मला आता हुंदका येणार. कसेबसे रडू आवरले. मिता आणि मी विनोदला भेटायला स्टेजवर गेलो. मला पाहताच मिता गळ्यात पडली. तिच्या डोळ्यातील दोन अश्रू माझ्या खांद्यावर पडले. आम्ही तिला अहेर केला आणि निघालोच. बाहेर पडून गाडी स्टार्ट करता करता हे म्हणाले, ' मला वाटलं होतं, वल्लभचं मिताशी लग्न होईल. हे असे कसे झाले? ' मी म्हटले, 'वल्लभच्या मनात मिता होतीच. पण तो करियरच्या मागे लागला. मिताला तो गृहीत धरुन बसला. आता दुखावलाय. मिताने तरी किती वाट पाहायची.

प्रेमात पुरुषाने पुढाकार घ्यायला नको? तो तुमच्यावर गेलाय. मन मोकळ करावं माणसाने. नुसतं शिक्षण, शिक्षण... मिता किती दिवस वाट पाहिल याची? '

मुन्नीचे बाबा शांतपणे गाडी चालवत होते, घरी येईपर्यंत कोणीच कोणाशी बोलले नाही. घरी आल्यावर कपडे बदलले. आणि बेडवर शांतपणे डोळे मिटून पडले. पहिल्यांदा मुन्नीसोबत आलेली १५-१६ वर्षाची मिता ते आज लग्नात शालू घातलेली मिता, मिताची अनेक रुपे डोळ्यासमोर आली. फार काहीतरी गमावलयं अशी हुरहूर मनाला लागून गेली. यात माझे काही चुकले का? या दोन तरुण मुलांची मने ओळखून मी पुढाकार घ्यायला हवा होता का? का नाही मी वल्लभला मिताबद्दल विचारले आणि मिताला वल्लभबद्दल? आता पुढे वल्लभ काय करील? विसरेल का तो मिताला आणि मिता वल्लभला?

होय, वल्लभ आणि मिताप्रमाणे माझे पण चुकलेच. आता ही हुरहूर आयुष्यभर मन पोखरणार. त्रिकोणाच्या दोन बाजू तयार होत्या तिसरी बाजू त्याला जोडण्याची गरज होती. मी कूस बदलली आणि उशीत डोकं खुपसून रडू लागले.

श्री **प्रदीप केळूसकर** - मोबा. ९४२२३८१२९९



## लेख – करिअरिस्टीक मुला-मुलींसाठी लग्न अडथळा की आधार - डॉ. सोनिया कस्तूरे



करिअर ही गोष्ट कायम स्वरुपी मनुष्याच्या व्यक्तीगत, कौटुंबिक व सामाजिक जगण्यासाठी अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट आहे. करिअर करण्याची इच्छा असणाऱ्या मुला-मुलींसाठी लग्न अडथळा आहे की आधार ही गोष्ट सापेक्ष आहे. यासाठी पहिल्यांदा करिअर म्हणजे काय हे समजून घ्यायला हवे.

करिअर म्हणजे असे काम, असा व्यवसाय अथवा नोकरी ज्याच्यामुळे व्यक्तीला आर्थिक स्वावलंबन मिळेल, स्वतःच्या गरजा तसेच आपल्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील इतर व्यक्तींच्या गरजा भागवता येतील, त्याला मानसिक समाधान मिळेल व समाजात त्याची माणूस म्हणून वेगळी ओळख निर्माण होईल… अशी करिअरची व्याख्या ढोबळ मानाने करता येईल.

म्हणजे करिअरचा पहिला मुद्दा आर्थिक स्वावलंबन आहे. मुलांना, मुलींना दोघांनाही करिअर करण्यासाठी समान संधी मिळणं हा व्यक्ती म्हणून त्यांचा /तिचा हक्क, अधिकार झाला असे म्हणायला हरकत नाही. कौटुंबिक सामाजिक पातळीवर विचार करता, मुलांना करिअर करताना इतके अडथळे येत नाहीत की जितके मुलींना येतात. याला पारंपरिक विचारसरणी कारणीभूत आहे असे माझे मत आहे. लग्ना- नंतर मुलींवर पडणाऱ्या जबाबदारीचे प्रमाण मुलांपेक्षा जास्त आहे. शिवाय तिच्याकडे निसर्गतः आलेल्या प्रजोत्पादन (reproduction)-- बाळ जन्माला घालण्याच्या प्रक्रियेमुळे तिच्या करिअरला अडथळा निर्माण होण्याची दाट शक्यता असते. जर संगोपन, संस्कार, घरकाम दोघे मिळून करणार अशी मानसिकता पुरुषांची तयार झाली आणि मुलं लहान असताना दोन्ही कडच्या कुटुंबांनी योग्य ती मदत केली तर नवरा बायको दोघांचेही करिअर चांगले होऊ शकते. पण समाज म्हणून एवढी आदर्श मानसिकता अजून तयार झालेली दिसत नाही. क्वचित ठिकाणी अपवादाने अशी कुटुंब पहायला मिळतात.

आपल्याकडे नवरा करिअर करतो आणि बायको कितीही उच्च विद्या विभूषित असो, ती घर सांभाळते असे चित्र आजपर्यंत दिसत आले आहे. पण आता मुली हे स्विकारायला तयार नाहीत. त्यांनाही करिअर करण्याचा, सामाजिक योगदान देण्याचा तेवढाच अधिकार आहे. जर कुटुंब व्यवस्थेत बदल झाला नाही. आधुनिक विचाराची नवीन कुटुंब व्यवस्था आकाराला आली नाही, जसे की घर दोघांचे - घरकाम दोघांचे, बाळ दोघांचे -संगोपनाची जबाबदारी दोघांची. दोन्हीकडील आईवडिलांची जबाबदारी दोघांची. अशी व्यवस्था रुजणार नाही तोपर्यंत तर करिअरिस्टीक मुला मुलींना लग्न हा अडथळाच वाटणार. नात्यातील समजदारपणा, योग्य आधुनिक कुटुंब व्यवस्था करिअर करणाऱ्या मुलींना आधार वाटेल. असे घडल्यास कुटुंब व्यवस्था, लग्न व्यवस्था टिकेल अन्यथा अडचणी निर्माण होतील.

जगातील आई हे सर्वात श्रेष्ठ, अत्यंत गरजेचे, सर्वोच्च पातळीवरचे करिअर आहे, असे माझे मत आहे. पण ते केवळ आर्थिक पातळीवर मोजून चालणार नाही. तर त्याचे मूल्यमापन मानवतेच्या पातळीवर करायला हवे. आईला आर्थिक अधिकार प्राप्त करुन देऊन त्याची अमलबजावणी तिने/त्याने कायद्याच्या मदतीने वा सामंजस्याने केली पाहिजे. तरच केवळ आईपण स्वीकारुन जीवन जगण्याचे ठरविणाऱ्यांना ‘आई ‘ हे उत्तम करिअर होईल.

अडथळ्यांचा उपयोग करुन आधार निर्माण करता आला तर करिअर करणाऱ्या मुलामुलींना लग्न आधार वाटेल.. जगणं सुंदर करण्यासाठी ज्याचं त्याचं करिअर असणं अत्यंत महत्त्वाचं आहे आणि करियर असेल तर ज्याचं त्याचं जगणं तर सुंदर होईलच, पण त्याला एक मानसिक समाधानही मिळेल असं माझं मत आहे. नवरा करिअर करत असतो आणि नवरा मेल्यानंतर अचानक त्या मुलीच्या आयुष्यात आभाळ कोसळतं. आणि त्यावेळी ती आर्थिक मदतीसाठी, कुटुंब चालवण्यासाठी धडपड करत राहते आणि ही धडपड त्यावेळी अचानकपणे करण्यापेक्षा अगोदरपासून त्या मुलीच करिअर असेल तर तिला आर्थिक स्वावलंबन मिळेल, त्याचप्रमाणे कुटुंबाचा गाडा व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी तिला चांगली मदत होईल! स्वतःला अभिमानाचं, स्वाभिमानाचं आत्मभानाचं, मानसिक स्थैर्याचं, आर्थिक स्थैर्याचं जगणं अनुभवण्यासाठी करिअर गरजेचं आहे. मुलांनाही काही वेळा जोडीदार/बायको, कुटुंब करिअरमधील अडथळा वाटतो. कारण मनासारखी झेप घेताना कुठेतरी बायका-पोरांचा विचार करावा लागतो, हे थोडं का होईना रुजत चाललंय. नातेसंबंध आणि कुटुंब व्यवस्थेत निरपेक्ष मदतीच्या भावना रुजून मैत्रभाव जोपासता आले तर लग्न अडथळा न ठरता आधार वाटेल. संयुक्त कुटुंब पद्धती कमी होऊन आता एकल कुटुंब पद्धती निर्माण झाली तरी लग्न व्यवस्थेतील पारंपरिक वैचारिक पद्धतीत काही बदल दिसत नसल्याने, सध्या तरी मुलामुलींना, जास्त करुन मुलींना लग्न हा करिअरमधला अडथळा वाटतो ही विचार करण्यासारखी बाब आहे. काही देशात नवरा बायको स्वतंत्र राहतात आणि दर शनिवार रविवारी एकत्र येतात. अशी पद्धत अडथळा कमी करण्यासाठीच तर निर्माण होत असेल ना! माणसांची मानसिकता बदलून एकमेकांना पूरक आणि प्रोत्साहनात्मक जगणं जोपर्यंत अंगिकारले जाणार नाही, तोपर्यंत करिअरिस्टीक मुलामुलींना लग्न व्यवस्थेतला वाटणारा अडथळा संपणार नाही.

डॉ. सोनिया कस्तुरे - मो. 9326818354



## कथा - स्पर्धा... - डॉ. ज्योती गोडबोले



डीन मॅडम रूपा आपल्या बंगल्यात बसल्या होत्या. व्हरांड्यात माळ्याने पाणी मारले होते, त्या मातीचा दरवळ सगळीकडे पसरला होता. बाग नुसती फुलांनी बहरली होती आणि आता जानेवारी-फेब्रुवारीमध्ये आंब्याला खूप मोहोर यायची चिन्हे दिसत होती. गेली जवळजवळ पंधरा वर्षे रूपा डीन म्हणून या आलिशान बंगल्यात रहात होत्या. किती लहान वयात त्या या पदाला पोचल्या. त्यांच्या हुशारीवरच ही सर्व पदं त्यांना मिळाली होती आणि त्यांच्या सहकाऱ्यांनाही त्यांच्याबद्दल आदरयुक्त दरारा होता. रूपामॅडम आणखी तीन महिन्यांनी निवृत्त होणार होत्या. आता हा बंगला, या आठवणी सोडून त्यांना पुन्हा नवीन आयुष्य सुरू करायचे होते.

आत्ता आराम खुर्चीत झुलत असताना मनाशी त्या म्हणाल्या," जमेल का मला हे? आजपर्यंत जिद्दीने, सन्मानाने जगले, तसे पुढेही होईल? नियती साथ देईल? ,"

त्यांना सगळा आयुष्याचा पट दिसायला लागला. कधीही हार मानावी लागली नाही, सतत आपल्या ओंजळीत हवे ते दानच पडले. आता आयुष्याची उतरण सुरू होताना काय असेल भविष्यात? रूपा भूतकाळात शिरल्या. रूपा शिल्पा या दोघी बहिणी. साने काकांना दोघीच लागोपाठच्या लेकी. अगदी दोन वर्षाच्या अंतराने झालेल्या. त्या अगदी जुळ्या असाव्या इतक्या सारख्या होत्या आणि त्यामुळे दोघींना खेळायलाही इतर कोणी मैत्रिणीही फारशा लागत नसत. दोघीच भातुकली खेळत, पुस्तकं वाचत बसत. वडील या दोघींचे खूप लाड करत. त्यांना खूप पुस्तकं आणून देत. शाळेत सुद्धा कितीतरी वेळा दोघींचाही पहिलाच नंबर येई. एक पाचवीत एक चौथीत. रूपा जरा जास्त हुशार आणि जिद्दी मुलगी होती. शिल्पा साधी, समंजस आणि भाबडी. बाबांनी लहानपणी कोणतीही गोष्ट दोघीना आणली की शिल्पा म्हणे, ‘ ताईला घेऊ दे आधी. ती मोठी आहे ना! ’ मग हक्काने रूपा आपल्याला हवी ती वस्तू आधी उचले. बाबांच्या हे एकदा लक्षात आलं.

"शिल्पा, यावेळी दोघींना सारख्याच बाहुल्या आणल्या आहेत. तू आधी तुला हवी ती उचल. यावेळी ताई नंतर घेईल." रूपाचा जळफळाट झाला. संतापाने लाल लाल झाली ती. पण यावेळी बाबा ठाम होते शिल्पाने भीत भीत लाल फ्रॉकवाली बाहुली उचलली. बाबा म्हणाले," रूपा, ही निळी तुझी हं! शिल्पाच्या बाहुलीची काही मोडतोड केलीस तर मी तिला एकटीलाच पुन्हा आणखी चांगली नवी बाहुली आणीन. हात लावायचा नाही तिच्या बाहुलीला." रूपा तिकडून रागाने निघून गेली." शिल्पा, हे बघ! दरवेळी तू अशी माघार का घेतेस? तुझ्यात काय कमी आहे बाळा? जन्मभर असा हात मागे घेत गेलीस तर तुझे हात रिकामे रहातील बाळा! आपलं असेल ते हक्काने घेत जा." बाबा म्हणाले होते." नको बाबा, ताई मोठी आहे. तिला आवडेल ते घेऊ दे तिला. राहिलेलं मी घेईन." शिल्पा अगदी सहजपणे म्हणाली होती.

“ नाही शिल्पा. तिलाही समजले पाहिजे, दुसऱ्यालाही मतं असतात, आवडीनिवडीचा हक्क असतो. तू आता अशी नेहमी तडजोड नको करत जाऊस. आयुष्यात सतत बाबा येणार नाहीत तुझी बाजू घ्यायला. कायम

लक्षात ठेव. तूही तिच्याच इतकी हुशार, सुंदर आहेस. उगीचच नेहेमी पडती बाजू घेत जाऊ नकोस" बाबा शिल्पाला मोलाची शिकवण देऊन गेले.

रूपाचा त्रागा, थयथयाट बघून घाबरून आई म्हणायची," शिल्पा, घेऊ दे बाई तिला आधी हवं ते! नंतर सगळं वातावरण बिघडून जातं अगदी घरातलं."…. पण आता मात्र शिल्पाला बाबांची साथ मिळाली होती. न बोलून आणि न भांडता, आपला हक्क मिळवायचा हे शिकली शिल्पा. पण दोघी बहिणींचं प्रेमही होतंच एकमेकींवर! कोणताही सल्ला शिल्पा ताईला विचारी आणि काही अडचण आली तर रुपाला शिल्पाची आठवण तर हमखास येईच! शाळेत शिल्पावर जरा जरी अन्याय झाला तर रूपा धावून जाई.

मुली मोठ्या झाल्या. रूपा अतिशय बुद्धिमान तर होतीच. तिने डॉक्टर व्हायचे ध्येय लहानपणापासून जपले होते. अहोरात्र अभ्यास करून रूपा पहिल्या पाचात आली. तिला मेडिकल कॉलेजमध्ये अगदी सहज मिळाला प्रवेश. यावेळी मात्र शिल्पाची आवड वेगळी होती. तिने बाबांना सांगितलं," बाबा, मला नाही डॉक्टर व्हायचे. मला इंजिनिअर व्हायचंय."… शिल्पाला सहज मिळाला प्रवेश इंजिनिअरिंगला! दोघी बहिणींच्या वाटा अगदीच वेगळ्या झाल्या. रूपा कॉलेजमध्ये चमकत होती. नाटकात, वक्तृत्वात, सगळीकडे रूपा असायचीच. आईबाबांना अभिमान वाटायचा आपल्या गुणी हुशार मुली बघून. बाबांनी आणखी मोठा फ्लॅट घेतला, त्यामुळे दोघींना स्वतःच्या वेगळ्या स्वतंत्र बेडरूम्स मिळाल्या. आई म्हणाली,"अहो काय हे! किती लाड ते! आपल्या म्हातारपणाचाही विचार केलाय ना? मुली काही राहणार नाहीयेत बरं कायम आपल्याजवळ." बाबा हसून म्हणाले," हो ग बाई! आपल्याला भरपूर ठेवलंय. काळजी नको करू! आपल्या मुलींना एकाही पैशाचा खर्च न होता, राजकुमार उचलून नेतील बरं."

आई हसून म्हणाली," तथास्तु। तसंच होवो."

कॉलेजची चार वर्षे भुर्रर्रकन उडून गेली. रूपा डॉक्टर झाली आणि पोस्ट ग्रॅज्युएशन करायला लागली. तिच्याच बरोबर एमडी करणारा सलील म्हणाला," रूपा, पुढे काय आहे विचार? आपण एकमेकांना बरेच दिवस ओळखतो. करायचं का लग्न आपण? आता एम. डी. झालं, मी प्रॅक्टिस सुरू केलीय आणि छान चाललीय. काय म्हणतेस? मला खूप आवडतेस तू. आपले विषयही एकमेकांशी पूरक आहेत. छान जोडीदार होऊ आपण असं वाटतं मला!"

"नाही रे सलील! अजून इतक्यात नको वाटतंय मला लग्न. पण तसा विचार केला तर नक्की तुला कळवीन मी!"

'ठीक आहे,' म्हणून सलील निघून गेला.

शिल्पाला चांगला जॉब लागला. ती एक दिवस तिच्या मित्राला घेऊन आली." बाबा, हा जय. माझ्याच वर्गात आहे." जयने आपली सगळी माहिती सांगितली. छानच मुलगा होता जय. आईवडील छान, जयची नोकरी फार चांगली, आणि त्याला प्रॉस्पेक्ट्स पण खूप चांगले होते पुढे. जय म्हणाला," मी आणि शिल्पा एकाच वर्गात होतो. ओळखतो आम्ही एकमेकांना. मला लग्न करायचंय शिल्पाशी. मी एकुलता एक मुलगा आहे माझ्या आईवडिलांचा. पण आम्ही लगेच लग्न केले तर चालेल का तुम्हाला? माझी आजी वयस्कर आहे, आणि तिची इच्छा आहे की तिच्या डोळ्यादेखत व्हावे लग्न नातवाचे."…. आईबाबांना आनंदच झाला. शिल्पाने फक्त विचारले," बाबा, ताईला चालेल ना पण हे? ती मोठी बहीण आहे ना! तिचं लग्न आधी व्हायला हवं

ना!" यावर बाबा म्हणाले होते की" अरे, कोणत्या जमान्यात रहातोय आपण? तिची कशाला असेल हरकत ग? उलट आनंदच होईल तिला! तिच्याही मनात कोणी असेल तर दोघींचीही लग्ने आपण करून देऊ या की! एकदम दोन दोन जावई येतील घरात!"... सगळं घर आनंदात उजळून निघालं.

रात्री रूपा दमून घरी आली. हॉस्पिटलमध्ये खूप काम पडे हल्ली तिला. रात्री जेवणं झाल्यावर बाबांनी उत्साहाने तिला सांगितलं," अग, असं असं ठरतंय. तुलाही आम्ही आता स्थळं बघू का? का कोणी आहे मनात तुझ्या? असेल तर लगेच सांग. दोघींचीही लग्ने आम्ही आनंदाने करून देऊ."

बाबांच्या अपेक्षेपेक्षाही रूपाची प्रतिक्रिया भलतीच वेगळी आली." कमाल आहे बाबा तुमची. खुशाल माझ्या आधी तिचं लग्न करणार होय तुम्ही? छान! मी मोठी बहीण आहे ना तिची? मला नको का आधी विचारायला?" संतापाने फणफणत तिथून निघून गेली रूपा! सगळेच चपापले. तिची ही अशी रिऍक्शन होईल ही स्वप्नात सुद्धा कल्पना नव्हती केली कोणीच. शिल्पाला अतिशय गिल्टी वाटले. मग आई-बाबा तिच्या पाठोपाठ तिच्या खोलीत गेले." रूपा, ठीक आहे. तुझ्या मनात, किंवा पहाण्यात कोणी मुलगा आहे का? अगदी मोकळेपणाने सांग. आम्ही त्यांना भेटू आणि पुढचे ठरवू". रूपाच्या डोळ्यासमोर सलील चमकून गेला. रूपाचा नकार समजताच त्याने रूपाच्या मैत्रिणीशी, मनीषाशी लगेचच लग्न केले सुद्धा. आणि किती सुखात दिसत ते दोघेही. रूपा म्हणाली," नाही, तसं कोणी नाही माझ्या डोळ्यासमोर! आई, तू नाव घाल माझं मॅरेज ब्यूरोत. आणि तोपर्यंत सांग थांबायला शिल्पाला."

दुसऱ्या दिवशी जय घरी आला. शिल्पाने रूपाशी त्याची ओळख करून दिली. रूपाच्या काळजात त्याला बघून कळ आली.... ' किती देखणा, रुबाबदार, स्मार्ट आहे हा मुलगा. मला का नाही हा आधी भेटला? ' रुपाला शिल्पाची असूया वाटली. आई रुपासाठी मुलगे बघायला लागली. तिला खात्री होती, आपल्या या सुरेख हुशार डॉक्टर मुलीला हसत हो म्हणेल कोणीही. पण तसे घडेना. जिथून होकार येतील, त्या मुलांना रूपा खोड्या काढून नकार देऊ लागली. कोणताही मुलगा तिला आवडेनाच! खरी गोष्ट अशी होती की रूपा सगळ्यांची तुलना जयशी करून पाही. काही मुलगे इतके छान होते की, जयपेक्षाही उजवे. पण रूपा कोणालाच हो म्हणेना. आता मात्र आईबाबा हताश झाले. जयच्या आजींचे निरोप यायला लागले. 'आम्ही किती थांबायचं? ' आईबाबा, शिल्पा सगळेच कोंडीत सापडले. पुन्हा एकदा बाबांनी रुपाला निर्वाणीचं विचारलं," हे काय चाललंय तुझं? मुद्दाम करते आहेस का? शेवटचं सांगतोय! एक महिन्यात जर काही ठरवलं नाहीस तर आता आम्ही शिल्पाचं लग्न करून टाकणार. बस झाली तुझी नाटकं. त्या लोकांनी उगीच का थांबायचं? किती चांगले मुलगे काहीही कारण नसताना नाकारतेस तू! विचार कर रूपा! आम्ही जन्माला पुरणार नाही तुझ्या. काय तो लवकर निर्णय घे. आम्ही आता जास्त थांबणार नाही. जयच्या घरचे लोक आता आणखी का म्हणून थांबतील?"

बाबांनी म्हटल्याप्रमाणे केले. पुढच्याच महिन्यात शिल्पाचे लग्न झाले. किती सुरेख दिसत होती त्या दोघांची जोडी! अशीच रूपाही वधूवेशात शोभली असती असं आई बाबा शिल्पा सगळ्यांना वाटून गेलं. शिल्पा सासरी गेली आणि घर सुनंसुनं झालं. रूपा तर घरी कधी नसायचीच. तिने आता आपलं लक्ष करिअरवर केंद्रित केलं. मुळात हुशार असलेल्या रुपाला काहीच अवघड गेलं नाही. शिल्पा संसारात रुळून गेली. नोकरी आणि घर संभाळणे तिला अवघड गेले नाही, कारण घरी आजेसासूबाई, सासूबाई होत्या. शिल्पाचे, तिच्या करिअरचे

कौतुक होते त्यांना. शिल्पाला या सात वर्षात दोन मुलं झाली आणि आईबाबा कृतकृत्य झाले. अलीकडे रुपाला लग्नाबद्दल विचारणे त्यांनी सोडूनच दिलं होतं. काय विचारणार एवढ्या मोठ्या आणि इतकं शिकलेल्या मुलीला.

शिल्पाच्या मुलांना आपल्या रूपामावशीबद्दल फार आदर आणि प्रेम होतं." आई, आपली मावशी किती हुशार डॉक्टर आहे ना? हॉस्पिटलमध्ये लोक किती आदराने बोलतात तिच्याबद्दल!" शिल्पाची मयूरी, मानस नेहमी म्हणत." हो रे! तुम्हाला व्हायचंय ना तिच्यासारखं? मग तिने केला तसा भरपूर अभ्यासही करावा लागेल बरं का!" शिल्पा सांगायची."आई, तुला नाही का ग कधी डॉक्टर व्हावेसे वाटले?"" नाही रे बाबा. मला नव्हती ती आवड कधीच. मी पहिल्यापासून इंजिनिअर व्हायचंच ठरवलं होतं मनाशी."

मुलं मोठी झाली. शिल्पाचा मानस मेडिकलला गेला, तर मयूरी आर्किटेक्ट झाली. डॉक्टर रूपा नोकरीत चढत चढत डीन मॅडम झाल्या. किती शोभून दिसायच्या त्या आपल्या ऑफिसमध्ये. शिल्पाला आपल्या या कर्तृत्ववान बहिणीचा फार अभिमान वाटे. रूपा मॅडमची नुसती पावले वाजली तरी सगळे हॉस्पिटल शांत होत असे आणि कॉलेजमध्ये इथे तिथे गप्पा मारत असलेली मुलंमुली नाहीशी होत. दिवस उलटत गेले, आई बाबा थकत गेले. शिल्पाला विचारूनच त्यांनी आपला रहाता फ्लॅट रुपाला दिला. बाकी सगळे शिल्पाला दिले. अशी समान वाटणी करून वृद्धापकाळाने ते कालवश झाले. मनात कुठेतरी खंत होती, की इतक्या गुणी मुलीच्या नशिबात संसारसुख नाही. पण तिच्या कर्तृत्वाने ते सुखावून जात. आई वडिलांची शेवटपर्यंत काळजी घेतली दोघी मुलींनी.

आता रूपा मॅडम रिटायर होणार होत्या. शेवटचे तीनच महिने उरले होते. त्या रात्री शिल्पाचे कुटुंबीय रूपाच्या बंगल्यावर जेवायला आले होते. जेवणे झाली आणि मग दोघी बहिणी लॉनवर गप्पा मारत बसल्या. गप्पा मारताना विषय निघाला," रुपाताई, एक विचारू? इतकी मुलं आली, आईबाबांनी किती तरी मुलगे बघितले, पण तू का ग नाही म्हणायचीस? तेवढी खंत राहिली बघ त्यांच्या मनात. बाकी ते तृप्त होऊन गेले."

रूपा म्हणाली," तसं झालं खरं. आता मी पण साठीजवळ आले, तूही येशीलच! आता या वळणावर खरं बोलायला काही हरकत नाही बघ. मी लहानपणापासून तुझ्याशी उगीचच स्पर्धा करत गेले गं. तू फार भाबडी, सरळ, आणि मोठ्या मनाची होतीस. तुला आठवतं का, मामा नेहमी आपल्याला छान फ्रॉक आणायचा... तेव्हा मी मुद्दाम तुला आवडायचा तोच रंग आधी निवडायची. उरलेला आनंदाने तू घ्यायचीस. हे फक्त बाबांनी ओळखले होते बघ. त्यांनी मला जाणीव दिलीही होती अनेकवेळा! तू जेव्हा म्हणालीस, ' मला नाही व्हायचं डॉक्टर '.. तेव्हा मनातून आनंदच झाला मला! सहज शक्य होतं ग तुला डॉक्टर होणं, पण तू बायॉलॉजी घेतलीच नाहीस आणि पुढचा संघर्ष किती खुबीने टाळलास! गुणी ग तू खरंच! म्हणून आपली आयुष्ये सुखाची गेली. मला नसतं हे जमलं कधीही! शिल्पा, मला खरंच कौतुक वाटतं बघ तुझं. तू काय कमी कर्तृत्वाची होतीस आणि आहेस का? किती मोठं नाव आहे तुझं इंडस्ट्रीत. पण तू कधीही मी मी करत नाहीस. गाजावाजा तर नाहीच... आणि खरं सांगू का.. मी लग्न केलं नाही ते बरंच झालं एका दृष्टीनं. माझं नसतं ग पटलं कोणाशी. संसार करणं म्हणजे खूप तडजोड आलीच. खूप लोकांशी जुळवून घेणं आलं. मला हे नसतं जमलं. अर्थात त्याबद्दल मला मुळीच खेद खंत नाही हं!" रूपा बोलत होती. म्हणाली,"तुझा जय बघितला तेव्हाही मला असूया वाटून गेलीच. पण मग नंतर तोच आपल्या घरात इतका समरस झाला, की

मला त्याच्याबद्दल लहान भावासारखं प्रेम वाटायला लागलं. नाहीतरी आपल्या घरात कुठे होता ग कुणी मुलगा? माझ्या करिअरमध्येसुद्धा कमी नाही आले अडथळे, पण तुम्ही दोघे, जय, सतत माझ्यासाठी होतात, हा विश्वास मला होता. तुझी गोड मुलं.. किती आनंद घेऊन येतात माझ्या आयुष्यात! मी खरोखर फार तृप्त आणि कृतज्ञच आहे बघ!" रूपाचे डोळे भरून आले.

तिच्या खांद्यावर प्रेमाने हात ठेवत शिल्पा म्हणाली," छे ग ताई! तू खरोखरच खूप मोठी आणि या सगळ्या सन्मानाला पात्रच आहेस. उगीच काय कमीपणा घेतेस ग? मलाही कमी राग नाही यायचा तुझा. आपल्यावर अन्याय होतोय, असंही वाटायचं बरेचदा. मीही लहानच तर होते आणि आईचं झुकतं माप नेहमी तुझ्याकडे असायचं. पण बाबा मात्र कायम माझ्यासाठी आधारवडासारखे उभे राहिले. असो, आपलं सगळं छानच झालं. मी काय म्हणते, आता तू रिटायर होशील. तुला अनेक कॉलेजेसमधून सन्मानाने बोलावणी आलीच असणार. तू त्यातलं एखादं पद घे आणि आपल्या आईबाबांच्या घरात मस्त सुखात राहा ना! खूप झाली ग वणवण ताई! आता उरलेलं आयुष्य सुखात राहू एका शहरात. आम्हीही खूप फिरलो नोकरीनिमित्त, दुबईपासून ऑस्ट्रेलियापर्यंत. पण आता बास.".. रूपा हसली आणि म्हणाली,"अग, मला इंग्लंडहून एका मोठ्या इन्स्टिट्यूटमध्ये सन्माननीय प्रोफेसर असे मानाचे बोलावणे आलेय. सगळं देऊ केलंय त्यांनी. घर, उत्तम पैसे, सगळं सगळं. आणि मी ते स्वीकारायचं ठरवलंय. शिल्पा अगं इतकी वर्षे मी एवढ्या अधिकाराच्या पोस्टवर होते. आता अजून मला ताकद आहे, आणि महत्वाचं म्हणजे बुद्धी अजून शाबूत आहे, तर जाईन म्हणते. घरी बसून काय करू मी? माझं मन नाही ग रमत, स्वयंपाक आणि घरकामाच्या गोष्टीत. मला अजिबात रस नाही त्या लोणची, मसाले आणि नोकर चाकर यांच्या गॉसिपमध्ये. असं म्हण, , की माझ्यातली गृहिणी पार गंजून गेलीय बघ या सगळ्या निरनिराळ्या उद्योगात! त्यामुळे मग मी रिटायर झाले की फार तर एखादा महिना राहीन इथे आणि मला त्यांनी जॉईन व्हायला मुदत दिलीय त्याच्या आत जाईन. नवीन क्षितिज खुणावतंय बघ आता. तिकडचं बघते कसं काय जमतंय, आणि शेवटी इथंच तर येणार ना! .. 'गड्या आपुला गाव बरा!' असं म्हणत. कोण आहे ग आपल्याला एकमेकींशिवाय? शिल्पा, पण आता मला हे कबूल करायलाच हवं की तू खूप वेगळी आहेस आणि उपजतच शहाणपण घेऊन आली आहेस. अशीच छान रहा. मी वाईट वागले तुझ्याशी, पण ते विसरून जा जमलं तर. इतके दिवस हेही कबूल करायला मन धजत नव्हते.. पण आता सांगून टाकते. माफ कर हं मला!" रूपाने शिल्पाला मिठी मारली.

"ताई, हे असं नको ना बोलू! तू नेहमी करारी, शिस्तीची, दरारा असणारी रूपामॅडम म्हणूनच शोभतेस ग! तू वागतेस ते तुला अतिशय शोभून दिसतं बघ. माफी कसली मागतेस? तुला सांगू का... डॉ. साने डीन माझी सख्खी बहीण आहेत हे सांगताना मान अभिमानाने उंच होते माझी. अशी कमीपणा घेऊ नको ग ताई. तू जरूर जरूर जा या नव्या आव्हानाला सामोरी! सहज जमेल हे तुला. काही माणसे जणू अशा अधिकार पदासाठीच जन्माला येतात, तू त्यातलीच आहेस ग ताई!"...

दोघी बहिणींच्या डोळ्यातून वहाणारे अश्रू त्यांच्या एकमेकींवरच्या प्रेमाचे जणू साक्षीदारच होते... आणि रूपाने अनेक वर्षं तिच्या मनात तिच्याही नकळत जोपासलेली शिल्पाबरोबरची स्पर्धा, त्या अश्रूंच्या ओघळात तशीच तिच्या नकळत वाहूनही गेली.

**डॉ. ज्योती गोडबोले** मो. - 9822639471

## चित्रकाव्य - समानता - सुश्री वर्षा बालगोपाल





एक हात सदाशिवाचा
एक हात गौरीचा
जिवशिवत्व जागवून मनी
समानता दाखवण्याचा॥

एक हात कर्तृत्वाचा
एक हात लावण्याचा
जोड लाभता परस्परांची
कार्य सुफल संपूर्ण करण्याचा॥

घर दोघांचे दोघांनी सांभाळायचे
आता दोघांनीही घरात - घराबाहेर
सारखेच वावरायचे
कोणी घरी येताच एक त्याचा अन एक तिचा असा दोघांचा
एकच नमस्कार करून स्वागत करायचे॥

स्त्री पुरूष समानता हा वादाचा विषयच नाही
अनादि काळापासूनचे स्त्रीचे श्रेष्ठत्व का लक्षात येत नाही?
स्वर्गातही अर्थ, गृह, शिक्षणमंत्री स्त्रियाच ना?
म्हणून त्यांनी जोडीदाराशी पूरक काम करण्याचे सोडले नाही

शक्ती विना शिव, लक्ष्मी विना नारायण
आणि शारदे विना गजानन
आजही अधुरे वाटती
पण परस्परांची साथ लाभता चतुर्भुज दोघे भासती
अंधश्रद्धेने देवांकडे नको पहायला
सकारात्मकतेने पाहिले तर स्त्री-पुरुष समानता दावती॥

**सुश्री वर्षा बालगोपाल** - मो. 8830084184

## लेख - भाग्यवान मी... - सौ. अंजली धडफळे



माझे गुरु श्री अण्णा व्यवहारे उर्फ श्रीकृष्ण व्यवहारे हे गेली पन्नास वर्षं 'घंटाळी मित्र मंडळ ठाणे', ही योगसंस्था चालवतात. अनेक अभ्यासूंनी या संस्थेतून योगशिक्षक पदवी घेतली आहे. रोगावर योगाचा कसा उपयोग होईल ते संशोधनाद्वारे शोधून काढून शोधनिबंध लिहिले आहेत. त्यांनी मला श्री. पु. ल. देशपांडे उर्फ भाई यांना योग शिकवण्याचं काम दिलं.

श्री. भाई आनंदवनात असताना भाईंवर श्री. अण्णांनी योगोपचार केले होते. नंतर मुंबईत आल्यावरसुद्धा श्री. अण्णांनी त्यांच्यावर उपचार चालूच ठेवले होते. श्री. भाईंमध्ये खूप फरक पडला होता. नंतर भाई पुण्याला आले. नेहमी ठाणे-पुणे करणे जमणार नाही म्हणून, आणि मी पुण्याला असल्यानं हे काम त्यांनी माझ्यावर सोपवलं. मी धन्य झाले!

श्री. आण्णा एक आठवडा मला ट्रेनिंग देत होते. रोज सकाळी दहा ते साडेअकरा असा वर्ग होता. मी लिहून काढायचे. कसं शिकवतात ते बघायचे. शवासनात काय संकल्प द्यायचा तो लिहून घेतला आणि माझं त्यांच्याकडे लाॅ काॅलेज रोडला ‘ मालतीमाधव ‘ या घरी जाणं सुरू झालं.

रोज अकरा ते साडेबारा अशी वेळ ठरली होती. शनिवार रविवार वर्ग नसायचा. बरोबर अकराच्या दहा मिनिटं आधीच मी पोहोचायचे. सुनिताताई हॉलमध्ये असायच्या, त्यांच्याशी थोडे बोलायचे व नंतर आतल्या खोलीत मी जायचे. खोलीच्या मधोमध पलंग होता. लोड, उशा, स्वच्छ चादर असायची. खोलीमध्ये चार्लीचॅपलीनचे मोठं चित्र होतं. छान पडदे होते. एक टेबल, त्यावर काही पुस्तकं, व्यायामाचे साहित्य, रबरी बॉल, दोर वगैरे इतकंच. एक सुंदर सतरंजी घातलेली असायची. दोन खुर्च्या असायच्या. आपण खुर्चीवर पण बसू शकायचो.

त्यांच्याकडे एक सुधाकर नावाचा शेतकरी मुलगा होता. तो त्यांच्याकडे चांगले लक्ष ठेवायचा. हवं नको बघायचा. औषधे द्यायचा, त्यांना फिरायला बाहेर न्यायचा. सुधाकर अत्यंत सेवाभावी होता. त्याच्यासारखं प्रेम करायला शिकलं पाहिजे. हळुवारपणे त्यांना उठून बसवणं, हळुवारपणे उशीचं टेकण देणं, पायावर शाल घालणं...

आमचा वर्ग ओंकाराने सुरू व्हायचा. ते अतिशय उत्तम ओंकार म्हणायचे. हाडाचे गायक वादकच ते! थोडी बसूनची आसने प्राणायाम करून पाठीवर आडवे झाले की कधीकधी त्यांना झोप लागायची. तेव्हा मला थोडे थांबावे लागत असे. मग पाठीवर पडूनच्या क्रिया, आसनं व्हायची. शवासन व्हायचं. शवासनात दृश्य वर्णन असायचं. त्यात ते रमून जायचे. नंतर बसून थोडा प्राणायाम, ओंकार व शांतीमंत्र असायचा. रोजचा आसनांचा कार्यक्रम वेगवेगळा असायचा.

सुरुवातीला पाठीवर पडून जास्त हालचाली करून घ्यायला लागायच्या. नंतर उठून बसून, टेकून बसून व नंतर पलंगावर पाय खाली सोडून बसायचे. योगाभ्यासाने फार चांगला फरक पडत होता. एक वर्ष त्यांना शिकवलं. नंतर नंतर आधाराशिवाय उठून चालत बाहेरपर्यंत हॉलमध्ये यायचे. तेव्हा खूप धन्य वाटायचं.

त्यांचा संकल्प होता… ' माझी 'लेखणी' आणि 'वाचा' पूर्वीच्याच तेजाने तळपणार आहे. दिवसेंदिवस माझे आरोग्य चांगलं होत आहे. माझ्यात ताकद निर्माण झालीय. ' शवासनात अंतर्मन जागृत झाल्यावर संकल्प सिद्धीस जातात. तसंच काहीसं झालं.

त्यांना पार्किसन्सचं दुखणं होतं. त्यामुळे आवाज नीट नव्हता. अडखळायला व्हायचं. मी त्यांचे चेहऱ्याचे व्यायाम बरेच करून घ्यायचे. सिंहमुद्रा केली की म्हणायचे, 'अंजली एरवी छान दिसतेस, पण सिंहमुद्रेत भयानक दिसतेस. ' यावर आम्ही खूप हसायचो.

मला म्हणायचे, 'कोथरूडमधून येतेस ना…. मग नीलमोहर कुठे फुललाय, गुलमोहर कुठे फुललाय हे तेच सांगायचे. ' इतके अचूक रस्ते आणि जागा की जणू काही तेच आत्ता आलेत त्या रस्त्यावरून!

मला म्हणायचे ' चार्लीचॅपलीन सारखे हावभाव करत चालून दाखव तर तू योगशिक्षिका. ' मी खूप हसायचे.

एक वर्षभर हा वर्ग चालला. अनेक मान्यवर मंडळी तेथे भेटायची. जब्बार पटेल, राहुल देशपांडे, सुबोध भावे, इ. अनेक मान्यवर असायचे. पण क्लासच्या वेळी फक्त सुधाकर असायचा बाकी कुणीही यायचे नाही.

त्यांच्या तब्येतीत बराच फरक पडत होता. पण हा रोगच असा आहे की बरा होत नाही. ते हळूहळू थकत चालले होते. नंतर क्लास बंद झाला. एक दिवस ती वाईट बातमी आली. पु. ल. देवाघरी गेले. आम्ही सर्व त्यांच्याकडे गेलो. खालीच त्यांना ठेवले होते. दर्शन घेतले. अंत्ययात्रेत थोडावेळ सामील झालो. एक उत्तम लेखक, निवेदक, गायक, वादक हा आसमंतात विलीन झाला होता. पु. लं. कडे जायचंय हा एक ध्यास होता… लळा लागला होता. नंतर कित्येक दिवस मी त्या वेळेला तिथे जायचे आणि परत यायचे. मन स्वस्थ बसू द्यायचे नाही.

त्यांच्या दहाव्या दिवशी माझा व श्री. अण्णा व्यवहारे यांचा लेख महाराष्ट्र टाइम्समध्ये छापून आला. माझ्या लेखाचे शीर्षक होते-" कॅमेरा नको- तुम्ही ठेवा- फोटो द्या"


त्याचं असं झालं की अण्णांनी सांगितले होतं की कुणालाही भेटायला पु. लंकडे न्यायचं नाही. मित्र-मैत्रिणी घरातील व्यक्ती… फोटो काढायचे नाहीत. सुनिताताई काहीही म्हणाल्या तरी काही बोलायचे नाही. मी पु. लं. ना शिकवायला जातेय असं सांगायचं नाही.

एक दिवस अण्णांच्या व सुनितातांईच्या परवानगीने पु. लं बरोबर फोटो काढला. त्या फोटोच्या वेळी सुधाकरने त्यांच्या पायावर छान शाल घातली. ते कॉटवर बसले. मी शेजारी बसले. सुधाकरने फोटो काढले. त्यावेळी मोबाईल नव्हते. कॅमेऱ्यातील रोल भरल्यावर फोटो कॉपीज करू म्हणून तेव्हा फोटोकॉपीज केल्या नाहीत. पण त्या आधीच तो कॅमेरा चोरीला गेला तेव्हा फार वाईट वाटलं. पण अण्णा व्यवहारे यांच्या शब्दाला मान दिला, त्यांचे म्हणणं राखलं, याचा आनंद झाला.

पु. लं. कडून मी खूप शिकले. कसं लिहायचं... मी म्हणायचे," भाई तुम्ही एखाद्या व्यक्तीबद्दल सहज लिहिता. ती व्यक्ती ओळखीची नसून डोळ्यासमोर उभी राहते." ते म्हणायचे," सोप्पे आहे. निरीक्षण बारीक करावे, तसे लिहावे. त्यात काही मोठी मोठी पल्लेदार वाक्य किंवा इंग्लिश फ्रेजेसची गरज नसते." यानंतर माझे लिखाण सुधारत गेले. भाई म्हणायचे," आपल्यासमोर कागद आला की त्यावरचे काय बघायचे हे आपल्याला समजले पाहिजे. डॉक्टर कसे पेशंटकडे नेमके बघतात." तिसरी महत्वाची गोष्ट शिकले ती अशी की एकटाकी लिहावे, नंतर मुद्दे सुटून जातात. सुनिताताई सांगायच्या की भाई टीव्हीवरचा बावीस मिनिटांचा कार्यक्रम बरोबर पंचवीस मिनिटांत लिहून संपवतात व पेन खाली ठेवून घड्याळ बघतात. अतिशय अचूक.

या सगळ्या गोष्टी मी मनापासून शिकले. एवढ्या मोठ्या लेखक, कलाकाराकडे मला जायला मिळाले. धन्यवाद माझे गुरु अण्णा व्यवहारे यांना व धन्यवाद भाई - सुनीताबाई व सुधाकराला!

**सौ. अंजली धडफळे** - मो. ८८०५०२१६६१



## कथा - लिली लालू लेले - सौ अंजली दिलीप गोखले



माझे नाव वाचून हसलात ना? वाटलेच मला. माझे हे नाव म्हणजे चमत्काल आहे बलं! सांगते! सांगते! आमच्या लग्नाच्या वेळी आम्हा दोघांची एकच अट होती. काय म्हणता? मला माझे पती बोबडे हवे होते, मग ते कसे का असेनात आणि यांना पण बायको बोबडी हवी होती. कशीही! आणि झाले तसेच. आम्ही दोघेही बोबडे. म्हणजे दोघांनाही लाम, लाधा, मालूती, लावण असेच बोलता येते. आता आम्हाला नक्की काय बोलता येत नाही ते समजलेच असेल तुम्हाला.

माझी उंची ५'७", यांची ५', माझे वजन ७५ किलो तर यांचे ५७. मला जाड भिंगाचा चष्मा तर यांचे दात पुढे. असे असले तली आम्ही लग्नाला तयाल झालो. मला पाळण्यात ठेवताना आत्याने माझे नाव लूपाली ठेवले आणि यांच्या आत्याने त्यांचे नाव लविंदल ठेवले. याचे आडनाव लेळेकल आहे. पण नोकलीला लागायच्या आधी नाव बदलून लालू आणि आडनाव पण बदलून सोपे - लेले कलून घेतले. लग्नात यांनी माझे नाव बदलून लिली असे सोपे केले. तल अशी मी साधी, सलल सोपी - लिली लालू लेले.

आमच्या लग्नाला झाली ४० - ४२ साल. वलष म्हणायचं मी टाळलं. सुलवातीला लोकं आम्हाला टाळायची, हसायची. बलोबल ना! त्यांच्या मते विजोड जोडपं! पण आता सगळे कौतुक कलतात बलं! चांगल्यात चांगली गोष्ट म्हणजे आमची मुलं - बोबडी नाहीत हं! सगळं छान बोलतात. मुलगी पायल बाबांसालखी नाजूक आणि सोहन माझ्यापेक्षा उंच आणि तब्येतीनं छान. अभ्यासात दोघेही हुषाल. पायल एम. ए झाली आणि कॉलेजमध्ये शिकवते. सोहन एम. कॉम होऊन बँकेत जॉब कलतो. दोघांची लग्ने केली. आता आम्ही निवांत!

आम्ही दोघे आता खूप भटकतो. फिलतो म्हंटले नाही मुद्दाम. आयुष्य मस्त जगतो. भटकतानाची गावं सांगते - सांगली, पुणे, मुंबई, गोवा, कलकत्ता अशी. म्हंजे तिकीट काढताना गडबड होत नाही.

तल काय सांगत होते, लग्न झाल्यावल सुलवातीला चाललो होतो आम्ही कोल्हापुलला. आंबाबाईला. बसमध्ये तिकीट काढताना यांनी सांगितले,"दोन कोल्हापूल." …"त्या पुलावर गाडी जात नाही."

मग मी पुनः सांगितले," अहो दादा, दोन कोल्हापूल द्या. आंबाबाईला जायचंय." म्हणून मी नमस्काल कलून दाखवला. एसटीतले सगळे लोक लागले फिदी फिदी हसायला. मग आम्ही पण झालो सामील.

तेव्हापासून आम्ही ठलवून टाकलं, कोणी आपल्याला हसलं तली आपण लागवायचे नाही. मनाला लावून घ्यायचे नाही. पायल चवथीत असताना आम्ही दोघी गेलो होतो दुकानात. तिथे आलेल्या एका खेडवळ आजीनी नेमकं मला समोलची पाटी वाचून दाखवायला सांगितली. मी"लाधा दामोदल प्लसन्न" असं वाचल्यावल तोंडाला पदल लावून लागली की हसायला. माझी पायल म्हणाली,"ओ आजी, मी सांगते. राधा दामोदर प्रसन्न. माझ्या आईला का हो हसता? तिला फक्त र म्हणता येत नाही. पण ती खूप हुशार आहे." आजीना कौतुक वाटले. माझी पाठ थोपटून म्हणाल्या,"गुणी आहे हो पोर तुझी छान शिकून मोठी होईल" अशी माझी पायल माझी ढाल बनली.

आमचा सोहन आम्हा दोघांसाठी धाल तलवाल आहे. सातवी आठवीत असताना तो बाबांबलोबल दुकानात सामान आणायला गेला होता.” पोहे, चहा, साबण, झाल्यावल साखल, लवा, टूथब्लश” असं हे सांगत असताना त्याच्या लक्षात आलं की दुकानदाल हसतोय. पण त्या हसण्यात टिंगल नव्हती. मग तोही हसत म्हणाला,” काका, माझे बाबा बँकेच्या कामात एकदम पहिले आहेत हं! कधी काही काम असले तर सांगा.” त्या काकांनी सुद्धा सोहनची पाठ थोपटत” यस, नक्की.” असे म्हणून त्याचेही कौतुक केले.

सोहनला मी तलवाल म्हटले कारण तो योग्य वेळी योग्य तेच बोलतो. आणि सुचवतो. एकदा त्याच्या बँकेतल्या लोकांचे फॅमिली गेट टुगेदल होते. आम्हाला सोहन घेऊन गेला. खेळात पालकांनी पण भाग घ्यायचा होता. गाण्याच्या भेंड्या खेळताना सोहनने बाबांना”लाल छडी मैदान खडी" (त्यामध्ये ल खूप उशिला आहे) हे गाणे म्हणायला सांगितले. लालूजी इतकं छान गातात हे मला पहिल्यांदा समजलं. गंमत म्हणजे एक ओळ झाल्यावल लोकांनी उभे लाहून टाळ्या वाजवून लालूजींचे कौतुक केले.

आमच्यातल्या कमीपणाचे मुलांनी भांडवल केले नाही. उलट आम्हाला आधाल दिला. आता आम्हा दोघांची साठी काय पासष्ठी उलटली, पण एकदाही मुलांनी आमचा कमीपणा दाखवून दिला नाही. आमचे जावई, सून हे सुद्धा मान देतात. या चौकटीने आम्हाला आधाल दिला आहे. आमचे हास्यास्पद होऊ घातलेले जीवन या चौघांनी आनंदमय केले. आता आम्ही आजी - आजोबा होण्याच्या वाटेवल आहोत. मुलीचे आणि सुनेचे कौतुक कलण्यात दंग आहोत. आता मी लिली आजी आणि हे लालू आजोबा होणाल. बाळाला झोपावतानाचे गाणे म्हणायला मी आता पासूनच सवय कलतीय…

"नीज माझ्या नंदलाला, नंदलाला ले"…

आता त्यांच्या बोबड्या बोलाने आणि आमच्याही, आमचे घल आणखीनच आनंदून जाणाल. मी, लिली लालू लेले, आजमितीला खूप सुखी आहे. लग्न ठलवताना आम्हाला जी तडजोड कलावी लागली त्याची आम्हाला खंत नाही, कालण आम्हाला आता उसंत नाही. आता घली कोणी येवो, लाम की गोपाळ, लाधा की सीता, लिली आजी आणि लालू आजोबा स्वागताला सज्ज आहोत. आमच्या बोबडेपणाला उंची मिळणाल आहे, बोबडेपणाने आमचे घल गोकूळ होणाल आहे.

हे सगळं मी तुम्हाला का सांगितल, तल आमची जोडी विजोड असूनही आमचा संसाल सुखाचा झाला. 'लाम लाम' म्हणत आम्ही जप कलत होतो, म्हणून आम्ही लांब नाही गेलो. त्या लामाने आम्हाला तालले. आता अशी किती घलं मी पहाते, दोघं नोकली कलतात, खूप खूप पैसे मिलवतात, छान छान घल घेतात, सजवतात पण त्या घलात लमत नाहीत. मुले वाढतात पाळणाघलात, त्यांना वाढवतानाचा आनंद आई बाबा अनुभवत नाहीत. मुलांना माया लावत नाहीत. काय म्हणू याला? त्यापेक्षा आम्ही सुखी. भले आमच्याकडे बालाखडीतले एक अक्षल नाही. आम्ही ते बोलू नाही शकलो. पण आमचे मायेचे घल आहे. आमची मुले आम्हाला मानतात, आमच्या जवळ लहातात. सांभाळतात. याहून वेगळी संपत्ती काय पाहिजे? आम्ही खूप समाधानी आहोत. आम्ही म्हणजे मी लिली आणि लालू लेले.

**सौ अंजली गोखले** - मो. 8482939011

## लेख –"शूटींग - वेगळी ती दुनिया" - श्री सुनील काळे





वाई हे गाव जरी मंदिरांचे गाव, विश्वकोश, सांस्कृतिक तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असले, तरी आणखी एका गोष्टीसाठी खूप प्रसिद्ध झालेले आहे आणि ते म्हणजे चित्रपटांच्या शुटींगचे मुख्य केन्द्र. काही वर्षांपूर्वी वाईला सिनेसृष्टीतील अनेक नामवंत कलाकारांनी व दिग्दर्शकांनी हजेरी लावलेली होती. मोठमोठ्या बॅनर्सचे चित्रपट आवर्जून वाईची निवड करत होते. त्यामुळे मेणवलीघाट, गंगापूरीचा घाट, वाईचा गणपती घाटाचा परिसर अनेक चित्रपटांमध्ये चित्रित झालेला आहे. या मंदिराच्या सुबक घाटाबरोबरच आजूबाजूचा धोम धरणाचा परिसर व जवळची छोटी छोटी गावे निसर्गरम्य असल्याने चित्रपट व्यवसाय करणाऱ्यांचे लक्ष वाईला मुख्य केंद्रस्थानी नेण्यास आकर्षित करत आहेत. त्याची दोन मुख्य कारणे म्हणजे वाई हे पाचगणी - महाबळेश्वर या पर्यटनस्थळांच्या अगदी जवळ आहे. शिवाय पाचगणीत टेबललॅन्ड या मुख्य पठारावर गाडी नेण्यासाठी बंदी आहे. दुसरे कारण महाबळेश्वरला हॉटेलच्या अतोनात भाडेवाढीमुळे शुटींग करणे परवडत नाही म्हणून वाईला महत्व प्राप्त झालेले आहे.

त्यामुळे या परिसरातील अनेक छोटे मोठे हॉटेल व्यावसायिक, स्थानिक शेतकरी, त्यांच्या बैलजोड्या, खानावळवाले, अनेक छोट्या मोठ्या मॉबसीनसाठी लागणारी गर्दी यामुळे स्थानिकांना शुटींग आले की थोडेफार पैसे मिळण्यास सुरुवात झाली होती. पण या सगळ्या गोष्टींना थोडे गालबोट लागले ते शुटींगसाठी लागणाऱ्या अनेक गोष्टींचे सप्लाय करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टर पद्धतीच्या गब्बर गावनेत्यांमुळे. त्यांचे आपआपसातील हेवेदावे, कुरघोड्यांचे राजकारण, 'मी म्हणेन तो कायदा व माझाच झाला पाहिजे फायदा' या प्रवृत्तीमुळे अनेक गट तयार झाले. या गटांमध्ये मारामारी होऊ लागली.. अगदी एकमेकांच्यावर पिस्तुल रोखण्यापर्यंत आणि तलवारबाजीपर्यंत मजल गेली. त्यांच्या भांडणाचा परिणाम चित्रपट निर्मिती साठी बाधा ठरू लागला. या स्थानिक लोकांच्या असहकार्याच्या भूमिकेमुळे हळूहळू वाईला शुटींगला प्राधान्य देण्याचे प्रमाण कमी झाले.

ही सर्व पार्श्वभूमी आठवायचे कारण म्हणजे आज सकाळी मेणवली घाटावर नेहमीच्या मॉर्निंग वॉकसाठी गेलो तर सकाळपासूनच घाटावर शुटींगची मोठी तयारी चालू होती. घाटावर पायऱ्या उतरत असतांनाच वाईच्या सोनवले मंडपवाल्यांचा मोठा जनरेटरचा ट्रक लाइटिंगची व्यवस्था करण्यात मग्न होता. मेणवली घाटावर, नेहमीचे वॉचमनदादा निवांतपणे सकाळी पोहण्यासाठी येणाऱ्या स्थानिक गावकऱ्यांसोबत मस्तपैकी गप्पा मारत बसलेले होते. शूटींगचा आणि येणाऱ्या पर्यटकांच्या गर्दीचा व त्यांचा काही संबंध नसल्यामुळे मला काहीच माहिती मिळाली नाही.

मुख्य घाटावर मेणवलीच्या स्थानिक बायका निवांतपणे कपडे धुण्याचा कार्यक्रम व गप्पांमध्ये मग्न होत सकाळचा प्रहर एन्जॉय करत होत्या. त्रिकोणी आकाराच्या दगडाच्या मध्यावर आर्ट डिपार्टमेंटमधला मुख्य डायरेक्टर एक चौकोनी दहा बाय दहाचा चौथरा बनविण्याच्या सूचना देत होता. एक पेंटर, एक सुतार प्लायवूडचा तो चौथरा दगडासारखा ग्रे रंग लावून पटापट हाताने काम उरकत होता. कारण शुटींगचा मुख्य काफीला आता घाटावर येणार होता. वाड्याच्या दक्षिणेच्या प्रवेशदाराजवळ तर जत्रेचेच स्वरूप आलेले होते. सकाळचा नाश्ता तयार करणारे कॉन्ट्रॅक्टर एका मोठ्या ट्रकमधून गरमागरम इडली, चहा, पोहे आग्रहाने वाढत होते. त्याच्या बाजूला कपडेपट सांभाळणारी मंडळी ट्रकशेजारी कापडाच्या मंडपात हिरोच्या कपड्यावर इस्त्री करत होते. त्याच्याजवळ लाईटींगचे सामान भरलेला मोठा ट्रक पाठीमागून उघडा केला होता. त्यामध्ये लहान लहान स्पॉटलाईट ते अवाढव्य जनरेटर सेट व साऊंड यंत्रणेचे सामान तुडूंब भरलेले होते. रिफ्लेक्टर्स तर ठिकठिकाणी लावलेले दिसत होते. सगळे छोटेमोठे कलाकार आपआपला ड्रेस, दाढी मिशा चिकटवून, काही जण भगवे कपडे परिधान करून शॉटची वाट पहात निवांतपणे बाओबाबच्या विशाल वृक्षाखाली खुर्च्यांवर निवांत बसलेले होते. सुमो, इनोव्हा, अशा प्रकारच्या मोठ्या वीस-पंचवीस गाड्यांच्या काचांवर नंबर लावून शुटींगच्या ठिकाणी ही मंडळी आली होती

मेकअपमन, छोटे छोटे असिस्टंट, डायरेक्टर्स, त्यांचे सहकारी, झेंडेवाले, बॅनर्सवाले हातात मोबाईल फोन घेऊन सगळीकडे फिरत होते. गार्डनच्या छत्र्या लावल्याने शुटींगच्या या जत्रेत खऱ्या जत्रेप्रमाणेच भरगच्चपणा आलेला होता.

मग काही जणांशी चर्चा केल्यावर ही एका सिरियलची शुटींग असल्याचे कळले. बिहार राज्याच्या पार्श्वभूमीवर आधारीत वेशभूषा असलेल्या व नेहमीचाच मसाला असलेल्या त्या सिरियलचे नाव आहे "तोसे नैना लागे रे." मेणवलीच्या वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरच्या रस्त्यावर शुटींग सुरू असल्याची माहिती मिळताच मी तिकडे पोहोचलो.

वाई मेणवली रस्त्यावर मोठा कॅमेरा लावलेला होता. फेल्ट हॅट घालून दाढीवाला डायरेक्टर अँक्टर्स मंडळीना शुटींगचा सीन नीटपणे समजावून सांगत होता. कॅमेरामनला नीट फोकसिंग करण्याच्या सूचना देत होता. व्हिलन गळ्यात सोन्याची चेन, हातात लॉकेट, पांढरीशुभ्र धोती, व अधूनमधून मिशानां पीळ देत प्लास्टीकच्या खुर्चीवर उजवा पाय रेलून उभा होता. हिरॉईन आता वाड्याच्या प्रवेशद्वाराच्या रस्त्यातून वेगाने पळत येणार असते." नही करनी हमे ये शादी" असे मोठमोठ्याने म्हणत रडवेला चेहरा करून ती व्हिलनच्या दिशेने येणार असते. एक सायकलवाला भैय्या दुधाच्या किटल्या भरून निवांतपणे जाणार असतो. वाईतून जरा नीटनेटक्या कपड्यातील एक दिवसाच्या कामासाठी आलेल्या स्थानिक महिला हातात रिकाम्या पिशव्या घेऊन मॉबसीनसाठी ये जा करणार असतात. एवढासा छोटा सीन पण त्यात वास्तवतेचा स्पर्श होण्यासाठी, दृश्य जिवंत दिसण्यासाठी किती आटोकाट प्रयत्नाची शिकस्त करावी लागत होती. मध्येच मुख्य रस्त्यावर वाहतुकीची कोंडी थांबवावी लागत होती. तीन वेगवेगळ्या ठिकाणी मोठमोठे कॅमेरे लावून चित्रिकरण केले जात होते. सिरीयलमध्ये प्रसंगाची कंटीन्यूईटी येण्यासाठी लेखकाचे स्क्रिप्ट वारंवार सर्वांना ऐकवले जात होते. गाड्यांच्या नंबरप्लेटवर बिहारची गाडी वाटावी म्हणून नकली प्लेट लावल्या जात होत्या. अधूनमधून बिहारी भाषेत बोलण्यासाठी जाणीवपूर्वक माणसे चालत जात येत बिहारी भाषा बोलत होती. दीडशे ते दोनशे

माणसे एक शॉट यशस्वी होण्यासाठी जीवापाड प्रयत्न करत होती. लाईट, साऊंड, ॲक्शन व कॅमेरा असा आरडाओरडा होत होता. एकवेळ रिहर्सल व तीनदा रिटेक घेऊन एकदाचा शॉट ओके झाला व लगेच दुसऱ्या शॉटची तयारी सुरु झाली.

परत जाताना पाहतो तर घाटावरचा चौथरा आता पूर्ण झाला होता. नकली प्लायच्या फळ्या लावून असली दगडाचा वाटावा असा चौथरा पूर्ण झाला होता. आता त्यावर दहा फुटांची शंकराची मूर्ती विराजमान झालेली होती. त्यासाठी लागणाऱ्या मोठ्या आकाराच्या समया, हार, नारळ, पूजेचे सामान, त्रिशूळ, भगवे झेंडे सगळीकडे लावलेले होते. स्थानिक कलाकार दगडी भिंतीवरच्या डिझाईनमधे पुन्हा रंग भरत होते. फुलांच्या माळा मंदिराच्या घंटा असलेल्या कमानीवर लावल्या जात होत्या. एकंदर बिहारी छटपूजेच्या कार्यक्रमाचा देखावा उभा करण्यात आर्ट डायरेक्टर कमालीची मेहनत घेत होता.

सिरियलचा स्मार्ट हिरो एका फोटोग्राफरकडून पिंपळाच्या मोठ्या गोल दगडी चौथऱ्यावरून स्वतःचे फोटो काढून घेत होता. त्याला फोटोसाठी विचारले तर त्याने प्रेमाने घट्टपणे हात हातात घेऊन माझी चौकशी करत चार पाच फोटो काढले. एकंदर शुटींगचा कार्यक्रम नकली असला तरी माणुसकीचे असलीपण टिकवून वाटचाल करीत असल्याची मला जाणीव होत होती.

सिनेसृष्टी भारतातील एक मोठी इंडस्ट्री आहे. इथे हजारो कलाकार, लेखक, गायक, वादक, चित्रकार, डायरेक्टर्स, अभिनेते, अभिनेत्री, यांचा भरणा असणारी मंडळी आपले नशीब रोज आजमावत असतात. कित्येक जणांना यश मिळते किंवा काही जणांना अपयशाच्या गर्तेच्या वादळात करियरचा अंत पहावा लागतो. अपयशी झालेले कोणाच्या स्मरणातही राहत नाहीत. काही जण दुय्यम दर्जाचे म्हणून आयुष्यभर कष्ट करत राहतात.

स्पॉटबॉयपासून ते चतुर्थ श्रेणीतील हेल्परसारखी कामे करणारी असंख्य माणसे पोटाची खळगी भरण्यासाठी या इंडस्ट्रीवर अवलंबून असतात. त्यांना काम मिळाले तरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होणार असतो. त्यांच्या मुलांना शाळेची फी भरण्यासाठी यांना काबाडकष्ट करावे लागणार असतात. हा एक मोठा चालता फिरता काफीला असतो. आज एका ठिकाणी तर उदया दुसऱ्या लोकेशनवर भटकंती सुरु असते. सिरियल किंवा सिनेमा चालला तर त्यांच्या जीवनाचे रहाटगाडगे सुरु राहणार असते. अन्यथा कामावरून काढून टाकण्याची टांगती तलवार घेऊनच हातावर पोट असलेली ही मंडळी सतत अस्थीर जीवन जगत असतात. त्यांना कसले पेन्शन नसते, भवितव्य नसते, म्हातारपणातील आरोग्याच्या सुखसुविधा नसतात. आणि त्यांच्यामागे कसल्याही प्रकारचा आशावाद, किंवा त्यांच्या स्वप्नांना आकार देणारा राजकीय वरदहस्त नसतो. सगळे भविष्य खोल अधांतरी बुडलेले असते.

आम्ही किती सहजपणे एखादा चित्रपट, सिरियल फालतू आहे असे समजून चॅनेल बदलतो. पण त्या प्रत्येक शॉटच्या प्रसंगासाठी किती दिव्यातून जावे लागत असते हे त्या डायरेक्टरलाच माहीत असते. तो त्या अवाढव्य जहाजाचा कप्तान असतो. सगळ्या यश-अपयशाची जबाबदारी त्याची असते.

सामान्य माणसांच्या रोजच्या जगण्यापेक्षा शुटिंगच्या या वेगळ्या जीवनपध्दतीचा थोडा काळ अनुभव घेऊन मी माझ्या दुनियेत परत आलो.

येताना पारावर निवांत गप्पा मारत बसलेली माणसे पाहिली, दुकानात व घरात दोनशे रुपयाने गॅस स्वस्त झाला म्हणून सुखावलेली माणसे पाहिली. शेतात नेहमीप्रमाणे कष्ट करणारे शेतकरी पाहिले, दुकानातून राजकारण्यांना नेहमीच्या शिव्या घालत रस्त्यावर पचापच पान तंबाखू खाऊन थुंकणारी माणसे पाहिली, घरातील सगळा कचरा बाहेर रस्त्यांवर, ओढ्यामध्ये, छोट्या पुलांवर टाकून घाण करणारी नेहमीची गावातील माणसे पाहिली. शिवाय पहाटेची, तसेच दिवसभर वेळीअवेळी डिजे लावून मोठमोठ्याने लाऊडस्पीकरवर भेसूर आवाजातील गाणी व भजने ऐकत असताना, माझा रोजचा दिनक्रम सुरळीत चालला आहे याची मला खात्री पटत गेली..

मात्र शुटींगची ही दुनिया वेगळीच आहे. नकलीपणातील जीवनाला काही तास असलीपणाकडे घेऊन जाणारी, भ्रमनिरास करणारी ही दुनिया आहे.

**श्री सुनील काळे -** मो. 9423966486



## चित्रकाव्य - मुखवटे - सुश्री नीलांबरी शिर्के





मुखवट्याआत
जो तो वेगळा
मुखवटा केवळ
दर्शन सोहळा

प्रसंगानुसार
तयाचा वापर
मुखवटे मनी
असती तत्पर

मुखवट्यामुळे
फसविशी जगा
स्वतःच्या मनी
तया नसे जागा

एकटे बसता
आपला चेहरा
आपणास दिसे
अस्सल नी खरा

फसविले जगा
मुखवट्याव्दारे
स्वतःचा चेहरा
बोलतोच खरे

मुखवटा जग
तटस्थपणाचे
खरे बोलतात
भाव अंतरीचे

अंतरीच्या भावा
स्पर्श चैतन्याचा
तिथेच वसतो
गाव भावनेचा

सगळ्या भावना
दडपून आत
हवेच कशाला
मुखवटी नातं!

**सुश्री नीलांबरी शिर्के** - मों. ८१४९१४४१७७ / ९३७०८३००३०

# लेख - हॅप्पी हार्मोन्स ची काळजी घ्या आणि निरोगी आयुष्य जगा - सौ. मुक्ता महेश अभ्यंकर



आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे,

किती सांगू मी सांगू कुणाला आज आनंदी आनंद झाला.

आनंदाच्या डोही आनंद तरंग

आनंदी आनंद मुलांनो, आनंदी आनंद!

चहूंकडे दशदिशी दाटला आनंदी आनंद!

आकाशी आनंद वरी… भरे धरेवरी त्याचपरी, … गिरिशिखरी, तरुशिखरी, घरी

प्रत्येक व्यक्ती आपापल्या पद्धतीने आयुष्यामध्ये आनंदी राहायचा प्रयत्न करत असते. एखादी चांगली नोकरी, हसते-खेळते कुटुंब, पुरेशी झोप आणि मनामध्ये शांती अशा काही मोजक्या गोष्टी माणसाला आनंदी राहण्यासाठी हव्या असतात. व्यक्तिपरत्वे ह्या घटकामध्ये गोष्टी वाढत जातात किंवा कमी होत जातात. कोणाला कोणत्या गोष्टीमार्फत आनंद मिळू शकेल याबद्दल सांगणे अशक्य आहे. प्रत्येक माणूस हा वेगळा असयाने प्रत्येकाची आनंदाची व्याख्या वेगवेगळी असते.

एखाद्या व्यक्तीला आवडता पदार्थ खाल्ल्याने समाधान मिळते, तर एखाद्याला एखादा पदार्थ बनवण्यात आनंद वाटतो तर एखाद्याला डायटींग करुन आनंद प्राप्त होतो. कोणाला आराम करुन मजा येते, तर कोणी प्रचंड मेहनत करुन बक्कळ पैसे कमवण्याच्या मार्गामध्ये धन्यता मानतो.

काही जणांना लोकांच्या घोळक्यात राहून आनंद वाटतो तर काहींना अगदी एकटे राहायला आवडते. खूप संपत्ती असूनही एखादा मनाने दु:खी असतो तर थोड्या संपत्तीत एखादी व्यक्ती अगदी आनंदी राहते.

प्रत्येकाचा आनंद वेगळा, आनंद साजरा करायची पद्धत वेगळी. माणसांच्या हाताच्या बोटाच्या ठश्याप्रमाणे प्रत्येकाचा दृष्टिकोन हा वेगळा असू शकतो.

आनंद आणि शांतीसाठी आपल्याला हॅपी हार्मोन्सची (happy hormones) गरज असते. आपल्या शरीरात ४ प्रकारचे हॅपी हार्मोन्स असतात. यामध्ये डोपामाइन (dopamine), ऑक्सिटोसिन (oxytocin), सेरोटोनिन (serotonin) आणि एंडॉर्फिन (endorphins) यांचा समावेश होतो. त्यांचा मानसिक आरोग्यावर लगेच

परिणाम होतो. जर शरीरात या हार्मोन्सची कमतरता असेल तर व्यक्ती मानसिकदृष्ट्या अस्वस्थ राहते. एखादा विशिष्ट हार्मोन प्रमाणापेक्षा जास्त तयार झाला, तर तुम्ही खूप खूश असता. एखाद्या खास हार्मोनची पातळी खालावल्यामुळे तुम्ही दुःखी होऊ शकता.

डोपामाइन हा मेंदूमध्ये तयार होणारा न्यूरोट्रान्समीटर आहे. मूलभूतपणे, हे न्यूरॉन्स दरम्यान रासायनिक संदेशवाहक (Chemical Messenger) म्हणून कार्य करते. जेव्हा तुमच्या मेंदूला अँप्रेसिएशनची अपेक्षा असते तेव्हा डोपामाइन मेंदूमध्ये सोडले जाते. जेव्हा डोपामाइनची पातळी मेंदूमध्ये योग्य प्रमाणात असते तेव्हा मूड सामान्यतः चांगला असतो. ह्या प्रकारातील हार्मोन्स शिकण्यासाठी, नियोजन करण्यासाठी आणि प्रॉडक्टिव्हिटी वाढवण्यासाठी सर्वोत्तम आहे. डोपामाइन अलर्टनेस, फोकस, मोटिवेशन, प्रसन्न वाटणे भावनांशी संबंधित असू शकते. 'फील गुड' फंक्शन व्यतिरिक्त, डोपामाइन शरीराच्या इतर अनेक कार्यांमध्ये सामील आहे. डोपामाइन शरीराच्या ब्लड फ्लो (Blood Flow), पचन शक्ती (Digestion), हार्ट आणि किडनी फंक्शन (Heart And Kidney Function), मोटर कंट्रोल (Motor Control), दुखण्याची प्रक्रिया (Pain Processing) अश्या अनेक कार्यांमध्ये सामील आहे.

सेरोटोनिन (5-HT) हे अत्यावश्यक अमीनो आम्ल ट्रिप्टोफॅनपासून संश्लेषित केले जाते. अत्यावश्यक म्हणजे ते आहारातील स्त्रोतांकडून येणे आवश्यक आहे. सेरोटोनिन हे खरं तर एक संप्रेरक आहे तसेच एक न्यूरोट्रांसमीटर आहे. हे मेंदू (मेंदू-व्युत्पन्न)मध्ये न्यूरोट्रांसमीटर आणि परिघात (आतडे-व्युत्पन्न) संप्रेरक म्हणून कार्य करते. न्यूरोट्रांसमीटर सेरोटोनिनची नैराश्यात भूमिका असते. या सेरोटोनिनची कमी पातळी हे नैराश्याचे एक कारण असल्याचे आढळून येते. संप्रेरक म्हणून, सेरोटोनिन मूड, सामाजिक आणि वर्तणुकीतील बदल, तसेच पचन नियंत्रित करण्यात गुंतलेले आहे.

मेंदूमध्ये मूड संतुलित करण्यासाठी सेरोटोनिन हार्मोन आवश्यक आहे. भुकेपासून मूडपर्यंत सर्व काही सिरोटोनिनवर अवलंबून असते. चांगल्या झोपेसाठी, शरीरात सेरोटोनिनचा समतोल राखला पाहिजे. तुमच्या मूडसोबत झोप, भूक, पचन, अध्ययनाची क्षमता आणि आठवणी या घटकांवर नियंत्रण मिळवण्यासाठी सेरोटोनिन हार्मोन मदत करते.

ऑक्सिटोसिन हायपोथालेमसमध्ये तयार होते आणि पिट्यूटरी ग्रंथीद्वारे रक्तप्रवाहात सोडले जाते. ऑक्सिटोसिन हार्मोनला `लव हार्मोन' असेदेखील म्हटले जाते. हे हार्मोन माणसातील विश्वास वाढवणे, नात्यामध्ये जिव्हाळा, सहानभुती प्रस्थापित करणे अशा गोष्टींमध्ये मदत करत असते.

एंडोर्फिंस पिट्यूटरी ग्रंथी आणि हायपोथालेमसमध्ये तयार होतात, दोन्ही मेंदूमध्ये असतात. एंडोर्फिन हे तुमच्या शरीरातील एक प्रकारचे न्यूरोट्रांसमीटर किंवा संदेशवाहक आहेत. ते तुमच्या मेंदूच्या बक्षीस केंद्रांना (ओपिओइड रिसेप्टर्स) जोडतात आणि तुमच्या मज्जासंस्थेमध्ये सिग्नल वाहून नेतात. एंडोर्फिंस हार्मोन हे आपल्या शरीराचे प्राकृतिक दुःख निवारक हार्मोन आहे. शरीरामध्ये वेदना किंवा तणाव निर्माण झाल्यावर हे हार्मोन त्यावर काम करते. एंडोर्फिंस हार्मोनचा स्तर प्रामुख्याने जेवण जेवताना, वर्क आउट करतांना वाढलेला पाहायला मिळतो. तुम्ही शरीराला आनंदी ठेवणारे काम करत असताना एंडोर्फिंस हार्मोनचे प्रमाण वाढत जाते.

असे बरेचसे पदार्थ असतात, जे खाल्ल्यावर आपल्याला आनंदाची आणि तृप्तीची भावना निर्माण होते व हॅपी हार्मोन्स वाढतात. आइस्क्रीमसारखा पदार्थ डोपामाइनची लेव्हल तात्पुरती वाढवतो. केळ्यामध्ये अमीनो एसिड टायरोसिन आणि फेनिलॅलानिनसह उच्च पातळीचे डोपामाइन तयार करण्यास मदत करतात. बदाम हे अमीनो ऍसिड टायरोसिनचा एक चांगला स्रोत आहे, जो डोपामाइनसाठी एक बिल्डिंग ब्लॉक आहे. अंडी हे टायरोसिनचा समृद्ध स्त्रोत आहे. डोपामाइन प्रोडक्शनमध्ये हे अमीनो ऍसिड फायद्याचे ठरते. त्यांच्यात व्हिटॅमिन डी देखील जास्त आहे. यामुळे मूड सुधारण्यास मदत होते. डार्क चॉकलेटमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल सारखे कम्पाऊंड्स असतात. याचा मूड आणि आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडतो. डार्क चॉकलेटमध्ये कमी प्रमाणात कॅफीन आणि फेनिलेथिलामाइन नावाचे संयुग असते, जे आनंदाची भावना वाढवते आणि डोपामाइनची पातळी वाढवते. पालेभाज्या फोलेटमध्ये समृद्ध असतात. हे बी व्हिटॅमिन डोपामाइनच्या नियमनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. ग्रीन टीमध्ये एल-थेनिन नावाचे अमिनो ॲसिड असते, जे रिलॅक्सेशनला प्रोत्साहन देते आणि डोपामाइनचे उत्पादन वाढवते. डार्क चॉकलेट खाल्ल्याने तुमच्यातील आनंदी हार्मोन वाढतो. त्यात कोको पावडर टाकली जाते ज्यामुळे एंडोर्फिन वाढतात. टोमॅटो खाऊनही तुम्ही तुमचा मूड सुधारू शकता. कच्चा नारळ देखील तुमचा मूड सुधारण्याचे काम करतो. जर तुम्ही बिया आणि नट्सचे सेवन केले तर तुमचा मूड चांगला राहील. यामुळे तुम्हाला ऊर्जाही मिळेल. इडली, डोसा सारख्या आंबलेल्या पदार्थांमध्ये प्रोबायोटिक्स असतात. जे आतड्यात राहणारे फायदेशीर बॅक्टेरिया असतात. हे जीवाणू शरीराच्या तणावाच्या प्रतिसादाचे नियमन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात आणि चिंता आणि तणावाचे इतर नकारात्मक प्रभाव कमी करण्यास मदत करतात. तुम्हाला तणाव वाटत असेल तेव्हा मूठभर काजू किंवा बिया एक उत्तम नाश्ता असू शकतो. सुकामेवा आणि अनेक बिया मॅग्नेशियममध्ये समृद्ध असतात, जे तणाव पातळी कमी करण्यास आणि आराम करण्यास मदत करतात. त्यामध्ये निरोगी चरबी देखील जास्त असते., ज्यामुळे मूड नियंत्रित करण्यात आणि शरीरातील जळजळ कमी होण्यास मदत होते.

विटामिन डी आणि ओमेगा- 3 फैटी ॲसिड भरपूर असलेला सैल्मन मासा ऑक्सीटोसिन वाढवण्यास मदत करतो. संत्र्याचा रस, कॉफी, बदाम, ब्रोकोली, केळे व अंडे हे पदार्थ ऑक्सीटोसिन वाढवण्यास मदत करते.

हॅपी हार्मोन्स चांगली झोप, व्यायाम, ध्यान धारणा, संगीत, आपले छंद जोपासून वाढवता येतात. निरोगी राहण्यासाठी आनंदी असणे आवश्यक आहे व आनंदी राहण्यासाठी निरोगी असणे आवश्यक आहे. म्हणूनच हॅप्पी हार्मोन्सची काळजी घ्या आणि निरोगी आयुष्य जगा. आनंद पसरवा, त्याचा संसर्ग होवू द्या. सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. असे केल्यास सगळे सुखकारक वाटेल, आनंदमय वाटेल. आनंदाचे झाड माझ्या अंगणात आहे असे वाटेल

So, choose to be happy, आनंदी रहा म्हणजे तुमच्या संपर्कात येणारेही सगळे आनंदी राहतील.

**सौ. मुक्ता महेश अभ्यंकर -** मो. 7506243050

## लेख-शाळा सुटता, पुस्तक मिटता, दिवाळीची सुट्टी लागता... डॉ. मीना श्रीवास्तव



आपण सर्वांना दीपावलीच्या आनंददायी पर्वाच्या खूप खूप मंगलमय शुभेच्छा!

आपल्यापैकी आई, बाबा, आजी, आजोबा अन इतर सर्वांना प्रेमळ प्रणिपात, नमन आणखीन खूप खूप शुभेच्छा, मात्र अजून एक नम्र निवेदन, तुमच्या घरातल्या छोट्या मंडळींना साष्टांग नमस्कार, विचारा असे का? शेवटपर्यंत माझे म्हणणे ऐकल्यावर तुम्हाला ना हे आपोआपच कळेल!

शाळकरी मुलांची कुठलीही सुट्टी, म्हणजे पालक किंवा तत्सम मंडळींचा बहुदा घातवार असेल असा अलिखित नियम असावा! अन त्यात एक महत्वाची सुट्टी म्हणजे दिवाळी व्हेकेशन! आजकाल 'नेमेचि येतो पावसाळा' असे नसून 'केव्हाही येतो पावसाळा' असे अनुभव येत असतात! त्याचप्रमाणे आपल्या देशात इतक्या सुट्ट्या का दिल्या जातात हा प्रश्न अत्यंत वाजवी आणि समयोचित आहे! कारण आपल्या देशाची 'सुट्ट्यांचा देश' म्हणून ख्याती आहे. प्रिन्सिपॉल आणि शिक्षक तर अशा सुट्ट्या देण्यास सदैव तत्पर असतातच आणि त्यातच कधी कधी धक्के तंत्र वापरीत अनपेक्षितपणे कोरोनाचा पर्मनन्ट वरदहस्त लाभल्यागत ऑनलाईन वर्गांचे आयोजन करीत असतात. पण मंडळी, आता प्रिन्सिपॉल आणि शिक्षक यांचा सहानुभूतीपूर्वक विचार कराल की नाही? त्यांना देखील ब्रेक हवा, त्यांना पण घरची आणि अवांतर कामे असू शकतात, हे लक्षात घ्याल की नाही! ती मंडळी या निमित्याने त्यांच्या मुलाबाळांच्या सुट्टीचे व्यवस्थापन करणार की नाही! म्हणून एरवी शाळेत धुमाकूळ घालणाऱ्या मुलांच्या समस्त घराला सुट्टीच्या काळात  मुलांचा ब्रेथलेस परफॉर्मन्स बघणे हे कंपलसरी असते.

शाळेत नियोजनबद्ध गोष्टींसाठी नियत अवधी असतो, मात्र शाळा नसेल तर हे नियोजन नसणार हे ओघाने आलेच, मग आपल्या घरात असे सुसंवाद घडत असतीलच!

पहिले बालक, "ए ममा, उद्या सकाळी उठवू नकोस प्लीज़, मी उठेन तेव्हा उठेन, म्हणजेच कदाचित दुपार होईल, अगदी नरकचतुर्दशी का असेना!"

दुसरे बालक, "मम्मी, आज ऑफिसला जाऊ नकोस! घरीच मस्त वेळ घालवू, म्हणजे तू मस्त काही बाही कुकिंग कर अन मी खाईन. मित्रांनो यात चकल्या, शेव, चिवडा, कडबोळी, झालच तर गेला बाजार आपल्या वेळी फक्त दिवाळीत मिळणाऱ्या लाडू, अनारसे, शंकरपाळी, चिरोटे सारख्या ट्रॅडिशनल किंवा पुरातन डिशेसचा समावेश संपूर्णपणे वर्ज बरे का!

एक चिरंजीव बच्चू, "मॉम, आज जरा घर नीट आवरून ठेव, अन मस्त स्नॅक्स, कोल्ड-ड्रिंकचे प्रिपरेशन कर, अर्थात पिझ्झा, बर्गर अन पास्ता! माझे फ्रेंड्स येणार आहेत अन आम्ही एन्जॉय करणार आहोत"

एक चिरंजीवी बालिका "ममा, आत्ता कुठे सुट्टी लागली, अभ्यास करून कंटाळा आलाय, मी आधीच सांगते, मी जरा रिलॅक्स होणार आहे. म्हणजे दिवाळीच्या आधीची साफसफाई, पंखे पुसणे, जाळी काढणे इत्यादी कामाच्या यादीत मला इन्क्लूड नको करू हां!

एक अत्यंत दयाळू लेकरू बघा काय म्हणतय, "आई ग! आज तू दमली असशील ना दिवाळीची साफसफाई अन फराळाचे करून! आता ना तुला किचनपासून सुट्टी! किती करतेस ग आमच्यासाठी, आज तू आराम कर बरं!" आईला वाटतंय 'आज ही पोरं माझ्यासाठी स्वयंपाक करणार!' पण कसले काय, पोरांची तयारी झाली पण. कशाची

म्हणताय? मेनू पण ठरलाय! अहो, बाहेर महागड्या हॉटेलमध्ये मेक्सिकन अन थाई फूड हादडायला तयार झालीत की पोरं . पोरांचे डॅड आहेतच कार ड्राइव्ह करायला अन बिल पेमेंट करायला! डॉक्टर मीना श्रीवास्तव

मी आता या क्षणी फ्लॅश बॅक मोड मध्ये गेले मंडळी! नवरात्रीचे पावन पवित्र नऊ दिवस अन थोडे थोडके नाही तर एक महिना मोजून भुलाबाईच्या गाण्याचे दिवस! सांगता असायची कोजागिरी पौर्णिमेला! त्या एक महिन्यात आमचे डिनर बाहेरच असायचे, भुलाबाईची गाणी म्हणतांना दमछाक होऊन नये म्हणून घरोघरीच्या आया फार सजग असायच्या. पोटभरीचा मेन्यू रिपीट व्हायचाच नाही. आम्ही पण अधाशासारखे वर्षभराची बेगमी करत या काळातील चांगलेचुंगले फराळ कम जेवण हादडायचो!
प्रत्येक घरात आईला मात्र लय काम पडायचं. आम्ही शहरात राहायचो, त्यामुळे गावाकडील पद्धतीप्रमाणे सर्वांनी एका घरी जमून काम करणे शक्य नव्हते. चाकरमान्यांना दिवाळीच्या सुट्या मोजक्याच मिळायच्या! मात्र त्यातल्यात्यात फराळाचे आधी करून ठेवलेले जिन्नस, पितळी, तांब्याची अन थोडकी चांदीची भांडी स्वच्छ करणे, घरातील तमाम कोपरे अन प्रत्यक्ष घर स्वच्छ करणे, पूजेचे साहित्य, उटणी, एक ना दोन. जमतील तितके फटाके, घरी केलेला आकाशदिवा आणि मातीच्या पणत्या (त्यांना ओला चुना लावायचा दंडक होता, त्याने पणतीच्या आत तेल झिरपत नसे). मंडळी, बजेटप्रमाणे नवीन कपड्यांची खरेदी व्हायची! आजच्या पिढीच्या हातात पैसे असतात म्हणून मनात येईल त्या दिवशी दिवाळी! सांगा बरे आपण दिवाळीत चकली, शेव, चिवडा, करंज्या, अनारसे इत्यादी खाण्याकरता आसुसले असतो का? आपण कापड, दागदागिने, वाहन इत्यादी खरेदीकरिता पाडव्याची प्रतीक्षा करतो का? त्याचे अप्रूपच राहिले नाही, कारण आत्ता आपण 'बारोमास खरेदीच्या मोड' मध्येच असतो. गावात अशी परिस्थिती नसावी अशी मी आशा करते. पण गावांचे झपाट्याने शहरीकरण होत आहे, तेव्हा कोण जाणे कदाचित तिथेही हे खरेदीचे लोण पसरले असावे.
मग आपण आता काय करावे म्हणजे मुलांना या दिवाळीच्या सुट्ट्यांचा खरा आनंद लुटता येईल? मी जे सुचवते आहे ते अर्थातच माझे विचार आहेत! बघा पटताहेत कां!
सर्वप्रथम दिवाळीचा सण घरीच साजरा करणे. मित्रांनो, सर्वांना आनंद देणारा हा एकमेव सर्वसमावेशक सण आहे. वसुबारस गाय वासरू यांचा, धनत्रयोदशी धन्वंतरी पूजेचा, नरक चतुर्दशी संपूर्ण स्वच्छतेचा, श्रीकृष्णाने याच दिवशी नरकासुराचा वध केला! मुख्य सण दिवाळीचा, वैभव अन समृद्धी प्रदान करणाऱ्या विष्णुपत्नी लक्ष्मीमातेचे मनोभावे पूजन करण्याचा! तसेच अमावास्येच्या काळ्याभोर रात्रीला उजळणाऱ्या मातीच्या पणत्यांचा. या इवल्या पणत्यांचा मान इतका मोठा की, या दिवशी त्यांची पूजा केली जाते. लाख मोलाची विजेची रोषणाई यांच्या पुढे फिक्की पडते.

बलिप्रतिपदा हा साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त असा पावन दिवस! वर्षातून एकदा पाताळातून पृथ्वीवर येणाऱ्या दानवीर बलीपूजनाचा अन गोवर्धन पूजेचा, श्रीकृष्णाला छप्पनभोग नैवेद्य दाखवायचा. या सोबतच पतिपत्नीच्या नात्याचा सन्मान करण्याचा म्हणजेच पतीने पत्नीला या दिवशी भेटवस्तू देणे अत्यावश्यकच! यमद्वितीया (भाऊबीज) म्हणजे भाऊ आणि बहीण यांच्या पवित्र प्रेमाचे प्रतीक असा हा सण! मंडळी, आधीच्या काळात पांडव पंचमी, कार्तिक एकादशी, द्वादशीला तुळशी विवाह अन कार्तिक पौर्णिमा इथवर दिवाळी असायची! या शिवाय या दीपपर्वाच्या आनंदात सहभागी होणारे सगेसोयरे आणि मैत्रमंडळी यांनी या सर्वंकष सणाचे परीघ पूर्ण व्हायचे! जर वडीलधाऱ्या मंडळींनी युवा आणि बालक (कधी तर पालक सुद्धा) यांना सुट्टीचे निमित्य साधून दिवाळीचे हे भव्य रूप समजावून सांगितले तर प्रत्येक दिवशी केलेली पूजा हा निव्वळ उपचार राहणार नाही. घरी मुलांनी

आणि मुलींनी हौसेने साफसफाई (जाळी काढणे आणि पंखे स्वच्छ करणे हे मुख्य काम), फराळ करण्यात मदत करणे, आकाशदीप स्वतः बनवणे, मातीच्या पणत्या रंगांनी सजवणे, फुलांचे हार गुंफणे, पूजेची भांडी स्वच्छ करणे, आपली आलमारी किंवा आपली स्वतंत्र खोली असल्यास ती आवरणे, हे सर्व उपक्रम हाती घ्यावेत. बघा मुलांनो, तुमची आई किती खुश होईल ते! या साफसफाईच्या निमित्त्याने नको असलेले कपडे, स्टेशनरी, वह्या, पुस्तके शक्यतोवर गरिबांना देता येतील. दिवाळीचा फराळ जर अनाथाश्रमात किंवा वृद्धाश्रमात दिला आणि तिथे एखादा दिवस साजरा केला तर सोन्याहून पिवळे! मुले आपल्या पॉकेटमनीचे पैसे इथे दान देऊ शकतात! बघा यावर विचार करून मैत्रांनो! डॉक्टर मीना श्रीवास्तव

मुलांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या दिवाळीची एक खास गोष्ट, किल्ला बनवणे! यात कल्पनाशक्तीचा वापर करून उपलब्ध सामग्रीत सुंदर किल्ले बनवण्याची मजा कांही औरच! चुरस निर्माण करायची असेल तर सोसायटीत स्पर्धा आयोजित करता येईल. मात्र प्रत्येक किल्ल्याला कुठले ना कुठले बक्षीस द्यावेच!

एक सुचवते, किमान दिवाळीच्या दिवसांत पहाटे उठून अभ्यंगस्नान करण्याचे महत्त्व पटले की, मुले साग्रसंगीत अभ्यंगस्नान करण्यास नक्कीच तयार होतील. कदाचित त्यांना पहाटे उठण्याची सवय देखील लागेल! तसेही आजकाल विशेष थंडी पडतच नाही, कुठे आणि कां गेली हे आपल्यालाच ठाऊक असणे गरजेचे नाही का?

आता एक गंभीर वॉर्निंग! फटाक्याच्या जीवघेण्या खेळाची! आगीच्या दुर्घटना घडणे, हात, पाय किंवा डोळे यांना इजा, कधी शरीर भाजणे, ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण आणि पैसे खर्च होणे एक ना दोन किती म्हणून वर्णावे! आता तर दुर्दैव असे की उठसूट फटाक्यांच्या माळा जपणे आणि त्यात नवी चिंताजनक भर लेझर किरणांची! फटाकेच खरेदी न करणे हा उपाय जरा कडक, त्याने बच्चे कंपनीचा हिरमोड होईल भर सणासुदीला! हे सर्व प्रदूषण रोखायचे असेल तर, कार POOLING सारखे फटाक्यांचे सुद्धा POOLING करता येईल. प्रत्येक कुटुंबाने सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना किंवा नियोजित समितीला पैसे देऊन, मग त्या लोकांनी फक्त नयनसुख देणारे, ध्वनी विरहित फटाके नियोजित स्थानी आणि नियोजित वेळी लावले तर सोसायटीतील मंडळी हे खूप एन्जॉय करतील. वाटल्यास नियोजित दिवशी सोसायटीत सामूहिक दिवाळी पहाट (मात्र स्थानिक कलाकार हवेत) आणि दिवाळी फराळ आयोजित केले तर मजा येईल. तसेही मोठ्या शहरात नातेवाईकांपेक्षा आपले सख्खे शेजारीच आपल्याकरता मौल्यवान सोबती असतात.

मंडळी दिवाळीतल्या कांही गोष्टी मला खटकतात, आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करतांना महागडे गिफ्ट देणे, दिवाळीच्या रात्री लाखोंचा जुगार खेळणे, बाहेर पार्ट्या करणे, असे मोठ्यांनी केले तर मुलांना दिवाळीचे विकृत रूपच दिसेल! त्यापेक्षा मुलांनी घरी बनवलेल्या भेटवस्तू अन भेटपत्रे किती साजिरी अन गोजिरी दिसतील नाही का? मैत्रांनो, हे माझे विचार बुरसटलेले वाटतात का? थंड डोक्याने विचार करून मगच ठरवा. आता साग्रसंगीत दिवाळी साजरी झाल्यावर सुट्टीच्या इतर दिवसांचे प्लॅनिंग करावे! कामे करून दमला असाल तर ब्रेक हा हवाच. हिवाळाच तर खरा सिझन आहे पर्यटनाचा! मात्र त्यातून मॉल, संस्कारशिबिरे, हिवाळी शिबिरे वगळून, निसर्गरम्य प्रदूषणरहित खेडी, गडकोट, वनराई इत्यादींचा प्रवास केल्यास दिलो दिमाग फ्रेश व्हायला नक्कीच मदत होईल.

तुम्हा सर्वांना फिरफिरुनि दिवाळीच्या मंगल पर्वाच्या खूप शुभेच्छा! आपण दिवाळीच्या आनंदाची लयलूट करा, आपला आनंद द्विगुणित होईल. तुमच्या हातातील पणतीने एखाद्या अंधाऱ्या घरात पणती पेटतेय का बघा बरं!

**डॉ. मीना श्रीवास्तव**, ठाणे मोबाईल क्रमांक ९९२०१६७२११, ई-मेल - drmeenashrivastava21@gmail.com

## चित्रकाव्य - अनोखे अर्थविश्व - आशिष बिवलकर





ट्राफिक सिग्नलवरही,
एक अर्थविश्व वसतं!
टाईम मॅनेजमेंटचं,
गणित तिथेही असतं!

अवघा एक मिनिटाचा सिग्नल,
त्यात चाले जीव तोडून लगबग!
एक एक सेकंदाचे मोल इथे,
वीतभर खळगीसाठी दगदग!

कुणी विकतो गजरे,
कुणी सोनचाफा माळ!
कुणाचे उडणारे फुगे,
कुणा झोळीत रडणारे बाळ!

अर्ध लक्ष गिऱ्हाईकाकडे,
अर्ध लक्ष काउंटडाऊनवर!
जोरदार घासाघीस चाले,
रोजरोजची तीच ती मरमर!

शानशौकीत जगणाऱ्यांना,
ही सारी कस्पटेच वाटतात!
ऊन पावसात धंदा करणारे,
सिग्नलवर रोजच झटतात!

रोज भरणार हा बाजार,
सोडवतो हजारोंची रोजीरोटी!
एक मिनिटाच्या व्यवहारातून,
शिकावी टाईम मॅनेजमेन्टची कसोटी!

**श्री आशिष बिवलकर** - बदलापूर मो.
9518942105

## ई-अभिव्यक्ती (मराठी) सम्पादक मंडळ



सौ. उज्ज्वला केळकर




श्री सुहास रघुनाथ पंडित



सुश्री मंजुषा सुनीत मुळे



सौ. गौरी गाडेकर






e-abhivyakti

नि:शुल्क